# १

# जिल्हा प्रशासन- भाग-I

**प्रकरणाची रूपरेषा**

**१.१** पाठची उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ जिल्हा प्रशासनासंबंधी मूलभूत संकल्पना

१.४ जिल्हा प्रशासन उगम व स्वरूप

१.५ जिल्हा प्रशासनाची तत्वे

१.६ जिल्हा प्रशासनाची उद्दिष्टे

१.७ स्वातंत्र्यापूर्व जिल्हा प्रशासन.

१.८ समारोप

१.९ स्वाध्याय

१.१० संदर्भग्रंथ

## १.१ पाठची उद्दिष्टे

- जिल्हा प्रशासन या संकल्पनेचा अर्थ समजून घेणे.
- जिल्हा प्रशासनाचा उगम व विकास जाणणे.
- भारतातीलग्रामीण प्रशासनाचे स्वरूप समजून घेणे.
- जिल्हा प्रशासनाची मागिलतत्वे उदिष्टे समजून घेणे.
- जिल्हा प्रशासनाच्या विकासाचा आढावा घेणे.
- इंग्रजी राज्याच्या पूर्वीची परिस्थिती पुनरावलोकन.

## १.२ प्रस्तावना

भारतात अति प्राचीन काळापासून प्रशासनाचा घटक म्हणून जिल्हा महत्त्वाचा मानला गेलेला आहे.भारताच्या इतिहासात निरनिराळ्या राजवटीमध्ये जिल्ह्याला वेगवेगळ्या



munotes.in

नावाने संबोधल गेले आहे.प्रशासनासाठी अत्यंत सोयीचा घटक म्हणून जिल्ह्याला महत्त्व आहे. राज्यकारभारात एक विशिष्ट भूभाग म्हणून जिल्ह्याचे महत्त्व व उपायुक्तता अनन्यसाधारण आहे. लोकासंबधी प्रशासनविषयक अनेक कामे पार पाडणारा जिल्ह्या एक महत्त्वपूर्ण घटक आहे.

राज्यकारभाराच्या सोयीसाठी देशाच्या भौगोलिक क्षेत्राची प्रशासकीय घटकांमध्ये विभागणी करण्यात येत असून भारतात ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीच्या नियंत्रणाखालील बंगाल प्रांताची २४ जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली. १८२७ साली मुंबई प्रांताची १० जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली.

आज महाराष्ट्र राज्याची ३६ जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात आली असून जिल्हा प्रशासन ग्रामीण प्रशासनाची यंत्रणा समजली जाते.प्रशासनाच्या सोयीसाठी जिल्ह्याची उपविभागात आणि उपविभागाची तालुक्यात विभागणी करण्यात येते.प्रत्येक तालुक्यात १०० किंवा अधिक गावांचा समावेश करण्यात आला आहे.

मुघल बादशहा अकबरांच्या साम्राज्यातही जिल्ह्याचा उल्लेख करण्यात आला आहे.इंग्रज काळातही क्षेत्रीय प्रशासनात जिल्ह्याला प्राधान्य दिलेले आहे.आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळातही **जिल्हा** हा प्रशासनाचा घटक म्हणून कायम आहे.

खेडयांचा विकास म्हणजे एकूण भारतीय समाजाचा विकास हे स्वर्गीय महात्मा गांधीचे स्वप्न, हे स्वप्न प्रत्यक्षात साकारण्यासाठी स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विविध प्रयत्न करण्यात आले.वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनेतून या विकासासाठीआधिक फंडाची तरतूद करण्यात आलेली आहे.पंचायत राजच्या माध्यमातून विकासयोजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करण्यात आले आहे. ग्रामीण विकासाच्या विविध कार्यक्रमांचा निधी जिल्हा स्तरावरील यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात आला, आणि त्याच्या विनियोगाद्वारे ग्रामीण विकासाला चालना मिळत गेली.

भारतात पंचवार्षिक योजनाना १९५१ साली सुरुवात झाली.या पंचवार्षिक योजनेत मुख्यतः सामूहिक विकास कार्यक्रमांवर भर देण्यात आलेला होता. परंतु या पंचवार्षिक योजनेत पाहिजे तेवढे ग्रामविकासाचे कार्य होऊ शकले नाही व म्हणून या योजनेतील अडचणी दूर सारण्याच्या दृष्टीकोनातून दुसरी पंचवार्षिक योजना आखताना सर्वागीण ग्रामविकासाचे कार्य करण्यासाठीअधिकसक्षमयंत्रणाअसावी, असा विचार पुढे आला. त्याकरिता जानेवारी १९५७ मध्ये बलवंतराय मेहतायांच्या अध्यक्षतेखालील समिती नेमण्यात आली. या समितीत, फुलसिंग, बी.जी.राय, हे सभासद होते.या समितीने देशाच्या सर्व राज्यांत जाऊन लोक स्वयंप्रेरणेने समाज विकास कार्यात का सहभागी होत नाहीत या कारणांचा मागोवा घेतला.२४ नोवेंबर १९५७ रोजी ऐतिहासिक अहवाल सादर करून राज्यसरकारच्या विकास कार्याचे लोकशाही विकेंद्रीकरण करावे, अशी समितीने शिफारस केली.

बलवंतराय मेहता समितीने सतेचे लोकशाही विकेंद्रीकरण प्रत्यक्षात उतरविण्यासाठी त्रिसूत्री योजना सुचविली. ती त्रिसूत्री योजना म्हणजे पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत

होय. १२ जानेवारी १९५८ रोजी राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत मेहता समितीने केलेल्या शिफारशी मंजूर करण्यात आल्या. १९५२ साली हैद्राबाद येथे भरलेल्या स्थानिक स्वराज्य सरकारच्यामध्यवर्तीमंडळाने लोकशाही विकेंद्रीकरणास पाठिंबा दर्शविला. लोकशाही संस्थामार्फत विकेंद्रीकरण प्रक्रियेला चालना मिळून आपल्या देशात २ ऑक्टोबर १९५८ रोजी राजस्थान आणि १ नोव्हें १९५८ रोजी मध्यप्रदेश या राज्यांनी पंचायती राज संस्थांची स्थापना केली.बयाच राज्यात पंचायत राजची वाटचाल सुरू झाली.१ मे १९६० रोजी मुंबईसह मराठी भाषिकप्रदेश म्हणून महाराष्ट्र राज्याची स्थापना करण्यात आली.

## १.३ जिल्हाप्रशासन मूलभूत संकल्पना

ऑक्सफोर्ड शब्दकोशाप्रमाणे "ज्याठिकाणी विशेष प्रकारचे प्रशासकीय कार्य होते असा भूभाग म्हणजे जिल्हा होय". तर प्रशासन म्हणजे कार्याचे व्यवस्थापन होय.म्हणजेच ज्या विशिष्ट भूभागात त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या कार्याचे व्यवस्थापन होतअसते, त्या व्यवस्थापनाला जिल्हा प्रशासन म्हणतात.

लोककार्यअथवाविकासकायद्याशिवाय करता येत नसून, असे कायदे संबंधित देशाची सार्वभौम सत्ता करते.संसदीय लोकशाही पद्धतीत कायदे करण्याचा अधिकार संसदेला असतो.भारतात कायदे करण्याचा अधिकार संसदेला आणि राज्य विधिमंडळाला आहे. लोकशाहीमध्ये व्यक्ती आणि शासनाचे संबंध निकटचे असून शासनाला व्यक्ती आणि मानवी विकासाची अनेक कार्य करावी लागतात, यामुळेच आधुनिक काळात जन आणि शासनयांचे संबंध फार निकटचे झालेले आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासन करते.

जिल्हा प्रशासनातही लोककार्याच्या विविध पैलूंचा विचार होत असून वास्तविक पाहता याअंतर्गत शासनाच्या कोणत्या कार्याचा समावेश प्रशासनात करण्यात यावा याबदल मात्र विचारवंतांत दुमत आहे. काही विचारवंतांनी केवळ कार्यकारी मंडळाच्याच कार्याला प्रशासन म्हणावे असे सुचविले आहे.तर काहींनी शासनाच्या तिन्ही विभागांच्या कार्याला प्रशासनाचे कार्य मानले आहे.प्रत्येकाने आपल्या सोयीप्रमागे प्रशासनाची व्याख्या केली आहे.जिल्हा आणि प्रशासन या दोन शब्दांवरून आपल्याला जिल्हा प्रशासनाची पुढीलप्रमाणे व्याख्याकरता येईल.

**'जे प्रशासन जिल्हा च्या विशिष्ट भूभागातलोकप्रशासनाचा एक भाग मणून प्रशासकीय कार्य करते त्या प्रशासनाला जिल्हा प्रशासन असे म्हणतात.'**

**"जिल्हा प्रशासन म्हणजे विशिष्ट भूभागात वास्तव्यास असलेल्या लोकांच्या विकासासाठी उपलब्ध साधन-संपत्तीची केलेली जुळवाजुळव होय."---** डॉ.**बी.एच. बारी**

**एस.एस. खेरा** यांनी जिल्हा प्रशासनाची केलेली व्याख्या,"**सार्वजनिक व्यवहारांचे त्याच उद्देशाने निर्माण करण्यात आलेल्या भू-प्रदेशातील व्यवस्थापन म्हणजे जिल्हा प्रशासन होय."**

अशा प्रकारे “जिल्हाप्रशासन” या संकल्पनेच्या व्याख्यामधूनजिल्हा हा एक महत्त्वपूर्ण घटक आहे हे स्पष्ट होते.

आजच्या जिल्हा प्रशासनात शासनाच्या सर्व यंत्रणा, प्रशासकीय अधिकारी, सनदी नोकर आणि इतर अनौपचारिक संघटना, तसेच निमसरकारी संघटना यांचा समावेश करण्यात येतो.त्याचबरोबर स्थानिक स्वायत्त संस्था, विविध सल्लागार समित्या इ. समावेश जिल्हा प्रशासनात होतो. अशा प्रकारे नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने सुरू केलेल्या प्रक्रियेची जाणीव करून देणारा जिल्हा हा केंद्रबिंदू आहे.

## १.४ जिल्हा प्रशासन उगम व स्वरूप

**जिल्हा प्रशासनाचा उगम:**१८५८ सालापूर्वी जिल्हा प्रशासन भारतात अस्तित्वात नव्हते

❖ . पूर्वीच्या काळात भारतातराजे लोकांचा काळ होता, आणि प्रत्येक राजा आपल्या मर्जीप्रमाणे कार्य करीत असे. सर्वातपहिल्यांदा लॉर्ड बेन्टिगने १८२८-१८४५ या काळात भारताची आर्थिक परिस्थिती, दळणवळण व्यवस्था, शेती आणि समाज सुधारण्यासाठी येथील अधिकाऱ्यांनी लेखन करावे असे विचार मांडले, मात्र आर्थिक आणि शैक्षणिक अडचणीमुळे त्यांच्या प्रयत्नाला यश आले नाही. लॉर्डमेकॉलेच्या काळात १८३५ च्या पुढे पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार भारतात करण्यात आला. १८५७साली मद्रास, मुंबई आणि बंगाल येथे तीन विद्यापीठे उघडण्यात आली, जिल्हा प्रशासनात कलेक्टर आणि डेप्युटी कलेक्टर पद निर्माण करण्यात आले. या अधिकाऱ्यांना विभागीयआयुक्तांच्या अधीन काम करावे लागत असे. १८२९ साली भारतात विभागीय आयुक्ताची नियुक्तीकरण्यात आली.ईस्ट इंडिया कंपनीच्या काळात कलेक्टरला जिल्हा प्रशासनाचे कार्य देण्यात आले. त्या काळातपोलीस यंत्रणेलासुद्धा जिल्हाधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली कार्य करावे लागत असे. पोलीस यंत्रणा हा वेगळा विभाग म्हणून १८६१ साली देण्यात आला. तसेच शिक्षण आणिसार्वजनिक बांधकाम विभाग १८५५ साली, फॉरेस्ट विभाग १८६१ साली, शेती आणि राजस्व विभाग १८७१ साली उघडण्यात आले. कलेक्टरच्या अधिकारात कपात करून विशेषतज्ज्ञ प्रशासकांना त्यांच्या खात्याचे काम देण्यात आले.

लॉर्ड रिपनच्या योजनेअंतर्गत समाजकल्याण कार्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनाला देण्यात आली.कंपनीच्या चार्टर सेंक्ट १८३३ प्रमाणे प्रांतीय सरकारांना केंद्रीय सरकारचे एजन्टकरण्यात आले.त्यामुळे जिल्हा प्रशासनाचे महत्त्व वाढले.

१) **बंगाल प्रारूप**

बंगाल प्रारूप पद्धती, जिल्हा प्रशासन भाडेपट्टीने घेतलेल्या जमीनदारी पद्धतीवर आधारित होती.ऐतिहासिक परिस्थिती आणि राजकीय सत्तीवर हे प्रशासन आधारित होते.लॉर्ड कॉर्नवालिस यांनी १७९३ साली जमीन महसुलासंबंधिस्थायी करार केले.हेकरार जमीनदारांबरोबर करण्यात आले होते.

२) **मद्रास प्रारूप**

रचनात्मकदृष्ट्या १७७२ साली लॉर्डहेस्टिंगने बंगालमध्ये सुरु केलेले जिल्हा प्रशासन, मद्रासमध्येही सुरु करण्यात आले.स्थानिक परिस्थितीनुसार त्यात बदल करण्यात आला.प्रेसिडन्सीला जिल्ह्यात विभागण्यात आले.त्यांना तहसीलदाराच्या अधीन ठेवण्यात आले.जिल्ह्यामध्ये युरोपियन कलेक्टरची नेमणूक करण्यात आली.त्याला न्याय करण्याचे,मेजिस्टिरियल आणि पोलीसचे कार्यही देण्यात आले.१७८६ साली स्थापित झालेल्या 'बोर्डऑफ रेव्हिन्यू' व कलेक्टर रेझिन्यूच्या कामाबद्दल जबाबदार असे.१८०३ च्या कायद्याने कलेक्टरच्या कार्य आणि जबाबदार्याचे विवेचन लॉर्डक्लाईव्हच्या काळात स्पष्ट केले.१८१६साली एक नवीन कायदा करण्यात आला.गावच्या मुख्याला मुन्सीफ म्हणून ओळखण्यात आले.त्याला काही नागरी आणि फौजदारी कार्येही देण्यात आली.कलेक्टरला मेजिस्टिरियल आणिपोलीसांवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य देण्यात आले.

३) **बॉम्बे प्रारूप**

ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरतमधील फैक्टरीने बॉम्बे प्रारूपची नोंद ठेवली.एकअध्यक्षआणि काही सदस्य मिळून प्रशासनाचे कार्य करीत असत.१९व्या शतकाच्या सुरुवातीच्याकाळात बॉम्बे प्रेसिडेन्तीच्या कार्याला सुरुवात झाली.१८१८ साली माउंट एलफिन्स्टनची डेक्कनध्या कमिशनरपदी नियुक्ती झाली.डेक्कनमधील जिल्यात शेतकरी राहत असे.पेशव्यांच्या काळातील प्रशासनामुळे राजस्व पद्धती क्षीणझाली होती.त्या काळात जिल्ह्याच्या रेव्हिन्यू अधिकाद्याला मामलेदार म्हणून संबोधण्यात येई. मराठा राजवटीत सरकारचे नियंत्रण मामलेदारामार्फत होत असे.एलफिन्स्टनने वांशिक अधिकार मान्य केले.त्यांनी लोकांना जहांगिरी दिल्या.पेन्शनस् दिली.तसेच धार्मिक स्थळेसुद्धा बहाल केली, त्यांचे कार्य नाना फडणीसांसारखेच होते, त्यांनी भारतीय अधिकाऱ्यांना राजस्व, तसेच न्यायदानाचे कार्य दिले.त्यांच्या मताप्रमाणे कलेक्टरने लोकांना भेटून त्यांच्या अडचणी समजून घ्यायला पाहिजेत, असे होते.१८२७ च्या बॉम्बे कोडाप्रमाणे कलेक्टरला खालील अधिकार देण्यात आले.

अ) जमिनीचे सर्व तंटे सोडविण्याचे अधिकार

ब) रस्ते आणि पाणी वापरल्यामुळे उद्भवलेले सर्व प्रश्न

क) सरहदीचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे.

त्याने पहिल्यांदा पोलीस कार्य, मेजिस्टिरियल कार्यासंबंधी पथक केले.१८३८ साली बंगाल सरकारले एक आयोग नेमला.पोलीस यंत्रणेच्या सुधारांसंबंधी या आयोगाने अनेक सुझाव दिले मात्र सनदी नोकरांनी त्याची अंमलबजावणी केली नाही.

१८४३ साली सिंध प्रांतात सर वाल्स नेपियरने स्वतंत्र पोलीस यंत्रणेची स्थापना केली.त्याच्या कार्याने प्रभावित होऊन १८५३ साली सर जॉर्ज क्लर्स यांनी तेच प्रारूप बॉम्बेसाठी स्वीकारले.या व्यवस्थेत एका पोलीस अधीक्षकाची नेमणूक करण्यात आली. जे जिल्हा

मैजिस्ट्रेटच्या अधीन कार्य करीत असे.तहसील पातळीवर भारतीय पोलीस अधीक्षकाला काम देण्यात आले.जिल्हा प्रशासनाचे विविध पैलू आहेत. त्यातील काही महत्त्वपूर्ण पैलूचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे.

**जिल्हा प्रशासन स्वरूप**

१) **जिल्हा प्रशासन, भारत सरकार व राज्य सरकार यांची क्षेत्रीय यंत्रणा.**

कर्मचारी संस्था(Staff agencies) सहाय्यक अभिकरणे (Auodilary Agencies) आणि पंक्ती अभिकरणे हे लोक प्रशासनाचे तीन प्रमुख घटक आहेत. जिल्हा प्रशासन हे एक पंक्ती अभिकरण आहे.कारण शासकीय धोरण व कार्यक्रमांची कार्यवाहीकरणारी क्षेत्रीय यंत्रणा (Field Agency) असे त्याचे स्वरूप आहे.जिल्हा प्रशासन क्षेत्रीय प्रशासनाचा सोयिस्कर घटक आहे.कारण मुख्यालयात निर्धारित धोरण व कार्यक्रमांची प्रत्यक्षकार्यवाही जिल्हा प्रशासनाद्वारे करण्यात येते. प्रशासनाच्या घटक विभागाचा लोकांशी प्रत्यक्ष संबंध/संपर्क असल्याने शासकीय धोरणातील त्रुटी सर्वप्रथम त्यांच्या निदर्शनास येतात. शासकीय धोरणाविषयीची गा-हाणी आणि त्या विषयीचे पर्यायी प्रस्ताव जिल्हा प्रशासनासमोरच मांडलेजातात. जिल्हा प्रशासन जनतेच्या तक्रारी आणि प्रस्ताव शासनास सादर करते.

जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकार व जबाबदार्याचे विकेंद्रीकरण करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात १७७३ साली झाली.भारत सरकार आणि राज्य सरकार यांची लहान प्रतिकृती असे जिल्हा प्रशासनाचे स्वरूप आहे.कारण भारत सरकार व राज्य सरकारच्या प्रत्येक विभागाची क्षेत्रीय यंत्रणाजिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात राजकीय विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सुरू झाली.पंचायती राजच्या स्थापनेद्धारा लोकशाही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली.जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना स्थानिक स्वरूपाच्या विकासविषयक बाबींची जबाबदारी सोपविण्यात आली. १९९२ च्या घटना दुरुस्तीने जिल्हा आणि त्यापेक्षा कनिष्ठ स्तरावर असणाऱ्या म्हणजेच तालुका आणि गाव स्तरावरील स्थानिक शासन संस्थांना शासकीय यंत्रणेतील तिसरे स्तर अशी मान्यता दिली. आर्थिक विकेंद्रीकरणाची प्रक्रिया १९९२ साली जिल्हा नियोजनाचे तत्त्व स्वीकारून कार्यान्वित करण्यात आली.जिल्हा नियोजन आणि विकास समिती भारतातील बहुस्तरीय नियोजनाचे प्राथमिक स्तर आहे.अशा प्रकारे जिल्हा प्रशासन, भारत सरकार व राज्य सरकार यांची क्षेत्रीय यंत्रणा स्थापन करण्यात आली.

munotes.in

**जिल्हा ग्रामीण अर्थकारण आणि राजकारणाचा केंद्रबिंदू**

प्रा. ब. म. सिरसीकर यांच्या मते, जिल्हा परिषद आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ही ग्रामीण राजकारणाची सत्ताकेंद्रे आहेत. ग्रामीण राजकारण आणि अर्थकारणाची दिशा जिल्हा स्तरावर निर्धारित होत असते. स्वातंत्र्योत्तर कालावधीतआर्थिक विकास घडवून आणणाऱ्या नऊपंचवार्षिक योजना पूर्ण करण्यात आल्या. ग्रामीण विकासाच्या विविध कार्यक्रमाचा निधी जिल्हास्तरावरील यंत्रणेस उपलब्ध करून देण्यात आला, आणि त्याच्या विनियोगाद्वारे ग्रामीण विकासाला चालना मिळाली. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि जिल्ह्यातील अन्य सहकारीसंस्था विकास प्रक्रियेला हातभार लावतात. अशा प्रकारे ग्रामीण अर्थकारणाची दिशा स्तरावर निर्धारित होत असते.

महाराष्ट्र राज्यात पंचायती राज व्यवस्थेची स्थापना १९६२ साली करण्यात आली.पंचायती राज व्यवस्थेअंतर्गत जिल्हा परिषदेवर सर्वाधिक महत्त्वाची भूमिका सोपविण्यात आली.त्यामुळे जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर स्थानिक नेतृत्वाचा उदय झाला. जिल्हा परिषद हे सत्ताकेंद्र असल्यामुळे राजकारणातील प्रत्येकमहत्त्वाकांक्षी व्यक्ती, त्यांचे गट आणि राजकीय पक्ष जिल्हा परिषद काबीज करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून राजकीय स्पर्धा, गटबाजीचे राजकारण, जातीय राजकारण उत्तरोत्तर क्षीण होत गेले. त्याचा परिणाम म्हणजे राजकीय अस्थैर्य निर्माण झाले आणि त्याचा अनिष्ट परिणाम ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेवर झाल्याचे दिसून येते.

**२) ग्रामीण विकासाची प्रमुख यंत्रणा**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकसहभाग घडवून आणण्याच्या उद्देशाने १९५८ साली सामूहिक विकास कार्यक्रम आणि १९५९ साली लोकशाही विकेंद्रीकरणाची कार्यवाही करण्यासाठी पंचायती राज व्यवस्थेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण विकासाच्या नियोजन कार्यक्रमांची कार्यवाही जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येते.१९७० च्या दशकात ग्रामीण दारिद्रय आणि बेरोजगारी निर्मूलनाचे विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले.या कार्यक्रमांच्या कार्यवाहीत सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने १९८० साली जिल्हा ग्रामीण संस्थेची स्थापना करण्यात आली. या व्यतिरिक्त बहुस्तरीय नियोजनाच्या अंतर्गत जिल्हा नियोजन आणि विकास समितीची १९८२ साली स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे पंचायती राज संस्था, जिल्हा ग्रामीण विकास संस्था आणि जिल्हा नियोजन आणि विकास समितीवर जिल्हा स्तरावरील यंत्रणे द्वारा ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबविले जातात, म्हणजेच ग्रामीण विकास आणि त्यासाठी केल्या जाणाचा नियोजनाचा केंद्रबिंदू जिल्हा प्रशासन आहे.

## १.५ जिल्हा प्रशासनाची तत्वे: (Principles of District Administration)

कार्यक्षमप्रशासनसाठी प्रशासनाला तत्त्वांचा आधार असावा लागतो.तत्वाची अंमलबजावणी योग्य त-हेने होणे आवश्यक आहे.योग्यअंमलबजावणीसाठी तत्वांना मान्यता प्राप्त करून देणे, आणि ती व्यवहारात आणणे आवश्यक आहे.लोकप्रशासन हे जनतेच्या हितासाठी असते आणि म्हणूनच कल्याणासाठी या तत्वांचा उपयोग होत असतो.

(१) संसूचन (Communication):प्रशासनात संसूचनास फार महत्व असते. त्यासाठी संसूचनाचीआखणी योग्य प्रकारे झाली पाहिजे.संघटनेत काम करीत असताना संघटनेतील सर्व घटकांमध्ये संसूचनाचे माध्यम योग्य प्रकारे ठरविले गेले पाहिजे.संसूचना संबंधित अधिकारी वर्गात ते स्पष्ट असले पाहिजे. तांत्रिक अधिकारी आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निर्देश घेईल किंवा जिल्ह्यातील अधिकारी वर्ग जिल्हाधिकारी यांकडून मार्गदर्शन घेईल याची स्पष्टता असली पाहिजे.

(२) अधिकार सुपूर्द करणे(Delegation of Authority):प्रशासनाचे कार्य सतत वाढत असते. अशा वेळी कामाची पुनरावृत्ती होऊ नये, या हेतूने अधिकारी वर्गामध्ये सत्ता अथवा अधिकारांचे वाटप केले जाते.जेव्हा हे अधिकारी सुपूर्द करण्यात येतात तेव्हा अधिकाराबरोबर जबाबदारीसुद्धा सोपविली जात असते.

(३) उत्तरदायित्व (Accountability):उत्तरदायित्व हा प्रशासनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. उत्तरदायित्वामुळे संघटनेत नियंत्रणाला महत्त्व प्राप्त होते.नियंत्रणाशिवाय कोणतीही संघटना योग्यप्रकारे कार्य करू शकत नाही.निरंकुश प्रशासनात गोंधळ जास्त होत असतो.त्यामुळे बळी तो कान पिळीची परिस्थिती निर्माण होत असते.अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी प्रशासनाला कायद्याचा आधार असणेआवश्यक आहे.कायदे, नीतिनियम, रूढी-परंपरा, चालीरीती यासारख्या गोष्टी लिखित स्वरूपात असणे योग्य असते.लिखित नियमांमुळे योग्य प्रकारे नियंत्रण ठेवता येते.त्याचप्रमाणे उत्तरदायित्व स्वीकारता येते.

(४) निश्चित स्वरूपाचे कार्यक्षेत्र (Specific Jurisdication):प्रशासनाचे कार्यक्षेत्र हे निश्चित स्वरूपाचे असले पाहिजे. प्रशासनाला त्याचे निश्चित अधिकार व त्याच्या मर्यादा यांची जाणीव असली पाहिजे.संलग्न खात्यांना आपल्या परस्पर संबंधाची जाणीव असली पाहिजे.

(५) स्पष्ट उदिष्टे: प्रशासनातील प्रत्येक खात्याची उदिष्टे स्पष्ट असली पाहिजेत आणि उदिष्टे प्राप्तीसाठी ज्या पद्धतीचा वापर केला जाईल तीसुद्धा स्पष्ट असावयास हवीत. अशा प्रकारच्या स्पष्टतेमुळे प्रशासकीय संघटनेची कार्यक्षमता वाढते.

(६) सेवकवर्गाचे महत्व: प्रत्येक संघटनेत सेवकवर्ग असतो. काम करणे अथवा काम न करणे हे सेवकवर्गावर अवलंबून असल्यामुळे संघटनेचे खरेखुरे भवितव्य याच्यावरच अवलंबून असते.हा सेवकवर्ग कोणत्याही समाजाचा एक महत्त्वपूर्ण घटक असतो. लोकप्रशासनाचा मुख्य हेतू जनकल्याण असतो. प्रशासनाच्या कार्याचा लोकहिताशी

munotes.in

संबंध लावणे हे आवश्यक असते.सेवकवर्ग ही महत्वाची भूमिका बजावण्याचे कार्य आपल्या हाती घेत असतो.

(७) प्रशासकीय कार्य व ती करण्याची पद्धती देशातील प्रचलित कायद्यांवर आधारित आणित्याला पूरक असली पाहिजे.

(८) प्रशासकीय कार्य व कार्यपद्धती देशाच्या नैतिक आचारसंहितेशी जुळणारी असली पाहिजे.

(९) नोकरशाहीत कामकाजाची फाजील चाकोरी (Red-Tape), पक्षपात (Favourism)यासारख्या दोषरूप

गोष्टी प्रशासनात अडथळे निर्माण करीत असतात, त्यावर अंकुश हवा.

(१) प्रशासकीय कार्य सत्तारूढ सरकारच्या ध्येयधोरणावर आधारित असले पाहिजे.

(११) लोकप्रशासनातील वेगवेगळ्या संघटनांचे कार्य एकमेकांशी पूरक असले पाहिजे.

(१२) सत्ता आणि अधिकारांची योग्य सांगड घातली पाहिजे.

## १.६ जिल्हा प्रशासनाची उद्दिष्टे:

कल्याणकारी राज्य भारतात संविधानाद्वारे प्रस्थापित उदिष्टे साध्य करण्याचे जिल्हा प्रशासन प्रभावी माध्यम आहे.स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुभाव ही **तत्वे** भारताच्या संविधानाच्याउद्देश पत्रिकत नमूद करण्यात आली आहेत, ही उदिष्टे साध्य करण्यासाठी, करण्यात येणारे कायदे, शासकीयधोरण आदर्श असून चालणार नाही, त्यांचे यश किंवा अपयश त्यांच्या कार्यवाहीवर अवलंबून असते. जिल्हा प्रशासनाने निष्ठापूर्वक शासकीय धोरणे आणि कार्यक्रम राबविले तरच कल्याणकारी राज्याचे उदिष्ट साध्य होऊ शकेल.

१) नागरिकांना संविधानानुसार मिळालेल्या मूलभूत अधिकारांची जोपासना करणे.त्यासाठी जिल्ह्याच्या अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखणे.

२) कल्याणकारी राज्याचे उदिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक निधी असणे आवश्यक आहे.जिल्हा प्रशासन शासनाला देय असलेल्या महसुलाची आकारणी व वसुली करते.तसेच विकासाच्या विविध कार्यक्रम व प्रकल्पांची अंमलबजावणी करून देशाच्या विकासालाहातभार लावते.

३) अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या पाच मुलभूत घटकांची पूर्तता करणे.त्यासाठी जिल्हा प्रशासन दारिद्र्यनिर्मूलन आगि किमान गरजांची पूर्तता या कार्यक्रमांची कार्यवाही करतो.

४) सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांचा विकास करणे, आदिवासी विकास उपाययोजना आणि अनुसूचित जाती

munotes.in

वजमाती आणि मागासवर्गीयांच्या विकासाच्या विशेष कार्यक्रमांची जिल्हा प्रशासनअंमलबजावणी करते.

५) कृषी विकास हा ग्रामीण विकासाचा पाया आहे.जिल्हा प्रशासन कृषी विकास, मृदसंधारण, जलसंधारण आणि तत्सम कार्यक्रमांची कार्यवाही करते.प्रयोगशाळांमध्ये विकसित तंत्रज्ञान जिल्हा प्रशासन शेतकर्यापर्यंत पोहोचविते.तसेच दुष्काळ, अतिवृष्टी, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात संकटग्रस्त लोकांसाठी मदत कार्य हाती घेते.

६) विकास प्रक्रियेत लोकसहभाग घडवून आणणे या उदिष्यंच्या पूर्ततेसाठी जिल्हा प्रशासन सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देते. ग्रामसभांना मार्गदर्शन करते आणि त्यांच्या विकास प्रकल्पावर शासकीय अर्थ सहाय्य उपलब्ध करून देते

## १.७ स्वातंत्र्यापूर्व जिल्हा प्रशासन:

### ❖ इंग्रज साम्राज्याच्यापूर्वीची परिस्थिती

इंग्रजांच्या पूर्वीच्या काळात जमीनदार लोकांचा एक वेगळा वर्ग होता, त्यात सरदार ज्यांचा संबंच उच्च कुळाशी होता.जमीनदार वा सरदार लोकांना राजस्व गोळा करण्याची जबाबदारी राजे लोक देत असत.तसेच त्यांच्या भागात शांतता ठेवण्याचे कार्यही त्यांना करावे लागत असे.या वर्गाचा संबंध जुन्या राजघराण्यांशी असायचा किंवा ते त्या भागात वर्चस्व ठेवणारे लोकअसायचे.एक ठराविक रक्कम ते लोक सरकारी कोषागारात भरीत असत.असा प्रकार मुघल प्रशासनात प्रचलित होता.जास्त प्रमाणात असे लोक वंशानुवंश हे काम करीत असत.अशा लोकांना जानकर म्हणून संबोधिले जाई. अशा कामामुळे त्यांना एक सामाजिक दर्जा प्राप्त होत असे.जमीनदार वर्ग अर्धसरकारी कर्मचारी म्हणून काम करीत असत.जिल्ह्याचा कार्यकारी अधिकारी, ज्याला 'फौजदार' म्हणून ओळखला जाई. त्यांच्या देखरेखीखाली जमीनदार लोक काम करीत असत.शांतता राखण्यासाठी जमीनदार लोकांकडे त्या काळी हत्यार असायचं.तसेच काही लोकही त्यांचे नोकर म्हणून कार्य करीत असत.त्यांच्या व्यतिरिक काही शेतकरीही जमीन महसूल गेला करीत असत.मात्र त्यांचा दर्जाअनुवांशिक जमीनदारापेक्षा खालचा होता.मात्र फौजदाराजवळ कार्यात्मक दर्जा दोघांप्रमाण होता.जिल्हा प्रशासनात दोघांना आपापल्या क्षेत्रात पोलीसांचे कार्य करावे लागत असे.जिल्हयाच्या प्रमुख महसूल अधिकाऱ्याला त्या काळात अमलगुजार किंवा आमील म्हणून ओळखण्यात येत असे. त्याचे काम प्रामुख्याने पडीक जमिनीला शेतीसाठी उपयोगी करुन शेतकऱ्याच्या हिताचे रक्षण करावयाचे होतेज्यामुळे नैसर्गिक आपत्तीतून लोकांना वाचविण्यात मदत होते असे, अशी त्याला मर्यादित स्वरूपात कार्यकारी कामे देण्यात आली होती. काही प्रमाणात तो विवादही सोडविण्याचे कार्य करीत असे.या अधिकाऱ्याला मुघल साम्राज्यात जिल्हा प्रशासनात महत्त्वाचे स्थान नव्हते.मुघल काळात जिल्ह्याच्या प्रशासनाची जबाबदारी 'नाजीम' या अधिकाऱ्याला देण्यात आली होती.तो 'दिवाण'च्या सहकार्याने काम करीत असे.त्या काळात अधिकारी आणि नेत्यांना वेगवेगळे

munotes.in

ठेवण्यात आले होते.जिल्हयातील नोकरशाही ज्याचा आधार सेना आणि वित्त होता.त्याच्या अभावामुळे विस्कळीत झाली आणि नंतरजमीनदार लोकांची स्वतंत्र म्हणून घोषणा केली.

❖ **ईस्ट इंडिया कंपनीचे कार्य :**

१७६५ साली राजकीय अस्थिरतेच्या वातावरणात ईस्ट इंडिया कंपनीने मुगल बादशाह शहा आलमकडून बंगाल, बिहार आणि ओरिसाची दिवाणी घेतली.या दिवाणीमुळे ईस्ट इंडिया कंपनीला जिल्ह्यातील नागरी प्रशासनाचे अधिकार मिळाले.सुरुवातीच्या काळात या कंपनीने 'जैसे थेची भूमिका स्वीकारली. नंतर मात्र त्यांनी युरोपियन लोकांची पर्यवेक्षक म्हणून नियुक्तीकेली आणि वॉरन हेस्टिंगच्या काळात १७७२ साली या पर्यवेक्षकांना कलेक्टर' म्हणून मनोनितकरण्यात आले. त्यांच्या कार्यात बदल करण्यात आला नाही.जुनी व्यवस्था तालुक्यात आणि जिल्ह्यात प्रचलित राहिली.१७७३ साली संसदीय समितीच्या अहवालात हे मान्य करण्यात आले की, जमीनदार आगि तत्सम वर्ग आपले वर्चस्व टिकविण्यात यशस्वी झाले.हेस्टिंग यांनीबंगाल, उर्दू आणि परशियन भाषा अवगत केली, त्यामुळे लोकांचे प्रश्न त्याला कळू लागले.तो आपल्या विचारात स्पष्ट होता.तो होशियार होता.प्रशासनाचे डावपेच त्याला माहीत होते.यासाठी गरीब शेतकर्यासाठी काहीतरी चांगले कार्य करावे, अशी त्याची इच्छा होती.मात्र त्याचे सर्व सल्लागार त्याच्या विचारांशी सहमत नव्हते.यासाठी तो काहीही करू शकला नाही.१७८६ साली वॉरन हेस्टिंगची जागा जैकपरोनने घेतली.कंपनीच्या नोकरांनी जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार सुरु केले.कंपनीच्या नोकरांनी जमीनदारांना उसने पैसे देण्याचे कार्य सुरु केले आणि सरकारमध्ये त्यांच्या हिताच्या रक्षणाची जबाबदारीही स्वीकारली.सरकारला नोकरशाहीच्या भ्रष्टाचाराला कमी करण्यात अपय आले. १७९३ साली भारतीय न्यायाधीश ज्याला 'मुनसिफ' म्हणून ओळरण्यात येत असे, याची नेमणूक करण्यात आली.१८२१ साली एक कायदा करण्यात आला.या कायद्यानुसार गव्हर्नर-जनरलला कलेक्टर किंवा तत्सम रेव्हिन्यू मैजिस्ट्रेटचे अधिकार देण्याची मुभा देण्यात आली.

सर थॉमस मनरोनी यांनी या अधिकाराचे समर्थन केले आणि त्या काळातील भारतीय राजकीय परिस्थितीसाठी ते पोषक राहिले असे मत व्यक्त केले जाते.१८३१ साली बेन्टिग सरकारनेसुद्धा त्याचे समर्थन केले, आणि त्या काळातील भारतीय राजकीय परिस्थितीसाठी तेपोषक राहिले असे मत व्यक्त केले.१८३१ साली बेन्टिग सरकारनेसुद्धा त्याचे समर्थन केले.बेन्टिगच्या मताप्रमाणे जमिनीची नोंद व्यक्तिगत ठेवण्यात मदत करील, तसेच शेतीचाही विकास होऊ शकेल. प्रशासनाच्या आधुनिकीकरणात सुद्धा बेन्टिगने प्रयत्न केले.ज्यामुळे सरकार आणि नागरिकांत संवाद साधण्यास मदत झाली.

इ.स. १७७३ च्या कायद्याद्वारे प्रचलित असलेली द्वीदल शासनपद्धती रद्द केली आणि कंपनीला स्वतःची प्रशासकीय यंत्रणा स्थापन करण्याचे आदेश दिले.कंपनी सरकारने फ्रान्समध्ये प्रचलित असलेल्या क्षेत्रीय प्रशासनाचा स्वीकार केला.फ्रान्समध्ये प्रचलित असलेल्या प्रशासकीय पद्धतीत भूप्रदेशाची Prefacture किंवा Department मध्ये

विभागणी केली आणि या क्षेत्रीय घटकाच्या प्रशासनाची जबाबदारी prefect (governor).या अधिका-या- कडे सोपविलीजात असे.कंपनी सरकारने बंगाल, बिहार आणि ओरिसा प्रांताची Prefacture च्याधर्तीवर Districts जिल्हयामध्ये विभागणी केली आणि prefect च्याधर्तीवर District Collector जिल्हा महसूल अधिकारी या पदाची निर्मिती केली.१७७३ मध्ये अस्तित्वात आलेली ही प्रशासकीय यंत्रणा म्हणजेच जिल्हा प्रशासन आजही भारतात कार्यरत आहे.ब्रिटिश काळात **ईस्ट**इंडिया कंपनीचा प्रमुख प्रतिनिधी ज्या क्षेत्रात काम करीत असे, त्या क्षेत्रात जिल्हा हा प्रमुख आधार मानला गेला. क्रमाक्रमाने कंपनीच्या साम्राज्याचा विस्तार होत गेला आणि १८५७ मध्ये अखेर ब्रिटिशांच्या भारतीय साम्राज्याच्या प्रशासनाचा आधारभूत घटक जिल्हा प्रशासन झाला. प्रारंभीच्या काळात जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असलेल्या कलेक्टरकडे महसूल गोळा करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. पुढच्या काही वर्षातजिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारीही जिल्हाधिकारी वा सनदी अधिकाऱ्याच्यानियंत्रणाखालील जिल्हा प्रशासनाकडे सोपविण्यात आली. जिल्हा प्रशासनाचा प्रमुख अधिकारी असलेला कलेक्टर हा महसूल आकारणी व महसूल गोळा करणे आणि शासकीय कोषागारात जमा करणे ही कामे करत असतानाच, जिल्हा दंडधिकारी ही भूमिका बजावताना कायदा व सुव्यवस्था राखणे आणि न्यायदान करने ही जबाबदारी पार पाडत असे. कायदा व सुव्यवस्थाराखण्यासाठी पोलीस दले उभारण्यात आली.ही यंत्रणा जिल्हा प्रशासनाचा भाग असल्याने जिल्हाधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असे.त्यातून पुढे जेल प्रशासन हा स्वतंत्र घटक १९व्या शतकात स्थापन करण्यात आला.तुरुंगातील कैद्यांचे स्वास्थ्य जोपासण्यासाठी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली.कालांतराने जिल्ह्यात रोगराई निवारण आणि सार्वजनिक आरोग्य जोपासण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग स्थापन करण्यात आला.१८१३ सालच्या कायद्यातील तरतुदीद्वारे भारतीयांच्या शिक्षणाची जबाबदारी कंपनी सरकारने स्वीकारल्यानंतरजिल्हा शिक्षण अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली.अशा प्रकारे १९व्या शतकात जिल्हा प्रशासनाची व्याप्ती विस्तारतगेली.विविध विभागांच्या कार्यात समन्वय प्रस्थापित करणे, ही जवाबदारी जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असलेल्या जिल्हाधिका-याकडे सोपविण्यात आली.भारत सरकार व प्रांतिक सरकारांची लहान प्रतिकृती म्हणजे जिल्हा प्रशासन असे समीकरणप्रस्थापित झाले.ब्रिटिश राजवटीच्या अखेर जिल्हा प्रशासनाच्या अंतर्गत महसूल, कायदा, सुव्यवस्था, तुरुंग, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक बांधकामे, शिक्षा वाटप व नागरी पुरवठा, जनगणना इ. बाबींचा समावेश करण्यात आला. जिल्हा प्रशासन हा ब्रिटिश राजवटीचापायाभूत घटक बनला.

## १.८ समारोप

जिल्हा प्रशासनासंबंधी मूलभूत संकल्पनेचा विचार करत असताना जिल्हा प्रशासनाच्या विविध व्याख्या, जिल्हा प्रशासनाचे स्वरूप त्यामधील महत्वाचे पैलू, त्यांचे स्पष्टीकरण, जिल्हा प्रशासनाची तत्वे, प्रशासनाचा हेतू इ. मुद्यांचा विचार केला आहे. जिल्हाप्रशासनाचा

उगम, तसेच इंग्रजी राज्यांच्या पूर्वीची स्थिती कशी होती, ईस्ट इंडिया कंपनीचे कार्य कोणते, जिल्हा प्रशासनाचा विकास कसा झाला आणि जिल्हा प्रशासनाची उदिष्ट इ. मुद्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

## १.९ स्वाध्याय

**प्रश्न*:***

1) 'जिल्हा प्रशासन' या संकल्पनेची व्याख्या करा आणि त्याचे स्वरूप स्पष्ट करा.
2) ब्रिटिश काळात जिल्हा प्रशासनाची उत्क्रांती कसा झाला ते स्पष्ट करा,
3) स्वातंत्र्योत्तर काळात जिल्हा प्रशासनात झालेल्या बदलांचा लेखाजोखा द्या.

***MCQs:***

I) खालीलपैकी कोणत्या समितीने भारतातील पंचायती राज व्यवस्थेची शिफारस केली आहे?
   A. पंछी समिती.
   B. बळवंतराय मेहता समिती.
   C. गांधी समिती.
   D. नेहरू समिती

II) भारतातील पंचायती राज व्यवस्थेत किती स्तर आहेत
   A. एक-स्तरीय
   B. द्विस्तरीय
   C. त्रिस्तरीय
   D चार-स्तरीय

III) जिल्हा स्तरावरील महसूल प्रमुख कोण आहे?
   A. जिल्हाधिकारी.
   B. गटविकास अधिकारी.
   C. तहसीलदार
   D. अधिकारी.

## १.१० संदर्भग्रंथ


- Local Government. S.R. Maheswari Local Government in India.
- Administrative Reform. P.R. Dubbashi Administrative Reforms.
- Administration of Law and Order. K. K. Sharma Law and Order Administration in India.
- www.google.com

- Shri. Sarvesh Kulkarni, Central Right to Information Act 2005
- Forest Right Act, Chaudhari Publications
- Co-operative Act. 2009 Chaudhari Publications
- Biodiversity, Act 2002 Chaudhari Publications
- PESA Act 1996 Chaudhari Publications

१) पंडित म.शा पंचायतराज आणि ग्रामीण महिला सुगाव प्रकाशन, पुणे, मे -१६

२) पंडित पी.बी. पंचायत राज्याकडून ग्रामस्थराज्याकडे प्रबोान प्रकाशन इचलकरजी - १९९४

३) काकडे सुरेश - पंचायतराज, प्राची प्रकाशन जून १९८३

४) विभूते भालवा - पंचायतराज्य व्यवस्था, मनोविकास प्रकाश जुलै - २००१

५) मटकर दयानंद - आपल्या ग्रामपंचायती वेनयन प्रकाशन

६) महाराष्ट्र शासन महाराष्ट्र - जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम - १९८१ (दि. ४ ऑक्टोबर १९९९ पर्यतच्या फेरबदलासह)

१) डॉ. श. ना. नवलगुंदकर, भारतीय शासन आणि राजकारण, नरेंद्र प्रकाशन, पुणे.

२) प्रा. बी.टी. देशमुख, भारतीय संविधान, पिंपळापुरे, अ‍ॅन्ड क. नागपूर

३) प्रा. ची. ग. धांगरेकर भारतीय राज्यघटना स्वरूप आणि राजकरण, मंगेश प्रकाशन, नागपूर

४) कृ. ना. वळसंगकर शासकीय यंत्रणा, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मीती मंडळ करीता सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर.

५) के.सी. काटकर महाराष्ट्राच्या शासनाच्या हजार योजना व कार्यक्र. चंद्रसरू प्रकाशन, कुर्ला - मुंबई.

६) भारत सरकारच्या कल्याणकारी योजना माहिती आणि प्रसार मंत्रालय, भारत सरकार.

७) यशदा - यशवंतराव चव्हाण विकास प्रशसन प्रबोधित, राजभवन आवाव, बाणरे रोड - पुणे राजीव गांधी पंचायत सरकार सशक्तीकरण अभियान ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन पंचायत महिला, लोकप्रतिनीधी महिला, ग्रामीण विकास व महिला विषयक निवडक शासकीय अध्यादेश परिपत्रके व पंचायत महिला लोकप्रतिनिधी महिला संदर्भात आहेत. - क्रांती ज्योती.

८) अण्णा हजारे, केंद्रीय माहितीचा अधिकार, अधिनियम २००५


❖❖❖❖

# २

# जिल्हा प्रशासन- II

**प्रकरणाची रूपरेषा**

२.१ पाठाची उद्दिष्टे

२.२ प्रस्तावना

२.३ जिल्हा प्रशासनाचे घटक

२.४ जिल्हा प्रशासन कार्ये

२.५ जिल्हा प्रशासन स्वातंत्र्योत्तर घडामोडी (बदल)

२.६ समारोप

२.७ स्वाध्याय

२.८ संदर्भ ग्रंथ

## २.१ पाठाची उदिष्टे

- प्रशासनाचे आवश्यक घटक समजून घेणे
- जिल्हा प्रशासनाचे घटक समजून घेणे,
- स्वातंत्र्योत्तर जिल्हा प्रशासनातील बदल समजून घेणे,
- जिल्हा प्रशासनाची कार्ये समजावून घेणे.

## २.२ प्रस्तावना

भौगोलिक दृष्ट्या प्रशासनासाठी अत्यंत सोयीचा भाग म्हणजे जिल्हा हे आपण पहिल्या प्रकारात पाहिले. जिल्ह्याच्या ठिकाणी लोक प्रशासनाची सर्व अभि करणे व उपकरणे (Agencies& Apparatus) यांची समीकरणे सुव्यवस्थित बसवली जातात. लोककल्याणा च्या योजना सामान्य जनते पर्यंत पोहोचविण्याचे उत्तम साधन म्हणून जिल्हा प्रशासनाकडे पाहिले जाते.त्याकरीता प्रशासनाच्या विविध गट पाडले जातात, आणि हे गट प्रशासकीय खात्याच्या रूपाने कार्यरत असतात.

प्रशासकीय खात्याच्या ही राबविणारी यंत्रणा कोणती असते आणि ती कशा प्रकारे कार्य करते या सर्वाचा अभ्यास आपणास या घटकात करता येईल.सर्वसाधारणपणे जिल्हा प्रशासनाचे कार्य पाहिल्यानंतर ते अत्यंत किचकट, गुंतागुंतीचे वत्याचबरोबर जबाबदारीचे



munotes.in

आणि महत्वपूर्ण असल्याचे आपणास आदळून येते.म्हणूनजिल्हाधिकारी प्रत्यक्षपणे संपूर्ण कार्य करून घेऊ शकत नाही.यासाठी प्रशासनाला प्रशासकीय कार्यावरून काही स्तरांमध्ये विभागण्यात येते.काही जिल्हा भू-भागांच्या दृष्टीने मोठे असतात, त्यावेळी प्रशासनाच्या सोयीसाठी अशा जिल्ह्याला दोन किंवा तीन विभागांत विभागण्यात येते.जिल्हा प्रशासनाचे घटक समजून घेताना**विकास प्रशासन** महसूल प्रशासन, **जेल प्रशासन**, **कायदा व सुव्यवस्था** अशा चार मुख्य घटकांचा प्रामुख्याने विचार व्हावयास हवा.या पाठामध्ये आपण**विकास प्रशासन**, महसूल आणि महसूल प्रशासनाशी निगडित विविध बाबींचा अभ्यास करणार आहोत. **जेल प्रशासन**, **कायदा व सुव्यवस्था** हेदोन घटक समाविष्ट आहेत.

## २.३ जिल्हा प्रशासनाचे घटक:

**जिल्हा प्रशासनाचे घटक**

| विकास प्रशासन | महसूल प्रशासन | जेलप्रशासन, कायदाव सुव्यवस्था |
|---|---|---|
| जिल्हा | जमीनमहसूल | कारागृह प्रशासन |
| तालुका | पाणीपट्टी | पोलीसप्रशासन |
| गाव | आयकर | |
| | विक्रीकर | |
| | न्यायालयीनशुल्क | |
| | अबकारीकर | |

**जिल्हा प्रशासनाचे घटक**

❖ “**विकास प्रशासन** ”विकास म्हणजे सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणणारी सामूहिक भागीदारीची प्रक्रिया. ती अविकसित व विकसनशील देशासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे. हा विकास ज्या नोकरशाहीच्या वा नागरी सेवेच्या माध्यमातून घडविला जातो, त्या प्रशासन व्यवस्थेला विकास प्रशासन असे स्थूल मानाने म्हटले जाते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विकासाची जबाबदारी पार पाडण्यासाठी जिल्हा, विकासगट आणि गाव पातळीवर जी नवीन यंत्रणा स्थापन करण्यात आली त्या यंत्रणेस विकास प्रशासन असे म्हणतात. १९५२ साली देशाध्या ग्रामीण भागाची ५०११ विकास गटामध्ये विभागणीकरण्यात आली. **विकासप्रशासन**जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून प्रशासकीय अधिकार व जबाबदायांचे विकेंद्रीकरण करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात झाली. पंचायत राज स्थापनेद्वारे लोकशाही विकेंद्रीकरण प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली. जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींना स्थानिक स्वरूपाच्या

विकासविषयक बाबींची जबाबदारी सोपविण्यात आली. जिल्हा नियोजन आणि विकास समिती भारतातील बहुस्तरीय नियोजनाचे प्राथमिक स्तर आहेत. ग्रामीण विकासाच्यानियोजन कार्यक्रमांची कार्यवाही जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असून ग्रामीण विकासाच्या विविध कार्यक्रमांचा निधी जिल्हा स्तरावरील यंत्रणेस उपलब्धकरून देण्यात आला आणि त्याच्या विनियोगाद्वारे ग्रामीण विकासाला चालना मिळाली. १९७० च्या दशकात ग्रामीण दारिद्रय आणि बेरोजगारी निर्मूलनाचे विशेष कार्यक्रम हाती घेण्यात आले. कार्यक्रम कार्यवाहीत सुसूत्रता आणण्याच्या उद्देशाने १९८० साली जिल्हा ग्रामीण विकास संस्थाची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारे जिल्हा स्तरावरील यंत्रणांद्वारे ग्रामीण विकासाचे कार्यक्रम राबविले जातात,म्हणजेच ग्रामीण विकासाच्या नियोजनाचा केंद्रहिंदू जिल्हा प्रशासन असून ग्रामीण प्रशासन वास्तव अर्थाने जिल्हा प्रशासन असते.

१९५९ साली बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार विकासगटातील यंत्रणेचे पंचायत राज मध्ये विलीनीकरण करण्यात आले.त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्थेकडे ग्रामीण विकासाच्या नियमित कार्यक्रमांची कार्यवाही करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली.या अंतर्गत खालील स्वरूपाची यंत्रणा निर्माण करण्यात आली.

| **पंचायत राजव्यवस्था** | | |
|---|---|---|
| **जिल्हा** | **तालुका** | **गाव** |
| जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | गटविकास अधिकारी | ग्रामसेवक |

## **पंचायत राजव्यवस्था**रचना

**पंचायत राजव्यवस्था** विकास कार्यक्रम सर्व लोकांपर्यंत पोहोचविणे आणि विकासाची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे यासाठी त्याचा पाया लोकसहभाग असावा लागतो. हा लोकसहभाग साध्यकरण्यासाठी ग्रामीण स्थानिक शासनाची यंत्रणा जिल्हा, विकासगट व ग्राम अशा तीन स्तरांवरून काम करते. तिलाच 'पंचायतराज' असे म्हटले जाते. ग्रामीण स्तरावर प्रभावी विकासकार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी यासाठी विकेंद्रित शासनपद्धती असे पंचायत राजशासन व्यवस्थेचे स्वरूप आहे. प्रत्येक विभागातील परिस्थितीनुरूप लोकांच्या प्रतिनिधींमार्फत लोकांचा सहभाग घेऊन काम करणारीही यंत्रणा आहे. गावपातळीवर विविध बाबींना अनुसरून यायंत्रणेने काम करणे अपेक्षित आहे. या शासनपद्धतीचा विस्तारित विचार ग्रामसभेच्या माध्यमातून व्यक्त होतो पंचायत राजमधील सर्वच सभा ह्या प्रतिनिधी मंडळे असतात. तर ग्रामपातळीवर काम करणारी व नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग असलेली ग्रामसभा मात्र नागरिकांची चिरंतन सभा असते. या ग्रामसभेच्या माध्यमातून गाव या सूक्ष्मपातळीवर

राबविल्या जाणा-या योजनांची आखणी व अंमलबजावणी अधिकलोकाभिमुख आणि प्रभावीपणे होऊ शकते. गावाशी संबंधित विकासकामांची चिकित्सा व परीक्षणयासाठी आवश्यक वेगवेगळी माहिती जमा करणे, त्यांसंबंधीचर्चा करून ग्रामसभेने स्वत:चे मत वरिष्ठ कार्यालयाला कळविल्या सव वरिष्ठांनी त्याची योग्य दखल घेतल्यास या यंत्रणेमार्फत होणारी कामे अधिक चांगली करता येऊ शकतात.

महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायतसमिती अधिनियमातील पहिल्या अनुसूचित म्हणजेच जिल्हा यादीत नमूद केलेली एकूण१२९ कार्ये जिल्हापरिषदेकडे सोपविण्यात आली आहेत. त्याचबरोबर आपल्या उत्पन्नामधून आरोग्य, शिक्षण, वैद्यकीयसेवा आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक कार्ये हाती घेण्याचे अधिकार जिल्हापरिषदेस आहेत.

**महसूल प्रशासन(Revenue Admonistration)**“महसूल प्रशासन” जिल्हा प्रशासनाचा महत्त्वाचा भाग आहे.मराठी भाषेतील महसूल' या शब्दप्रयोगासाठी संस्कृत भाषेतील 'राजस्व हा शब्दप्रयोगही वापरण्यात येतो.'राजस्व' म्हणजे राजाला देय असलेली रक्कम, राजस्व देण्याचे पारंपरिक कारण म्हणजे राजा प्रजेचे संरक्षण करतो आणि प्रजेच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशीलअसतो.आधुनिक काळात देशाच्या संरक्षणासाठी आणि विविध कल्याणकारी उपक्रमांसाठी कर आकारणीद्वारा पैसा उभारला जातो.प्राचीन आणि मध्ययुगात जमीन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन असे.ग्रामीण भागात शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय असल्याने शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करण्यात येतो.महसूल या संकल्पनेची व्याप्ती आता विस्तृत झाली असून त्यात शेतसारा व्यतिरिक करदात्यांकडून राज्याला देय असलेल्या सर्व बाबींचा समावेश करण्यात येतो. करनिरण आणि करवसुली ही जबाबदारी पार पाडणाऱ्या प्रशासकीय घटकाला महसूल विभाग किंवा महसूल प्रशासन म्हणतात, जमीन महसूल आकारण व तो वसूल करणे यासारख्या कामामुळे जिल्हा प्रमुखाला कलेक्टर नाव देण्यात आले. वेगवेगळ्या प्रकारचे कर इतर अधिका-यांच्या सहाय्याने वसूल करणे हे महत्त्वाचे काम त्यांच्यावर सोपविण्यात आले.

जिल्हा प्रशासनातील आणखी एक महत्वाचा घटक माणजे 'महसूल प्रशासन' होय. या प्रशासनाचा अभ्यास करण्यासाठी त्यातील विविध घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

1. ***'जमीन महसूल'*** हा महसुलाचा एक मोठा भाग आहे. जमीन महसूल आकारण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणेचा जिल्हाधिकारी प्रमुख असतो. विविध राज्यांत, जिल्ह्यात, जिल्ह्यातील महसूल जमा करण्याच्या अधिकाऱ्याला विविध नावाने संबोधिले जाते. उदाहरणार्थ, केरळव तामिळनाडूमध्ये रेवेन्यू डिव्हिजन ऑफिसर(Revenue Division Officer) असे म्हणतात, तर गुजरात राज्यात यास उप-कलेक्टर म्हणतात. महसूल अधिकारी

सर्वसाधारणपणे आय.ए.एस. दर्जाचा अधिकारी असतो. तालुका पातळीवर तहसीलदार हामहसूल अधिकारी असतो. महाराष्ट्रात आणि गुजरातमध्ये यासमामलेदार म्हणतात, तर ओरिसामध्ये त्यांना तालुका अधिकारी म्हणतात. तहसीलदाराच्या महसूल कार्यात मदत करण्यासाठी एक नायब तहसीलदार असतो. तालुका पातळीच्या खाली गाव घटकएक असतो. गावात पटवारी हा अधिकारी महसूल जमा करण्याचे काम करतो. या व्यवस्थेत सुद्धा आता बराच बदल झालेला आहे. सध्या तलाठी हा प्रशासकीय अधिकारी सरकारी पैसे जमा करण्याचे कार्य करतो. तलाठयास, गुजरात, मध्यप्रदेश,कनाटक राज्यांत पटेल आणि ओरिसा मध्येमनसबदार म्हणून ओळखण्यात येते. उत्तर प्रदेशात याला पूर्वी पटवारी म्हणत असत. पण आज त्याला लेखापाल म्हणून संबोधले जाते. या सर्व ग्रामअधिकाऱ्यांचे मुख्य कार्य जमिनीचे सर्व रेकॉर्डस् अद्ययावत ठेवण्याचे असते. वेळोवेळी जमीनविषयक होत असलेले बदल उदाहरणार्थ, जमिनीच्या खरेदी-विक्री संबंधी नोंदीसुद्धा या कार्याधिका-यांना ठेवाव्या लागतात. तहसीलदार, नायब तहसीलदार आणि तलाठी यांच्याव्यतिरिक्त आणखी काही अधिकारी जमीन महसुलाच्या कार्यातसहभागी असतात त्यात प्रामुख्याने महसूल तपासणी अधिकाऱ्याचा उल्लेख करता येईल.

2. ***पाणीपट्टी* -**दुसऱ्या गटात आपणास जलसिंचन विभागाचा उल्लेख करता येईल.शेतकऱ्याला आवश्यकतेनुसार शेतीसाठी पाणी देण्याची जबाबदारी या विभागावर असते.विशेषतः नगदी पिकांसाठी (Cash Crops) पाण्याची पार मोठ्या प्रमाणात गरज असते.ज्या प्रमाणात पाणी देण्यात येते त्या आधारावर ***कर आकारण्यात येत असतो***. कर आकारण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व तहसीलदार खांद्यावर नसून जलसिंचनअधिकाऱ्यावरच असते. शेतीच्या हंगामात(ॲग्रिकल्चर सिझन) जे पाणी शेतीला देण्यात आले आहे. त्याच्या आधारावर कर आकारुन जलसिंचन विभागा तर्फेवसुलीचे पैसे जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना पाठविण्यात येत असत हे कर वसूल करुन घेण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्याची असते. नायब तहसीलदार किंवा काही वेळी विशेष अधिकाऱ्याची नेमणूक करून शेतकऱ्याकडून जमीन महसुलाबरोबर हे कर वसूल करण्यात येत असतात. पूर्वी काही राज्यांत हे कर लंबरदार' गोळा करीत असे आणि त्यातील आपला हिस्सा कापून बाकीची रक्कम भरणे कठीण जात असे. सध्या जलसिंचनविषयक कायम स्वरूपाची यंत्रणा प्रत्येक जिल्ह्यात उभारण्यात आलेली आहे आणि त्यामुळे पूर्वीची लंबरदार पद्धत संपुष्टात आली आहे.

3. ***आयकर-विक्रीकर*:** महसूल प्रशासनाचा 'आयकर तिसरा महत्त्वाचा घटक आहे. जलसिंचनाप्रमाणे आयकर विभागाचे अधिकारी कर आकारत असतात. आयकर विभागाचा संबंध केंद्र विभागाशी असतो. त्यामुळे हा विभागच संबंधितांकडून स्वतः कर गोळा करीत असते, एखाद्या व्यक्तीच्या

मालमत्तेसंबंधी आयकर अधिकाऱ्यास संशय आल्यास आयकर खाते गुप्तरीतीने माहिती मिळवून एकदम छापा घालीत असत व अशा संशयित व्यक्तीच्याघराची झडती घेत असत. उदाहरणार्थ, गुंबईतील सांताक्रूझ येथील एका अतिथिगृहाची व त्या अतिथिगृहाच्या मालकाच्या निवासस्थानी आयकर खात्याने झडती घेऊन बेहिशोबी रक्कम जप्त केली.परंतु काही वेळा आयकर विभागाच्या प्रयत्नामुळे कर वसूल होत नसेल, तर जिल्हाधिकाऱ्याच्या मदतीने ते वसूल करण्यात येत.

4.***न्यायालयीन शुल्क***: उदाहरणार्थ, जर न्यायालयात एखाद्याविरुद्ध खटला भरावयाचा असेल, रिट अर्ज जारी करुन घ्यावयाचा असेल, न्यायालयीन निर्णयाची सत्यप्रत हवी असेल अथवा इतरअदलाबदलीचे पत्र दाखल करावयाचे असेल तर या सर्वांसाठी न्यायालयीन शुल्क आकारणे आवश्यक असते. हे कर आकारण्यासाठी आणि वसूल करण्यासाठी विविध अधिकारी कार्यरत असतात. काही बाबतीत रजिस्ट्रार हे कार्य करीत असतात. काहीबाबतीत स्वतः नागरिकाला ही माहिती करून घ्यावी लागते की, त्यांनी आवश्यकतेनुसार न्यायालयीन शुल्क भरले आहे किंवा नाही. जर तसे झाले नाही तर न्यायालयात त्याला कायद्याचा आधार नसतो.प्रत्येक न्यायालयात स्टॅप विक्रेते असून ते जिल्हाधिकाऱ्याकडूनस्टैप विकत घेतात आणि अल्प कमिशनवर विकतात.

5.***अबकारी कर***-हा महसूल प्रशासनाचा सातवा महत्त्वपूर्ण घटक होय. हे अबकारी कर विविध वस्तूंवर लावण्यात येतात. यात प्रामुख्याने दारू, औषधी आणि पेट्रोलियमपासून तयार होणाऱ्या वस्तू इत्यादींचा समावेश होतो. केंद्र व राज्य सरकारमध्ये अबकारी विभाग दिसून येतो.प्रत्येक जिल्ह्यात एक अधिकारी असतो, त्यास 'जिल्हा अबकारी अधिकारी म्हणतात. अबकारी कर लावणे आणि वसूल करणे अशा दोन्ही स्वरूपाचे कार्य हा विभाग करीत असतो.अबकारी कर प्रामुख्याने दारू कारखाने, गोदाम यावर लावून गोळा करण्यात येत असतो.अशा व्यवसायात बेकायदेशीर उत्पादन होऊ नये यासाठी अबकारी विभाग प्रयत्न करीत असतो.जिल्हा अबकारी अधिकाऱ्याचेकार्य जिल्हा अधिकाऱ्याच्या देखरेखीखाली चालत असते. जिल्ह्यात असलेल्या दारू गोळ्याच्या दुकानांची, विषारी औषधालयांची आणि त्यांचे परवाने तपासण्याची कामे अबकारी विभाग करीत असतो, थोडक्यात प्रामुख्याने वरील सर्व घटक जिल्हा प्रशासनाशी निगडित असून ते आवश्यक पटक मानले जातात. जिल्हाधिकारी आणि त्याचा सहकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग हे कार्य प्रशासकीयदृष्टया योग्य रीतीने पार पाडीत असतात. शांतता, सुव्यवस्था आणिमहसूलविषयक कार्याचा अंतर्भाव जिल्हा प्रशासनात महत्वाच्या दृष्टिकोनातूनच करण्यात आलेला आहे.

munotes.in

## ❖ जेल प्रशासन

***कारागृह प्रशासन***:कायदा व सुव्यवस्थेचा जिल्हा प्रशासनात आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे जेल प्रशासन होय. जिल्याच्या ठिकागी एक मोठे कारागृह असते, अशा ठिकाणी दीर्घकालीन शिक्षा झालेल्या गुन्हेगारांना ठेवण्यात येत असते. या कारागृहात त्या त्या जिल्ह्यातील गुन्हेगारांनाठेवण्यात येत असते.पण काही काही वेळा सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून दुसया जिल्ह्यातीलगुन्हेगारांना अशा कारागृहात ठेवण्यात येत असते. तसेच ज्या गुन्हेगारांनी गंभीर स्वरूपाचा गुन्हा केलेला असून त्या विरोधात न्यायालयात खटला चालू असेल, तर अशा आरोपींनादेखील ह्याच कारागृहात ठेवण्यात येत असते. जिल्ह्यामध्ये न्यायालयाने दिलेल्या मृत्यूच्या शिक्षेची पूर्तता जिल्हा कारागृहात होत असते.सर्वसाधारणपणे फौजदारी न्यायाधीशाच्या (District Magistrate) देखरेखीखाली या कारागृहाची व्यवस्था चालत असते.पूर्वी जिल्ह्याचा वैद्यकीय अधिकारी (Civil Surgeon) सुद्धा जिल्हा कारागृह प्रमुख म्हणून काम पाहत असे.परंतु आज ही व्यवस्था बंद करण्यात आली आहे.सध्या कारागृह प्रशासनासाठी एका कारागृह व्यवस्थापकाची (Superitendent of Jails) तरतूद करण्यात आली आहे.***कारागृह प्रशासन*** हे जिल्हा प्रशासनाचा एक भाग असल्यामुळे जिल्हा मॅजिस्ट्रेटवर त्याच्या देखरेखीची जबाबदारी असते. एक महत्वाची बाब अशी की, पोलीस किंवा कोणीही माणूस कारागृहात जाऊ शकतनाही किंवा घालू असलेल्या खटल्यातील आरोपीला भेटू शकत नाही, जर अशा पोलिसाला आरोपीस भेटावयाचे असेल, तर जिल्हा मजिस्ट्रेटकडून लेखी परवानगी घेणे आवश्यक असते. ज्यावेळी आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा देण्यात येते.त्यावेळी जिला अधिका-याला हजर राहणेआवश्यक असते तो स्वतः मृत्युदंडाचा वॉरंट (Warrant) रहातो आणि आरोपीस बाधून दाखवितो.या मृत्यूदंड पत्रात कोणत्याही प्रकारचा दोष नाही याची पुरेपूर खात्री पटल्यानंतर तो मृत्यूदंडाची आज्ञा देत असतो. मृत्युदंड दिल्यानंतर आरोपीचा मृत्यू झालेला आहे काय? याची देखील वैद्यकीय अधिकारी कडून तपासून घेऊन खात्री करून घेत असतो. नंतर तो आवश्यक त्यापत्रा-वर सही करतो.कारागृह व्यवस्थापनाचे कार्य योग्य प्रकारे होत आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी तो वेळोवेळी कारागृहाला भेट देत असतो.तेथे आरोपींशी चर्चा करीत असतो.तसेच आरोपींच्या शिस्तीची तपासणी करीत असतो.खटला चालू असलेल्या आरोपीवर अन्याय होऊ नये व त्यास वेळेवर कोर्टात हजर करता यावे यासाठी तो जेल तिकिटाची तपासणी करीत असतो. कारागृहातील जीवनाची जबाबदारी यावरच असल्याने कारागृहातारे दिले जाणारे जेवण हे योग्य प्रकारचे केले आहे किंवा नाही याची तपासणी करण्याचे महत्वाचे कार्य यावेच असते. अशा सर्व दृष्टीने तो कारागृहाची व्यवस्था घोस । संरक्षणाच्या संदर्भात योग्य आहे किंवा नाही याचीखात्री करून घेत असतो. जिल्ह्यामध्ये केवळ मोठ्याय व्यक्ती गुन्हे करतात असे नसून काही अल्पवयीन मुलेदेखील गुन्हा करण्यात प्रवृत्त होतात म्हणून अशा स्वरूपाच्या अल्पवयीन बालकांच्या गुन्ह्यांला 'बालगुन्हेगार' असेही संबोधण्यात येते.

***न्यायविभाग:***कायदा व सुव्यवस्थेचा आणखी एक महत्वाचा घटक म्हणजे जिल्हा प्रशासनातील न्यायविभाग व फौजदारी न्यायाधीश (District Magistrate) यांचा समावेश होय.कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ यांचे कार्यक्षेत्र एकमेकांपासून वेगवेगळे असले पाहिजे अशी चर्चा आपण नेहमी करतो. याच संदर्भात जिल्हा मजिस्ट्रेट आणि न्यायमूर्ती यांच्याशी संबंधित चर्चा करावी लागेल.भारतातील संविधानातील नीतिनिर्देशक तत्वातील कलम अन्वये असे सांगण्यात आले आहे की, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ हे वेगळे असले पाहिजे. कारण त्यामुळेच न्यायदानाचे कार्य व्यवस्थित होईल.भारतीय न्यायव्यवस्था त्रिस्तरीय आहे.ज्यामध्ये उच्चस्थानी सर्वोच्च न्यायालय, मध्यभागी उच्च न्यायालय आणि खालच्या पातळीवर सत्र जिल्हा न्यायालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.प्रत्येक राज्याने हे दोन्ही विभाग वेगवेगळे करावे, अशी सूचना केंद्र सरकारने वेळोवेळी केली आहे.काही राज्यांनी ती मान्य केली असून काही राज्यांत हे कार्य अपुरे राहिले आहे.

**३) कायदा व सुव्यवस्था**जिल्ह्यात शांतता राखण्यासाठी कायदा व सुव्यवस्था चांगल्या प्रकारे ठेवण्याचे कार्य जिल्हाधिकारी करीत आहे.या कामासाठी जिल्हाधिकाऱ्याला पोलीस अधीक्षकाची मदत घ्यावी लागते.जिल्यात न्यायदानाचे कार्य करण्यासाठी जिल्हा न्यायाधीश असतो.काही महत्त्वाच्या विषयांच्या संदर्भात जिल्हाधिकारी न्यायाधीशाची भूमिका घेत असतो.

जिल्ह्यात असलेल्या न्याय विभागाचा संबंध (District Court) देशातील न्यायदान प्रणालीशी असतो.जिल्ह्यात दोन प्रकारची न्यायालये असतात. एक जिल्हा न्यायालय आणि दुसरे सत्र न्यायालय.दिवाणी फौजदारी संबंधित सर्व खटल्यांचा निकाल या ठिकाणी लावण्यात येतो.जमीन व महसूलविषयक खटल्यांच्या बाबतीत जिल्हा दंडाधिका-याने (DistrictMagistrate) दिलेल्या निर्णयाविरुद्ध संबंधित जिल्हा न्यायालयात अपील करू शकतो.शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी आणखीएक जो घटक विशेष सहकार्य करतो तो म्हणजे 'पोलीस' होय. पोलीस, संघटना अधिकार व परंपरेच्या तत्वावर राज्यापासून ते गावापर्यंत कार्य करीत असते. पोलीस खात्यात पोलीस महानिरीक्षक (IGP) आणि पोलीस उपमहानिरीक्षक (DIG) हे प्रमुख अधिकारी असतात. त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी संपूर्ण राज्याला प्रशासकीय विभागात वाटण्यात येते. सरासरी, प्रशासकीय विभाग जिल्ह्याच्या आकाराएवढा असतो.या विभागाचा प्रमुख जिल्हा पोलीस अधिक्षक असतो.हा जिल्हा पोलीसप्रमुख जिल्हातील सर्व पोलीस कार्यासजबाबदार असतो.कायदा व सुव्यवस्थाराखण्याव्यतिरिक्त त्याला दिवाणी व फौजदारी गुन्हे याकडेसुद्धा लक्ष द्यावे लागते.त्याला मदत करण्यासाठी उप-अधीक्षक, सर्कल इन्स्पेक्टर, सब-इन्स्पेक्टर आणि पोलीस दल असते. विशिष्ट परिस्थितीनुसार पोलीस ठाण्यात शस्त्रे ठेवण्यात येत असतात. मात्र जिल्याच्या ठिकाणी अशी हत्यारे पुरेशा प्रमाणात ठेवण्यात आलेली असतात. वेळप्रसंगी ज्या भागात दंगली होतात त्याभागात जिल्हा प्रमुख कार्यालयातून

munotes.in

शस्त्रे पाठविण्यात येतात. तसेच पोलीस अधिकाऱ्यांच्या न्यायालयाशी सतत संपर्क येत असतो. गुन्हा केलेल्या लोकांना कायद्याप्रमाणे पकडल्यानंतर चोवीस तासांच्या आत न्यायाधीशासमोर आणणे आवश्यक असते.अशा व्यक्तींना न्यायाधीश गुन्ह्यांचस्वरुपलक्षात घेऊन शिक्षा व दंड करू शकतो.तसेच सबळ पुरावा न मिळाल्यास गुन्हेगारास सोडून देऊ शकतो.जिल्हा दंडाधिकारी फौजदारी प्रशासनासाठी जबाबदार असतो.तो जिल्यातील प्रशासनालादेखील जबाबदार असते.खालच्या पातळीवर शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक गावात एक चौकीदार आणि पोलीस पाटील असतो. तंग वातावरणात शांतता व सामंजस्याचे वातावरण कायम राहावे व सार्वजनिक मालमतेचे नुकसान होणार नाही याची काळजी घेण्यासाठी तालुक्यातील काही ग्रामपंचायती, वरील प्रकारचा ठराव संमत करून त्यासाठी 'दक्षता समित्या' अथवा शांतता समित्या स्थापन करीत असतात. त्यामुळे शांतता वसुव्यवस्था ठेवण्याच्या कामी जिल्हा प्रशासनाला या समित्यांकडून अतिशय मोलाचे सहकार्य मिळत असते.

***पोलीस प्रशासनाचा*** वार्षिक अहवाल जिल्हा पोलीस अधीक्षक तयार करीत असतो.अहवाल जिल्हाधिकाऱ्यामार्फत शासनाला पाठविण्यात येतो.या अहवालावर आपले विचार मांडण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्याला देण्यात आला आहे.तसेच अहवालासंबंधी काही सूचना असेल तर त्यासुद्धा अशावेळी जिल्हाधिकारी सुचवीत असतो. जिल्हयातील पोलिसांची शिस्त, पोलीस ठाण्याला आवश्यक असलेल्या वस्तू, पोलिसांची नियुक्ती आणि त्यांच्या कामाची वाटणी इत्यादीविषयक पोलीस प्रशासनाची जबाबदारी पोलीस अधीक्षकाच्या अधिकार क्षेत्रात येत असे. ही सर्व कामे जिल्हयात शांतता राखण्याकरीता पोलीस अधिक्षकाला करावी लागतात. परंतु जिल्ह्यात दंगली अथवा इतर कारणावरून असंतोषाचे वातावरण निपजत असेल तर त्यावेळी जिल्हा मजिस्ट्रेट व पोलस अधिक्षक ह्या दोन्ही अधिकाऱ्यांमध्ये चांगल्या प्रकारचे संबंध असणे आवश्यक असते. वेग परिस्थितीत जमावाला पांगविण्यासाठी काही वेळेस पोलिसांना अश्रूधूर लाठीमार तर काही वेळेला गोळीबारदेखील करण्यासाठी जिल्हा अधिका-याकडून (District Magistrate) परवानगी घेणे आवश्यक असते. कित्येक वेळा असे दिसून येते की, जिल्हा अधिकारी हा एक तरुण अधिकारी असतो.तर जिल्हा पोलीस अधिक्षकत्यापेक्षा जास्त वयस्कर असतो.गोळीबारासाठी या तरुण अधिकायाची आज्ञा घेणे पोलीस अधीक्षकाला अपमानास्पद वाटते, आणि यासाठी तो त्याची परवानगी न घेता आपल्या मनाप्रमाणे वागत असतो.त्यामुळे त्याच्या वागण्याचा परिणामप्रशासनावर गंभीर स्वरूपाचा ठपका मारून जातो. जिल्ह्यात मैजिस्ट्रेट व पोलिसाचे कार्य कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे असल्यामुळे पोलीस विभागाला चातुर्याने व कुशलतेने पोलीस प्रशासनाविषयक कार्य करावे लागते. त्यासाठी पोलीस खात्यातील गुप्तचर खाते विशेष महत्त्वाचे कार्य करीत असते.गुप्तचर विभागाचे कार्य कार्यक्षम आणि चातुर्याचे असते.जिल्हयात होणाऱ्या गुन्ह्यांची दखल गुप्त रीतीने घेणे त्यांना आवश्यक असते.पण असे गुन्हे थांबविण्याच्या दृष्टीने अगोदर

पाऊल उचलणे आणिगुन्हेगारांना ताब्यात घेणे हे अतिशय महत्त्वाचे कार्य असते.म्हणूनच पोलीस प्रशासनात 'गुप्तता बाळगणे फार महत्त्व असते.शासनाने घेतलेल्या निर्णयाविरुद्ध गुन्हेगारांना गुन्हे न करू देण्याची किंवा निर्णयाच्या अंमलबजावणीत अडथळेयेऊ नये याची खबरदारी घेणे पोलीस खात्यावरच असते.तसेच गुन्हेगारांना पकडण्यासाठी पोलीस खात्याने घेतलेला गुप्त निर्णय गुन्हेगारांना कळू न देण्याची दक्षता पोलीस यंत्रणेवर असते.

## २.४ जिल्हा प्रशासनाची कार्ये

**१) नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण**ःनागरिकांना संविधानानुसार मिळालेल्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे हे जिल्हा प्रशासनाचे मुख्य कार्य आहे.प्राप्त मूलभूत अधिकारांची जोपासना करणे या कार्यासाठी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था ठेवावी लागते.नागरिकांना दिवाणी व फौजदारी न्यायलवकर मिळवून द्यावे लागतात.

**२) महसूल वसूली**कल्याणकारी राज्याचे उदिष्ट साध्य करण्यासाठीआर्थिक निधी असणे आवश्यक आहे.जिल्हा प्रशासन, शासनाला देय असलेल्या महसुलाची आकारणी व वसूली करते.यामध्ये राज्य सरकारसाठी राजस्व आणि अबकारी कर जमा करण्यात येत असतो.हे कार्य अतिशय महत्वपूर्ण असून जिल्हा प्रशासनाला ते फार जबाबदारीने पार पाडावे लागते.

**३) कर आकारणी व वसूली:**महसूल हा अनेक प्रकारचा असून यामध्ये जमीन महसूल, पाण्यावरील कर, आयकर, शेतीच्या उत्पन्नावरील कर, विक्री कर, करमणुकीच्या साधनांवरील कर, वाहनकर इ. बाबी महसुलामध्ये येतात, अबकारी कराच्या संदर्भात औषधे आणि दारू यांच्या वाटप व नियंत्रणावर कर लावण्यात येतो. जिल्ह्यात असलेल्या दारूची दुकाने यांच्यावर कर आकारण्यात येतो.

**४) सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी विशेष कार्यक्रमांची अंमलबजावणी करणे.**सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांचा विकास करणे अत्यावश्यक असते.यासाठी जिल्हा प्रशासन आदिवासी विकास योजना आणि अनुसूचित जाती व जमाती आणि मागासवर्गीयांच्या विकासासाठी विशेष कार्यक्रमांची अंमलबजावणी करते.

**५) शेतीसंबंधित समस्या सोडविणे:**शेतीविकास हा ग्रामीण विकासाचा पाया आहे. प्रत्येक जिल्ह्यातील लोकांचा शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने शेतीविषयक कार्यांना जिल्हा प्रशासनात प्रामुख्याने प्राधान्य देण्यात आले आहे.जिल्हा प्रशासन कृषी विकास, मृद संधारण, जलसंधारण आणि तत्सम कार्यक्रमांची कार्यवाही करते. प्रयोग शाळांमध्ये विकसित तेत्रज्ञान म्हणून वेगळ्या शेतकऱ्यांपर्यत पोहोचवते. तसेच शेतीशीसंबंधित प्रश्न उदाहरणार्थ बी-बियाणे, रासायनिक खते, जंतुनाशके, पिकांना पाणी देण्यासंबंधीच्या गोष्टींची व्यवस्था

munotes.in

जिल्हा प्रशासन करीत असते.तसेच दुष्काळ, अतिवृष्टी, भूकंपसारख्या नैसर्गिक आपत्तीच्या काळात संकटग्रस्त लोकांसाठी मदतकार्य करण्याचे काम जिल्हा प्रशासन हाती घेते.

**६) कल्याणकारी कार्य** आधुनिक युगात प्रशासनाचे कार्य केवळ आवश्यक कार्यापुरतेच राहिलेले नसून कल्याणकारी आणि विकास कार्य करणे आधुनिक शासन यंत्रणेचे कर्तव्य बनले आहे. नागरिकांचे स्वास्थ्य आणि प्राथमिक शिक्षणाचा अलीकडे विचार केल्यास प्रौढ शिक्षणाची काळजी सरकार घेत आहे.सामुदायिक विकासाचे कार्य पंचायत राज संस्थेमार्फत आणि सरकारी सोसायटीमार्फतपार पाडले जात आहे.वरील दोन्ही संघटनांशी जिल्हा प्रशासनाचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष संबंध आहे.

**७) अन्नधान्य व नागरी पुरवठा** जिल्हा प्रशासन दारिद्र्यनिर्मूलन आणि किमान गरजांची पूर्तता या कार्यक्रमाद्वारे अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य या पाच मूलभूत घटकांची पूर्तता करते. प्रत्येक देशात अन्नधान्य व नागरी पुरवठा करण्याचे कार्य सरकारच्या प्रमुख कार्याचे अंग संबोधिले जाते.भारतातसुद्धा हे कार्य सरकारच्या वतीने जिल्हा प्रशासन करीत असते.आवश्यक वस्तूंचा साठाकिती आहे, यावर त्या वस्तूंचे नियंत्रण अवलंबून असते. जर वस्तू कमी प्रमाणात उपलब्ध असतील आणि त्यामुळे खुल्या बाजारपेठेत त्याचे भाव आवश्यकतेपेक्षा जास्त असतील, तर त्या वस्तूंवर जिल्हा प्रशासनातर्फे नियंत्रण ठेवण्यात येते आणि ती वस्तू सरकारी स्वस्तदुकानांमार्फत वाटप्यात येते. आज जरी स्वस्त धान्य दुकानाचे कार्य आणि महत्त्व कमी झालेअसले तरी राष्ट्राच्या अश्याअन्न टंचाईच्या काळात अशा दुकानांनी भरीव कार्य केलेआहे.

**८) नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना सहकार्य** कधी-कधी जिल्हा प्रशासनाला नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते.अशा वेळी हे अनपेक्षित कार्य अनिवार्य कार्य होत असते.नैसर्गिक आपत्ती विविध प्रकारच्या असतात. अनेकदा पाऊस इतका पडतो की, त्याचे रूपांतर अतिवृष्टीत होते.याउलट पाऊस पडलाच नाही तर दुष्काळाची परिस्थिती जिल्ह्यात निर्माण होते. त्यामुळे लोकांचे जीवनमान बिघडते, अशा आपादग्रस्त जिल्ह्यात जिल्हाधिकाला तोड द्यावे लागते. काही वेळाभूकंपासारख्या आपत्तीमुळे जिल्हा प्रशासनाच्या कार्याची जबाबदारी वाढते.काही परस्पर वैमनस्यामुळे शेतीमालास आग लावण्याचे प्रकार घडतात. जातीयवादामुळे तणाव निर्माण होतो.अशा वेळी जिल्हा प्रशासनाला मदतीचे कार्य करावे लागते.तसेच देशातील सार्वत्रिक निवडणुकांतहीजिल्हा प्रशासनाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. जिल्हाधिकारी हा जिल्ह्याचा मुख्य निर्वाचन अधिकारी असून त्यास अचूक मतदान याद्या तयार करणे, मतदान केंद्र निश्चित करणे आणि निवडणुकीसाठी अधिकारी नेमणे व ठराविक दिवशी मतदान शांततेच्या वातावरणात पार पाडून निकाल जाहीर करणे यासारख्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात, अशा प्रकारे जिल्हा प्रशासनाचा जिल्ह्यातील लोकांशी जवळून संबंध येत असतो, लोकशाही व्यवस्थेत तर जिल्हा प्रशासनाची

जबाबदारी अधिकच वाढते आहे. याचे कारण, लोकशाही व्यवस्थेत जनतेच्या प्रशासनाकडून फार मोठ्या अपेक्षा असतात. प्रशासकीय यंत्रणेने आपल्या समस्या सोडविण्यासाठी सर्व प्रकारचे प्रयत्न करावेत, आपल्या अडचणींच्या काळात तिने आपणास मदतीचा हात देण्यासाठी पुढे यावे, असे लोकांना नेहमीच वाटत असते.अर्थात सार्वजनिक व्यवहारात अनेक बाबींचा अंतर्भाव होत असला तरी या बाबी लोक प्रशासनाच्या तत्त्वांशी सुसंगत असाव्या लागतात. आपल्या देशाच्या कायद्याचे ज्यामुळे उल्लंघन होईल अशी कोणतीही कृती किंवा सार्वजनिक व्यवहार जिल्हा प्रशासन करू शकत नाही. राज्यघटनेतील नागरिकांच्या मूलभूत

हक्कांवर गदा येईल, अशी कोणतीही कृती जिल्हा प्रशासन करू शकत नाही.याचा असा की, जिल्हा प्रशासनाची व्याप्ती बरीच मोठी असली तरी त्याला लोक प्रशासनाच्या मूलभूत तत्वांच्या बंधनात राहूनच आपले कार्य करावे लागते.

## २.५ जिल्हा प्रशासन स्वातंत्र्योत्तर घडामोडी (स्वातंत्र्योत्तरबदल)

munotes.in

स्वातंत्र्योत्तर काळात स्थानिक प्रशासनास अधिक गती आणि महत्त्व प्राप्त झाले; कारण त्या पूर्णतः निर्वाचित सदस्यांच्या प्रतिनिधींच्या नियंत्रणाखाली आल्या. गावातील मतदार यादीत ज्यांच्या नावाची नोंद झाली आहे, त्या सर्वांची मिळून ग्रामसभा बनते.तिच्या वर्षातून किमान दोन बैठका होणे बंधनकारक आहे.ग्रामपंचायतीचा सरपंच ग्रामसभेचा अध्यक्ष असून त्याने ग्रामपंचायतीच्या जमा-खर्चाचा हिशेब ग्रामसभेसमोर ठेवला पाहिजे. ग्रामपंचायतीप्रमाणे तालुका पातळीवर तालुका पंचायती, तर जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदा कार्यरत असतात. या संस्थांची कामे पुढीलप्रमाणे :(१) सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य: झाडलोट, घरगुती पाणीपुरवठा, औषधपाणी वगैरे. (२) सार्वजनिक बांधकामे: रस्ते, गटारे वगैरे बांधणे व त्यांची निगा राखणे, अतिक्रमणे हटविणे, दिवाबत्ती, आठवड्याचा बाजार, सेवकवर्गासाठी घरे बांधणे, कोंडवाडा बांधणे वगैरे. (३) शैक्षणिक व सांस्कृतिक कामे. (४) स्वसंरक्षण व ग्रामरक्षण: गस्त व्यवस्था, आकस्मिक आगीचे शमन इत्यादी. (५) प्रशासन: गावातील सर्व घरांना क्रमांक देणे, त्यांची सर्व माहिती संकलित करणे, बेरोजगारांची आकडेवारी जमविणे, तक्रारींचे निवारण व गंभीर बाबी वरिष्ठांकडे पाठविणे, दप्तराची अद्ययावत नोंद करणे वगैरे. (६) लोककल्याणाची कामे: जमीन सुधारणा कायद्याच्या अंमल-बजावणीस सहाय्य करणे, अनाथ-अपंगांची सोय करणे वगैरे. (७) कृषि-विकास: पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न करणे, जलसंवर्धन,जलसिंचन यांकडे लक्ष देणे वगैरे. (८) पशुसुधारणा: कृत्रिम रेतन केंद्र चालविणे, जनावरांची नोंद ठेवणे वगैरे. (९) ग्रामीण उद्योगधंद्यांना उत्तेजन देणे. (१०) भिन्न समित्या नेमून प्रशासकीय कामाचा नियमित आढावा घेणे आणि दरवर्षीचे अंदाजपत्रक तयार करून ते पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्याकडे पाठविणे आदी प्रशासकीय कार्याची व्यवस्था करणे.नगरपालिका व महानगरपालिका या नागरी

स्थानिक संस्थांचे प्रशासन अनेक बाबतींत सारखेच असून लोकसंख्येनुसार त्यात काही फरक आढळतात. प्रशासनाच्या सोयीसाठी महानगरपालिकांच्या प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. दिल्ली महानगरपालिका क्षेत्राचे दहा विभागांत, तर मद्रासचे (चेन्नई) उत्तर व दक्षिण असे मुख्य खंड असून प्रत्येक खंड पाच क्षेत्रीय विभागांत आणि प्रत्येक क्षेत्रीय विभाग दहा उपविभागांत विकेंद्रित केला आहे. क्षेत्रीय विभाग पातळीवरील प्रशासन स्तराला आपल्या क्षेत्राबाबत व्यापक अधिकार दिलेले आहेत. मुंबई महा-नगरपालिकेची सतरा विभागांत प्रशासकीय व्यवस्था केली असून त्यावरविभागीय अधिकारी नेमले आहेत. महानगरपालिका आयुक्त आणि विभाग अधिकारी यांच्या कार्यकारी समन्वय साधण्यासाठी तीन विभागीय उपायुक्त नेमलेले आहेत. मालमत्तेवरील सर्वसाधारण कर, जकात, वाहनकर ही नागरी स्थानिक संस्थांची उत्पन्नाची साधने असून पाणीपुरवठा, सार्वजनिक स्वच्छता,रस्ते, दिवाबत्ती, मलनिःसरण, शिक्षण, वाहतूक, सर्वसाधारण प्रशासन इ. खर्चाच्या बाबी होत. या स्थानिक संस्थांची कर्तव्ये व विवेकाधीन कामे यांची यादी १९६५ च्या कायद्यानुसार कलम ४९ मध्ये नमूद केलेली आहे. त्यात सार्वजनिक रस्ते, ठिकाणे यांची स्वच्छता व दिवाबत्ती, आग विझविण्याची व्यवस्था, जन्ममृत्यूची नोंद, पाणीपुरवठा, प्राथमिक शाळा स्थापणे व चालविणे, कलम १०५ मध्ये नमूद केलेले आवश्यक ते कर बसविणे अशी २२ कर्तव्यांची नोंद तसेच २४ विवेकाधीन विशेष तरतुदी आहेत. प्रत्येक नगरपालिका व महानगरपालिका यांसाठी अनुक्रमे अध्यक्ष व महापौर आणि उपाध्यक्ष व उपमहापौर असून अनुक्रमे मुख्या-धिकारी व आयुक्त हे शासननियुक्त असतात. आयुक्त हा अधिकारी भारतीय प्रशासन सेवाश्रेणीतील (आय्एएस्) असतो. या अधिकाऱ्याचे मुख्य काम म्हणजे पालिकांच्या कामावर देखरेख ठेवणे, अंदाजपत्रक तयार करून स्थायी समितीला सादर करणे, सर्वसाधारण सभेत प्रशासनविषयक प्रश्नांना उत्तर देणे, मागतील ती माहिती पुरविणे इ. होय. अध्यक्ष व महापौर यांची निवड प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निवडणुकीने शासन निर्णयानुसार होते. त्यांना मानधन दिले जाते. स्थायी समिती ही प्रशासनातील मुख्य घटक असून याशिवाय विषय समित्या असतात. त्यांच्या अखत्यारीत सार्वजनिक कामे, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा व जलनिकास, नियोजन व विकास इत्यादींचा प्रशासकीय विचार केला जातो. या विषयांकरिता आवश्यकतेनुसार अभियंता, पाणीपुरवठा अभियंता, आरोग्याधिकारी,लेखापरीक्षक, शिक्षणाधिकारी व अन्य अधिकारी व सेवकवर्ग प्रशासकीय कर्तव्ये बजावीत असतात.

## २.६ समारोप:

विकास प्रशासनाच्या संदर्भात आपण भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा ऊहापोह केला. परंपरागत नोकरशाहीच विकास कार्यक्रमाचे निर्वाहन करीत असल्यामुळे व जनप्रिय लोकसहभागाचा सातत्याने संकोच होत असल्यामुळे त्यांचे प्रशासन लोकांच्या अपेक्षांना पुरे पडण्यास सक्षम ठरलेले नाही. राज्य व केंद्र सरकारच्या नीती व धोरणे बदलल्याविना

विकास प्रशासनाचे आव्हान नव्या काळात पेलता येणार नाही. खास करून नागरी प्रशासनाचे प्रश्न फारच बिकट झाले आहेत. आज भारतातील जवळपास सर्वच शहरे जनतेच्या असंतोषाच्या ज्वालामुखीवर बसली आहेत. केव्हा हा असंतोषाचा ज्वालामुखी उफाळून त्याचा उद्रेक व स्फोट होईल हे सांगता येत नाही, अशी अवस्था आहे. नव्या आर्थिक सुधारामुळे नागरिकांचे जीवनमान उंचावत आहे व त्यांच्या नागरी सुविधांच्या अपेक्षा वाढल्या आहेत, पण त्या पुऱ्या करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेत योग्य ते बदल करणे, योग्य धोरणे व नीती आखणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना खऱ्या अर्थाने बळकट व स्वायत्त करणे ही काळाची गरज बनली आहे, पण त्याचे पुरेसे भान केंद्र व राज्य शासनास आहे, असे म्हणण्याजोगी परिस्थिती नाही. या परिस्थितीत दिलेल्या मर्यादेत नोकरशाहीने विकास प्रशासन करणे आवश्यक आहे. त्यासाठी जनतेप्रती बांधिलकी आणि आखलेल्या विकास योजनांची त्या मागील तत्त्वे व उद्देश लक्षात घेऊन योग्य अंमलबजावणी करणे सद्यस्थितीतही करता येणे बऱ्याच अंशी शक्य आहे, हे आव्हान नोकरशाही (ब्युरोक्रसी) पेलते का हे येणारा काळच सिद्ध करणार आहे.अशा प्रकारे जिल्हा प्रशासनाचे घटक अभ्यासत असताना प्रशासनाचे आवश्यक घटक, जिल्हा प्रशासनाचे घटक, जिल्हा प्रशासनाची तत्वे, जिल्हा प्रशासनाची कार्य इ. मुद्यांचा विचार केला आहे.

अशा प्रकारे महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासत असतानामहसूल प्रशासनाची रचना, महसूल प्रशासनाची उदिष्टे इ. मुद्यांचा सविस्तर विचार केलेला आहे.

## २.७ स्वाध्याय

प्रश्न:

1) 'जिल्हा प्रशासनातील विविध घटक स्पष्ट करा.

2) ७३व्या घटनादुरुस्तीवर तपशीलवार नोंद लिहा.

3) स्वातंत्र्योत्तर काळात जिल्हा प्रशासनात झालेल्या बदलांचा लेखाजोखा द्या.

***MCQs:***

i) खालीलपैकी कोणता घटक जिल्हा प्रशासनाचा महत्त्वाचा घटक आहे?

A. महसूल
B. आरोग्य
C. शिक्षण
D. मनोरंजन

ii) ७३ वी घटनादुरुस्ती ______ शी संबंधित आहे.

A. नगरपालिका
B. पंचायती राज.
C. राज्य घडामोडी
D. संसद.

iii) गाव पातळीवरील महसूल अधिकारी कोण आहे?

A. तलाठी

B. जिल्हाधिकारी

C. ग्रामसेवक

D..पोलीस पाटील.

## २.८ संदर्भग्रंथ


- *Local Government. S.R. Maheswari Local Government in India.*
- *Administrative Reform. P.R. Dubbashi Administrative Reforms.*
- *Administration of Law and Order. K. K. Sharma Law and Order Administration in India.*
- *www.google.com.*
- *भारतीय प्रशासन - प्रा. व्ही बी. पाटील प्रकाशन के सागर*
- *मराठ्यांचा इतिहास - जितेंद्र आमरे, शेठ प्रकाशन*
- *महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था - प्रा. डी. बी. पाटील प्रकाशन के सागर*
- *प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास - गायधनी*
- *भारतातील स्थानिक स्वशासन - प्रा. अ. ना. कुलकर्णी*
- *जिल्हा प्रशासन-डॉ. दर्शनकार*
- *पंचायत राज प्रकाशन-डॉ.दर्शनकार*


❖❖❖❖

munotes.in

# 3

# भारतातील महसूल प्रशासन-I

**प्रकरणाची रूपरेषा**

३.१ पाठाची उदिष्टये

३.२ प्रस्तावना

३.३ महसूल संकल्पना

३.४ महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्र्वभुमी

३.५ महसुल प्रशासनाची उदिष्टये

३.६ महसूल प्रशासनाचे स्वरूप

३.७ महसुल प्रशासनाचे कार्यक्षेत्र व्याप्तीवरचना

३.८ महाराष्ट्रातील महसुल प्रशासनाचे प्रादेशिक विभाग

३.९ स्वातंत्रयोत्तर काळातील जमीन सुधारणांचा आढावा

३.१० समारोप

३.११ स्वाध्याय

३.१२ संदर्भग्रंथ

## ३.१ पाठाची उदिष्टये

- शासन व प्रशासन संकल्पना समजून घेणे
- महसूल प्रशासनाची संकल्पना अभ्यासणे.
- महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्र्वभुमी अभ्यासणे.
- महसूल प्रशासनाची उदिष्टये अभ्यासणे.
- महसूल प्रशासनाचेकार्यक्षेत्र अभ्यासणे.
- महाराष्ट्रातील महसुल प्रशासनाचे प्रादेशिक विभाग अभ्यासणे.

munotes.in

## ३.२ प्रस्तावना

शासन आणि प्रशासन ही राज्य कारभाराच्या रथाची दोन चाके असतात.राज्यकारभार सुरळीत चालवायचा असेल तर ही दोन्ही चाकांची दिशा एकच असली पाहिजे.प्रशासनाने निर्भीडपणे काम करावे. .दबावाची प्रकरणे निदर्शनास आणून दयावीत व शासन व्यवस्था सक्षम करावी अशी नागरीकांची अपेक्षा असते.सरकार म्हणजे Government शासन म्हणजे Governance आणि प्रशासनाला Administrationअसा इंग्रजी शब्दप्रयोग वापरला जातो.शासन आणि प्रशासन ही राज्य कारभाराच्या रथाची दोन चाके असतात.राज्यकारभार सुरळीत चालवायचा असेल तर ही दोन्ही चाकांची दिशा एकच असली पाहिजे.प्रशासनाने निर्भीडपणे काम करावे. .दबावाची प्रकरणे निदर्शनास आणून दयावीत व शासन व्यवस्था सक्षम करावी अशी नागरीकांची अपेक्षा असते.सरकार म्हणजे Government शासन म्हणजे Governance आणि प्रशासनाला Administrationअसा इंग्रजी शब्दप्रयोग वापरला जातो.सरकार चालवण्यासाठी विविध प्रशासन कार्यरत असतात त्यापैकी भारतामध्ये प्राचीन काळापासून राज्यांची स्वतंत्र महसूल प्रशासन व्यवस्था अस्थित्वात होती.भारतीय व्यवस्थमध्ये राजा हाच सगळ्या जमिनीचा मालक असायचा. हा भुस्वामी राजा आपल्या राज्यातील प्रजेला भुमी कसायला देत असे आणि प्रजेला त्यांच्या उत्पन्नातून काही हिस्सा महसूल म्हणून भूस्वामीला देण क्रमपाप्त होते.अशा महसूल आकारण्याची व्यवस्था प्राचीन राज्यव्यवस्थांमध्ये वेगवेगळी होती.चंद्रगुप्त मौर्यापासूऩ अशोक ते पेशव्यांपर्यत या महसूलांची आकारणी वेगवेगळया पध्दत्तीने होत होती.त्याचं प्रमाणीकरण पहिल्यांदा शेरशाह सुरीने केलं.पुढे भारत देशात अनेक उदारमतवादी राजांनी **महसूल** व्यवस्थेमध्य सुधारणा करून राज्य कारभार सांभाळला आणि **महसूल वसूल** करण्याच्या अनेक परंपरांना एकत्र करून इंग्रजांनी स्वतःची एक **महसुल** यंत्रणा बनविली.**महसूल** प्रशासन हे भारतीय प्रशासनाच सर्वात जुनं प्रशासन आहे. इंग्रजांनी सगळयात आधी बंगालमध्ये आपलं अधिपत्य स्थापन केलं.तिथल्या जमीनदारांच्यां माध्यमातून ते **महसूल** गोळा करित असे. त्या व्यवस्थेचं नाव त्यांनी जमीनदारी महसूल व्यवस्था असे ठेवलं.जमीनदारी महसूल प्रणालीमध्ये इंग्रजांना जाणवलं जमीनदारी महसूल व्यवस्थेव्दारे इंग्रजांना जास्त फायदा होत नाही म्हणुन इंग्रजानी पेशव्यांच्या अधिपत्याखाली असणा-या आणि दक्षिणेमध्ये असणा-या नंतर ब्रिटीशांनी काबीज केलेल्या प्रातांमध्ये एक नविन महसुल व्यवस्था सुरू करण्याचे ठरविले. जमीनदारी पध्दतीमध्ये जमीनदार आपला महसूल प्रथम सरकारला ठेका पध्दतीने जमा करीत असत तर नविन पध्दतीमध्ये **महसूल** यंत्रणा अस्तित्वात आणली

त्याच च नाव होतं **महलवारी महसुल** यंत्रणा .एकंदरित ब्रिटीश सरकारने आपल्या आर्थिक स्वार्थासाठी **महसुल यं**त्रणेत मुलभुत स्वरूपाचे बदल केले आणि महसुल प्रशासनाच्या जोरावर भारतात १५० वर्षे राज्यशासन केले . भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर भारत सरकारने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला . त्यामुळे सरकारला विकासात्मक कार्यासाठी लागणारा पैसा कर रूपाने महसुल यंत्रणेव्दारा सरकारच्या तीजोरित जमा होऊ लगला . **भारतात तीन पदरी करव्यवस्था आहे** . भारताच्या राज्यघटनेने केंद्रसरकारला आयकर . गुंतवणुकीवरील कर संपत्तीवरील कर व वारसाहक्काने मिळालेल्या संपत्तीवरील कर . विक्रीकर . आयात कर . सेवावरील कर अबकारी कर वसुल करण्याचा अधिकार दिला आहे . तसेच राज्यांना मालाच्या आंतरराज्यीय विक्रीवरील कर . करमणुक कर . व्यवसाय कर . मंद्य ऊत्पादनावरील अबकारीकर तसेच मालमत्तेच्या हस्तांतरावरील स्टॅप डयुटी वसुल करण्याचा अधिकार दिला आहे . याचबरोबर राज्यसरकारकडून स्थानिक स्वराज्य संस्थाना मालमत्ता कर व जकात कर वसूल करण्याचा तसेच पाणी व स्वच्छतेच्या सोयीसारख्या सार्वजनिक सेवांसाठी किंमत वसूल करण्याचा आणि **शेतसारा** वसूल करण्याचा अधिकार दिला आहे . राज्यपातळीवर हा महसूल वसूल करण्यासाठी सक्षम जिल्हा महसूल प्रशासन कार्यरत आहे . महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत . जिल्हा पातळीवर असलेल्या या महसुल प्रशासनाशी सामान्य जनता शेतकरी शेतमजूर यांचा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी विविध कामामुळे नियमित संबंध येतो . या शेतकरी आणि सामान्य जनतेचे प्रश्न त्वरीत निकाली काढण्यासाठी तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमूख कार्यक्षम व गतिमान व पारदार्शक करण्याच्या दृष्टिने महाराष्ट्रातील ३६ जिल्हयात महसुल विभागाने १ ऑगष्ट या महसुल दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात २०१५ पासून **महाराजस्व अभियान सुरु** केलेले आहे .

## ३.३ महसूल संकल्पना

आधुनिक युगात शासन व्यवस्थचे कार्य वाढत आहे . कल्याणकारी आणि विकास कार्य करणे आधुनिक शासन व्यवस्थेचे कर्तव्य बनले आहे . या कर्तव्याची पुर्तता करण्यासाठी शासनाकडे आर्थिक निधी असणे आवश्यक आहे . हा नीधी गोळा करण्यासाठी सरकार आपल्या प्रजेवर निनिराळे कर लादते . कर म्हणजे महसूल होय . महसुल हा अनेक प्रकारचा असून यामध्ये जमीन महसूल़ पाण्यावरील कऱ आयकऱ शेतीच्या उतपन्नावरील कऱ वस्तु व सेवा वरील कर . कारमणुकीच्या साधनावरील कर . इत्यादी कर आहेत . महसूल हा जमीनीवर लावला गेलेला व दर वर्षी घेण्यात येणारा संपत्ती कर

होय. मराठी भाषेतील 'महसूल' या शब्दप्रयोगासाठी संस्कृत भाषेतील 'राजस्व' हा शब्दप्रयोगही प्रचलीत आहे.'राजस्व' म्हणजे प्रजेव्दारा राजाला देय असलेली रक्कम.राजस्व देण्याचे पारंपारीक कारण म्हणजे राजा किंवा राज्य प्रजेचे संरक्षण करतो आणि प्रजेच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील असतो.प्राचीन आणि मध्य युगात जमिन महसूल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते.

अ. **महसूल प्रशासनाचा अर्थ** ः

अ. **महसूल** ः महसूल ही संकल्पना जमीन महसुल या संकल्पनेपेक्षा व्यापक आहे.किंबहूना जमीन महसूल हा महसूलाचा एक घटक आहे.आधुनिक काळात शासनाला कल्याणकारी राज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी पैसा हवा असतो. त्यासाठी लागणारा पैसा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर प्रजेकडून कर रूपाने गोळा करण्यात येतो

ब. राज्यकारभार चालविण्यासाठी जनतेकडून त्यांच्या उत्पन्नापैकी काही अंश कर म्हणुन वसूल करणारी यंत्रणा म्हणजे **महसूल** प्रशासन होय.

क. करनिर्धारण आणि करवसूली ही जबाबदारी पार पाडणा-या घटकाला महसुल विभाग किंवा **महसूल** प्रशासन असे म्हणतात.

ड. **जमीन महसूल** ः जमीन महसूल म्हणजे जमीनीवर लावण्यात आलेला कर होय.हा कर जमीनीच्या उत्पादक्तेवर आधारीत असतो. भारतात प्राचीन आणि मध्ययुगीन काळात राजा हा प्रजेने आपल्या शेतीत पिकविलेल्या अन्नधान्याचा काही भाग महसूल म्हणुन आकारत असे.आणि त्याच मोबदल्यात प्रजेची संरक्षणाची जबाबदारी राजा स्विकारत असे.त्यावेळी राजाचा आणि प्रजेचा या जमीन महसुलीमुळे प्रत्यक्ष संबंध येत असे.स्वामीत्वाचा अधिकारात जमीन महसूल आकारणे अभिप्रेत असले तरी त्यासंबंधीचे निश्चित नियम जेव्हा अस्तित्वात नव्हते त्यावेळी भूधारकांच्या उत्पन्नाचा निम्मा एक तृतीयांश एक चतुर्थाश किव्हा एक पंचमांश हिस्सा जबरदस्तीने जमीन महसूलीच्या नावाखाली वसुल केला जात असे.

## ३.४ महसूल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्र्वभुमी

माणुस रानटी अवस्थेतून बाहेर पडला.तो टोळयाटोळयांनी राहू लागला आणि शेती व्यवसायाचा शोधाने मानवी जीवन स्थिर झाले .प्रबळाने स्वसामर्थाने दुर्बलांना जिंकून दंड शक्तीच्या उपयोगान इतरांवर स्वामित्व प्रस्थापित करून राज्य निर्माण केले.व राज्याचा कारभार सुव्यवस्थित चालण्यासाठी प्रत्येक राज्याच्या राजांनी प्रशासन निर्माण

केले व राजांनी आपल्या प्रजेचे संरक्षणाचे कार्य समर्थपणे करण्यासाठी महसुलाची वेगळी व्यवस्था निर्माण केली. भारतामध्ये प्राचीन कालापासून राज्यांची स्वतंत्र महसुल व्यवस्था होती. त्यावेळी **राजस्व म्हणजे कर हे फक्त जमीनीच्या वापरासंबंधी जनता राजाला देत असे.** भारतीय व्यवस्थेमध्ये **राजा** हाच सगळया जमीनीचा मालक असायचा. नागरीकांना जमीन कसायला दिली की तो नागरीक आपल्या उत्पन्नामधून काही हिस्सा हा राजाला देणं क्रमप्राप्त होतं. अशा महसूल आकारणीची व्यवस्था प्राचीन राज्य व्यवस्थांमध्ये वेगवेगळी होती. चंद्रगुप्त मौर्यापासून अशोक ते पेशव्यांपर्यंत या महसुलाची आकारणी वेगवेगळया पध्दत्तीने होत होती. त्याचा ऐतिहासिक आढावा पुढील प्रमाणे.

**महसूल प्रशासनाचा उदय** ः. अश्म युगातील माणुस टोळयाटोळयांनी एकत्र गुहेत राहत असे. कालातंराने त्यानी गुहेत राहणे सोडून दिले. शिकार करण्याच्या जोडीने पशुचे पालन करण्यास व शेती करण्यास त्यांनी सुरवात केली. मानवी जीवन शेतीचा शोध लागल्यामुळे स्थिर झाले. स्थायिक झालेल्या टोळयामध्ये संघर्ष वाढीस लागला. या संघर्षात पराभूत झालेल्या टोळीच्या लोकांना जिंकलेली टोळी गुलाम बनवू लागली यातुनच राजस्त्तेचा उद्य झाला. राजे लोकांची लहान लहान राज्ये निर्माण झाली. राज्य चालविण्यासाठी राज्यातील प्रजेच्या उत्पन्नतील काही भाग घेण्यास राजसत्तेने सुरू केले म्हणजेच महसूल गोळा करण्यास प्रारंभ झाला.,थोडक्यात महसूल प्रशासनाचा उदय राज्य सत्तेतून झाला.

**मौर्य काळ ह्यइ स.पू ३२१ ते इ स. पू १८५ह** ः मौर्य साम्राज्य म्हणजे भारताच्या इतिहासातील पहिले सुसंघटित आणि सुनियंत्रित असे पहिलेच सामाज्य होय. इसवीसन पुर्व ३२१ मध्ये चंद्रगुप्त मौर्य याने मगध साम्राज्याची सूत्रे हाती घेतली. कौटिल्याच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राज्यकारभाराची सुनियंत्रित यंत्रणा उभी केली आणि राज्यकारभार सुलभपणे चालविण्यासाठी सुव्यवस्थित करप्रणालीमुळे महसुलात वाढ झाली. या काळातील सर्वात महत्वाचा ग्रंथ म्हणजे कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' होय. कौटिल्याने हा ग्रंथ १५ विभागात लिहला आहे. अर्थशास्त्र या ग्रंथातील तत्वांच्या आधारे शासनाव्दारे प्रशासित अशा शिस्तशीर व उचित प्रणालीव्दारे कर म्हणजे **महसूल** आकारला जाई. मौर्यसाम्राज्यामध्ये जमिनीची मोजणी व नोंदणी ठेवण्यासाठी 'रज्जूक'' नावाचा अधिकारी नेमला जाई. कौटिल्याच्या अर्थसास्त्रामध्ये जमिनीची मोजणी कशी करावी तसेच जमीनीची प्रतवारी व सर्व्हेक्षण करून तिचे कोरडी बागायत ओलसर अशाप्रकारे प्रतवारी करून जमिनीचा प्रकार जमीनीचा प्रकार सिंचन सुविधा व त्यावरील पकिांच्या आधारे सेतसारा कराची निश्चिती कशी करावी यावर

प्रकाशझोत टाकण्यात आला आहे.कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथाचा आधर घेऊन मौर्य काळात महसूल आकारणी केली जात असे.

**मुघल काळ ःह्य इ स.पू १५४० ते १७२६ह** मुघल काळाच्या प्रशासनाची सर्वात मोठी व टिकाऊ स्वरूपाची देणगी कोणती असेल तर ती महसूल प्रशासनाची.जमिनीची मालकी व कररचना असणारी महसूल पध्दत दिल्लीचा बादशहा शेरशहाने इ.स १५४० ते १५४५ दरम्यान अवलंबली.त्याच्या कारकिर्दीमध्ये प्रत्येक जमीनधारकाची नोंद करण्यात आली.हा महसूल काटेकोरपणे गोळा केला जाई.जमीनधारकाचे हक्क व त्यची जबाबदारी करार नाम्यात असे.मोगलबादशहा अकबराने त्याचा मंत्री तोडरमल याच्या मदतीने करपध्दत्तीची फेरउभारणी केली.त्याने जमीन मोजणीसाठी प्रथमच काठीव साखळीचा वापर केला.जमीनीच्या क्षेत्रफळासाठी **बिघा** हे परिमाण ठरविण्यात आले व जमीनीची उत्तम मध्यम व निकस या तीन प्रकारात विभागणी करण्यात आली.जमीनीच्या एकूण उत्पन्नापैकी एकतृतिअंश एवढा कर म्हणून घेतला जाई .त्याचे चलनामध्ये मुल्यांकन करून मागील १९ वर्षाच्या सरासरी इतके पुढलि १० वर्ष साठी करपात्र उत्पन्न ठरविले जात असे. अकबर बादाशहाच्या दरबारात राज तोडरमल हा दिवाण व वजीर होता.त्याच्यापुर्वी ग्रॅड टंक रोड बांधणारया शेरशहा सुरीनं महसूल प्रशासनाच्या गाभ्याला हात घातला होता.पण त्याची राजवट अल्प असल्यामुळे ती विकासित होऊ शकली नाही.पण मुघल काळात अकबराचा दिवाण राजा तोडरमल यानं महसूल प्रसासनाची शास्त्रशुध्द आकारणी केली जी आज जिल्हा ते गाव प्रसासन कलेक्टर तहसिलदार तलाठी जमीनीच्या संदर्भात प्रचलीत आहे. त्या काळात उद्योग व व्यापारापेक्षा जमीनीतून जास्त उत्पन्न मिळत असल्यामुळे राजवटीचा खर्च भागविण्यासाठी जमीन महसूल हा सर्वात महत्वाचा स्त्रोत होता.ते राजा अकबरानं हेरलं आणि तोडरमलल त्याचं काम दिलं.राजा तोडरमल हा जसा लढवय्या तसाच कुशाग्र बुध्दीचा व जमीन शेतीचा तज्ज्ञ होता त्यानं परिश्रमपुर्वक महसूल प्रशासनाची पध्दत विकसित केली.त्याच्या महसूल प्रशासनाचं सर्वात महत्वाचं वैशिष्टय म्हणजे जमीनीचं सर्वेक्षण होय.तोडरमलनं शेतसारा वसुलीसाठी व पर्यायानं प्रशासनासाठीपण एक सुव्यवस्था तयार केली. मुघल बादशहाचा भूभाग हा अनेक ‘सुबा’ म्हणजे भागात विभाजला. सुबा हा अनेक ‘सरकार’ व सरकार अनेक ‘परगणा’मध्ये पुढे विभाजित केला.परगणामध्ये भौगोलीक परिस्थिती लक्षात घेऊन अनेक गावंचा समावेश केलेला असायचा.प्रत्येक परगण्यामध्ये शेतसारा वसुलीसाठी ‘मालगुजार’ हे पद निर्माण केलं होतं.त्याच प्रशासन म्हणजे मालगुजारी होय. मालगुजाराच्या हाताखाली अनेक अधिकारी असायचे.सर्वात शेवटचा अधिकारी म्हणजे पटवारी किंवा आजचा तलाठी होय. **मालगुजार** हे उच्च दर्जाचे प्रशिक्षित अधिकारी असायचे.मंत्री तोडरमलची वरील

munotes.in

नमुद पध्दत दक्षिणेकडे निजामाचा दिवाण अहमदनगरचा वजीर अंब यानेही सन १६०५ ते १७२६ या काळात काही सुधारणासह विकसित केली. त्यांनी जमीन मोजणीच्या वरील पध्दत्ती कायम ठेवल्या.

**मराठा राजवट ह्य इ.स.१६३० ते ते १८१८ह** ः मराठा साम्राज्य इ स १६३० ते इ.स १८१८ दरम्यान भारतातील एक साम्राज्य होते. मराठेशाहीमध्ये इमाम व मिरास हे शब्द जमिनीच्या महसूल आकारणीशी निगडीत होते. याव्दारे जमिनीची मालकी व महसूल आकारणीचे अधिकार देण्यात येत होते. हे अधिकार वंशपरंपरागत होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ म्हणजे १६७४ पासून सुरू झला. या काळात जमिन आकारणीसाठी 'खेडे' हे एकक वापरले जात असे. पीकउत्पादन व करणा–याची क्षमता पाहून जमिन महसूल आकारणी म्हणजे शेतसारा बसविला जाई. या पध्दत्तीला 'कमालधारा' म्हटले जाई. प्रत्येक गावात मामलेदार हे देशमुख देशपांडे यांचे मदतीने जमीन गोळा करण्याचे काम करत. दुस–या बाजीरावाच्या काळात सन १७९६ ते १८१८ मध्ये ही पध्दत बंद झाली. याच काळात मामलेदार या पदाचा लिलाव सुरू झाला.

**ब्रिटीश काळ ( इ.स.१६०० ते १७५७)** ः

मोगल प्रशासनाच्या शेवटच्या कालखंडात अस्थिरता निर्माण झाली आणि अस्थिरतेच्या वातावरणात १७६५साली. ईष्ट इंडिया कंपनीने बंगाल विहार आणि ओरिसा या राज्याचे नागरी प्रशासन ताब्यात घेतले. ईष्ट इंडिया कंपनीचा प्रमुख हेतू जमीन महसूल गोळा करणे व त्याचे वितरण करणे हा होता. ब्रिटीशांनी १६०० ते १७५७ पर्यंत भारतीय भुभागावर वर्चस्व संपादन केले. परंतू ब्रिटीश हे व्यापारी म्हणुन हिंदूस्थानात आले होते. त्यांच्या व्यापारी दृष्टीकोनातून त्यानां हिंदूस्थानातून उत्पन्न हवे होते आणि भारतामध्ये जमिन हे उत्पन्नाचे महत्वाचे साधन होते हे त्यांनी हेरले म्हणुन ब्रिटीशांनी उत्पन्न मिळविणेकरिता जमिनीची शास्त्रशुध्द पध्दत्तीने सर्वेक्षण करण्यासाठी १७६७ मध्ये 'सर्व्हे ऑफ इंडियाची' स्थापना केली. सदर पदावर सर्व्हेअर जनरल ऑफ इंडिया म्हणुन जेम्स रनेल या ब्रिटीश अधिका–याची नियुक्ती केली. जेम्स रनेल लिखित ' भ्एन्गल्स अतलस' या पुस्तकात शंकुसाखळीने जमीनीची मापे आणि खागेलशास्त्रीय माहिती याचा एकत्रित आधर घेऊन नकाशे तयार केले गेले होते आणि भोगवटदारांकडुन **महसुल कर** आकारणी सुरू केली १७६५सालच्या अलाहबादच्या तहानुसार बंगाल बीहार आणि ओरिसा प्रांतात दिवाणी म्हणजेच **महसूल गोळा** करण्याचे अधिकार मिळाल्यानंतर कंपनीने स्वतःची प्रशासकीय यंत्रणा स्थापन कारण्याऐवजी प्रचलित स्थानिक जमीनदाराकडे ही जबाबदारी सोपविली. जमीनदार आणि कंपनीच्या संगनमतामुळे कंपनी आर्थिक संकटात सापडली. १८७२ साली वॉरन

हेस्टिंग्स याने महसूल प्रकियेमुळे कंपनीचे नियंत्रण प्रस्थापित करण्याकरिता **महसुल अधीक्षकाची** नेमणूक केली.

**ब्रिटिशकालीन जमीन महसुलीचे धोरण :**

ब्रिटीश साम्राज्य विस्तारातील मराठयांची सत्ता हा सर्वात मोठा अडसर आहे याची जाणीव ब्रिटीशांना होती. सन १८०२ मध्ये ब्रिटीशांनी पेशव्यांशी वसईचा तह करून त्यांची सत्ता क्षीण केली. सन १८११ साली मांऊट स्टुअर्ट एल्फीस्टन पुण्यात इंग्रजाचा वकील म्हणून हजर झाला. ब्रिटीशांची सत्ता भारतात स्थीर झाल्यानंतर निरनिराळया ठिकाणी निरनिराळया **महसूल पध्दती** राबविल्याचे धोरणे ब्रिटीशानी आखले. बंगाल मध्ये कायमधा–याची पध्दत तसेच महालवारी पध्दत लागू केली. रयतवारीची पध्दत मद्रास इलाख्यात काही दिवस अगोदर सुरू केली होती. कायमधारा पध्दती म्हणजे सरकारने जमिनदाराला कायमचा **महसूलाचा दर** ठरवून द्यावयाचा या पध्दतीमध्ये जमिनदार व सरकार यांचे नाते **महसूलाबाबत** असे. रयतेला येथे काही स्थान नसे. महालवारी पध्दत्तीमध्ये एका विशिष्ट व्यक्तीचा मालकी हक्क जमिनीवर नव्हता. म्हणजे या पध्दतीत संपूर्ण गाव व सरकार यांचा संबध असे. यामध्ये सुध्दा रयतेला स्थान नसे. रयतवारीमध्ये मात्र व्यक्ती व सरकार यांचा सवंध असे. ही पध्दत सन १८१८ मध्ये जेव्हा ब्रिटीशानी मराठयाकडून सत्ता काबीज केली तेव्हा सुरू केली. त्यावेळी स्तूअर्ट एलफिन्स्टनने महाराष्ट्रात सरकारच्या **महसुली उत्पन्न** वाढविण्यासाठी रयतवारी पध्दत्तीचा पाया घातला. जमीन महसूलाची आकारणी करणे सुलभ व्हावे म्हणून ब्रिटीशांच्या कारकिर्दीत श्री गुंटर नावांच्या अधिका–याने शास्त्रशुध्द पध्दत्तीने शेतजमीनीची मोजणी शंकूसाखळीने केली. शंकुसाखळीस गुंटरचैन गुंठा म्हणत. सदर साखळी ३३ फुट लांबीची असून १६ भागात विभागली आहे. त्या प्रत्येक भागाला आणा म्हणत व गुंटरसाहेवांच्या नावावरून पुढे जमीन मोजणीसाठी गुंठा प्रचलित झाला. ब्रिटीश काळात जमिन महसूल ठरविण्याचा पहिला मान पुणे जिल्हयातील इंदापुर तालुक्यातील भिगवण येथुन श्री प्रिगले नावाच्या सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी सन १८२७ मध्ये मिळविला. निव्वळ शेतीच्या आधारे शेतसारा ठरविण्याचा श्री प्रिंगले या अधिका–याचा प्रयत्न काही प्रमाणात अयशस्वी झाल्याने श्री गोल्डस्मिथ हे आय .सी एस अधिकारी तसेच कॅप्टन विगेंट इंजिनिअर व ले. डेव्हीडसन या तीन अधिका–यांची समिती त्यावेळच्या सरकाराकडून नेमण्यात आली. येणा–या अडचणी व प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन त्यांनी सन १८४७ मध्ये जमावंदी कामी सयुक्त प्रयत्न करून जॉईट रिपोर्ट तयार केला. तदनंतर त्या आधारे जमिनीची मोजणी करून संपुर्ण मुंबई प्रांतात गुजरात पासून बेळगाव पर्यंत जमाबंदीचे काम सुरू करण्यात

आले.जमीनीच्या मगदुरानुसार प्रतवारी वर्गीकरण व त्यावर आधारित जमीन **महसूल** आकारणीचे काम पुढे चालू ठेवण्यात आले. सध्या अस्तित्वात असलेली जमिन **महसुल** आकारण्याची पध्दत ब्रिटीश राजवटीत ठरवून दिलेल्या पध्दतीनुसार आहे.

## ३.५ महसुल प्रशासनाची उदिष्टये

महाराष्ट्र जमीन **महसुल अधिनियम १९६६ मध्ये** महसुल प्रशासनाची खालील उदिष्टये नमूद करण्यात आलेली आहेत ती पुढील प्रमाणे

१. जमीन महसूल संहिता व तदनुषंगिक नियमाप्रमाणे ठरवून दिलेल्या नमुन्यात कागदपत्रे तयार करणे व अद्ययावत ठेवणे.

२. नवीन तयार झालेले जमीनीचे पोट हिस्से मोजून त्याचे नकाशे तयार करणे.

३. जमीन सुधारणा कायद्याची अमलबजावनी करणे.

४. जमिनीबद्दल निर्माण झालेले वाद मिटविणे.

५. राज्यातील जमीन महसुलाची वसुली करणे.

## ३.६ महसूल प्रशासनाचे स्वरूप

महसूल प्रशासन हा जिल्हा प्रशासनाचा सर्वात महत्वपुर्ण घटक आहे.महसुल प्रशासनाचे स्वरूप आकलन होण्यासाठी खालील मुद्यांचा विचार करावा लागतो.

१. महसुल निर्धारण व वसूली ः महसुल हे राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.आपल्या विभागातील प्रजेचा कल्याणासाठी महसूल प्रशासनाला विविध कराचे प्रमाण निर्धारित करावे लागते अश्या परिस्थितीत लेकशाहीची तत्वे अंगिकारून महसूल प्रशासनाला महसुल निर्धारण व महसुलाची वसूली करावी लागते .उदा करोनाचा फटका बांधकाम क्षेत्राला बसला म्हणुन समयसुचकता पाळुन महसूल प्रशासनाने गेल्या वर्षी घर खरेदी करणा–या साठी मुद्रांक शुल्कात थोडी कपात केली होती त्यामुळे मुबंईत घरविक्रीतून २३५५ कोटी रूपायांचा महसूल शासनाला प्राप्त झाला आहे. ह्यसंदर्भ लोकसत्ता दैनिक दिनांक १ जानेवारी 2022).

**२.जमीनीचे मोजमाप** ः महसूल प्रशासनाचा एक भाग म्हणून भूमी अभिलेख विभाग तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत असतो.जमीन मोजणीचे कागदपत्र जमीनीचे नकाशे गावाचे नकाशे वगेरे तयार करणे आणि सुरक्षित ठेवणे भुधारकांची जमीन मोजून देणे पोट हिस्स्सा मोजणी करणे तसेच प्रत्येक भुखंडात नकाशे तयार करणे इत्यादी कार्य भाग महसुल प्रशासनाला सांभाळावा लागतो.

**३.जमिनीविषयक व्यवहारांची नोंद ः** महसुल प्रशासनाला आपल्या विभागातील खरेदी विक्रीतील व्यवहारांची नोंद ठेवावी लागते. कारण जमीनीची खाजगी विक्री भाडेपट्टी दान व बक्षिस वगेरे मार्गानी एका भोगवटदाराकडून दुस–या भोगवटदारांकडे हस्तांतरीत होत असतात. ही हस्तांतरणे मालमत्ता हस्तांतरण कायदा तसेच भारतीय नोंदणी कायद्यानुसार महसूल प्रशासनाला नोंदवावी लागतात.हे जमीनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार होताना जमीनीचे दस्तऐवज नोंदवण्यासाठी नोंदणी शुल्क व जमीनीच्या किंमतीच्या प्रमाणात मुद्रांक शुल्क वसूल केली जाते.शासनाचे दस्तऐवज नोंदणी हे महसूली उत्पन्नाचे एक साधन आहे.दुय्यम नोंदणी अधिकारी साधरणः प्रत्येक तालुक्यात असतात.

**४. शासकीय कोषागार** ःमहसुली खात्यातर्फे जमा होणा–या व खर्ची पडणारया रक्कमांचा व्यवहार देखील सब ट्रेझरी आणि जिल्हा ट्रेझरींमध्ये नोंदवावण्याचे कार्य महसुल प्रशासनाल करावे लागते.

## ३.७ महसुल प्रशासनाचे कार्यक्षेत्र व्याप्ती व रचना

जिल्हा प्रसासनातील एक महत्वाचा घटक म्हणजे महसूल प्रशासन होय. महसूल विभाग हा राज्याच्या प्रशासनाचा कणा आहे. गाव मंडल तालुका उपविभाग जिल्हा अशा सर्व पातळीवर सर्वसामान्य जनतेचा जास्तीत जास्त संपर्क या विभागाशी येत असतो. महसुल विभागाच्या कार्यतत्परतेमुळे शासनाची जनमानसातील प्रतिमा तयार होत असते. या भारतीय महसूल प्रसासनाची व्याप्ती खुप मोठी आहे. या विभागाचे कार्य क्षेत्र व्यापक आहे. आपल्या ग्रामीण विकास विषयाशी संबंधित ग्रामीण प्रशासनाचा अभ्यास करताना महाराष्ट्रातील महसुल प्रशासनाचे कार्यक्षेत्र अभ्यासताना आपणास पुढिल घटकांचा अभ्यास करावा लागतो.

**१.भुमी अभिलेख विभाग** ःमनु काळापासून जमीन महसूल व जमीन मालकी या दोन्ही बावींशी सामान्य जनतेचा संबंध आलेला आहे. भुमी अभिलेख विभागाचे प्रमुख काम जमिनीची मोजणी करणे हे आहे. यामध्ये जमीन मोजणीचे काम महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १३६ नुसार केले जाते.उदा .हद्द कायम मोजणी पोट हिस्सा. भूसंपादन. बिनशेती मोजणी इत्यादी.मोजणी अंती पुराव्याकरीता अभिलेख म्हणून उपयुक्त ठरतात. मंहसूल विभागाला लागणारी सर्व माहिती या विभागाल पुरविली जाते. तालुकास्तरावर उपअधीक्षक भुमी अभिलेख अधिकारी कार्यरत आहे. सांप्रत काळात जमीन मोजणीमध्ये नव नव तंत्र अवलंबिण्यात येत आहे. शंकू

साखळी नंतर फलक यंत्र जि.पी.एस. तसेच सॅटेलाईट या आधूनिक यंत्राव्दारे जमीन मोजणीचे काम प्रगतीपथावर आहे.

२.**'जमीन महसूल'** वसूल करणारे सरकारी कर्मचारीः 'जमीन महसूल' हा महसुलाचा एक मोठा भाग आहे.जमीन महसुल आकारण्यासाठी जिल्हयातील जिल्हाधिकारी हा प्रमुख अधिकारी असतो. तालुका पातळीवर तहसिलदार हा महसूल अधिकारी असतो.महाराष्ट्रात आणि गुजरात मध्ये यास मामलेदार म्हणतात तर ओरिसामध्ये त्यांना तालुका अधिकारी म्हणतात. तहसीलदाराच्या महसूल कार्यात मदत करण्यासाठी एक नायब तहसीलदार असतो. तालुका पातळीच्या खाली गाव घटक असतो. गावात पटवारी हा अधिकारी महसूल जमा करण्याचे काम करतो. या व्यवस्थेत सुध्दा आता बराच बदल झालेला आहे. सध्या तलाठी हा प्रशासकीय अधिकारी शेतसारा गोळा करण्याचे कार्य करतो.

३.**जलसिंचन महसुल विभाग** ः शेतक–याला आवश्यकतेनुसार शेतीसाठी पाणी देण्याची जबाबदारी जलसिंचन विभागाची असते. विशेषतः नगदी पिकांसाठी पाण्याची फार मोठया प्रमाणात गरज असते . ज्या प्रमाणात पाणी देण्यात येते त्या आधारावर कर आकारण्यात येत असतो. कर आकारण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यावर नसून जलसिंचन अधिका–यावर असते. शेतीच्या हंगामात जे पाणी शेतीला देण्यात आले आहे. त्याच्या आधारावर कर आकारून जलसिंचन विभागातर्फे वसूलीचे तक्ते जिल्हाधिकारी व तहसीलदार यांना पाठविण्यात येत असतात हे कर वसूल करून घेण्याची जबाबदारी जिल्हाधिका–याची असते. नायब तहसीलदार किंवा काही वेळा विशेष अधिकार–याची नेमणूक करून शेतक–याकडून जमीन महसुलाबरोबर हे कर वसूल कारण्यात येत असतात.

४.**आयकर विभाग** ः महसूल प्रसासनाचा 'आयकर ' हा तिसरा महत्वाचा घटक आहे. जलसिंचनाप्रमाणे आयकर विभागाचे अधिकारी कर आकारात असतात.आयकर विभागाचा संबंध केंद्र विभागाशी असतो. त्याामुळे हा विभागच संबंधितांकडून स्वतः कर गोळा करीत असते.एखाद्या व्यक्तीच्या मलमत्तेसंबंधी आयकर अधिका–यास संशय आल्यास आयकर खाते गुप्तरीतीने माहिती मिळवून एकदम छापा घालीत असत व अशा संशयित व्यक्तीच्या घराची झडती घेत असत. परंतू काही वेळा आयकर विभागाच्या प्रयत्नामुळे कर वसूल होत नसेल तर जिल्हाधिकारयाच्या मदतीने ते वसूल करण्यात येतात.

५. **शेती उत्पन्नावरील कर** ः हा महसूल प्रशासनाचा चौथा घटक होय. सांप्रत काळात हे कर नवीनपणे नुकतेच सुरू करण्यात आले आहेत. ज्या जिल्हयात मोठे

शेतकरी असतात. विशेषतः यांचाच संबंध या कराशी येत असतो.अल्पभुधरक शेतकरयाशी यांचा संबंध येत नाही.शेती उत्पन्न कराची आकारणी झाल्यानंतर हे करदेखील जमीन महसूलाबरोबर जमा करण्यात येत असतात.

**६.न्यायालयिन शुल्क आणि मुद्राकशुल्क** ः जर न्यायालयाविरूध्द खटला भरावयाचा असेल .रिट अर्ज जारी करून घ्यावयाचा असेल न्यायालयीन निर्णयाची सत्यप्रत हवी असेल अथवा इतर अदलाबदलीचे पत्र दाखल करावयाचे असेल तर हया सर्वासाठी न्यायालयीन शुल्क आकारणे आवश्यक असते. हे कर आकारण्यासाठी आणि वसुल करण्यासाठी विविध अधिकारी कार्यरत असतात.काही बाबतीत रजिस्ट्रार हे कार्य करीत असतात.प्रत्येक न्यायलयात स्टॅप विक्रेते असून ते जिल्हाधिका–याकडून स्टॅप विकत घेतात. देशातील कर कायदयानुसार मालमत्तेचे कायदेशीर मालक होण्यासाठी भारतातील सर्व घर खरेदीदारांना 'मुद्राक शुल्क' ही एक अतिरीक्त किंमत मोजावी लागते. जेव्हा जमीन या मालमत्तेचा व्यवहार होतो तेव्हा सरकार कर आकारते हा कर 'मुद्राक शुल्क' ह्यश्ताम्प फएएह म्हणून ओळखला जातो. वरील सर्व शुल्क हे सरकारी **महसूल उत्पन्नाचे** साधन आहे.

**७.अबकारी कर** ः अबकारी कर हा महसुल प्रशासनाचाच महत्वाचा घटक आहे.हे अबकारी कर विविध वस्तूंवर लावण्यात येतात. यात प्रामुख्याने दारू विषारी औषधी आणि पेट्रोलियमपासुन तयार

होणा–या वस्तू इत्यादींचा समावेश होतो. केंद्र व राज्य सरकारमध्ये अबकारी विभाग दिसून येतो.प्रत्येक जिल्हयात एक जिल्हा अबकारी अधिकारी ह्यडस्तिरच्ति श्र्क्ष्चस्रिए फफच्िएरह असतो.अबकारी कर लावणे आणि वसूल करणे अशा दोन्ही स्वरूपाचे कार्य हा विभाग करीत असतो.अबकारी कर प्रामुख्याने दारू कारखाने गोदाम यावर लावून गोळा करण्यात येत असतो.अशा व्यवसायात बेकायदेशीर उत्पादन होऊ नये यासाठी अबकारी विभाग प्रयत्न करीत असतो. जिल्हा अधिका–याचे कार्य जिल्हा अधिका–याच्या देखरेखीखाली चालत असते.जिल्हयात असलेल्या ताडी माडी व दारूच्या दुकानांची तसेच विषारी औषधालयाची आणि त्यांचे परवाने तपासण्याची कामे जिल्हयाचा प्रमुख अवकारी अधिका–यास करावी लागतात.

**८.गौण खनिज उत्खनन परवाना** ः यामध्ये वाळू विटभट्टी दगडाच्या खाणीह्यश्तेन्ए छ्रुस्र्हएरह सुरू करण्यासाठी महसूल विभागाची परवानगी आवश्यक असते. वैध अधिकाराशिवाय एखादय नागरीकाने गौण खनिजाचे उत्खनन केले तर त्याचावर दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार महसूल विभागाला आहे. दंड म्हणुन

आकारलेली रक्कम महसुल खजिन्यात जमा होत असते तसेच गौण खनिज उत्खनन परवाना शुल्क सुध्दा महसुल खात्यात सरकारी तिजोरीत जमा होत असतो .

९ . **महसूल न्यायीक प्राधिकरण किंवा न्यायलये** ः भारतात ब्रिटीश साम्राज्याच्या काळात महसुल विषयक वादांची सुनावणी करण्याचा आणि त्याबाबत निर्णय देण्याचा अधिकार सुरवातीच्या काळात जिल्हाधिकारयाकडे सोपविण्यात आला होता . कालांतराने या वादांची सुनावणी जिल्हा दिवाणी न्यायाधिशाच्या न्यायालयात केली जात असे . स्वातंत्रोत्तर काळात कार्यकारी आणि न्यायविषयक कार्याची फारकत करण्यात आली व पुन्हा एकदा महसूल विषयक वदांची जबाबदारी जिल्हा प्रशासनाकडे सोपविण्यात आली . १९९६ साली महाराष्ट्र जमीन महसूल न्यायिक प्राधिकरण स्थापन करण्यात आले . या प्राधिकरणात राज्यातील महसूल अधिका–यांच्या निर्णयाविरूध्द करण्यात आलेल्या पुर्नविचाराच्या याचिकांची सुनावणी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे . तसेच भुधारणाविषयक विविध कायदे कमाल भुधारणा कायदे वतन आणि इनाम संबंधीचे वाद यांची सुनावणी करण्याचा अधिकार देण्यात आले आहेत .

## ३ . ८ महाराष्ट्रातील महसुल प्रशासनाचे प्रादेशिक विभाग

महाराष्ट्र शासन हे भारताच्या पश्चिम क्षेत्रात असलेल्या महाराष्ट्र राज्यातील सरकार आहे . महाराष्ट्रा राज्याच्या १ मे इ . स . १९६0 रोजीच्या स्थापनेपासून येथे स्वतंत्र राज्यातील सरकार आहे . महाराष्ट्र शासनाचे महसूल प्रशासन विभागाचे कार्य सुलभ व सोईचे आणि शीघ्र गतीने व्हावे या उदात्त हेतूने महसुल प्रशासनाचे प्रादेशिक विभाग स्थापन केले आहेत . महाराष्ट्रात नागपुर अमरावती मुबंई पणेठाणे नाशिक आणि औरंगाबाद असे सात महसूल विभाग आहेत . तर मुंबई व ठाणे या महसूल विभागांना एकत्र करून कोकण हा एकच प्रशासकीय विभाग केल्याने राज्यात सहा प्रशासकीय विभाग आहेत . प्रत्येक प्रशासकीय विभागासाठी महाराष्ट्र शासनातर्फे विभागिय आयुक्त नेमला आहे . सध्या महाराष्ट्रात ३६ जिल्हे असून त्यामध्ये ९२ उपविभाग आाणि ३५८ तालुक्याचा समावेश होतो . महाराष्ट्रात **महसूल** कायद्यातील तरतुदीनुसार प्रशासनाचे अनेक भाग करण्यात आलेले आहेत त्यामध्ये 'गाव' म्हणजे सर्वात लहान घटक मानला जातो . काही गावांचा मिळुन एक विभाग मानला जातो त्यास 'सजा' म्हणतात . अशा काही 'सजा' मिळून 'मंडळ' म्हणजे सर्कल तयार होते . आणि अनेक मंडलाचा एक तालूका होतो . ४ ते ५ तालूक्यांचा एक उपविभाग म्हणजे प्रांत तयार होतो . काही उपविभागांचा मिळून जिल्हा होतो आणि असा ३६ जिल्हयाचे महाराष्ट्र बनले आहे . सामान्य जनता शेतकरी शेतमजूर यांचा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी विविध कामामुळे महसूल प्रशासनासी नियमित संबंध येतो . या शेतकरी

आणि सामान्य जनतेचे प्रश्न त्वरीत निकाली काढण्यासाठी तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमूख कार्यक्षम व गतिमान व पारदार्शक करण्याच्या दृष्टिने महाराष्ट्रातील ३६ जिल्हयात महसुल विभागाने १ ऑगष्ट या महसुल दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात २०१५ पासून **महाराजस्व अभियान सुरू** केलेले आहे.

## ३.९ स्वातंत्र्योत्तर काळातील जमीन सुधारणांचा आढावा :

महसूल या संकल्पनेची व्याप्ती आधूनिक युगात व्यापक झाली असून त्यात शेतसारा व्यतीरिक्त करदात्याकडून राज्याला देय असलेल्या सर्व बावीचा समावेश करण्यात येतो. जिल्हातील महसुल गोळा करण्याची प्रमूख जबाबदारी जिल्हयाधिका–याची असते.

शेती उत्पादन वाढीला साहाय्य व्हावे या दुरदृष्टीने स्वातंत्र्प्राप्तीनंतर भारतात जमीनविषयक अनेक जमिनिविषयक सुधारणा केल्या व त्यासाठी भूधारणक्षेत्रावर कमाल मर्यादा घालण्यात आल्या त्यामुळे सरकारच्या **महसुली उत्पन्नावर** परिणाम झाला. शेतसारा पासून मिळणारे **महसूली** उत्पन्न वाढले.

## ३.१० समारोप:

महसूल प्रशासन हा राज्य विकासाचा कणा आहे. महसूल प्रशासनासंबंधी मुलभुत संकल्पनेचा विचार करत असताना अगोदर शासन व प्रशासन या संकल्पना समजून घेण्यासाठी आपण या प्रकरणात विविध व्याख्येचा वेध घेतला आहे. महसुल प्रसासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून घेण्यासाठी स्वातंत्र्पुर्वकाळ व स्वातंत्रोत्तर काळातील महसूल प्रशासनाच्या व्याप्तीचा उदिष्टांचातसेच प्रशासकीय प्रादेशिक विभागातुन १ ऑगष्ट या महसूल दिनाचे औचित्य साधून राबविलेल्या **महाराज स्वअभियानाचा** परामर्ष घेतला आहे.

## ३.११ स्वाध्याय

**प्रश्न १ . बहुपर्यायी प्रश्न**

१. शेतसारा हा कोणत्या महसुलाशी संबधित आहे.
   अ. जमीन ब. जल क. जनावरे ड. जन.

२. कोणत्या बिटीश अधिकारयाच्या नावावरून जमीन मोजणीचा गुंठा हा प्रकार प्रचलीत झाला.
   अ. एल्फीस्टन ब लॉर्ड कॉनवालीस क गुंटर साहेब ड. चर्चिल साहेब

३. कोणत्या राजवटीत इमाम व मिरास हे शब्द जमिनीच्या महसूल आकारणीशी निगडीत होते.

अ. मराठेशाही ब. ब्रिटीश क.निजामशाही ड.पोर्तुगीज

४. राज्य कारभाराच्या रथाची दोन चाके ?

अ.शासन आणि प्रशासन ब. ब्राहमण व क्षत्रिय

क.सैनिक व पैसा ड.पाप व पुण्य

५. महसुल म्हणजे काय?

अ. कर ब. दान क. स्वामित्व ड सामाजिक बांधिलकी

**प्रश्न** २ राखालील संकल्पना स्पष्ट करा.

अ.शासन.ब. प्रशासन.क.महसूल प्रशासन.

**प्रश्न ३ रा**

१. महसूल प्रशासनाची व्याख्या सांगून महसुल प्रशासनाचे स्वरूप स्पष्ट करा व्याप्ती ऐतिहासिक

**पार्श्वभूमी स्पष्ट करा.**

१. महसुल प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट करा

२. महसुल प्रशासनाची उदिष्टे सांगा.

३. महसूल प्रशासनाचे कार्यक्षेत्र स्पष्ट करा.

४. शासन व प्रशासन ही संकल्पना स्पष्ट करून या दोहोमधील भेद स्पष्ट करा.

## ३.१२ संदर्भग्रंथ

*१. भारतीय राज्यघटना आणि कायदे अभिजीत शिंदे चाणक्य मंडळ प्रकाशन.*

*२. माहिती स्रोत : मराठी विश्वकोश*

*३.संदर्भ साधना साप्ताहिक २५ डीसेबर २०२१*

*४.जिल्हा प्रसासन लेखक प्रा.के आर बंग सागर प्रकाशन पुणे.*

*५.महाराष्ट्राच्या प्रशासनची ओळख ह्यस्थानिक व जिल्हा प्रशासनह. लेखक डॉ दिलीपसिंह निकुंभ व डॉ विजय तुंटे प्रशांत प्रकाशन.*

*६.लोक प्रशासन प्रा.बी व्ही पाटील फडके प्रकाशन.*

*७.आधूनिक भारत प्रा सीमा भोसले.केसागर प्रकाशन.*

❖❖❖❖

# ४

## भारतातील महसूल प्रशासन- II

**पाठाची रूपरेषा**

४.१ प्रस्तावना

४.२ पाठाची उद्दिष्ट्ये

४.३ महसूल प्रशासनाचे घटक

४.४ महसूल प्रशासनाची कार्ये

४.५ महसूल प्रशासनयंत्रणा

४.६ समारोप

४.७ स्वाध्याय

४.८ संदर्भग्रंथ

## ४. १. पाठाची उद्दिष्ट्ये

- महसूल प्रशासनाचे घटक
- महसूल प्रशासनाची कार्ये.
- महसूल प्रशासनयंत्रणा.
- जिल्हा स्तरीय महसूल प्रशासनाचे घटक स्पष्ट करणे.
- जमिनीचे क्षेत्रफळ मोजण्याची जुनी व नवी मापे समजून घेणे.
- जिल्हा स्तरीय महसूल प्रशासनाचे घटक समजून घेणे.
- ७/१२ चा उतारा गाव नमुना क्रमांक ८ अगाव नमुना क्रमांक ६ समजून घेणे

## ४.२.प्रस्तावना :

पृथ्वीच्या पाठीवरील प्रत्येक देशात शासन व्यवस्थेला प्रजेच्या हिताकरिता अनेक कामे करावी लागतात. ही कामे करण्याकरिता शासनसंस्थेला विविध मार्गानी पैसा उभा करावा लागतो.कर हा त्यापैकी एक महत्वाचा मार्ग आहे.संस्कृत मध्ये "कर" म्हणजे 'राजस्व'.शासकीय भाषेत या कराला **महसूल** असे संबोधण्यात येते.**प्रजेच्या खाजगी उत्पन्नातून करांच्या रूपाने ठराविक वाटा घेण्याचा राजाला हक्क आहे ही भावना भारतात पूर्वापार चालत आलेली आहे.अथर्ववेदात** करांचा उल्लेख स्पष्टपणे



munotes.in

आढळतो. भारतात राजेशाही व्यवस्थेत कर गोळा करणारी यंत्रणा होती. खेडे गाव हे लहान घटक मानले जाऊन त्याचे स्वतःचे महसुला संबंधी नियम असत. भारतात इंग्रज राजवटीचा अमल सुरू झाल्यावर हळूहळू पाश्चात्य पध्दत्तीवर करव्यवस्था गोळा करणारी **महसूल** यंत्रणा विकसित पावली. पुढे भारताला स्वातंत्र मिळाल्यावर संविधान निर्माण केले. भारताचे संविधान संघराज्यात्मक आहे. भारताच्या संविधानातील करव्यवस्था व कराधिकार क्षेत्राची विभागणी १९३५ च्या गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टला अनुसरून केली आहे. केंद्र व घटक राज्ये यांच्या करविषयक क्षेत्राच्या वेगवेगळया सूची करण्यात आल्या आहेत. आणि आपापल्या कक्षेतील कर आकारण्याचे व वसूल करण्याचे अधिकार केंद्रास व घटकराज्यांना देण्यात आलेले आहेत. त्यासाठी **महसूल** विभाग हा ग्रामस्तरापासून ते राष्ट्र स्तरापर्यंत विस्तारलेला आहे तथापि, **जिल्हास्तरीय महसूल प्रशासन** विभागाचा संबंध प्रत्यक्ष भूधारकाशी येत असून जनतेशी **सेंद्रिय संबंध** प्रस्थापित करणारा असा हा विभाग आहे.**महसूल** हे शासनाच्या उत्पन्नाचे मुख्य साधन असून ते विविध प्रकारच्या कराच्या माध्यमातून सरकारच्या तिजोरीत जमा होत असते.त्यापैकी जमिनीपासून मिळणारा **महसूल** हे राज्याचे मुख्य उत्पन्नाचे साधन आहे.जमीन हा नैसर्गिक घटक असून मानवाचे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे.सांप्रत काळात झपाटयाने होणाऱ्या औद्योगिकरण व शहरीकरण प्रक्रियेमुळे जमीन या उत्पादन घटकाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.आज त्यामुळेच अवैध जमीन हस्तांतरण यामध्ये बेनामी जमीन व्यवहार प्रचंड प्रमाणात वाढताना दिसतो आहे. भविष्यात जमिनीतील गैरव्यवहार समस्या गंभीर स्वरूप धारण करणार आहे त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकास कार्यात सक्रिय असणाऱ्या **बळीराजासमोर** तसेच ग्रामीण भागात काम करणाऱ्या सामाजिक संस्था,ग्रामीण भागाचा अभ्यास करणारे विद्यार्थी व शिक्षक यांना या समस्येचा सखोल विचार करावा लागणार आहे.त्यामूळे समाजाला जमिनीची प्रत्यक्ष कब्जे वहिवाट किंवा जमिनीवरील अधिकार कोणाकडे आहे यांची माहिती असणे आवश्यक आहे.तसेच जमिनीवरील हक्क राखायचा असेल तर जमिनीवरील कब्जा अबाधित राखणे व तो सिद्ध करणे महत्वाचे ठरते यासाठी मालकी हक्क सिद्ध करण्यासाठी जमीनविषयक **हक्क नोंदी व त्यांचे नमुने** माहिती असणे आवश्यक आहे.

## ४.३. महसूल प्रशासनाचे घटक

महसूल प्रशासनामध्ये वेगवेगळे विभाग आहेत. त्यातील प्रमुख विभाग खालील आहेत.

१) महसूल वसुली

२) जमीन मोजणी

३) जमीन व्यवहाराची नोंदणी

४) खजिना

## १) महसूल वसुली :

साधारणत: महसुल वसुली विभाग हेच महसुल प्रशासन म्हणून ओळखले जाते कारण हा विभाग प्रत्येक गावापासून ते राज्याच्या राजधानीपर्यंत राज्यभर पसरलेला आहे. हाच विभाग महसूल प्रशासन म्हणून ओळखला जात असून या विभागातील कर्मचाऱ्यांचा गावातील प्रत्येक भूधारकांशी संबंध येतो. जनतेशी जिवंत संबंध असणारा हा विभाग आहे. कारण या विभागाकडे महसूलन वसुलीचे कुाक्य काम दिलेले आहे. या शिवाय या विभागाकडै विविध कामे सोपविलेली आहेत. सर्व प्रकारच्या निवडणुका, लोकसंख्या गणना, अन्नधान्य, रॉकेल साखर इ. आवश्यक वस्तूच्या वितरणाची व्यवस्था इत्यादी.

## २) जमीन मोजणी

### जमिनीचीमोजणी प्रक्रीया :

पैसा गुंतविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे जमीन विकत घेणे. सोन्याची विक्री हातोहात होते तर जमिनीची विक्री रातोरात होते असे म्हटले जाते सांगायचे तात्पर्य हेच की, दीर्घ कालीन गुंतवणूक म्हणून स्वत:च्या मालकीची जमीन असणे हे प्रत्येकाचे स्वप्न असते. माझी जमीन किती आणि कुठपर्यंत आहे? याची प्रत्येकाला उत्सुकता असते. त्यासाठी आपण जमिनीची मोजणी करत असतो.

आपल्याकडे स्वत:च्या मालकीची अथवा वडिलोपार्जीत जमीन असेल तर त्याची मोजणी ही आपल्याला करावीच लागते. दिवसेंदिवस जमिनीचा होणारा विकास, शहरीकरण, औद्योगिकरण अन्य विकासाची कामे यासाठी होणारा जमिनीचा वापर, तसेच आपापसातील हद्दीचे वाद सोडविण्यासाठी त्या जमिनीची प्रथम मोजणी करुन मूळ नकाशाच्या आधारे हद्दीच्या खुणा कायम करुन भूमापकाकडून दाखले दिले जातात.

मोजणीच्या अनुषंगाने विविध प्रकारचे अभिलेख तयार करुन त्यामध्ये मोजणीचे नकाशे तयार केले जातात त्यानंतर भूमी अभिलेख विभागाकडे त्यांचे संधारण केले जाते. जमिनीच्या मालकी हक्काबाबतचे वादविवाद मिटविण्यासाठी भूमी अभिलेख व भूमापन अधिकारी यांच्या कार्यालयात जमीन मोजणीसाठी अर्ज करावा लागतो.

जमीन मोजणीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर आवश्यकतेनुसार मोजणी फी भरुन त्याची नोंद मोजणी नोंदवहीत घेतली जाते. संबंधितधारकांना आगावू नोटीसद्वारे कळवून मोजणीची तारीख निश्चित केली जाते. ठरलेल्या दिवशी भूमापक जागेवर येऊन प्रत्यक्ष कब्जेदाराच्या मोजणी अर्जदार, लगत कब्जेदार व पंचमंडळी यांच्या समक्ष मोजणी कामास सुरुवात केली जाते. वहिवाटीच्या खुणांवर निशाण लावून त्याआधारे प्लेन टेबलवर ठेवलेल्या नकाशा शीटवर वहिवाटीची आकृती नगरभूमापन मोजणीत १.५00 या परिमाणात तर शेतजमिनीची मोजणी १.१000 या परिमाणात तयार होते.

त्यानंतर मूळ अभिलेखाच्या आधारे वहिवाटीच्या नकाशावर सुपर इंपोज करुन नकाशावर हद्दीच्या खुणा निश्चित केल्या जातात आणि त्या नकाशाच्या आधारावर मूळ अभिलेखाप्रमाणे अर्जदारास हद्दीच्या खुणा कायम करुन प्रत्यक्ष जागेवर नव्याने दाखवल्या जातात. अशा प्रकारे जमिनीच्या मोजणीची प्रक्रिया पूर्ण होते.

महसूल विभागाने या पुढे आपल्या भूमिसंदर्भातील सर्व अभिलेखांचे संगणकीकरण करण्याचेही काम हाती घेतले आहे. भूमापकांना प्रशिक्षण देण्यासाठी सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण देण्याची योजना आखली आहे. प्रशिक्षण हे मनुष्यबळ विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. कौशल्य स्थापित करुन त्याचा विकास करण्याच्या दृष्टीने व अद्ययावत ज्ञानाशी सुसंगत राहण्यासाठी औरंगाबाद येथे भूमी अभिलेख प्रशिक्षण शाळा सन १९८५ पासून स्थायी स्वरुपात सुरू आहे. कुशल व प्रशिक्षित भूमापक म्हणजे काम चोख व वेळेत होण्याची हमी आहे.

**जमिनीचे क्षेत्रफळ मोजण्याची जुनी आणि नवीन मापे :**

जमिनीच्या हक्क व नोंदी व त्याचे नमुने या घटकात आपण ७/१२ चा उतारा, गाव नमूना क्रमांकाचे विविध प्रकार अभ्यासले आहेत.त्या नमुन्यात जमिनीचे क्षेत्रफळ गुंठा,आर एकर व हॅकटरमध्ये दिलेले असते .पूर्वी जमिनीचे क्षेत्रफळ,अंतर,धान्य ,कापड इत्यादी गोष्टी मोजताना जुन्या पारंपारिक परीमांणांचा वापर केला जात असे.ग्रामीण भागाचा अभ्यास करणारे विद्यार्थी, शिक्षक, व स्वयंसेवी संस्थांना याविषयी सखोल माहिती असणे गरजेचे आहे त्यासाठी जमिनीची जुनी व नवीन मापे दिली आहेत ती पुढीलप्रमाणे

**जुनी मापे**

३ फूट × २ फूट = ६ चौरस फूट

९ चौरस फूट = १ चौरस यार्ड

११ × ११ यार्ड = १२१ चौरस यार्ड

१२१ चौरस यार्ड = १ गुंठा

३३ फूट ×३३ फूट = १ गुंठा

४0 गुंठा = १ एकर

**नवीन/दशमान पद्धत्तीची मापे**

१ मीटर × १ मीटर = १ चौरस मीटर्स

१0 मीटर्स × १0 मीटर्स = १00 चौरस मीटर्स

munotes.in

१00 चौरस मीटर्स = १आर

४0 आर =१ एकर

१00 आर = १ हॅकटर

१00 मीटर्स × १00 मीटर्स = १ हॅकटर

**नव्या व जुन्या मापांचा संबंध**

१ आर जवळजवळ १ गुंठा

१00 आर म्हणजे अडीच एकर

१ एकर म्हणजे ४0 गुंठे/आर

१ हेक्टर म्हणजे १00 गुंठे/आर

### ३) जमीन व्यवहाराची नोंदणी

**जमिनीच्या हक्क नोंदी व त्यांचे नमुने :**

**'जमीन'** एक मुलभुत उत्पादक घटक. अर्थशास्त्रात व्यापक अर्थाने 'जमीन' या संज्ञेत शेतजमीन, जंगले, गाव व शहरातील इमारतीच्य जागा सर्व प्रकारची खनीजद्रव्ये आणि खाणी, डोंगर ,नदया ,समुद्रकिनारा, धबधबे वगैरे सर्व निसर्गत्त उत्पादनाची साधने ज्यांवर मानवी ताबा आणि मानवी हक्क चालू शकतो अशा सर्वांचा समावेश होतो. ब्रिटिशांनी भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित केल्यानंतर इंग्लडमध्ये लागू असलेली व भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पोषक असणारी जमिनीची नोंद करून ठेवण्याची पद्धत विकसित केली.प्राचीन काळात जमिनीच्या नोंदी करण्याच्या विविध पद्धत्ती प्रचलीत होत्या त्यामध्ये ब्रिटीश काळात आमूलाग्र बदल करण्यात आले.ब्रिटिश राजवटीमध्ये जमीन मोजणे, जमिनीचेक्षेत्रफळ काढणे,जमिनीचा शेतसारा ठरविणे या सर्व माहितीची नोंद कागदपत्रात नोंद करणे याची आवश्यकता भासू लागली.ब्रिटिश राजवटीत आपल्या भारतात निरनिराळ्या विभागात अश्या नोंदी ठेवण्याच्या पद्धत्ती प्रचलित होत्या.याच काळात जमीन धारण करणे आणि शेतसारा भरणे वैगरे सर्व बाबी पद्धतशीर पणे नोंद करण्यासाठी महसूल संहिता तयार करण्याचे आनेक प्रयत्न झाले. एफ जी हार्टनेल अँडरसन या ब्रिटिश अधिकाऱ्याने १९२९ च्या सुमारास एक जमीन महसूल संहिता तयार केली. खेडेगावसंबंधीची सर्व प्रकारची माहिती पद्धतशीरपणे जमा करून त्यांची व्यवस्थित नोंद करण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या प्रकारचे गाव नमुने तयार केले.या गाव नमुन्यांना एकपासून विसपर्यंत निरनिराळे क्रमांक दिले आहेत.विशेष म्हणजे स्वातंत्र प्राप्तीनंतरही ७५ वर्ष भारत सरकारने हार्टनेल अंडर्सची गाव नमुना पद्धत सुरू राहिली.त्यापैकी गाव नमुना क्रमांक ७, गाव नमुना क्रमांक १२, गाव नमुना

क्रमांक ६ आणि गाव नमुना क्रमांक ८ आहे.गाव नमुने हे कोणत्याही जमीनधारकाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असतात त्याची माहिती पुढील प्रमाणे

## ७/१२ चा उतारा म्हणजे काय?

**सातबारा उतारा म्हणजे जमिनीचा एक प्रकारचा आरसा होय.**कारण हा उतारा वाचून प्रत्यक्ष जमिनीवर न जाता त्या जमिनीचा संपूर्ण अंदाज आपल्याला बसल्या जागी मिळू शकतो. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९७१ अंतर्गत शेतजमिनींच्या हक्कांबाबत विविध नोंदी ठेवल्या जातात. यासाठी वेगवेगळी नोंदणीपुस्तके असतात(रजिस्टर बुक्स). या रजिस्टरांमध्ये कुळांचे मालकी हक्क, शेतजमिनीचे हक्क, त्यातल्या पिकांचे हक्क यांचा समावेश असतो. तसेच यासोबत २१ वेगवेगळ्या प्रकारचे 'गावचे नमुने' ठेवलेले असतात. यापैकी 'गावचा नमुना' नं ७ आणि 'गावचा नमुना' नं १२ मिळून सातबारा उतारा तयार होतो. म्हणून त्या उताऱ्याला सातबारा उतारा असे म्हणतात. गाव नमुना नंबर सात व गाव नमुना नंबर बारा हे एकत्र करून त्यातील माहिती साताबाऱ्याच्या रूपात दिली जाते. सबब साताबार्या उतारा म्हणजे गाव नमुना सात व बारा यानाधील उतारा असतो.त्यात बरोबरीने सातबारा उताऱ्यात गावाचा नमुना नंबर ६ अ मधील माहितीसुद्धा समाविष्ट केलेली असते.

## गाव नमुना क्रमांक ७ :

आपल्या मिळकतीच्या बाबतीत तलाठी कार्यालयाकडून आपण आवश्यक ती माहिती मिळविण्याचा अधिकार भरतीय नागरीकाला आहे.महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ अन्वये प्रत्येक गावातील जमिनीची कागदपत्रे ही त्या गावतील तलाठी कार्या लयात असतात.त्यापेकी गाव नमुना क्रमांक ७ याला अधिकार अभिलेख असे म्हणतात. एखाद्या व्यक्तीचा जमिनीवरील हक्क किव्हा मालकी दर्शविण्यासाठी गाव नमुना क्रमांक ७ वापरला जातो.जमिनीचे हस्तांतरण हे विक्री,गहाण, दान किंवा अन्य मार्गाने होत असते त्याचा उल्लेख या नमुना क्रमांक ७ मध्ये दर्शविलेलअ असतो.गाव नमुनाक्रमांक ७ मध्ये मुख्यत: तीन स्तंभ असतात.पहिल्या स्तंभामध्ये सर्वात वरच्या बाजूला शेतजमिनीच्या भूमापन क्रमांक किंव्हा गट क्रमांक त्याच्या शेजारी भूमापन क्रमांकाचा उपविभाग दर्शविलेला असतो.पुढे भूधारणा पद्धत्ती असा स्तंभ असतो. भूधारणा पद्धत्ती म्हणजे ज्या सात प्रकारांनी जमीन धारण केलेली असते तो प्रकार होय.या तिन्ही स्तंभा च्या वरील बाजूस गांवचे व तालुक्याचे नाव दर्शविलेले असते व खालील बाजूस शेतीचे स्थानिक नाव नोंदविलेले असते.कारण एका शेतकऱ्याची जमीन अनेक ठिकाणी विखुरलेली असल्यामुळे प्रत्येक शेतीच्या ओळखीसाठी शेतजमिनींना सुद्धा स्थानिक नाव प्राप्त झालेले असते.शेतीच्या स्थानिक नावाखाली लागवडीस योग्य असलेल्या जमिनीचे प्रमाण हॅक्टर आर आणि प्रति आर अशया तीन प्रकारात दिलेले असते.सदर गाव नमुना क्रमांक नमुना ७ मध्ये लागवडीस योग्य क्षेत्राखाली जिरायत, बागायत शेतीचे प्रमाण दर्शविलेले असते.त्याखाली लागवडीस योग्य नसलेल्या

पोटखराबा जमिनीचे प्रमाण दर्शविलेले असते.सदर प्रमाण लक्षात घेऊन शेतसाराची आकारणी केली जाते. गाव नमुना क्रमांक ७ च्या मधल्या स्तंभामध्ये जमीन भोगवटदाराचे नाव दिलेले असते.

**गाव नमुना क्रमांक १२ :**

गाव नमुना क्रमांक ७ व गावं नमुना क्रमांक १२ हे बहुदा एकत्रच असतात.जमिनीची नोंद या दोन प्रकारच्या नमुन्यात प्रामुख्याने आढळते. म्हणून जमिनीच्या नोंदीला ७ /१२ चे उतारे असे म्हणतात. गाव नमुना क्रमांक १२ मध्ये मागच्या वर्षाच्या दोन्ही हंगामात घेतलेल्या पिकांची नोंद असते म्हणून. याला पिकांची नोंद वही असेही म्हणतात.गाव नमुना क्रमांक १२ मध्ये १ ते १४ असे स्तंभ असतात. सदर जमिनीत रब्बी व खरीप पिकांच्या लागवडीखालील जमिनीच्या क्षेत्राचे प्रमाण दर्शविलेले असते. तसेच जिरायती व बागायती जमिनीचे प्रमाण दर्शविलेले असते ,महसूल खात्याच्या खातेपुस्तकातील विविध प्रकारच्या नोंदी आद्ययावत ठेवणे आणि ७/१२ चे उतारेशेतकऱ्याना उपलब्ध करून देणे हे काम गावातील तलाठयाचे असते.

**गाव नमुना क्रमांक ६ :**

गाव नमुना क्रमांक ६ याला फेरफार नोंदवही असे म्हणतात. सदर नोंदवही तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या तहसीलदारांच्या कचेरीत असते. या नमुन्यात सुरवातीला मौजे आणि तालुका असे लिहलेले असते. मौजे म्हणजे ज्या गावातील व्यक्तीचा हा नमुना असेल त्या गावाचे नाव लिहून पुढे तालुका लिहतात. या नोंदवहीत मुख्यतः चार स्तंभ असतात. पहिल्या स्तंभात नोंदीच्या अनुक्रमांक दर्शविलेला असतो. दुसऱ्या स्तंभात शेतीच्या मालकी हक्कात जो बदल झालेला असतो त्याची व्यवस्थित नोंद केलेली असते.

**गाव नमुना क्रमांक ८अ :**

गाव नमुना क्रमांक ८ अ मध्ये एखाद्या इसमाने किती जमीन धारण केलेली आहे आणि त्याने धारण केलेल्या जमिनीवर किती **महसूल** व त्यावरील उपकर देण्यास भोगवटदार जवाबदार आहे. याची माहिती या गाव नमुन्यात मिळते. गाव नमुना क्रमांक ८ अ मध्ये सात स्तंभ असतात.पहिल्या स्तंभात गाव नमुना नंबर ७ वरून नोंद क्रमांक लिहला जातो.त्यानंतर त्या जमिनीचा सर्व्हे नंबर व हिस्सा नंबर दर्शविलेला असतो.तिसऱ्या स्तंभात ७/१२ च्या उताऱ्यावर जे नमूद केलेले क्षेत्र असते ते लिहले जाते.या नमुन्यात कबजेदारांनी धारण केलेल्या खालसा आणि इनाम जमिनी स्वतंत्रपणे दाखविल्या जातात तसेच बिगर शेतीखालील जमिनीचे क्षेत्र किती आहे त्याचे प्रमाण दर्शविले जाते.गावात भूधारकाने धारण केलेल्या सर्व प्रकारच्या एकूण जमीनक्षेत्राची माहिती सुद्धा गाव नमुना क्रमांक ८ वरून उपलब्ध होते.

**सातबारा च्या उताऱ्याचे महत्व :**

सात बाराचा उतारा हा जमिनीवरील मालकी हक्क कोणाचा आहे हे समजून घेण्यासाठी शासकीय अभिलेख महसूल विभागातर्फे दिला जातो. क्रमांक ७ व क्रमांक १२ ही जमिनीच्या मालकी हक्कांसंबंधीच्या कायद्यातली विशेष कलमे आहेत.सात बारा उता–याचे महत्व पुढिल मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१ जमीन भोग वटदारा सर्वे नम्बर कळतो :**

गाव नमुना ७ च्या उताऱ्याच्या डाव्या बाजूस भूमापन्/सर्व्हे/गट नं व हिस्सा नं. दाखविलेला असतो. सरकारने प्रत्येक जमिनीच्या गटाला एक नंबर दिलेला असतो, त्याला भूमापन किंवा सर्व्हे नंबर किंवा गट नंबर म्हणतात. आणि या प्रकारातील जमिनीचा हिस्सा कितवा आहे हे हिस्सा नंबर मध्ये दाखविलेले असते. त्याजवळच जमीन ज्या प्रकाराने धारण केलेली असते ती भूधारण पद्धती दाखविलेली असते. सदरची जमीन त्या व्यक्तीकडे कशी आली हे त्यावरून कळते.

**२.भोगवटदाराच्या जमीन मालकी ह्क्काचा बोध:**

भोगवटादार वर्ग १ म्हणजे ही जमीन वंशपरंपरेने चालत आलेली, मालकीहक्क असलेली असते.यालाच खालसा असेही म्हणतात.भोगवटादार वर्ग २ म्हणजे सरकारने अल्पभूधारक किंवा भूमिहीनांना दिलेल्या जमिनी. जिल्हाधिकार्यांनी परवानगी दिली तरच या जमिनीची विक्री, भाडेपट्टा, गहाण, दान्, हस्तांतरण करता येते.

**३.लागवडीचे योग्य क्षेत्राची माहीती :**

भूमापन क्रमांकाचे स्थानिक नाव या रकान्यात शेतकऱ्याने आपल्या जमिनीला नाव दिलेले असल्यास (खाचर/वाळूखाच) उल्लेख असतो.त्याखाली जमिनीचे 'लागवडीचे योग्य क्षेत्र' यात जिरायत, बागायत, भातशेतीचे क्षेत्र याची एकूण नोंद असते.

**४. जमीनीचे स्वरुप आणी मालकी ह्क्काचे आकलन :**

'पोट खराबा' म्हणजे लागवडीस पूर्णतः अयोग्य असे ज मी नी चे क्षेत्र दाखविलेले असते.यात पुन्हा वर्ग (अ) म्हणजे शेतातील बांध/नाले/खाणी यांचा समावेश होतो, तर वर्ग (ब) मध्ये रस्ते, कालवे, तलाव व विशिष्ट कामांसाठी राखून ठेवलेल्या जमिनीची नोंद असते. त्याखाली 'आकार', जमिनीवर लावण्यात येणारा कर रू./पैसेमध्ये दिलेला असतो.गाव नमुना ७ च्या मध्यभागी मालकाचे किंवा कब्जेदाराचे नाव दिलेले असते. प्रत्यक्ष व्यवहाराच्यावेळी सातबारा उतारा पाहिला असता जर जमीन विकत देणाऱ्याच्या नावास कंस केला असेल तर तो त्या जमिनीची मालक नाही असे समजावे. जमीन विकल्यावर अगोदरच्या नावास कंस करून नवीन

munotes.in

मालकाचे नाव त्याखाली लिहिले जाते. मालकाचे नावाशेजारी, वर्तुळात काही क्रमांक दिलेले असतात, त्याला फेरफार असे म्हणतात.

गावनमुना ७ च्या उजव्या बाजूला भूधारकाच्या जमिनीचा खातेक्रमांक व त्याखाली कोणाची कुळवहिवाट असेल तर त्या कुळाचे नाव लिहिलेले असते व खंडाची रक्कम दाखविलेली असते. 'इतर हक्क' मध्ये मालमत्तेमध्ये इतर अधिकार धारण करणाऱ्याच्या नावाची नोंद असते.या सदरात जमिनीसंदर्भात घेतलेले कर्ज फिटलेले आहे की नाही हे पाहायला मिळते.काही वेळेला संपूर्ण जमीन न घेता त्यातील काही भागच विकत घेतला जातो. अशा भागाला तुकडा असे म्हणतात. इतर हक्क मध्ये 'तुकडेबंदी' असे नमूद केलेले असेल आणि जर ती शेतजमीन असेल तर ती शेतजमीन तुकडे पाडून विकता किंवा विकत घेता येत नाही.

## ७/१२ उतारा ऑनलाईन कसा मिळवावा?

महाभूलेख महाराष्ट्र भूमि अभिलेख: महाराष्ट्र शासनाने सर्व शेतकऱ्यांना व राज्यातील इतर नागरिकांना त्यांच्या शेती व जमिनीशी संबंधित कोणत्याही माहितीसाठी अधिकृत वेबसाईट सुरू केली आहे. ज्याचे नाव आहे. महाभूलेख या पोर्टलद्वारे सर्व शेतकरी आणि इतर नागरिक त्यांच्या जमिनीशी संबंधित महाराष्ट्र भूमी अभिलेख नकाशाच्या ऑनलाईन खसरा-खतावणी रेकॉर्डसहित सर्व माहिती पाहू शकतात.

महाराष्ट्र सरकारच्या संकेतस्थळाला भेट दिल्यास किंवा येथे या लिंकवर क्लिक केल्यास वरील विहित केलेल्या माहितीनुसार ७/१२ प्रदर्शित होतो.

महाराष्ट्र शासन महसूल विभागाची ऑफिशियल वेबसाईट आहे ब्हुल्एकह. महाब्हुर्म.ेग्ट.नि यावर डिजिटल साईन (डिजिटल हस्ताक्षरात) सात बारा उपलब्ध करून देण्यात आलेला आहे आणि डिजिटल साईन असल्याकारणाने संबधित तलाठी व नायब तहसीलदारांची सही घेण्याची गरज नसते.

## ४) खजिना :

जमीन महसुल हे राज्याचे मुख्य उत्पन्न, स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी आणि नंतरही बराच काळ होते.आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. ब्रिटीश राजवटीत आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सरकारी पैशाचाच व्यवहार स्टेट बँकेकडे सुपूर्द करीपर्यंत पैशांच्या व्यवहारासह सर्व कामकाज तालुकास्तरावर तहसिल कार्यालयाचा एक भाग असलेल्या जिल्हा ट्रेझरीमार्फत चालविण्यात येत आहे. महसुल खात्याचे अधिकारी सब ट्रेझरीत आणि जिल्हा टेझरीत नेमले जातात फायनान्स खात्याच्या निर्णयानुसार आता सब टेझरी आणि जिल्हा ट्रेझरीचा कारभार स्वतंत्रपणे चालू आहे.सरकारी पैशाचा व्यवहार स्टेट बँक पाहते. तेव्हा आता फक्त राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या व्यवहाराच्या नोंदी सब टेझरी आणि जिल्हा टेझरी यांच्यामार्फत केल्या जातात. तेव्हा महसूल खात्यातर्फे

munotes.in

जमा होणाऱ्या व खर्ची पडणाऱ्या रकमांचा व्यवहार देखील सब ट्रेझरी आणि जिल्हा ट्रेझरीमध्ये नोंदवावेच लागतात.

## ४.४ महसूल प्रशासनाची कार्ये

**महसूल प्रसासन हे प्रशासनाचे पंख असतात. हे पंख सक्षम असल्याशिवाय सरकारी मनसुबे तडीस जाऊ शकत नाही.** महसुल प्रशासनाचे स्वरूप अत्यंत व्यापक असून त्यांच्या कार्यात सतत वाढ होत गेली आहे. महसुल प्रशासनाची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत:

१) खाजगी मालकीच्या जमीनीचा महसुल दरवर्षी वसूल करणे, त्याची थकबाकी राहणार नाही याची दक्षता घेणे.

२) सार्वजनिक वापराच्या तसेच सरकारी जमीनीचे व्यवस्थापन व संरक्षण करणे सरकारी जमीन शेतीसाठी बिगरशेती वापरासाठी सार्वजनिक कार्यासाठी मंजूर करणे, भाडेपट्टयाने वगैरे देणे.

३) जमीनीची अद्ययावत हक्क नोंद ठेवणे,

४) सरकारी व खाजगी जमीनीचा गोषवारा खात्याप्रमाणे याबाबतच्या ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार हिशेब ठेवणे.

५) इतर खात्याच्या वसूल न होणाऱ्या रकमा जमीन महसुलाची बाकी म्हणून वसूल करून देणे.

६) जमीनीचे मोजणी कागदपत्र सुरक्षित ठेवणे ते अद्ययावत राखणे, भूधारकानी विनंती केल्यावर त्यांच्या जमीनी मोजून देणे.

७) खाजगी व सरकारी जमीन महसुल आकारणी व वसुली विक्री, माडेपट्टी वगैरे जमीन हस्तातरणे पाणीपुरवठा साधने वगैरेबाबतची आकडेवारी ठरवून दिलेल्या नमुन्यात संकलित करणे.

८) गावातील जमीनीच्या हददनिशाण्या ठराविक कालावधीने (पाच वर्षातून एकदा) तपासून त्या संबंधित मुधारकांकडून अद्ययावत ठेवणे.

९) जमीनीच्या वापरावर नियंत्रण ठेवणे.

१0) सरकारी आणि खाजगी जमीनीतील उत्खनन सार्वजनिक मलस्त्रोत आणि बिगर शेतीसाठी होणाऱ्या वापरावर नियंत्रण ठेवणे.

११) भूमी सुधार कायद्याची अंमलबजावणी करणे.

१२) शासनाने वेळोवेळी सोपविलेली कामे पार पाडणे.

१३) जाती, उत्पन्न नागरिकत्वाचे दाखले देणे.

## ४.५ महसूल प्रशासनयंत्रणा ova कार्ये.

कृषि आणि महसुल हे राज्यसूचीतील विषय असल्याने, महसुल यंत्रणा प्रत्येक राज्यात स्थापन करण्यात येते. प्रशासकीय यंत्रणेत महसुल विषयक निर्णय घेण्याचा अधिकार राज्यस्तरावरील यंत्रणेचा असला तरी प्रत्यक्ष महसुल निर्धारण आणि महसुलाची वसुली ही जबाबदारी क्षेत्रीय यंत्रणा पार पाडते. ही यंत्रणा महसुल विभाग, जिल्हा, तालुका आणि गाव पातळीवर कार्य करते. भारतात आज जिल्हा तालुका आणि गाव स्तरावर अस्तित्वात असलेली यंत्रणा ब्रिटिश राजवटीच्या कालखंडात विकसित झाली. ही यंत्रणा परिपूर्ण आणि उपयुक्त असल्याने, स्वातंत्र्योत्तर खंडात ही कायम ठेवण्यात आली.

**शासनाच्या प्रत्येक कार्यात प्रशासकीय यंत्रणा उभारलेली असते.देशाच्या विकासात वित्ताला अर्थात पैसाला अनन्यसाधरण महत्व आहे. हेओळखून शासन व्यवस्थन पैसा उभारण्यासाठी करप्रणाली विकसित केली आहे. या करप्रणालीचा कारभार सांभाळणारी यंत्रणा म्हणजे महसूल यंत्रणा होय. या महसूल यंत्रणेत वरिष्ठ अधिका–यापासून ते कनिष्ठ अधिकारी सेवकांची पदसोपान व्यवस्था निर्माण केलेली असते. यंत्रणेत वरिष्ठ अधिकारी असतो व त्याचा नियंत्रणाखाली कनिष्ठ अधिकारी कमाकमाने त्याला जबाबदार राहून कार्य करीत असतात. या यत्रंणेत विभाग,** उपविभाग,**उपविभाग शाखेची निर्मिती करून अधिकार परंपरा निश्चित केलेली असते.**

**महसुल प्रशासनाची रचना दाखविनाराा तक्ता :**

| **अ.क्र.** | **स्तर** | **यंत्रणा** | **अधिकारी/कर्मचारी** |
|---|---|---|---|
| १ | राज्य | महसूल विभाग | महसूल प्रधान सचिव |
| २ | प्रादेशिक विभाग (६ विभाग) | विभागीय कार्यालय | विभागीय आयुक्त |
| ३ | जिल्हा (३६ जिल्हे) | जिल्हाधिकारी कार्यालय | जिल्हाधिकारी |
| ४ | उपविभाग | जिल्हाधिकारी कार्यालय | उपविभागीय अधिकारी |
| ५ | तहसिल/तालुका | तहसिल कार्यालय | तहसिलदार/मामलेदार |
| ६ | मंडल | तहसिल कार्यालय | मंडल निरिक्षक |
| ७ | सजा | ग्रामपंचायत कार्यालय | तलाठी |
| ८ | गाव | ग्रामपंचायत कार्यालय | कोतवाल |

munotes.in

## महसूल प्रशासन यंत्रणेतील अधिकारी व त्यांची कार्ये :

### १.विभागीय आयुक्त :

भारतीय प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांना आयुक्त असे म्हणतात. ब्रिटिश भारतीय गव्हर्नर जनरल लॉर्ड विल्यम बेंटिंग यांना आयुक्त पदाचा जनक असे म्हणतात. भारतीय प्रशासकीय सेवेतील सनदी अधिकारी हे श्रेणी-१ व श्रेणी - २ मध्ये समाविष्ट असतात. त्यामुळे अप्पर आयुक्त आणि सहाय्यक आयुक्त असे दोन प्रकार असतात. "अप्पर आयुक्त" पदावर नियुक्ती होण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोग (ूप्श्छ) भारतीय नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे असते. तसेच "सहाय्यक आयुक्त" पदावर नियुक्ती होण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग (प्श्छ) राज्य नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे असते. राज्य सरकारकडून राज्य प्रशासकीय अधिकारी गट अ (राजपत्रित) श्रेणी-१ मधून अप्पर आयुक्त पदावर कनिष्ठ राजपत्रित. अधिकाऱ्यांची नियुक्ती पदोन्नतीने केली जाते. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांचे प्रमुख आयुक्त असताना दिसतात.

**विभागीय आयुक्ताची महसूलविषयक कार्ये खालीलप्रमाणे**

१. आयुक्ताने वर्षातून एकदा कमीतकमी २ महसूल कार्यालयांची तपासणी केली पाहिजे. त्याबद्दलचा अहवाल शासनाकडे (राज्य) पाठविला पाहिजे.

२. ट्रेझरी (टरएगुरय) कार्यालयाची तपासणी केली पाहिजे.

३. सर्व जिल्हा परिषदांची तपासणी वर्षातून एकदा व ९ पंचायत समित्या वर्षातून एकदा तपासल्या पाहिजेत.

४. जिल्ह्याच्या महसुलाबाबत वार्षिक अहवाल राज्य शासनाला पाठविला पाहिजे.

### २.जिल्हाधिकारी :

जिल्हाधिकारी (डस्तिरच्ति छेल्लएच्त्ेर) हा भारतीय प्रशासन सेवा अधिकारी हा व्यक्ती प्रमुख असतो. त्यांचेकडे संपूर्ण जिल्ह्याच्या, कायदा व सुव्यवस्थेचीपण जबाबदारी असते. ते जिल्हा न्यायदंडाधिकारी ही असतात.१७७२ मध्ये ब्रिटिश गव्हर्नर वारेन हेस्टिंग्स यांनी जिल्हाधिकारी पदाची निर्मिती केली.जमीन महसूल वसुलीच्या उद्देशाने हे पद निर्माण करण्यात आले. या पदाचेमहत्त्व वाढवण्यासाठी कंपनी सरकारने न्यायदान आणि नागरी प्रशासनाचीजबाबदारी जिल्हाधिकाऱ्याकडे सोपवली. जिल्हाधिकाऱ्याला इंग्रजीमध्ये छेल्लएच्त्ेर असे म्हणतात. हा शब्द डरतिरच्ति म्हणजे जिल्हा आणि छेल्लएच्त म्हणजे गोळा करणारा या दोन शब्दांनी मिळून बनलेला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात जिल्हाधिकारी पदाच्या अधिकार व जबाबदारीत बदल करण्यात आले.जनकल्याणाची संबंधित अनेक कार्य त्यांच्याकडे सोपवण्यात आली.

जिल्हाधिकारी हा गट 'अ' चा अधिकारी असतो. त्याची निवड संघ लोकसेवा आयोग करत असते. जिल्हाधिकाऱ्यांची निवड दोन मार्गाने केले जाते. पहिला मार्ग म्हणजे सरळ सेवा भरती होय. संघ लोकसेवा आयोगाकडून भारतीय प्रशासकीय सेवा पदासाठी निवड केलेल्या उमेदवाराची जिल्हाधिकारी म्हणून राज्यशासन नेमणूक करते.संघ लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सेवाशर्ती,वेतन,बढती,सेवा निवृत्ती बाबत केंद्र सरकारचे नियम लागू होतात.

राज्यसेवेत उपजिल्हाधिकारी म्हणून कार्य करणाऱ्या व्यक्तीस बढती देऊन जिल्हाधिकारी पदावर नेमले जाते. भारत प्रशासन सेवेतून आलेल्या जिल्हाधिकाऱ्यांचे सेवानिवृत्ती वय ६0 वर्ष तर बढती मिळून जिल्हाधिकारी बनलेल्या ५८ व्या राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे सेवानिवृत्त होतात. केंद्र शासनाचा कर्मचारी देखील जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या अखात्यारित काम करतो. उपजिल्हाधिकारी हे पद राज्यातील लोकसेवा आयोग यांच्याकडून घेतली जाते. उपजिल्हाधिकारी पदासाठी जर आपण पात्र ठरला तर आपल्याला पुढील ट्रेनिंग साठी पुणे येथे पाठवले जाते. जिल्हाधिकारी पदासाठी जर आपण पात्र ठरला तर आपल्याला पुढील ट्रेनिंग साठी पुणे येथे पाठवले जाते. जिल्हाधिकारी यांचे प्रशिक्षण लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासन प्रबोधिनी, मसुरी येथे होते. अंतर्गत क्षेत्राचा विकास करणे व नवे कायदे जिल्ह्यात लागू करणे ही जिल्हाधिकाऱ्यांची मुख्य कर्तव्य होय. त्याचबरोबर विविध योजनांचे प्रतिनिधित्त्व देखील ते करतात. जिल्हाधिकारी या पदाचा उगमच जिल्हयाचा प्रमुख महसूल अधिकारी म्हणून प्रशासक आहे. महसूल प्रशासनाशी संबंधित असलेली विविध कार्ये जिल्हाधिकारी या नात्याने ते पार पाडीत असतो. **महाराष्ट्र राज्य ३६ जिल्हयात विभागणी कारण्यात आलेली आह. जिल्हाधिकारी या भारतीय प्रशासकीय सेवेतीलराजपत्रित अधिका–याकडे जिल्हयाच्या महसूल प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील कलम सात १ मध्ये जिल्हाधिकाऱ्याची खालील महसूल विषयक कामे नमुद करण्यात आली आहेत.**

१. जमीन महसूल जमा करणे

२. शासनाच्या मालमत्तेची देखरेख करणे.

३. भूमी अभिलेख व्यवस्थित ठेवणे.

४. शेतीच्या जमिनीचा बिगर शेतीसाठी वापर करण्यास परवानगी देणे.

५. जिल्हा दंडाधिकारी म्हणून काम करणे.

६. जमीन महसूल कार्यालयांना भेट देऊन त्याचे निरीक्षण करणे.

७. जिल्हा परिषद बाजार समित्या, म्युन्सिपालिटी यांच्या निवडणूका घेणे व त्यावर देखरेख ठेवणे.

८. जनगणना कार्यक्रमावर देखरेख करणे.

९. दुष्काळ अन्नधान्याची तूट, पूर, साथीचे रोग इत्यादी बाबतीत उद्भवणाऱ्या प्रश्नांवर तोडगा काढणे.

१०. तुरूंग समितीवर काम करणे.

११. सार्वजनिक निवडूकांचे वेळी जिल्ह्यात सुव्यवस्था व त्यासंबंधीचे काम.

**३.उपविभागीय अधिकारीः**

उप विभागीय अधिकारी (एसडीओ / एसडीएम) विभागाचा प्रमुख असून उपविभागीय अधिकारी हा सहाय्यक जिल्हाधिकारी, आयएएस किंवा उपजिल्हाधिकारी कॅडर मधील आहेत. ते त्यांच्या विभागात कार्यरत असलेले उप विभागीय न्यायदंडाधिकारी आहेत. उपविभागीय कार्यालये जिल्हाधिकारी यांची प्रतिकृती असून ते प्रशासकीय व्यवस्थेत मध्यस्थ म्हणून कार्य करतात.

प्रशासकीय सोयीसाठी जिल्ह्याचे तीन ते चार उपविभागांमध्ये विभाजन करण्यात येते. उपविभागाच्या महसुल प्रशासनाची जबाबदारी उपजिल्हाधिका-याकडे सोपविली जाते. उपजिल्हाधिका पदनाम उपविभागीय अधिकारी असे करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी (एस.डी.ओ.) आपल्या उपविभागाचा प्रमुख प्रशासक असतो. सरकारतर्फे बोलणारा महसुलाचे बावत जिलाधिकारी आणि तहसिलदार ह्यांच्यामध्ये समन्वय प्रस्थापित करणारा कायदा आणि सुव्यवस्थायांची आपल्या उपविभागात जबाबदारी सांभाळणारा अधिकारी म्हणून ओळखला जातो. त्याची प्रमुख कार्य पुढिलप्रमाणे.

(१) अशा निधींची स्थापना करील की त्यामध्ये पंचायतीकडे येणारा पैसा जमा होईल व खर्चाला लागणारा पैसा त्यामधून काढता येईल.

(२) सरकारच्या आदेशाची योग्य ती अंमलबजावणी आपल्या उपविभागात करणे, त्यासाठी कनिष्ठ अधिकाऱ्यांना आदेश देणे.

(३) वेळ प्रसंगी दौरे काढून प्रशासकीय माहिती गोळा करणे आणि जिल्हाधिकाऱ्यास सादर करणे.

(४) लोकांच्या तक्रारी दूर करणे, त्यासंबंधी अपिलास मान्यता देणे आणि निर्णय घेणे.

(५) आपल्या उपविभागात शांततेला आणि सुव्यवस्थेला धक्का पोहचणार नाही अशी खबरदारी घेणे.

(६) दुष्काळप्रसंगी आपल्या विभागातील महसुलाबात लोकांना सूट यावी अशी शिफारस करणे.

(७) उपविभागीय दंडाधिकारी म्हणून भूमिका बजावतात.

(८) करमणूक कर वसूली, गौण खनिज कर वसुली, स्वस्त धान्य दुकान तपासणी यंत्रणा, महसूल वसूली रोजगार हमी योजना, सुशिक्षित बेरोजगार मदत योजना इंदिरा आवारा योजना आदिचे पर्यवेक्षण.

(९) शासनाच्या विविध स्तरांवरील अधिकाऱ्यांमध्ये योग्य समन्वय राखणे व एकंदर प्रशासकीय सुसूत्रता राखणे,

(१०) भाडे नियंत्रण कायदा, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा इत्यादीमध्ये अभिप्रेम असलेली "न्यायालय" ही भूमिका त्याला बजावावी लागते.

(११) विधानसभा मतदारसंघाकरीता उप विभागीय अधिकारी हा निर्वाचन अधिकारी व लोकसभा मतदारसंघाकरिता सहाय्यक निर्वाचन अधिकारी असतो.

**४.तहसीलदार :**

महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ अन्वये राज्य शासन प्रत्येक तालूक्यासाठी एक 'तहसीलदार' नेमते.तालुकापातळीवर शासनाच्या प्रमुख अधिकारी तहसीलदार असतो. तहसील म्हणजे वसूली. त्यामुळे तहसीलदार म्हणजे ग्रामीण जनतेकडून कर वसूल करणारा अधिकारी. ग्रामीण म्हणण्याचा उद्देश असा की, इतर प्रकारच्या जनतेकडून कर वसूल करण्यास अन्य अधिकारी असतात. जिल्ह्याच्या ज्या तुकड्याला आपण मराठीत तालुका म्हणतो त्याला हिन्दीत 'तहसील' म्हणतात. त्यामुळे तहसीलदार हा तालुक्याचा सर्वोच्च नागरी अधिकारी असतो.तहसीलदारालाच 'मामलेदार'असेही नाव प्रचलीत आहे. मामलेदाराची नेमणूक राज्य लोक सेवा आयोगाकडून होते.हे गट 'अ' प्रकारचे पद आहे.जमीन महसूलाबाबत कोणताही अर्ज सर्वप्रथम तहसीलदारासमोर येतो. मामलेदार करवसूलीव्यतिरिक्त तालुक्यातली इतर अनेक सरकारी कामे करतो. तो प्रसंगी दिवाणी दाव्यांमध्ये न्यायदानही करतो.

**तहसीलदाराची कार्ये**

(१) तालुका अंतर्गत जमीन महसुलासंबंधी सर्व कार्ये पार पाडणे.

(२)आपल्या क्षेत्रांतर्गत राज्य शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे जमीन महसुलाची आकारणी करणे व त्याची वसुली करणे.

(३) पिकांची आणेवारी /पैसेवारी ठरविण्यासाठी मंडळ निरीक्षक व तलाठ्यांची सहाय्यता घेणे.

(४) मंडळ अधिकारी व मंडळ निरीक्षक याना योग्य ते मार्गदर्शन करून पुढील कार्य पार पाडणे त्यांना योग्य ते निर्देश देऊन माहिती मागविणे, निरीक्षकास आदेश देऊन अधिकारितेतील प्रत्येक गावाची वेळोवेळी तपासही करायला सांगणे

(५) त्यांच्या मंडलातील प्रत्येक गावाच्या भूमि अभिलेखावर देखरेख ठेवणे.

(६) एखाद्या गावातील लोकांची व पिकांची परिस्थिती जाणून घेणे .

(७) ठराविक मुदतीत तालुक्याच्या सांख्यिकी विवरणाचे संकलन करण्यासाठी सांगणे.

(८) संबंधित कुळवहिवाट विधी व मुंबईचा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणारा कायदा १९४८ याचे उल्लंघन करून एखादा व्यवहार झाला असल्यास त्यासंबंध योग्य ती माहिती मागविणे .

(९) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले असेल तर त्यासबंधी चौकशी करून पिकांच्या नुकसानीसंबंधी कच्चा अहवाल पाठविण्यास बंधी मंडळ निरीक्षकास सांगणे.मडंळ निरीक्षकाने नैसर्गिक आपत्तीमुळे पिकाच्या नुकसानीसबंधी पाठविलेल्या आखणीवर विचार करून शासनाच्या नियमांना अधिसरून योग्य ती नुकसान भरपाई शेतकऱ्यांना देणे.

(१0) एखाद्या गावात धरण फुटून अथवा झार कारणामुळे मानवी व वित्तीय हानी होण्याचा संभव आहे.अशी माहिती मिळाल्यास त्या ठिकाणी भेट देऊन खबरदारीचे उपया योजणे .

(११) जमिनीच्या तुकड्यावरून एखादा वाद निर्माण झाल्यावर भूमापन अधिकाऱ्याने जमिनीची मोजणी करून योग्य निर्णय दिला असेल परंतु पक्षकाराने त्याची अमलवजावणी करण्यास टाळाटाळ केली असेल तर त्या संबंधात जमिनीचा अधिकार ज्याचा आहे. त्यास मिळवून देण्यासंबंधी तो अतिक्रमणास जमिनीचा ताबा सोडण्याचे आदेश देणे .

(१२) तालुक्यात नैसर्गिक आपत्ती आढळल्यास त्याचा अहवाल तहसिलदारस त्वरीत जिल्हाधिकाऱ्याकडे सादर करणे .

(१३) तालुक्यात पिकांच्या आणेवारी संबंधीची माहिती गोळा करून ती जिल्हाधिकाऱ्यास पुरविणे .

(१४) जिल्हाधिकाऱ्याने सुचित केलेली कार्ये आपल्या क्षेत्रात पार पाडणे .

(१५) तहसिल कार्यालयातील कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे व त्यांच्यावर देखरेख ठेवणे.

(१६) कोतवालाची तात्पुरता काळासाठी नेमणूक करून त्याच्या रजेसंबंधी कार्यवाही करणे एखाद्या कोतवाला त्याच्या नोकरीच्या जागे प्रसंगोपात दूसरी नोकरी करण्यास परवानगी देणे.

(१७) निवडणूकासंबंधी तालुका स्तरावरील प्रमुख म्हणून सर्व कार्ये पार पाडले.

(१८) गावकऱ्यांना त्यांच्या स्वत:च्या उपयोगासाठी गौण खनिजे, काढण्यासाठी व त्यांचा वापर करण्यासाठी परवानगी देणे.

(१९) तालुका स्तरावरून स्वस्त धान्य दुकानाद्वारे धान्याचे संवितरण करणे, व स्वस्त धान्य दुकानदारांवर योग्य ते नियंत्रण ठेवणे.

(२०) आपल्या कार्यक्षेत्रातील जीवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार होत असेल तर त्यासंबंधी योग्य ते कडक उपाय योजणे.

(२१) गावाच्या अधिकार अभिलेखातील नोंदी दुरुस्त करण्यासाठी तलाठ्यांना आदेश देणे.

(२२) शेतीच्या कामासाठी सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे.

(२३) शहरी आणि ग्रामीण कामासाठी शेत जमिनीचा बिगर शेतजमीन म्हणून तात्पुरत्या घोषणा करणे.

(२४) अधिकार पत्राचे स्थानंतर करणे किया अधिकार पत्राच्या लाभ प्रतीची घोषणा करणे.

(२५) जमीनीतील महसूलीची कार्येकरताना ह्या कार्यवाहीसाठी आवश्यक त्या व्यक्तीला किंवा तिच्या तर्फे अधिकृत व्यक्तिला ठराविक दिवशी आणि वेळी उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठविणे.

### ५.मंडल अधिक्षक :

काही खेड्याचे मिळून एक महसूली मंडळ (रेव्हेन्यू सर्कल) बनते. या मंडलाचा अभिलेख महसूल निरिक्षकाकडे (रेव्हेन्यू इन्स्पॅक्टर) असतो. एका तालुक्यात एकाहून अधिक महसूली मंडळ असतात आणि ते नायब तहसिलदार यांच्या अधीन असतात.

### ६.सज्जा-तलाठी/पटवारी :

तलाठी (हिन्दीत पटवारी) हा महाराष्ट्र जमीन महसूल व्यवस्थेतील एक कर्मचारी आहे. जमिनीसंबंधीची अभिलेख सतत अद्ययावत रहावीत म्हणून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमानुसार अनेक प्रकारच्या नोंदवह्या विहित करण्यात आल्या आहेत. गावात काम करणारा तलाठी या गाव-पातळीवरील नोंदव तलाठी हा गावातील सर्व जमिनीच्या

व्यवहारांची नोंद करत असतो.ह्यांचे दप्तर एकूण १ ते २१ क्रमांकाच्या गाव नमुन्यांमध्ये ठेवतो. गावातील शेत जमिनीचा सात बारा, आठ अ या सर्व बाबी तलाठी देत असतो.

महसुल प्रशासन व्यवस्थेतील गावपातळीवरील घटक तलाठी असतो. तलाठी हा महसूल खात्याचा वर्ग-३ चा कर्मचारी असून त्याच्यावर नजीकचे नियंत्रणा सर्कल ऑफिसर व त्यानंतर तहशीलदाराचे असते. महाराष्ट्र महसूल अधिनियम १९६६कलम ७ (३) अन्वये प्रत्येक सजाकरिता एखादा किंवा अधिक तलाठी नेमण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहेत. तलाठयाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत.

**तलाठयाची कार्ये**

(१) जमीन महसुल वसुल करणे.

(२) जमीन महसुल थकबाकीची जमिनीच्या अधिकारपत्राची नोंद ठेवणे.

(३) जिल्हाधिकाऱ्याच्या आदेशानुसार लेखांची (अकौंटस) नोंद करणे व त्याचे रजिस्टर तयार करणे.

(४) संबंधित खेड्यातील सरकारशी जनतेशी व केंद्राशी संबंधित असलेला फौजदारी खटल्याबाबतचे रेकॉर्ड तयार ठेवणे.

(५) पिकपाण्याची नोंद करणे.

(६) अपादग्रस्तांना मदत करण्यासंबंधींची माहिती संबंधित तहसिलदाराला कळविणे

(७) निराधार कुटुंबाचे सर्वेक्षण करून सानुग्रह अनुदान वाटपासाठी तपसिलदारास मदत करणे.

(८) वाटप करण्यात आलेल्या आर्थिक मदतीचा विनियोग होतो किंवा नाही ते तहसिलदारास कळविणे.

(९) आवश्यकतेनुसार अपादग्रस्तांना त्वरीत व सुरक्षित अशा स्थळी हलविणे,

(१0) गावातील साथीच्या रोगाची माहिती तहसिलदार व नजीकच्या आरोग्य केंद्राधिकाऱ्याला पाठविणे.

**७.कोतवाल: कोतवाल हे पद मोगल काळापासून अस्तित्वात आहे. जागल्या, रामोशी इत्यादी.मुबंई कनिष्ठ गाव वतने निर्मुलन कायदा १९५८ कायद्यानुसार गावाच्या लोकसंख्येनुसार कोतवालाचे नियमित मानधन घेणारे पद निर्माण करण्यात आले.पोलीस पाटील आणि तलाठी यांना नियमित मदत करणारा कनिष्ठ नोकर म्हणजे कोतवाल होय.**

**कोतवाल पात्रता :**

१) कोतवाल हे महसूल खात्यातील सर्वात कनिष्ठ पद आहे.

२) कोतवालाची नेमणूक तहसिलदार करतात. कोतवाल पदासाठी शिक्षण ४ थी पास असावे लागते.

३) कोतवालांची संख्या गावाच्या लोकसंख्येवर अवलंबून असते, मात्र एखादया गावी एकाहून अधिक कोतवाल नेमण्याचा अधिकार शासनाच्या परवानगीने जिल्हाधिका–यास आहे.

कोतवाल हा पूर्णवळ काम करणारा चतुर्थ श्रेणीतील ग्रामनोकर आहे. कोतवाल हे महसूल खात्यातील सर्वात कनिष्ठ पद आहे.

**कोतवालांची संख्या :**

गावाची लोकसंख्या कोतवालांची संख्या

१000 पर्यंत १

१00१ ते ३000 २

३00१ हुन अधिक ३

४) कोतवाल म्हणून नेमणूक होण्यासाठी संबंधित व्यक्तीचे वय कमीत कमी १८ व जास्तीत जास्त ४0 वर्ष इतके असावे लागते.

५) कोतवालपदी नेमणूक होण्यासाठी संबंधित व्यक्तीने कुळकायद्यात धारणक्षेत्रापेक्षा अधिक जमिन मालक किंवा कूळ या नात्याने धारण केलेली नसावी.

६) कोतवालाची नेमणूक होण्यासाठी संबंधित व्यक्तीस तारणादाखल १00 रूपये व दोन जामीन द्यावे लागतात.

७) कोतवालावर नजीकचे नियंत्रण तलाठ्याचे असते.

८) कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोतवालावर नियंत्रण पोलीस पाटील ठेवतो.

९) कोतवालास दर सहा महिन्यास १५ दिवस किंवा वर्षाला ३0 दिवस अर्जित रजा मंजूर होते. कोतवालास ८ दिवसांची किरकोळ रजा देण्याचे अधिकार तलाठ्यास आहे.

१0) कोतवालास अर्जित रजा मंजूर करण्याचे अधिकार तहसिलदारास आहे.

११) कामात दिरंगाई केल्याबद्दल कोतवालास निलंबित करण्याचे अधिकार तहसिलदारांना आहे.

१२) गावपातळीवर तलाठ्याच्या हाताखाली महसूलाचे काम करण्यासाठी कोतवालची नेमणूक करतात.

१३) कोतवालाच्या रजेच्या काळात शेजारच्या गावचा कोतवाल हा त्याचे काम पाहतो.

१४) कोतवालास मासिक ५००० इतके वेतन मिळते.

१५) कोतवालास वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर राहता येते.

**कोतवालाची कार्य :**

१) गावचे दप्तर वरिष्ठ कार्यालयात नेआण करण्याची जबाबदारी कोतवालावर असते.

२) गावातील जन्म, मृत्यू, विवाह इत्यादींच्या नोंदणीची माहिती ग्रामसेवकास देण्याची जबाबदारी कोतवालावर असते.

३) गावकऱ्यांना चावडी किंवा सजा येथे बोलविण्याचे कार्य कोतवाल करतो.

४) गावात घडलेल्या गुन्हासंबंधी पोलीस पाटलास माहिती देण्याचे काम कोतवाल करतो.

५) पोलिस पाटलाच्या रखवालीतील कैद्यांवर कोतवाल पहारा ठेवतो.

६) शेत सारा, शासकीय देणे अदा करण्यासाठी गावकर्यांना चावडीवर बोलावुन आणणे.

७) बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावण्यास तसेच शव विच्छेदनासाठी प्रेत घेऊन जाण्यात पोलिसांना सहाय्य करणे.

८) अपघाती मृत्यू, आग, साथीचे रोग या प्रसंगी पोलीसपाटलांना मदत करणे.

९) गावातील अधिकार्यांना जमीन महसूल वसुलीस मदत करणे.

१०) गावातील अधिकार्यांना त्यांच्या इतर शासकीय कामात मदत करणे.

११) बेवारस मृतदेहांची विल्हेवाट लावण्यास तसेच शव विच्छेदनासाठी प्रेत घेऊन जाण्यात पोलिसांना सहाय्य करणे.

munotes.in

## ८.पोलीस पाटीलः

पोलीस पाटील हे पद प्राचीन काळापासून चालत आलेलं आहे . त्या काळी हे पद गावातील शूर व कर्तृत्वान व्यक्तीकडे दिल्या जाई. शिवाजी महाराजांच्या काळापासून तसेच मोगलांच्या काळापासून पोलीस पाटील हे पद आस्तित्वात आले . भारतात प्राचीन काळापासून गावाचा कारभार पाहण्यासाठी ग्राम प्रमुख असायचा.ब्रिटिश काळात कायदा सुव्यवस्था आणि महसूल वसुलीची जबाबदारी या पदाकडे देण्यात आली. तसेच ब्रिटिश काळात पोलीस पाटील पद वंश परंपरागत दिले जात असे. मात्र आता शासनाने १९४६ पासून हि वंश परंपरागत पोलीस पाटील नेमण्याची पद्धत बंद केली.

**पोलीस पाटील विषयी संक्षिप्त माहिती :**

- मुंबई नागरी कायदा (बॉम्बे सिव्हील ॲक्ट), १८५७ नुसार राज्यात पोलिस पाटील हे पद निर्माण करण्यात आले. महाराष्ट्र मुलकी पोलिस अधिनियम, १९६२ अन्वये १ जानेवारी १९६२ पासून राज्यातील वंशपरंपरागत मुलकी पद रद्द झाले .
- महाराष्ट्र ग्राम पोलिस अधिनियम, १९६७ नुसार पोलिस पाटलाची नियुक्ती केली जाते. राज्य सरकार, जिल्हाधिकारी वा त्यांनी अधिकार प्रदान केल्यास उपजिल्हाधिकारी किंवा प्रांत या अधिकाऱ्यांमार्फत पोलीस पाटलाची नियुक्ती करते .
- वयोमर्यादा : पोलीस पाटील म्हणून नियुक्ती होण्यासाठी उमेदवाराचे वय किमान २५ व कमाल ४५ वर्षे असावे लागते.
- वेतन : पोलिस पाटलांचे वेतन दरमहा रु. ३,००० (तीन हजार रुपये)
- निवडणूक प्रक्रिया/ पात्रता : पोलिस पाटील या पदासाठी नियुक्ती होण्याकरता त्या उमेदवाराने किमान १० वी इयत्ता उत्तीर्ण केलेली असावी लागते . गावातील उमेदवारास पोलीस पाटील पदासाठी नियुक्ती होण्यास जास्त प्राधान्य दिले जाते. तसेच नियुक्ती करत असताना ती सुरवातीला ५ वर्ष इतकीच केली जाते. तसेच त्या व्यक्तीचे गावात घर व जमीन असणे आवश्यक असते.
- पूर्वी पोलिस पाटलाची नेमणूक प्रत्येकवेळी ५ वर्षांच्या पटीत वाढविण्याची तरतूद होती. आता ही नेमणूक १० च्या पटीत वाढविली जाते. पोलिस पाटलास वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर पदावर राहता येत नाही.
- शेजारच्या गावातील किंवा कमी शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवाराची पोलिस पाटीलपदी नियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते.

munotes.in

हंगामी पोलिस पाटलाची तात्पुरती नेमणूक करण्याचे अधिकार तहसीलदारास आहेत.

- शासनाच्या नव्या धोरणानुसार पोलीस पाटील पदासाठी ८० गुणांची लेखी परीक्षा तर २० गुणांची मुलाखत दयावी लागते.

- परीक्षेत जास्त गुणांनी उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारास पोलीस पाटील पदी नियुक्त केल्या जाते.

- पोलिस पाटलास त्यांच्या पदाव्यतिरिक्त पूर्ण वेळेची कायमस्वरूपी दुसरी कोणतीही नोकरी करता येत नाही. पोलिस पाटलास शेती वा इतर व्यवसाय करता येतो, मात्र असा व्यवसाय त्याच्या पदाच्या कर्तव्यांच्या आड येता कामा नये.

- पोलिस पाटील हा पूर्णवेळचा शासकीय नोकर नसल्याने त्याला गाव पातळीवरील सहकारी संस्थांमध्ये एखादे पद वा सदस्यत्व धारण करता येऊ शकते. पोलिस पाटलास रजा देण्याचे अधिकार संबंधित तहसिलदारास आहेत.

राज्य सरकारच्या इतर शासकीय सेवकांना मिळणाऱ्या सवलती पोलिस पाटलास मिळत नाहीत. मात्र अटींची पूर्तता केल्यास त्याच्या मुलांना मोफत शिक्षण मिळू शकते. पोलिस पाटलास गैरवर्तणुकीबाबत शासन करण्याचे अधिकार उपजिल्हाधिकारी किंवा प्रांत–या अधिकायास असतात. गैरवर्तणुकीबाबत पोलिस पाटलास एक वर्षापर्यंत सेवेतून निलंबित किंवा बडतर्फ केले जाऊ शकते.

**पोलीस पाटील कार्य :**

१. गावपातळीवर कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने बंदोबस्त राखणे
२. गुन्ह्यांशी खबर पोलिस ठाण्यास देणे
३. गुन्ह्यास आळा घालणे
४. विनापरवाना शस्त्र बाळगण्यास मनाई करणे आदि कर्तव्यांशी पोलिस पाटील संबंधित आहे.

५. गावात नैसर्गिक आपत्ती व संसर्गजन्य रोगाची साथ पसरल्यास त्यासंबंधीचा अहवाला वरिष्ठांना पोलिस पाटील देतो.

६. गावपातळीवर अंली पदार्थ बंदी कायद्याच्या भंग झाल्यास संबंधित अधिकाऱ्यास पोलिस पाटील खबर देतो.

७. गावात अनैसर्गिक वा संशयास्पद मृत्यू घडल्यास तालुका दंडाधिकारी वा संबंधित पोलीस अधिकारी यांना खबर देण्याची जबाबदारी पोलीस पाटलावर असते.

munotes.in

८. गावपातळीवर व सुव्यवस्था राखण्याच्या कार्यात पोलिस पाटलास कोतवाल व कनिष्ठ ग्रामनोकर मदत करतो.

९. गावपातळीवर कोतवाल आदि कनिष्ठ सेवकांकडुन आवश्यक ती कामे करून घेण्याची जबाबदारी पोलीस पाटलावर असते.

१०. पोलीस पाटलाची नेमणूक करताना मागासवर्गीय उमेदवारास प्राधान्य देण्यात येते. पेलिस पाटलाच्या रजेच्या काळात शेजारच्या गावचा पोलिस पाटील त्याचे काम पाहतो.

११. सण, उत्सव, यात्रा व निवडणूक घडामोडीवर ठेवणे.

## ४.६ समारोप

भारतातील महसूल प्रशासनाची व्याप्ती केंद्र सरकार पासून जिल्हा व तालुक्यापर्यंत पसरलेली आहे. 'जमीन' एक मुलभुत उत्पादक घटक. अर्थशास्त्रात व्यापक अर्थाने 'जमीन' या संज्ञेत शेतजमीन, जंगले, गाव व शहरातील इमारतीच्य जागा सर्व प्रकारची खनीजद्रव्ये आणि खाणी, डोंगर ,नदया ,समुद्रकिनारा, धबधबे वगैरे सर्व निसर्गत्त उत्पाादनाची साधने ज्यांवर मानवी ताबा आणि मानवी हक्क चालू शकतो अशा सर्वा ंचा समावेश होतो. केली.प्राचीन काळात जमिनीच्या नोंदी करण्याच्या विविध पद्धत्ती प्रचलीत होत्या त्यामध्ये ब्रिटीश काळात आमूलाग्र बदल करण्यात आले. ब्रिटिशांनी भारतावर आपले साम्राज्य प्रस्थापित केल्यानंतर इंग्लडमध्ये लागू असलेली व भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पोषक असणारी जमिनीची नोंद करून ठेवण्याची पद्धत व कर वसूलीची एक प्रणाली विकसित केली व त्याला नाव दिले महसुल यंत्रणा. महाराष्ट्र राज्यातील या महसूल प्रशासनाचे घटक कोणते व ही महसुल प्रशासन यंत्रणा महाराष्ट्र महसूल १९६६ च्या कायदयाअन्वये शासनाला प्रसासकीय कारभारात मदत करते त्यासाठी अस्तित्वात असलेली अधिकार व जवाबदारीची सोपानपद परंपरा निमीाण केली आहे याचा आढावा आपण य प्रकरणात घेतला आहे.

## ४.७ स्वाध्याय

**बहू पर्यायी प्रश्न :**

१ हेक्टर म्हणज कीती गुंठे/आर?

अ.२०० गुंठे/आर ब.१०० गुंठे/आर

क.३०० गुंठे/आर ड.४०० गुंठे/आर

२ . जमिनीच्या मालकी हक्काबाबत मोजणीसाठी व वादविवाद मिटविण्यासाठी कोणत्या अधिकारयाकडे अर्ज करावा लागता?

अ . भूमी अभिलेख व भूमापन अधिकारी ब . गट विकास अधिकारी

क . ग्रामसेवक ड . पोलीस पाटील

३ . कोणत्या भाषेत कराला 'राजस्व' असे म्हणतात?

अ . लॅटिन ब . फारसी क . संस्कृत ड . देवनागरी

**प्रश्न**

१ . ग्रामनमुना क्रमांक ६ स्पष्ट करा

२ . सातबारा उता-याचे महत्व स्पष्ट करा

३ . जिल्हास्तरीय महसूल प्रशासनाचे घटक स्पष्ट करा

४ . महसूल प्रशासनाची कार्य सांगा

५ . तहसिलदाराची कार्ये सांगा .

## ४.८ संदर्भग्रंथ


१ . भारतीय प्रसासन –प्रा व्ही . बी . पाटीलप्रकाशन के सागर .
२ . जिल्हा प्रसासन लेखक प्रा . के आर बंग सागर प्रकाशन पुणे .
३ . महाराष्ट्राच्या प्रशासनची ओळख ह्यस्थानिक व जिल्हा प्रशासनह . लेखक डॉ दिलीपसिंह निकुंभ व डॉ विजय तुंटे. प्रशांत प्रकाशन .
४ . लोक प्रशासन प्रा . बी व्ही पाटील फडके प्रकाशन .
५ . आधूनिक भारत प्रा सीमा भोसले के सागर प्रकाशन .
६ . लॅड लॉज इन महाराष्ट्रा २०१७ श्री शेखर गायकवाड. यशदा पुणे प्रकाशन .
७ . लॅड इशूज इन इंडिया २०१६ श्री शेखर गायकवाड यशदा पुणे प्रकाशन .
८ . लॅन्ड राईटस ॲन्ड म्यूटेशन्स श्री शेखर गायकवाड यशदा पुणे प्रकाशन .


❖❖❖❖

# ५

# कायदा आणि सुव्यवस्था प्रशासन न्यायिक यंत्रणा- I

**पाठाची रूपरेषा**

५.१ पाठाचे उद्देश

५.२ प्रास्ताविक

५.३ जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणा

५.४ जिल्ह्यातील न्यायीक यंत्रणा

५.५ स्वाध्याय

५.६ संदर्भग्रंथ

## ५.१ पाठाचे उद्देश

- जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेची यंत्रणा समजून घेणे
- कायदा आणि सुव्यवस्थेच्या पद्धती समजून घेणे
- जिल्ह्यातील न्यायीक यंत्रणा समजून घेणे

## ५.२ प्रास्ताविक:

भारतीय प्रशासनात एका उदात्त आणि विधायक हेतूने जिल्हा प्रशासनाचीनिर्मिती झाली. प्राचीन काळापासून जिल्हा प्रशासनाला एक विशेष अधिष्ठान प्राप्त झालेलेआहे. कायदा आणि सुव्यवस्था राखणाराघटक म्हणून त्याला मान्यता मिळाली आहे.प्राधिकरणाची शृंखला निर्माण करून शिखराकडून तळाकडे नियंत्रणाची व्यवस्था निर्माण केली आहे. याच शृंखलेद्वारेतळाकडून शिखराकडे उत्तरदायित्व व्यवस्था स्थापित केली आहे याचा पूर्ण प्रभाव जिल्हा प्रशासनावर पडतो.संघटन एकात्मतेचे विशेष कारण कि आपण एकाचसंविधानानुसार शासित बनलो आहोत समान संहिता - फौजदारी प्रक्रिया संहिता, दिवाणी प्रक्रिया संहिता, भारतीय दंड संहिता, सामान संहिताच्या अंमलबजावणीमुळे संघटनेत एकटा निर्माण झाली आहे.

संपूर्ण भारतासाठी सामान धोरण सामान कार्यक्रम सामान जमीन सुधारणा, सार्वजनिक जमीनदारीची इतिश्री अशा काही बाबीमुळे देखील जिल्हा प्रश्नात एकात निर्मण शाली आहे एकतेचे एक महत्वाचे कारण म्हणजे कर्मचारी वर्गाचा अंतर्गत प्रवाह (Interflw of personal) जिल्हा प्रशासनाच्या विविध घटकातील कर्मचारीवर्ग वेगवेगळ्याठिकाणी आणि

munotes.in

वेगवेगळ्या स्थरावर स्थानांतरित केला जातो. स्थानांतर आणि स्थलांतर होऊनदेखील एकात्मता राखली जाते.या पार्श्वभूमीवर जिल्हयाच्याकायदा आणि सुव्यवस्थेचा विचारकेला जातो.कायदाआणि सुव्यवस्था हाच जिल्हयाचा मुख्य विषय असतो.हीच जिल्हयाची प्रमुख समस्या देखील आहे.यासाठीच शासनाचा आटापिटा चालू असतो.शासन व्यवस्था आपल्या परीने सर्वंकष प्रयत करून शांतता प्रस्थापित करण्यासाठी कायदा आणि सुव्यवस्था हा विषय हातळण्याचा प्रयत्नकरते.

## ५.३ जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची यंत्रणा

### १. कायदा आणि सुव्यवस्थेच्या पद्धती :-

जिल्हा प्रशासनाच्या मुख्य उद्देश कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणे हाच असतो. जिल्हा कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी फार मोठी अशी यंत्रणा असते. या यंत्रणेतील अभिकरणांनी कायदा आणि सुव्यवस्थेची तत्वे स्वीकारल्यानंतर त्यांना कायदा आणि सुव्यवस्थेसाठी काही पध्दती निश्चित करता याव्यात या उद्देशाने काही मार्गदर्शन केले आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे ते सनदशींर मार्ग म्हणून समजले जाउ शकतात. श्री. खेरांनी त्यांना सूक्ती ;डा़्ग्डैद्ध म्हटले आहे. सूक्ती म्हणले सुभाषिता प्रमाणे चांगले वाक्य अथवा वक्तव्य. या ठिकाणी विधीसूक्तीच्या स्वरूपात या पद्धती असाव्यात असा तयांचा आग्रह आहे. एखाद्या चांगल्या संशोधनाच्या कार्यात जी भूमिका ‘पध्दतीशास्त्र’ अथवा ‘पध्दती मीमांसा’ ची (Methodology) असते ती भूमिका कायदा आणि सुव्यवस्थेत त्या पध्दतीची असते. कार्य चांगले आहे आणि अंमलबजावणी झाली नाहीतर त्या कार्याला कोणी चांगले म्हणणार नाही. कार्यपूर्तीमध्ये साधनसुचितेला फार मोठे महत्व आहे. म. गांधीनी साध्याच्या श्रेष्ठतेबरोबरच साधनांचे श्रेष्ठतव असले पाहिजे, असे म्हटले आहे. सुव्यवस्थित अंमलबजावणी हा कायदा आणि सुव्यवस्थेला मूर्त स्वरूप देण्याचा एक भाग आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचे उद्दिष्ट प्राप्त करण्याचा एक भाग आहे.

एखादी गोष्ट त्वरित करणे म्हणजे कार्यक्षमता नव्हे, हे कार्य त्वरित करताना इतर दोष जर निर्माण होत असतील तर ती कार्यक्षमता नसून कार्याचा बिघाड समजला पाहिजे. अशा कार्यक्षमतेच्या नावाखाली काही लोक स्वत:चा फायदा करून घेत असतात. म्हणून कायदा आणि सुव्यवस्थेच्या पध्दतीमध्ये अनिश्चितेचा मार्ग अवलंबून चालणार नाही तर त्यासाठी काही निश्चित पध्दतीचा स्वीकार करून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यामध्ये काही मदत घेतली पाहिजे. त्या पध्दती कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची तत्वे म्हणून अथवा सिध्दांत म्हणून जरी नसल्या तरी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात त्यांचे महत्व, तत्व किंवा सिध्दांतापेक्षा निश्चितच कमी नसते. त्या पध्दती अथवा विधिसूक्ती पुढीलप्रमाणे आहेत.

### २. प्राधिकार (Authority):-

कायदा आणि सुव्यवस्थेत प्राधिकराला अग्रक्रम देण्यात आला पाहिजे. प्राधिकार व तो वापरणाऱ्या प्राधिकाऱ्याचा योग्य मान ठेवला पाहिजे. त्या प्राधिकाराचा योग्य तो उपयोग सर्वांना झाला पाहिजे.

प्राधिकार स्पष्ट असला पाहिजे. त्या प्राधिकारावरील मर्यादा निश्चित असल्या पाहिजेत. प्राधिकार स्पष्ट लिखित स्वरूपात असले पाहिजे. जितके स्पष्ट प्राधिकार असतील तितके ते प्रभावी असू शकतात. लिखित स्वरूपाच्या प्राधिकारांची अंमलबजावणी व्यवस्थित तर होतेच त्याशिवाय जी व्यक्ती प्राधिकार वापरते तिचे उत्तरदायित्वदेखील निश्चित होते. ती व्यक्ती प्रशासनात कोणाला उत्तरदायी आहे हे स्पष्ट होते. अलीकडे उत्तरदायित्व स्वीकारण्यास लोक घाबरतात. लोकशाहीत अशी भीती निरर्थक असते. ‘प्राधिकार म्हणजे अशी सत्ता की ज्यामुळे आदेशांचे पालन केले जाते.’ कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात आदेशांच्या पालनाला फार मोठे महत्त्व आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात प्राधिकाराचे स्वरूप निश्चित व्हायला पाहिजे. प्राधिकाराची निश्चित व्याख्या झाली की, आदेश देण्यात अडचण येत नाही आणि आदेशांचे पालन करून घेता येते. आदेशांचे पालन झाले की कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात अडचण येत नाही. प्राधिकार हा कार्य करून घेण्याचा सनदशीर म्हणजेच कायदेशीर मार्ग असतो. प्राधिकार म्हणजे केवळ सत्ता नये. ;ूमद्ध भीतीयुक्त आदर असल्याने कायद्याची योग्य अंमलबजावणी होईलच असे नाही. प्राधिकाराच्या मागे प्रतिष्ठा आपोआप येते. जितके जास्त प्राधिकार आणि जास्त मोठा दर्जा तितका त्या पदाचा आदर व प्रतिष्ठा असते. आदेशांचे पालन करून घेण्यासाठी हा आदर आणि प्रतिष्ठा कामाला येते. या ठिकाणी आपण वडिलधाऱ्यांचा आपण आदर करतो तो त्यांना कसालाही अधिकार नसतानाचा आदर असतो. काही वेळा आपण चिन्हांचा, प्रतीकांचा आदर करतो. उदा. राष्ट्रध्वज, राष्ट्रीय प्रतीक, राष्ट्रगीत इत्यादी. त्यांच्याबद्दल जो आदर प्रकट होतो तो त्यांना असणाऱ्या सर्वसाधारण प्रतिष्ठेमुळे म्हणून प्राधिकार आणि प्रतिष्ठा यामध्ये भेद करणे आवश्यक असते. प्राधिकाराला प्रतिष्ठा मिळणे ही वेगळी बाब असते. प्राधिकाराचा आदर झाला पाहिजे.

प्राधिकाराचा आदर(Respect for Authority) याबद्दलचे एक उदाहरण दिले आहे की, पोलिस रहदारी नियंत्रणाच्या कार्यावर आहे. तो आपले कर्तव्य बजावत आहे. त्यावेळी त्याचा सर्वांनी आदर करावयास पाहिजे. त्या ठिकाणी पोलिसांचा शब्द म्हणजे कायदा, इतका त्याच्या आदेशाचा प्रभाव असला पाहिजे. तो त्या ठिकाणी कर्तव्य बजावत असताना कायद्याची संपुर्ण शक्ती त्याच्या पाठीमागे असते. कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून त्या पोलिसांचा आदर करणे सर्वांचे कर्तव्य ठरते. मध्येच एखादी व्यक्ती त्याच्याशी हुज्जत घालत असेल तर त्यामुळे रहदारी ठप्प होईल किंवा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात व्यत्यय येईल. पण तोच पोलिस त्या ठिकाणाहून बाजूला गेला, भलेही पाणी पिण्यासाठी किंवा इतर काही कारणास्तव त्याने आपले कर्तव्याचे स्थान सोडले तर त्याचे ते कृत्य बेकायदेशीर समजले जाईल. तो इतर ठिकाणाहून म्हणजे नेमलेल्या ठिकाणापासून दूर असेल तर रहदारी व्यवस्थित होणार नाही. अपघात होण्याची दाट शक्यता असते. कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते म्हणजे प्राधिकाराचा वापर आपले कर्तव्य बाजावत असतानाच करता येतो, अन्यत्र वा अन्यथा नव्हे.

प्राधिकाराचा आदर करण्यामध्ये लोकांनी शिस्त पाळली पाहिजे. प्राधिकाराचा उपयोग करणारांची आणि ज्यांच्यासाठी प्राधिकाराचा उपयोग होतो आहे अशा दोघांनीही शिस्तीचे पालन केले पाहिजे. शिस्तीच्या पालन करण्याने कायदा आणि सुव्यवस्था

राखण्याचे कार्य सुकर बनते. केवळ गणवेशधारी असला म्हणजे त्याला सत्ता गाजविता येणार नाही. त्याला स्वत: शिस्तीचे पालन करावे लागेल. कर्तव्याच्या ठिकाणी नसताना गणवेशधारी अधिकाऱ्याला काहीही महत्त्व नसते. तो इतर नागरिकांप्रमाणेच असतो. म्हणजेच गणवेशधाऱ्याला ठरावकि वेळी आणि ठराविक ठिकाणीच ठराविक सत्ता गाजविता येते. त्यावेळी त्याला जे प्राधिकार प्राप्त होतात त्याचे त्याने कायदेशीर पालन करायला पाहिजे. उदा. जिल्हयातील अधिकारी जिल्हयात दौरे कर्तव्य बजावण्यात काढत असतील तेव्हा तेव्हा प्राधिकाराचा उपयोग करू शकतात; परंतु जर का ते खाजगी कामानिमित्त फिरत असतील तर त्यांना प्राधिकाराच उपयोग करता येणार नाही.

अधिकाऱ्यांनी अकारण भीती दाखवून सत्तेचा वापर करू नये. प्रत्येक गोष्ट कायद्याने करत आहे, असे ठासून सांगू नये. काही अधिकाऱ्यांना असे वाटते की, असे केल्यानी लोक घाबरून त्यांना मान देतील, सत्तेचा आदर करतील; परंतु असे घडत नसते. म्हणून अधिकाऱ्यांनी आपल्या प्राधिकाराचा आदर ठेवूनच वागले पाहिजे. विनाकारण प्राधिकाराचा बडेजावपणा आणण्याचे काहीही एक कारण नाही.

संसदीय लोकशाहीत प्रशासनाची जबाबदारी सयुंक्तपणे मंत्रिपरिषदेवर असते, तरीपण मं०यांवर वैयक्तिक जबाबदारी असतेच. त्या वैयक्तिक जबाबदारीच्या संदर्भात तो प्रशासनाकडून माहिती मागवू शकतो. काही तातडीचे निर्णय घेऊ शकतो. मंत्रिपरिषदेचे निर्णय हे शासनाचे निर्णय समजले जातात. त्यामुळे त्याचाही त्यामध्ये सहभाग असतोच. काही वेळा मं०याचे एक मत होत नसते. अशावेळी पंतप्रधानाला पुढाकार घेऊन त्याच्यात समेट घडवून आणावा लागतो. लोकशाही शासन व्यवस्थेत खासदार व आमदार या लोकप्रतिनिधनां देखील अधिकार असतात; परंतु त्यांना त्यांचे अधिकार संविधानाच्या चौकटीत राहूनच वापरायचे असतात. त्याचा विशेष दर्जा आणि विशेषाधिकार असल्यामुळे तेही अधिकारीच असतात; परंतु प्रथमत: ते लोकाचे प्रतिनिधी असतात ते विसरता कामा नये. हे प्रतिनिधी जेव्हा विविध समित्यांचे सदस्य असतात तेव्हादेखील त्यांना सत्ता प्राप्त झालेली असते. त्या सत्तेचा आदर त्यांनी स्वत: राखला पाहिजे. जेणेकरून त्यांचे अनुकरण सामान्य नागरिक करतील.

सत्तेचा आदर ठेवण्याची प्रवृत्ती नागरिकांत नसेल तर कायदा आणि सुव्यवस्था राखणे अत्यंत कठीण कार्य समजले जाते. प्राधिकारांचा वापर अधिकारी कसा करत आहेत ह`देखील डोळयांत तेल घालून नागरिकांनी पाहिले पाहिजे. नागरीकांचा देखील वचक त्या अधिकाऱ्यांवर असला पाहिजे. सत्तेचा दुरूपयोग करणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द न्यायालयाकडे जाण्याचा मार्ग सामान्य नागरिकांना उपलब्ध असतो. त्या मार्गाचा अवलंब नागरिकांनी करावयास मुळीच हरकत नाही; परंतु ही बाब म्हणावी तितकी सोपी नाही. जिल्हाप्रशासनासमोर जे प्रश्न उपस्थित होतात ते पाहण्यासाठी पुढील गोष्टी उपयोगी पडू शकतात.

ज्या कार्यासाठी प्राधिकाराचा उपयोग करण्यात आलेला आहे, ते कार्य योग्य आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक असते. तसेच अधिकाराचा वापर करत असताना कायद्याच्या अधिराज्याचे (Rule of Law)उल्लघंन तर होत नाही हे देखील

तपासले पाहिजे तसेच अधिकार बजावणारी व्यक्ती त्या अधिकारास पात्र आहे का? अशा पध्दतीने नागरिकांनी आपली भुमिका बजावली पाहिजे.

अधिकार आपल्या स्वविवेकाधीन अधिकारात वापरला आहे काय? हे तपासणे फार आवश्यक असते. स्वविवेकाधीन अधिकाराच्या वापरावर बंधन असले पाहिजे. ती प्रवृत्ती प्रशासनातील अधिकाऱ्यांना आपली मनमानी करण्याची संधी देते. त्याच्या त्या स्वतंत्र वागण्यामुळे पक्षपात घडण्याची दाट शक्यता असते. प्रचलित कायदे आणि परंपरा याला सोडून प्राधिकाराचा उपयोग अधिकारावर्गाने करू नये. आपले अधिकार कनिष्ठाकडे सोपवयाचे असल्यास ते देखील कायद्याने जी तरतूद केलेली आहे. त्या तरतुदीनुसारच ते प्राधिकार प्रदत्त केले पाहिजे. प्राधिकाराचे प्रत्यायाजन करण्याची सोय कायद्यात अथवा नियमात असली पाहिजे. त्याशिवाय आपले अधिकार कनिष्ठांकडे सुपूर्द करणे योग्य ठरत नाही. ती कृती बेकायदेशीर ठरते. कनिष्ठांकडे सोपविलेल्या प्राधिकाराचा गैरवापर जर त्यांनी केला जर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. म्हणून या बाबतीत प्राधिकार वापरणाऱ्या अधिकाऱ्याने दक्षता बाळगली पाहिजे. प्राधिकाराचा वापर करताना देखावा नसतो. अलीकडे अनेकांमध्ये हा दुर्गुण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. प्राधिकाराचा वापर सांभाळून केला पाहिजे.

प्राधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांकडून क्षमा मागण्याचा आग्रह धरू नये. त्यामुळे प्रशासनात वाईट पायंडे पडू शकतात. प्राधिकारात वापरून एखादया अधिकारी अतिरेकी भुमिका घेऊन कार्य करू शकतो आणि नंतर चुकले म्हणून क्षमा मागून मोकळा होऊ शकतो. प्रशासनात अशा चुकीच्या पध्दतीना स्थान दिले जाऊ नये. प्राधिकाराचा वापर करताना अधिकारी संवदेनशील असावा. चिडखोर स्वभावाने प्राधिकार वापरल्यास गंभीर प्रश्न उभे राहू शकतात. चिडून एखादे कृत्य करणे चुकीचे ठरते. समजा एखादा पोलिस शिपाई गणवेशात रस्त्याने चालत असेल तर त्यांने लगेच चिडून आपला अधिकार दाखवण्याच्या भानगडीत पडू नये. अशा प्रसंगातून देखील अशांतता निर्माण होऊ शकते. शांतता व सुव्यवस्था कायद्याने प्रस्थापित केली जाऊ शकते; परंतु कायद्याचा अतिरेक अधिकाऱ्यांकडून, नागरिकांकडून होता कामा नये. समाजकंटक व्यक्तींच्या कारवायांवर नजर ठेवणेदेखील प्राधिकाराच्या उपयोगाचा एक भाग आहे. वेळीच असे समाजकंटक समाजातून निवडले गेले व हद्दपार केले तर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यातील फार मोठा अडसर दूर होऊ शकतो.अशा प्रकारे प्राधिकार वापरण्याची पध्दती कशी यासंबंधी चर्चा केली आहे. ही पध्दती कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

**३. प्राधिकारणाचे आवश्यक घटक :-**

प्राधिकारणाच्या अत्यावश्यक बाबी, प्राधिकारणाचे सारभूत घटक अथवा आवश्यक गोष्टी (Essentials) : कायदा आणि सुव्यवस्थेच्या पध्दतीमध्ये प्राधिकाराच्या आवश्यक बाबींची माहिती झाली पाहिजे. प्राधिकाराचा उपयोग करताना कायदा आणि सुव्यवस्थेची तत्वे लक्षात घेतली पाहिजे. या तत्वाचा वापर करताना त्यावर दृढ राहिले पाहिजे. ती तत्वे फारच लवचिक अथवा फारच ताठर असता कामा नये. कायदा आणि सुव्यवस्था योग्य प्रकारे राबवता येईल इतपत हि तत्वे लवचिक असली पाहिजेत आणि कायदा आणि सुव्यवस्थ राबविताना अडथळे होणार नाहीत इतपत ती

ताठर असता कामा नये. मागे जी सहा तत्वें वर्णन केली आहत त्या तत्वांकडे मुळीच दुर्लक्ष होता कामा नये. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ही तत्वे अत्यंत आवश्यक आहेत. त्या तत्वांच्या व्यतिरिक्त काही बाबी परिस्थतीनुसार बदलत असतात. त्या बदलत्या परिस्थीतमध्ये त्या तत्वांचा वापर बदलून करावा लागेल. परंतु, तत्वांना सोडता येणार नाही. एखाद्या कार्यासाठी लागू केलेले नियम दुसऱ्या कार्यासाठी लागू होतीलच असे काही नाही. उदाहरणार्थ ज्या नियमांचा उपयोग करून दंगल शमविण्याचा प्रयत्न केला त्याच नियमांचा उपयोग संप मिटविण्यात करता येईलच, असे म्हणता येणार नाही. एखादी घटना का घडली तिचा पूर्ण इतिहास तपसून चिकित्सक वृत्तीने त्या घटनेचे परीक्षण करणे आवश्यक असते. सर्व दृष्टीकोनातून त्या घटनेचे विश्लेषण केल्यास त्या परिस्थितीवर ताबा मिळविण्यासाठी सहज प्रयत्न करता येतात. त्या सर्व घटना शब्दबध्द केल्या पाहिजेत. लिखित घटना परत परत वाचून त्यावर काही उपाय शोधता येणे शक्य असते. कायदा आणि सुव्यवस्था राखताना आज्ञा देणारा आणि आज्ञा स्वीकारणारे यांच्याच कायदा आणि सुव्यवस्थेच्या अत्यावश्यक तत्वासंबंधी काहीही गैरसमज असता कामा नये. तत्वांचे योग्य स्पष्टीकरण नागरिकांनादेखील समजले पाहिजे. नागरिकांचा फायदा आणि सुव्यवस्थेतील सहभाग वाढतो. नागरिकांचा सहभाग वाढला की कायदा आणि सुव्यवस्थेतील सहभाग वाढतो. नागरिकांच्या सहकार्याशिवाय प्राधिकाराच्या आवश्यक बाबींची अमंलबजावणी होणार नाही. रहदारी नियंत्रित करणाऱ्या पोलिसांना रहदारी थांबविण्यासाठी हाताने इशारा केला असल्यास वाहनचालकांनी आपली वाहने थांबविली पाहिजेत. असे जर नागरिकांकडून घडले नाही तर अपघातासारख्या गंभीर प्रसंगाला सामोरे जावे लागते. अपघातामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निमार्ण होतो. म्हणून नागरिकांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीत योग्य तो सहभाग दाखविलाच पाहिजे. नागरिकांनी आपले कर्तव्य बजावण्यात हयगय केली की कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. उदा. एखादया नावेतून अथवा बोटीतून प्रवास करताना त्या बोटीची क्षमता किती आहे हे पाहिले पाहिजे. बोटीच्या क्षमतेसंबंधी जाहीरपणे लिहिलेले असते. तसेच मुंबईसारख्या शहरातून बहुमजली इमारतीवर जाण्यासाठी असलेल्या लिफ्टची क्षमता देखील सांगितेली अथवा लिहिलेली असते. या क्षमतेकडे नागरिकांनी दूर्लक्ष केल्यास अपघात होऊ शकातात. नावेत अथवा बोटीत क्षमतेपेक्षा जास्त लोकांनी प्रवेश घेतला तर बोट बुडण्याचा धोका असतो. यासाठी बोट चालकानेही थोडयाशा पैशाच्या अमिषाला बळी पडता कामा नये. नागरिकांच्या सहकार्याने प्राधिकारणाच्या आवश्यक बाबींचे ज्ञान झाल्यास एक चांगल्या पध्दतीने कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करता येते.

### ४. सहनशीलता *(Tolerance):-*

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यामध्ये सहनशीलता हा गुण फार आवश्यक असतो; परंतु सहनशीलतेच्या मर्यादा निश्चिछत करणे ही तितकेच आवश्यक असते. कोणताही निर्णय घेत असताना किती वाट पाहावी, कोणत्या मर्यादेपर्यंत निर्णय घ्यायचे थांबवावे, या गोष्टीला कायदा आणि सुव्यवस्थेत फार महत्व असते. कोणत्याही गोष्टीसाठी योग्य वेळ देण्यात आला असेल तर लोक आणि प्रशासकीय अधिकारी त्यावर विचारविनिमय करू शकतात. दिलेल्या वेळ परिस्थती नियंत्रणात आली नसेल तर दुसरे निर्णय घेता येतात किंवा दुसरी उपाययोजना करता येते.

सर्वसाधारणपणे असे दिसून येते की, लोक परिस्थीती बिघडण्यासाठी प्रयत्न करत असतात. त्यावेळी त्यांना हे सुध्दा माहिती असते की, अधिकारीवर्ग ठराविक वेळेपर्यंत वाट पाहतील, ते सहनशीलता दाखवतील, नंतर मात्र ते माघार घेतील, उदा.दंगलग्रस्त भागात एखादा मोर्चा थाबंविण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला आणि तो थांबला तर त्या मोर्चेवाल्यांकडून निवेदन घेतले जाऊ शकते. जर मोर्चा संतप्त झाला असेल तर पोलिस आपली एक साखळी करून तो मोर्चा थांबविण्याचा प्रयत्न करतील. त्यावेळी ते लोक साखली तोडून पळण्याचा प्रयत्न करतील. शांततेच्या मार्गाने पोलिसांचे केलेले प्रयत्न फसतात. मग अशा वेळी पोलिसांची सहनशीलता संपते व ते त्या जमावावर छडीमार करतात. छडीमार करूनही जमाव पांगला नाही किंवा त्या मोर्चाने माघार घेतली नाही तर मात्र पोलिस अश्रुधूर सोडतात. अलीकडे बरेच लोक अश्रुधुरालाही जुमानत नाहीत. अशावेळी तो जमाव अधिक प्रक्षोभक बनतो आणि हींसक कृत्ये करू लागतो. वित्तहानी व जीवहानी होण्यासची दाट शक्तता निर्माण झालेली असते. अशावेळी पोलिस मॅजिस्ट्रेट (दंडाधिकारी) यांच्या परवानगीने गोळीबार करतात. गोळीबाराने परिस्थिती आटोक्यात आणली जाते.

अशा प्रकारे पोलीसांच्या कार्यात दंगल अथवा मोर्चा यांना सामोरे जातातना दाखविलेली सहनशीलता फार महत्वाची असते. पोलिसांनी अशी साहनशीलता दाखविली नाही तर परिस्थिती अत्यंत गंभीर बनू शकते. साहनशीतेची जाणीव अधिकारीवर्गाला असणे आवश्यक असते. काहीवेळा सहनशीतेची सीमा संपल्यानंतर देखील काही काळ अधिकारीवर्ग परिस्थती आटोक्यात येईल, आशी आशा बाळगून बसतात; परंतु असे करणे धोकादायक ठरू शकते. म्हणून एका विशिष्ट वेळेपर्यंत वाट पाहावी आणि कायदा व सुव्यवथेच्या दृष्टीने योग्य निर्णय घेऊन कार्यवाही करावी. काहीवेळा अधिकारीवर्ग वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करतात. वाटाघाटी चालेपर्यंत वाट पाहणे योग्य ठरू शकते; परंतु वाटाघाटीतून काहीच निष्पन्न होत नसेल तर त्या वाटाघाटी पटकन थांबवून पुढील कार्यवाही करणेच इष्ट असते. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबी वाटाघाटीवर अवलंबून ठेवता येत नाहीत. वास्तविक पाहता वाटाघाटी हा कायदा आणि सुव्यवस्थेचा भागच नाही.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात किती मर्यादेपर्यंत सहनशीलता अधिकाऱ्यांकडे असावी हे प्रशासनात अभुवन घेतलेला दूरदर्शी प्रशासक सहज समजू शकतो. सहनशीलता राहून किती कार्य करायचे हे तो उत्तम प्रकारे जाणत असतो. अशा वेळी कायदे व नियम कामाला येत नाहीत. योग्य प्रशासक आपल्या कार्यकुशलतेच्या जोरावर चांगले निर्णय घेऊ शकतात. त्याला आवश्यक बाबी कोणत्या, अनावश्यक बाबी कोणत्या याचा सारासार विचार केला पाहिजे. काही बाबतीत लवचिकता ठेवून व सहनशीलता दाखवून कार्य करता येते आणि अचूक निर्णय घेतला जाऊ शकतो; परंतु सहनशीलता संपल्यानंतर बळाचा योग्य तो वापर करणे आवश्यक ठरते आणि त्याचाही अचूक निर्णय प्रशासनाला घ्यावा लागतो. अशाप्रकारे सहनशीलता हा गुण कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी एक आवश्यक तत्व, एक आवश्यक कार्यपध्दती म्हणून कार्य करते.

## ९. चुका (Errors) :-

माणसाकडून चुका होऊ शकतात. असे म्हटले आहे की माणूस चुकीचा पुतळा आहे. तेव्हा कायदा आणि सुव्यवस्थेच्या कार्यातदेखील चुका होऊ शकतात. श्री.एस.एस. खेरा यांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या पध्दतीचा विचार माडताना, 'चुका' याबद्दल मांडलेले विचार फार महत्वाचे आहेत. ते म्हणतात की, शासनाकडून चुका होऊ शकतात, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जबाबदार असणाऱ्या मत्रयांकडूनदेखील चुका होऊ शकातात, संसददेखील चुकीचे कायदे करू शकते, ते कायदे सर्वोच्च न्यायालयाच्या पुनर्विलोकनासाठी बाजूला ठेवले जातात. न्यायालयातदेखील चुकीचे निर्णय देतात, ते निर्णय पुनर्निर्णयानंतर दुरुस्त केले जातात. त्यासाठी कोणी तरी ते निदर्शनास आणून देतो किंवा त्यासंबंधी आपिल करतो. पोलिस अधिकारी आणि नागरिक यांच्याकडूनही चुका होतात. प्रशासनात संबंधित व्यक्तीकडून कळत नकळत चुका होत असतात. चुकांशिवाय प्रशासन अशी कल्पना करणे चुकीचे ठरले. ती केवळ एक कल्पना ठरेल. जी व्यक्ती काहीच करणार नाही, त्या व्यक्तीकडून चुका होणार नाहीत अशा चुकांसंबधी कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात विचार करणे आवश्यक आहे. चुका झाल्यानंतर चुका दुरुस्त करण्यासाठी वेळ लागतो; परंतु त्याचा परिणाम होऊन गेलेला असतो. म्हणून चुका होणार नाहीत याचा विचार करणे महत्वाचे आहे किंवा चुका कमी कशा करता येतील, याचा विचार करणे आवश्यक आहे. चुकांची पुनरावृत्ती टाळता आली पाहिजे आणि जर का तसे घडले नाही तर मात्र फार गंभीर प्रसगांना सामोरे जावे लागेल. याची खात्री करून पाहणे हे देखील चुकीचे ठरेल.

चुका होऊ नयेत म्हणून किंवा चुका टाळल्या जाव्यात म्हणून पुढील बाबींकडे लक्ष देणे आवश्यक असते.कायदा आणि सुव्यवस्था राखणारी यंत्रणा ज्यावेळी कार्य करत असते त्यावेळी त्या कामात पुरेशी काळजी घेण्यात आली आहे किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. अधिकारीवर्गाने याकडे व्यवस्थित लक्ष दिले पाहिजे, यामुळे सर्व च चुका टाळता आल्या नाहीत तर चुकीची संख्या कमी करता येईल किंवा मोठया चुका होण्याचे टाळता येऊ शकले.

चुका कमी करण्याचा खात्रीचा मार्ग सांगितला आहे की निर्णय घेताना पूर्ण निष्ठने घ्यावेत. निर्णय घेताना आत्मविश्वास असला पाहिजे की आपण योग्य असाच निर्णय घेत आहोत. विवेकनिष्ठ निर्णय असावेत. निर्णय लोकहित समोर ठेवूनच घेतले पाहिजे. तसेच निर्णय घेताना चुका असतील तर त्या मान्य करायला पाहाव्यात. त्यामध्ये फेरबदल करता येऊ शकतो. चुका तात्काळ मान्य करणे आणि त्यामध्ये ताबडतोब दुरुस्त्या करणे केव्हाही योग्यच असते. दुरुस्तीसाठी जास्त वेळ लावता कामा नये. चुका मान्य करणे म्हणजे अपमान होतोय अस वाटू नये किंवा चुकामुळे आपली कार्यक्षमता प्रकट होते आहे असेही मानू नये. उलट कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये चुकीचा मार्ग अवलंबिला नाही याचे समाधान मिळते आणि चुका दुरुस्त केलेल्या कामात यशही मिळते.

चुका झाल्याबरोबर त्याची चौकशी व्हायला पाहिजे. कोणत्या परिस्थितीत, कशाप्रकारे ती चुक घडली याबद्दल माहिती घेतली पाहिजे. चुकांबद्दलची माहिती घेत असताना तो विषय प्रतिष्ठेचा करून घेऊ नये. वरिष्ठांना असे वाटण्याची शक्यता असते की

कनिष्ठांना आपल्या चुकांबदृदल माहिती झाल्यास त्यामध्ये आपली अप्रतिष्ठा होईल; परंतु असा विचार करणे अयोग्य समजले पाहिजे. कारण कनिष्ठ अधिकारीदेखील हे समजू शकतील की, आपल्या वरिष्ठांनी मुद्दामहून चुका केलेल्या नाहीत. त्या चुका कार्याच्या ओघात झालेल्या आहेत आणि त्या चुका मान्यही करत आहेत. तेव्हा या गोष्टीचा विपरीत परिणाम न होता चांगलाच परिणाम होतो. संसदीय लोकशाहीमध्ये कित्येक वेळा संसदेने केलेले कायदे न्यायालय घटनाबाहय ठरविते. तेव्हा तो संसदेचा किंवा मं०यांचा अपमान नसतो.

चुकांमुळे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असते. त्या नुकसानीची भरपाई केली जावी. नुकसानभरपाईमुळे व्यक्तीला दिलासा मिळते. चुका करणाऱ्याने नुकसानभरपाई देण्याचे टाळू नये. ती स्वखुशीने दिली पाहिजे. अशा चुका पुन्हा होऊ नयेत याची काळजी घेतली पाहिजे. चूक लपवण्याचा प्रयत्न कधीही करू नये. एक चूक लपवण्यासाठी ती व्यक्ती परत परत चुका करत राहते. अशावेळी नुकसान अधिक होते.

खऱ्यानेच एखाद्याचे चुकले आहे समजायला किंवा मान्य करायला तयारी दर्शविल्यास त्या चुकांसाठी शिक्षा करण्याची गरज नसते. शांतता आणि सुव्यवस्था राखण्यात अशा चुका झाल्या असतील तर त्या क्षम्य केल्या पाहिजेत. त्याचे मुख्य कारण त्या मुद्दाम म्हणून केलेल्या नसतात. चुका करणाऱ्या व्यक्तीची कृती तपासणे आवश्यक असते. ज्या माणसाकडून सहसा चुका होत नाही, अशा व्यक्तीकडून जर चूक झाली असेल तर त्याबद्दल त्याला क्षमा करण्यात आली पाहिजे. याउलट जर एखादी व्यक्ती तीच चुक पुन्हा पुन्हा करत असेल तर त्या चुकीबद्दल त्याला शिक्षा होणे आवश्यक असते. चुका झाल्यानंतर त्या चुकांचा परिणाम ज्या व्यक्तीवर होतात त्या व्यक्तींना योग्य मोबदला अथवा आर्थिक साहाय्य द्यायला हवे. उदा.रेल्वे दुर्घटना झाल्यानंतर पीडितांना तात्काळ साहाय्य केले पाहिजे. अशा मदती देताना चौकशी आदेशांची वाट बघू नये. अशी वेळेवर मदत दिल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकत नाही. अन्यथा प्रकरण चिघळण्याची शक्यता अधिक असते. अलीकडे दुर्घटना झाली की मदत जाहिर केली जाते. हे आपण नेहमीच पाहतो.

### ६. जबाबदारी (Responsibility) :-

लोकप्रशासनात आधिकार प्राप्त होणाऱ्या अधिकाऱ्यावर जबाबदारी असते. प्राधिकार आणि जबाबदारी या एका नाण्याच्या दोन बाजू असतात. कायदा आणि सुव्यवस्थेची एक पध्दती म्हणून जबाबदारीचे तत्व फार महत्वाचे असते. जबाबदारी स्वीकारणे, जबाबदारी सोपविणे, जबाबदारी एकाकडून काढून घेऊन दुसऱ्याकडे सोपविणे इत्यादी बाबीचा विचार कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न सोडविण्यात फार महत्वाचे ठरतो. कायदेशीररित्या जबाबदारी सोपवता येते का? हा फार महत्वाचा प्रश्न आहे. अशी जरी आपली जबाबदारी सोपविता येत असेल तर जबाबदा व्यक्ती आपल्यावरील सर्व जाबाबदारी इतरांकडे सोपवून मोकळा होईल. नंतर तो कोणालाही उत्तरदायी असणार नाही. जबाबदारी स्वीकारली म्हणजे ती जबाबदारी स्विकारणास आपल्या वरिष्ठाला अर्थात ज्याच्याकडून ती जबाबदारी स्वीकारली त्याला उत्तरदायी असतो. कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात जबाबदारीचे तत्त्व अभ्यासणे म्हणजे जबाबदार व्यक्ती कोण? कोण कायदेशीर अधिकारी आहे का? किती प्रमाणात

जबाबदारी सोपवली? त्या जबाबदारीनुसार कर्तव्यपूर्ती केव्हा, कशी व कोठे करावयाची इत्यादी प्रश्न ओघाने येतात. जबाबदारी सोपविताना केवळ तोंडी आदेश दिले म्हणजे ती व्यक्ती जबाबदारी सोपविणाऱ्याला उत्तरदारी राहीलच असे नाही. कायद्याचा आधार असल्याशिवाय जाबाबदारी सोपविलेली असेल तर आदेशधारक त्यातून बऱ्याच पळवाटा काढून जबाबदारीतून सुटका करून घेतो.

अनेकदा कनिष्ठाकडे प्राधिकार सोपविले जातात. प्राधिकाराबरोबर जबाबदारीदेखील सोपविली जाते. केवळ जबाबदारीच सोपविली असेल आणि त्या प्रमाणात प्राधिकार सोपविलेले नसतील तर कनिष्ठ आधिकारी कार्य करेल; परंतु त्याकडून चुका झाल्यावर तो त्या चुंकासाठी जबाबदार राहणार नाही. कारण त्याला कार्य करण्याचे प्राधिकार नव्हते. असे म्हणून त्यातून तो आपले अंग काढून घेऊ शकतो. वास्तविक पाहता कायद्याच्या आधारेच पदाधिकारी सोपविले पाहिजेत आणि त्या आधारेच जबाबदारी सोपवून कार्य पूर्ण करून घेतले पाहिजे. उदाहरणार्थ जिल्हा दंडाधिकारी फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार आपल्या सहकाऱ्यांकडे काही खटल्यांच्या सुनावणीचेकार्य सोपवू शकतो. त्यावेळी त्याच्याकडे तो खटला सोपविलेला आहे त्याची जबाबदारी असते. याचे कारण असे की अशा प्रकारची जबाबदारी पाडत असताना ज्या कायद्यांचा आधार घेउन तो ती जबाबदारी पार पाडील.

जबाबदारी काही वेळा व्यक्तीनिहाय असते तर काही जबाबदारी पूर्ण संघटनेवरच असते आणि ती संघटना आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी आपल्या कनिष्ठ संघटनेकडे ती जबाबदारी सोपविते. अशावेळी संपूर्ण जबाबदारी त्या कनिष्ठ संघटनेवर येते. ती कनिष्ढ संघटना वरिष्ठ संघटनेला उत्तरदायी असते. परंतु या ठिकाणी वरिष्ठ संघटना केवळ जबाबदारी सोपवून मोकळी राहू शकत नाही तर तिचेदेखील उत्तरदायित्व असते की सोपविलेलया कार्यावर देखरेख ठेवणे आणि ते योग्य प्रकारे हाते आहे किंवा नाही हे पाहणे, तसेच त्यांना काही अडचणी असतील तर त्या सोडविणे आणि त्यांच्याकडून कार्यपूर्ण कयन घेणे. काही वेळा एखादी जबाबदारी एका संघटनेकडून दुसऱ्या संघटनेकडे सोपविली जाते. कधी कधी एकाच संघटनेत एका स्तरावरून दुसऱ्या स्तरावरील अधिकाऱ्याकडे ती जबाबदारी सोपविले जाते.

जबाबदारी सोपविताना कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी नेमक्या कोणत्या प्रसंगी आणि नेमक्या कोणत्या व्यक्तीकडे सोपवावी हे निश्चत व्हायला हवे. ही गोष्ट जाहीर झाल्यामुळे जबाबदारी असलेल्या व्यक्तीबद्ल इतरांचा त्याच्यावर विश्वास बसेल, त्याच्यावर निष्ठा ठेवली जाईल. त्यामुळे जबाबदारी पार पाडण्यात त्या सर्वांचे सहकार्य मिळेल आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न काही प्रमाणात मिटविता येईल.

एखादा पोलिस अधिकारी एखाद्या गुन्हेगाराला अटक करण्यासाठी जात असेल तेव्हा त्याच्याकडे त्या व्यक्तीला अटक करण्यासंबधीचे वॉरंट असले पाहिजे. ज्या अधिकाऱ्याने अटक वॉरंट दिले आहे ती व्यक्तीच त्या गुन्हेगाराच्या अटकेस जबाबदार असतो. वॉरंट व्यवस्थीत नसेल तर अटक करण्यास गेलेल्या पोलिस अधिकाऱ्याचे काही चुकले तर तो त्या वॉॅरंटकडेच बोट दाखविल. म्हणून अटक वॉॅरंट हे पूर्ण विवरणासह असले पाहिजे, जेणेकरून बजावणाऱ्याला अडचण येणार नाही.

जबाबदारीमध्ये असे काही आदेश दिले जातात की त्या आदेशांना कायद्याची मान्यता नसते. तेव्हा जबाबदारी पार पाडणारा त्या आदेशांचे पालन करत नाही. लोकशाहीमध्ये नागरिकांवर कोणत्याही अधिकाऱ्याकडून बळाचा वापर करण्यास बंदी असते; परंतु सामान्य नागरिकांना याचे ज्ञान नसते त्यामुळे एखाद्या पोलिस अधिकाऱ्याने त्याला मारले, त्याच्यावर बळाचा वापर केला तरी ती व्यक्ती गप्प राहते. जेथे व्यक्तिस्वातं०याची कल्पना पूर्णपणे रूजली आहे तेथे असे करताना पोलिस अधिकारी निश्चतच कचरेल

जबाबदारी पार पाडत असताना आणखी एक गोष्ट महत्वाची असते की समजा जबाबदारीचे कार्य करत असताना दंगल किंवा भयग्रस्त वातावरण असेल तर अशा प्रसंगी त्या अधिकाऱ्यांना संरक्षण देण्यात येते. असे संरक्षण दिल्याने कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे कार्य जलद आणि व्यवस्थीत होते.

जबाबदारी पार पाडत असताना प्राधिकार आपल्याला मिळाले आहेत, आपण त्याचा कसाही उपयोग करू, वरिष्ट आपणास फक्त जबाबदारीसंबधीच विचारणा करतील, त्यांनी आपणास त्याशिवाय काहीही विचारू नये, अशी वृत्ती चुकीची असते. जबाबदारी पार पाडत असताना वरचेवर वरिष्ठांना त्या संबंधीची माहिती देत राहणे आवश्यक असते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि दंगलग्रस्त वातावरण योग्य प्रकारे हाताळण्यासाठी जबाबदारीच्या या तत्वाचे योग्य पालन होणे आवश्यक आहे.

### ७. अधिकाऱ्याची उपस्थिती (The Presence of Authority) :-

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी जो भौगोलिक भाग निश्चित केलेला असतो त्या भागात कायदा आणि सुव्यवस्था राखणारा अधिकारीवर्ग तेथे उपस्थित असलाच पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था राखणारा वर्ग फार काळ त्या भागातून अनुपस्थित राहू शकत नाही. असे जर झाले तर केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखणार अर्थॉरिटी नसल्यामुळे त्या ठिकाणची कायदा व सुव्यवस्था बिघडू शकते.

कायदा आणि सुव्यवस्था राखणारी यंत्रणा त्या त्या भागात नेहमीच असली पाहिजे. केवळ अशांतता किंवा दंगल निर्माण झाल्यासच तेथे जाऊन तेथील परिस्थिती सुधारणे यापेक्षा त्या सत्तेने तेथेच ठाण मांडले तर अशांतता निर्माण होण्याचा धोका कमी होतो. ही यंत्रणा त्या भागातच राहिली तर कायदा आणि सुव्यवस्था प्रभाविपणे राबविता येते आणि त्यामध्ये अधिक कार्यक्षमतादेखील आणू शकते. त्या सत्तेला तेथे प्रतिष्ठा मिळू शकते. प्रतिष्ठेचा प्रभावदेखील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास असतो. हे आपण मागे पाहिले आहे.

### ८. औचित्य (Fairness) रास्तपणा, ठीकपणा, वाजवीपणा :-

कायदा आणि सुव्यवस्था ठेवण्याची प्रकिया औचित्यपूर्ण असली पाहिजे. ती प्रक्रिया सामान्य माणसालादेखील रास्त आहे असे वाटले पाहिले. कायदा आणि सुव्यवस्था पाळताना नैसर्गिक न्यायतत्वांना सोडलेले नाही अशी जाणीव व्हायला पाहिजे. कायदा आणि सुव्यवस्था राखताना जे नियम पाळले जातात ते वाजवी असले

पाहिजेत. ते नियम न्याय असले पाहिजेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्याची प्रक्रिया ठीक-ठाक आहे असे नागरिकांना वाटले पाहिजे.

ज्यांच्याविरूद्ध कारवाई करावयाची असते, त्या व्यक्तीला कारणे दाखविली पाहिजेत. अशी औचित्यपूर्ण माहिती घेउनच कारवाई केली पाहिजे. एखाद्या मॅजिस्ट्रेटने गोळीबार करण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली नसताना गोळीबार करण्याचे आदेश दिले असतील तर ती कारवाई वाजवी नाही. ती कारवाई रास्त वाटत नाही. कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये नागरिक आणि अधिकारी यांच्यात व्यवस्थित असा सुसंवाद घडला पाहिजे. संसूचनाची सर्व साधने वापरली पाहिजेत. अधिकाऱ्याच्या वृत्तीबद्दल आणि कृतीबद्दल संशयाला वाव मिळता कामा नये. निर्णय रास्त असतील तर नागरीकही त्यांच्या कृतीला योग्य प्रतिसाद देतात. कायदा व सुव्यवस्था राखताना अधिकाऱ्यांच्या व्यवहार अवाजवी असल्यास नागरिक त्याला प्रतिसाद देणार नाहीत. त्याच्या प्रमाणिकपणावर व न्यायप्रियतेवर दृढविश्वास असेल तरच त्याचे निर्णय व कृतीदेखील प्रभावी ठरू शकते- The process of law and order should be fair and just at every point and that they should also be seen by the common man to be fair and just.-S. S. Khera.

कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रभाव संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर पडतो. सामाजिक आणि राजकीय परिस्थिती त्यामुळे प्रभावित होते. संसदीय लोकशाहीमध्ये निदर्शने, सत्याग्रह, मोर्चा, जाळपोळ, दंगल, हिसंक कृत्ये इत्यादी मार्गाने शासनावर दबाव आणला जातो. त्या दबावाच्या परिणामाखाली शासन काही निर्णय घेते. कायदा मोडणे, अशांतता पसरविणे या गोष्टी सरेआम केल्या जातात. त्यावर नियंत्रण मिळविणे आवश्यक असते. त्याशिवाय कायदा आणि सुव्यवस्था स्थापित करता येणार नाही. लोकशाहीमध्ये जनता आपला असंतोष खालीलप्रमाणे व्यक्त करते.

१. सरकारच्या घेतलेल्या निर्णयावर सार्वजनिकरीत्या असंतोष व्यक्त करण्यासाठी कायदे मोडणे व शांतता भंग करणे यासारखी कृत्ये करतात. आंदोलनाच्या तीव्रतेवर त्या प्रश्नाचे गांभीर्य मोजता येते. हिंदीला राष्ट्रभाषेचे स्थान देऊ नये म्हणून दक्षिणेकडे फार मोठे आंदोलन झाले त्याचे फार मोठे पडसाद संपूर्ण प्रशसकीय व्यवस्थेवर पडले. संपूर्ण कायदा आणि सुव्यवस्था बिघडली होती.

२. संसदीय शासन पध्दतीमध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो. नागरिक देशाच्या खास समस्येवर अथवा ज्वलंत प्रश्नांवर आपल्या भावना, आपले विचार व्यक्त करतात. अशा वेळी नागरिक शासनाच्या फार जवळ येतात. बऱ्याच वेळा त्यांच्या प्रत्यक्ष संबंध येतो. सरकार नागरिकांच्या भावनाची दखल घेत असते. नागरिक आणि शासन यांच्यात सुसंवाद घडून येतो.

३. लहानसहान गोष्टीसाठी कायदे मोडल्याने फार मोठे नुकसान होत नाही. यामुळे नेत्यांना जाग येते व मान मिळतो. कायदे मोडणे म्हणजे एखाद्या प्रकरणाबाबत नाराजी व्यक्त करणे होय.

munotes.in

## ५.४ जिल्ह्यातीलन्यायीक यंत्रणा :

१६७२ मध्ये गव्हर्नर जेराल्ड आंजिअरने (सुरत व मुंबई) न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने खरा पाया घातला.त्याने मुंबईचे माझगाव व गिरगाव असे दोन विभाग करून प्रत्येक विभागात पाच न्यायाधीशांचे एक स्वतंत्र न्यायालय निर्माण केले.जॉर्ज विल्कॉक्स यास पहिला मुख्य न्यायाधीश म्हणून नेमले.या न्यायालयात भारतीय न्यायाधीशांचीही नेमणूक केली जाई. या न्यायालयात रु.१५० मूल्यांकनापर्यंतचे दावे चालविण्याची मुभा होती.मुंबईचा डेप्युटी गव्हर्नर आणि त्याचे कौन्सिल यांच्यापुढे अपील चालत असे.यांशिवाय आंजिअरने 'जस्टिस ऑफ द पीस', 'कोर्ट ऑफ रिक्वेस्ट' इ. छोट्या अधिकारांचीही न्यायालये स्थापन केली.त्याने राष्ट्रनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष व संपूर्ण समानतेच्या तत्त्वावरील न्यायदानाचा पुरस्कार केला. तथापि न्यायालयांच्या न्यायनिर्णयाविरुद्ध डेप्युटी गव्हर्नर व त्याचे कौन्सिल यांच्यापुढे अपील चालत असल्यामुळे बव्हंशी शासनसंस्था न्यायसंस्थेचे न्यायनिर्णय फिरवू शकत होती. न्यायाधीश ईस्ट इंडिया कंपनीने नेमलेले असल्यामुळे कंपनीचा त्यांच्यावर अंकुश असे.अर्थातच निर्भिड व स्वतंत्र बाण्याचे न्यायाधीश कंपनीला पोषक नसत.त्यामुळे न्यायदानाच्या कामात अंधःकारच होता. त्यातच कंपनीचे पुष्कळसे नोकर स्वतःचा खाजगी व्यापार करून बेकायदेशीरपणे भरमसाठ पैसा मिळवीत होते त्यांचे अनेक दावे न्यायालयासमोर येत असत.त्यामुळे कायदा जाणणाऱ्यांपेक्षा कायद्याचे ज्ञान नसणाऱ्या व्यक्तींचीच न्यायाधीश म्हणून निवड व्हावी, असा अलिखित नियम कंपनी सरकार पाळू लागले.ही व्यवस्था जवळजवळ १६९० पर्यंत चालू होती.त्यानंतर १७१८ साली एक मुख्य न्यायाधीश व इतर नऊ उपन्यायाधीश असलेले एक नवीन न्यायालय स्थापन करण्यात आले.यात पाच न्यायाधीश ब्रिटिश असत आणि हे न्यायालय ज्यूरींच्या मदतींशिवाय न्यायादानाचे काम पहात असे.या न्यायालयात कायद्याची पुस्तके, लॉ रिपोर्ट, तज्ञ वकील वगैरे काही नव्हते.गुन्हेगारांना अघोरी स्वरुपाच्या शिक्षा दिल्या जात. याही न्यायपद्धतीवर कंपनी सरकारचे विलक्षण वर्चस्व होते.

त्यानंतरच्या मार्च १७२६ च्या सनदेने न्यायव्यवस्थेत थोडी सुधारणा झाली.मुंबई येथे या सनदेने 'मेयर कोर्टा'ची स्थापना झाली. यात एक मेयर व इतर नऊ ऑल्डरमेन न्यायदानाचे काम करीत. मेयर कोर्टाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील काही न्यायाधीशांची नेमणूक कंपनी सरकारकडून न होता थेट इंग्लंडच्या राजाकडून होऊ लागली व येथील गव्हर्नर व कौन्सिल यांच्या न्यायनिर्णयाविरुद्ध इंग्लंडच्या प्रिव्ही कौन्सिलकडे दुसरे अपील करण्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे प्रथमच मुंबईतील ब्रिटिश न्यायव्यवस्था व रहिवाशांचा इंग्लंडच्या न्यायव्यवस्थेशी प्रत्यक्ष संबंध आला आणि खऱ्याअर्थाने इंग्रजी विधीची पाळेमुळे महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेत रुजण्यास प्रारंभ झाला.

पुढे १७९८ च्या सनदेने मुंबईत 'रेकॉड्स कोर्टा'ची स्थापना करण्यात आली.एक मेयर, तीन ऑल्डरमेन व एक रेकॉर्डर असे हे न्यायाधीश मंडळ होते.रेकॉर्डरला कमीत कमी पाच वर्षांचा कायद्याच्या कामकाजाचा अनुभव असावा व तो बॅरिस्टर असावा, अशी अट घालण्यात आली.या न्यायालयाला काही काळ कलकत्त्याच्या सर्वोच्च न्यायालयासारखे अधिकार देण्यात आले होते.त्यानंतर मात्र १८२३ मध्ये मुंबईत स्वतंत्र सर्वोच्च न्यायालय

स्थापन करण्यात आले.या न्यायालयात सर्व न्यायाधीश कायदेतज्ञ होते, त्याबरोबरच वकीलवर्गही व्यावसायिक होता. कालांतराने महाराष्ट्रातील इतरही मुलूख ब्रिटिशांच्या ताब्यात आला आणि प्रत्येक जिल्हास्तरावर दिवाणी व फौजदारी अदालत न्यायालय स्थापन करण्यात येऊन न्यायादानाचे काम सुरू झाले.

ब्रिटिश संसदेने संमत केलेल्या १८६१ च्या 'इंडियन हायकोर्ट्स ॲक्ट' अन्वये मुंबई येथे उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले आणि न्यायव्यवस्था शासन व्यवस्थेच्या वर्चस्वातून पुष्कळशी स्वतंत्र ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधानानुसार दिल्ली येथे भारताचे सर्वोच्च न्यायालय आणि त्याच्याखाली प्रत्येक घटक राज्यासाठी एक उच्च न्यायालय स्थापन करण्यात आले. मुंबई येथे महाराष्ट्राचे उच्च न्यायालय असून त्याची खंडपीठे नागपूर व औरंगाबाद (अस्थायी) येथे आहेत. तसेच एक खंडपीठ पणजी (गोवा) येथे स्थापन करण्यात आले आहे.उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश व इतर न्यायाधीश असतात. या न्यायाधीशांची नेमणूक राष्ट्रपतींकडून होते. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक जिल्हान्यायालय व त्याखाली तालुका पातळीवर अनेक कनिष्ठ न्यायालये असतात. त्यांच्या कामकाजावर उच्च न्यायालयाचे संपूर्ण नियंत्रण असते.

महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे काम पहाण्याकरिता मुख्य न्यायाधीश म्हणून जिल्हा व सत्रन्यायाधीश असतो. त्याच्या नियंत्रणाखाली अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश, सहायक जिल्हा व सत्र न्यायाधीश, दिवाणी न्यायाधीश–वरिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश–कनिष्ठ स्तर, केवळ फौजदारी खटले चालविणारे कनिष्ठ न्यायदंडाधिकारी, तालुका ठिकाणचे दिवाणी न्यायाधीश व कनिष्ठ न्यायदंडाधिकारी अशी क्रमशः खालपर्यंत रचना असते. या सर्वांची न्यायालयीन अधिकारिता वेगवेगळ्या प्रकारची असते.

दिवाणी न्यायाधीश–कनिष्ठ स्तर याच्या न्यायालयात रू. २५,००० पर्यंत मूल्यांकन असणारे दिवाणी दावे चालतात. याशिवाय भाडे-नियंत्रण, घोषणात्मक हुकूमनामा (डिक्लेरेटरी सूटस), नगरपालिका अपीले इ. दावे या न्यायालयात चालू शकतात. या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरूद्ध जिल्हा न्यायालयात अपील करता येते त्यास पहिले अपील (फर्स्ट अपील) म्हणतात. जिल्हा न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरूद्ध मुंबई उच्च न्यायालयात अपील करता येते व त्यास दुसरे अपील (सेकंड अपील) म्हणतात. दिवाणी न्यायाधीश–वरिष्ठ स्तर याच्यापुढे रू.२५,००० च्या वरचे मूल्यांकन असणारे कोणत्याही प्रकारचे दावे चालू शकतात. त्याशिवाय विवाह, घटस्फोट, नादारी, पालकत्व, मृत्युपत्रप्रमाण (प्रोबेट) इ. अनेक बाबींसंबंधीचे दावे चालतात. जिल्हा न्यायालयातील कामाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात बव्हंशी सर्व दिवाणी न्यायधीशांना–वरिष्ठ स्तर उपर्युक्त बाबींसंबंधीचे दावे चालविण्याची अधिकारिता देण्यात आली आहे. या

न्यायालयांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी दिलेल्या न्यायानिर्णयाविरूद्ध पहिले अपील जिल्हा न्यायालयात करता येत नाही, तर ते उच्च न्यायालयात दाखल करून दाद मागावी लागते.

जिल्हा व सत्र न्यायाधीशाच्या तसेच अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीशाच्या न्यायालयांत सत्र स्वरूपाचे (सेशन्स केसेस) म्हणजे सर्वसाधारणपणे गंभीर स्वरूपाचे गुन्हे मानलेले खून, दरोडेखोरी, बलात्संभोग इत्यादींसारखे खटले चालतात. सत्र खटले सोडून अन्य सर्व खटले कनिष्ठ न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांत चालतात व त्या न्यायालयांच्या न्याय-निर्णयाविरूद्ध जिल्हा व सत्र न्यायालयांत पहिले अपील करता येते. सत्र स्वरूपाचे काही खटले व दिवाणी अपीले चालविण्याचे काम मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश हा आपल्या सहायक जिल्हा व सत्र न्यायाधीशाकडे सोपवू शकतो.त्याचप्रमाणे सार्वजनिक विश्वस्त, विवाह, घटस्फोट, पालकत्व इत्यादीसंबंधीच्या दाव्यांबाबत खास प्रकारची अधिकारिता जिल्हा व सत्र न्यायाधीशाकडे असते.[⟶अपील फौजदारी विधि].

यांशिवाय मालक-भाडेकरू संदर्भातील दावे तसेच लहानलहान रकमांचे दावे चालविण्यासाठी जिल्ह्याच्या ठिकाणी लघुवाद न्यायालय (स्मॉल कॉज कोर्ट्स) असते.त्याचप्रमाणे कामगारांचे दावे व सहकार विषयक कायद्यातील दावे चालविण्यासाठीही जिल्ह्याच्या ठिकाणी कामगार व सहकारी न्यायालये असतात.

महाराष्ट्रात १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्याने सरकारला पाच गावांसाठी एक न्यायपंचायत नेमता येते.या न्यायपंचायतीस प्रत्येक ग्रामपंचायतीने एक सभासद निवडून द्यावयाचा असतो.न्यायपंचायतीची मुदत ग्रामपंचायतीच्या मुदतीएवढीच असते.दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही प्रकारचे खटले या न्यायपंचायतीमार्फत चालतात. मात्र त्यांतील वादविषयीची किंमत शंभर रु पयांपेक्षा कमी असावी लागते. फौजदारी गुन्ह्याबद्दल न्यायपंचायतीला मर्यादित अधिकार असतात. उदा., दारू पिऊन गैरवर्तन करणे, इजा करणे इ. गुन्ह्यांबद्दल न्यायपंचायत गुन्हेगारास फक्त दंडाची शिक्षा करू शकते कारावास देऊ शकत नाही. न्यायपंचायत अकार्यक्षम असेलकिंवा तिने अधिकाराचा गैरवापर केला असेल, तर सरकार ती बरखास्त करू शकते.

महाराष्ट्रात महसूल खात्यामार्फतही न्यायदानाचे काम केले जाते. तालुक्याच्या ठिकाणी मामलेदार, तर जिल्ह्याच्या ठिकाणी कलेक्टर व प्रांत हे अधिकारी काम पाहतात. १९०६ च्या 'मामलेदार कोर्ट्स ॲक्ट'नुसार शेतीसाठी वापरात असलेल्या पाण्याच्या पुरवठा बेकायदा बंद करणे, किंवा हरकत घेणे, अडथळा आणणे इत्यादीं संबंधीचे दावे या न्यायालयात चालतात. कूळ कायद्याच्या संदर्भातील अनेक प्रकारचे दावेही या न्यायालयात चालतात. [⟶कृषिभूविधि].यांशिवाय महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर या मोठ्या शहरांत 'लघुवाद न्यायालये' आहेत. १८८२ च्या 'प्रॉव्हिंशिअल स्मॉल कॉज कोर्ट्स ॲक्ट' या दोन कायद्यान्वये या न्यायलयांची स्थापना करण्यात आली. सामान्यतः तीन हजार रु पयांपर्यंतचे दावे या न्यायालयात चालतात. मुंबई शहरामध्ये ही अधिकारिता दहा हजार रू पयांपर्यंत वाढविण्यात आली आहे.मोठ्या शहरात लहानलहान रकमांचे, विशेषतः व्यापारी, दावे अनेक असतात. त्यांचा निकाल लवकर लागावा या उद्देशाने या न्यायालयांची

स्थापना करण्यात आली. मुंबईच्या लघुवाद न्यायालयाला भाडे-नियंत्रण कायद्याखालील दावे चालविण्याची खास अधिकारिता दिलेली असल्यामुळे या न्यायालयास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. या न्यायालयांनी दिलेल्या न्यायनिर्णयाविरूद्ध अपीलाची तरतूद नाही.मुंबईमध्ये मात्र या न्यायालयाच्या खंडपीठापुढे अपीले चालविण्याची तरतूद करण्यात आली आहे.मात्र महत्त्वाच्या कायद्याच्या मुद्यांवर उच्च न्यायालयात फेरतपासणीसाठी अर्ज करता येतो किंवा त्याहीपुढे सर्वोच्च न्यायालयापर्यंत जाता येते.

मुंबईत शहर दिवाणी व सत्र न्यायालय (सिटी सिव्हील ॲन्ड सेशन्स कोर्ट) हे ही एक न्यायालय न्यायदानाचे काम करते.१९४८ साली या खास न्यायालयाची स्थापना करण्यात आली. जंगम मिळकतीबाबतचे दहा हजार रु पयांवरचे व पन्नास हजार रु पयांच्या आतील दावे या न्यायालयात चालतात. या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरु द्ध उच्च न्यायालयात अपील करता येते. याशिवाय विवाह, घटस्फोट, पालकत्व इत्यादींविषयक सर्व दावे या न्यायालयासमोर चालतात आणि महानगर न्यायदंडाधिकारी याच्या न्यायालयासमोर चालू शकत नाहीत असे सर्व सत्र स्वरूपाचे खटले या न्यायालयासमोर चालवले जातात.

मुंबईच्या उच्च न्यायालयाची अधिकारिता संपूर्ण महाराष्ट्रभर असून महाराष्ट्रातील सर्व न्यायालयांवर त्याचे नियंत्रण असते. उच्च न्यायालयाचे मूल न्यायशाखा (ओरिजनल साइड) व अपील न्यायशाखा (अपीलिएट साइड) असे दोन विभाग आहेत. अपील न्यायशाखेसमोर राज्यातील सर्व खालच्या न्यायालयांनी दिलेल्या न्यायनिर्णयाविरूद्ध अपीले चालतात. मूल न्यायशाखेसमोर पन्नास हजार रू पयांवरच्या मूल्यांकनाचे दावे चालतात. याशिवाय नौ-अधिकरण (ॲड्मिरल्टी), कंपनी विधी इ. कायद्यांतील वाद या न्यायालयासमोर चालतात. [⟶कंपनी व निगम कायदे]. भारतीय संविधानाच्या २२७ च्या अनुच्छेदानुसार महाराष्ट्रातील सर्व न्यायालये, ⇨न्यायाधिकरणे यांतील न्यायदान कामकाजाची नियमावली तयार करणे, त्यांचे दप्तर तपासणे इ. सर्वाधिकार उच्च न्यायालयाला आहेत. त्याचप्रमाणे अपीले सोडून अन्य मार्गांनी म्हणजे ⇨न्यायिक पुनर्विलोकन (ज्युडिशिअल रिव्ह्यू) वा पुनरीक्षण (रिव्हिजन) इ. खालच्या न्यायालयांनी दिलेल्या न्यायनिर्णयांचा पुनर्विचार करण्याचा अधिकार आहे.

त्वरीत न्याय मिळण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयाला ⇨बंदीप्रत्यक्षीकरण, उत्प्रेषण, प्रतिवेध, परमादेश व अधिकारपृच्छा असे पाच प्रकारचे न्यायलेख (रिट) काढण्याचे अधिकार संविधानाने प्राप्त झाले आहेत. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ ने उच्च न्यायालयास दिलेले हे अधिकार अनुच्छेद ३२ ने सर्वोच्च न्यायालयाला दिलेल्या अधिकारापेक्षा व्यापक आहेत. संविधानाच्या तिसऱ्या भागात नागरिकांना दिलेल्या ⟶ मूलभूत अधिकारांसंबंधी कोणतीही व्यक्ती, अधिकारी इत्यादींवर अन्याय झाला, तर उच्च न्यायालयांना आपापल्या प्रदेशात न्यायलेख काढून संबंधितावरील अन्याय थोपविण्याचा अधिकार आहे [ ⟶ न्यायलेख].

munotes.in

इतर राज्यांत नसलेले व म्हणून महाराष्ट्राचे वैशिष्ट्य ठरणारे अनेक महत्त्वाचे कायदे महाराष्ट्रात झाले आहेत. उदा., शेतकी कर्जमुक्ती कायदा, १९४७ कूळ कायदा, १९४८ महाराष्ट्र शेतकी आयकर कायदा, १९६२ महाराष्ट्र लोकायुक्त व उपलोकायुक्त कायदा, १९७१ इत्यादी. १९७१ च्या लोकायुक्त व उपलोकायुक्त कायद्याप्रमाणे महाराष्ट्रात प्रथमच लोकायुक्तपदी निवृत्त न्यायाधीशांची नेमणूक करण्यात येऊ लागली.[ ⟶ लोकपाल]. यांशिवाय कामगारविषयक पुष्कळसे कायदे महराष्ट्रातच झाले आहेत. उदा., महाराष्ट्र माथाडी, हमाल व अकुशल कामगार (रोजगार विनिमय आणि कल्याण) कायदा, १९६० महाराष्ट्र कामगार संघटना मान्यता आणि अनुसूचित कामगार गैर प्रथा प्रतिबंधक कायदा, १९७१ महाराष्ट्र रोजगार हमी कायदा, १९७७ इत्यादी. [ ⟶ कामगार कायदे रोजगार हमी योजना].

महाराष्ट्राच्या विधी व न्यायव्यवस्थेच्या इतिहासात अनेक निष्णात कायदेपंडितांचा उल्लेख करता येईल उदा., ⟶विश्वनाथ नारायण मंडलिक, न्यायमूर्ती ⟶ काशिनाथ त्र्यंबक तेलंग, न्या. ⟶महादेव गोविंद रानडे, न्या.⟶नारायण गणेश चंदावरकर, न्या.एम्.सी.छागला, सर चिमणलाल हरिलाल सेटलवाड, सर दिनशा फरिदुनजी मुल्ला, सर जमशेटजी कांगा, ⟶मुकुंद रामराव जयकर, डॉ.⟶भीमराव रामजी आंबेडकर, न्या.⟶प्रल्हाद बाळाचार्य गजेंद्रगडकर, न्या. य. वि. चंद्रचूड, एच्.एम्.सिरवाई, नानी पालखीवाला इत्यादी.गेल्या ३० वर्षांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या इतिहासाकडे पाहिले, तर महाराष्ट्राचे तीन विख्यात कायदेपंडित ⟶सर हरिलाल जेकिसनदास कानिया, प्र.बा.गजेंद्रगडकर आणि य.वि.चंद्रचूड, हे भारताच्या सरन्यायाधीशपदी विराजमान झाल्याचे दिसून येते.

**पोलीस प्रशासन व यंत्रणा**:

भारतीय संविधानानुसार सार्वजनिक सुव्यवस्था आणि पोलीस हे विषय घटक राज्यांच्या अखत्यारीतील आहेत. तथापि संविधानातील २४९ व्या अनुच्छेदानुसार एकूण देशहिताच्या दृष्टीने केंद्र सरकारला कोणत्याही घटक राज्याच्या पोलीस प्रशासनात हस्तक्षेप करण्याची तरतूद आहे. घटक राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि गुन्ह्यांना प्रतिबंध तसेच त्यांचे अन्वेषण करणे, नागरिकांच्या जीविताचे व वित्ताचे रक्षण करणे, मोठया शहरांतून वाहतूक नियंत्रण करणे ही सामान्यतः पोलीस खात्याची कामे आहेत.

**पार्श्वभूमी:** महाराष्ट्र पोलीस प्रशासन व यंत्रणेच्या जडणघडणीत, विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात, पुढील काही महत्त्वाचे टप्पे पडतात: प्रारंभीच्या मुंबई इलाख्यातील पोलीस यंत्रणा, द्वैभाषिक मुंबई राज्यातील पोलीस यंत्रणा व १९६० नंतरच्या विद्यमान महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणा व व्यवस्था यांचा त्यात सर्वसाधारणपणे समावेश होतो.

munotes.in

भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मुंबई इलाख्यात पश्चिम महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक या राज्यांतील काही जिल्हे यांचा समावेश होता.या काळात पोलीस व्यवस्थेच्या प्रमुखपदी पोलीस महानिरीक्षक असे व त्याचे कार्यालय पुणे येथे होते.जानेवारी १९५७ मध्ये ते मुंबई येथे हलविण्यात आले.पोलीस महानिरीक्षकाच्या मदतीसाठी अहमदाबाद, बेळगाव आणि मुंबई येथे तीन परिक्षेत्रे (रेंज) होती व त्यांवर उपमहानिरीक्षक पोलीस प्रशासनाचे काम पाही.शिवाय मुंबई येथे पोलीस आयुक्ताचे कार्यालय होते.प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस अधीक्षक पोलीस प्रशासनाचे काम पाही.गुन्हा-अन्वेषण विभाग व गुप्तवार्ता यांसाठी एकच विभाग होता.आज विद्यमान असलेल्या खास प्रकारच्या पोलीस शाखा नव्हत्या वाहतूक शाखा क्वचित आढळत बिनतारी संदेश यंत्रणा प्राथमिक अवस्थेत होती.

भारताचे संविधान अंमलात आल्यानंतर मुंबई इलाख्याला मुंबई राज्य म्हणण्यात येऊ लागले. १९५६ मध्ये सर्वत्र भाषिक राज्ये अस्तित्वात आली पण मुंबई राज्याचा विस्तार होऊन त्यात मराठी व गुजराती भाषिक प्रदेश समाविष्ट करण्यात आले आणि कन्नड भाषिक प्रदेश व बेळगाव कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले. वरील द्वैभाषिक मुंबई राज्यात मूळ इलाख्याच्या प्रदेशाशिवाय सौराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ हे नवे प्रदेश जोडण्यात आले.राज्याची राजधानी मुंबई येथेच राहिली आणि पोलीस व्यवस्था किरकोळ फेरफार होऊन जवळजवळ पूर्वीसारखीच राहिली. सौराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ यांकरिता अनुक्रमे राजकोट, औरंगाबाद व नागपूर येथे परिक्षेत्रे निवडण्यात येऊन त्यांवर पोलीस उपमहानिरीक्षकांची नेमणूक करण्यात आली. मुंबई राज्यात बिनतारी संदेश यंत्रणा व मोटार वाहन विभाग यांच्यात बरीच प्रगती झाली.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर पोलीस प्रशासनासाठी मुंबई शहर, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ असे प्रादेशिक विभाग पाडण्यात आले.या विभागांत एकूण २१ जिल्ह्यांचा समावेश होता.या सर्वांवर पूर्वीप्रमाणेच पोलीस महानिरीक्षकाची नेमणूक होती.मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या परिक्षेत्रांत पोलीस उपमहानिरीक्षकांची नेमणूक होती.याशिवाय मुंबई शहर पोलीस प्रशासनाचे काम पोलीस आयुक्ताकडे पूर्वीप्रमाणेच सोपविण्यात आले.

लोकसंख्येत तसेच औद्योगिक व सामाजिक प्रश्नांत झालेल्या वाढीमुळे पोलीस कारभाराचाही वेळोवेळी विस्तार होत गेला आणि पोलीस संघटनेत जरूर ते फेरफार करणे अपरिहार्य झाले. महाराष्ट्रात विद्यमान पोलीस यंत्रणेत ४ पोलीस आयुक्तालये, ६ परिक्षेत्रे, १० राज्य राखीव पोलिसांचे गट तसेच गुन्हा-अन्वेषण विभाग, गुप्तचर विभाग, मोटार वाहन विभाग, बिनतारी संदेश यंत्रणा, रेल्वे पोलीस यंत्रणा, पोलीस प्रशिक्षण विभाग इत्यादींच्या स्वतंत्र शाखा आहेत. पोलीस महानिरीक्षकाला १९८२ पासून पोलीस महासंचालक या पदाचा इतर राज्यांतील पोलीस महासंचालकाप्रमाणेच दर्जा देण्यात आला व पहिले पोलीस महासंचालक म्हणून कृ. पां.मेढेकर यांची नेमणूक करण्यात आली.

महाराष्ट्र पोलीस प्रशासनांत सहा पोलीस परिक्षेत्रे खालील सहा विभागांत विभागली असून त्यांवर प्रत्येकी एक उपमहानिरीक्षक नेमण्यात येतो.(१) नासिक विभाग – नासिक,

जळगाव, धुळे व अहमदनगर (४ जिल्हे).(२) अमरावती विभाग – अमरावती, अकोला, बुलढाणा व यवतमाळ (४ जिल्हे).(३) नागपूर विभाग – नागपूर (ग्रामीण), वर्धा, भंडारा, चंद्रपूर व गडचिरोली (५ जिल्हे). (४) औरंगाबाद विभाग- औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद व लातूर (७ जिल्हे).(५) कोल्हापूर विभाग – कोल्हापूर, पुणे (ग्रामीण), सातारा, सांगली व सोलापूर (५ जिल्हे).(६) ठाणे विभाग- ठाणे (ग्रामीण), रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग (४ जिल्हे).

**महाराष्ट्रातील पोलीस दल सामान्यतः** इतर राज्यांतील पोलीस दलांसारखे असून महासंचालक व महानिरीक्षक विशेष व अतिरिक्त महानिरीक्षक उपमहानिरीक्षक अधीक्षक व तत्सम दर्जाचे अधिकारी उपअधीक्षक पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक सहायक पोलीस निरीक्षक (बिनहत्यारी) बिनहत्यारी हवालदार बिनहत्यारी शिपाई हत्यारी सहायक पोलीस निरीक्षक हत्यारी हवालदार हत्यारी पोलीस शिपाई स्त्री-पोलीस अधिकारी व कर्मचारी इ. श्रेण्या त्यात आहेत. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच सर्व पोलीस प्रशासनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी पोलीस महासंचालकाच्या मदतीला तीन विशेष महानिरीक्षक नेमलेले आहेत. मुख्यतः आस्थापना, कायदा व सुव्यवस्था राखणे, राखीव दले, गुन्हा-अन्वेषण व प्रतिबंध इ. संबंधित कामे वरील तीन विशेष महानिरीक्षकांना पार पाडावी लागतात. महाराष्ट्रात उपर्युक्त सर्व श्रेण्यांवर अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे मिळून एकूण १,०६,२७८ एवढे संख्याबळ आहे (१९८४). पोलीस महासंचालकाच्या कार्यालयात नागरी हक्क संरक्षणासाठी एक खास कक्ष उघडण्यात आला असून तेथे गुन्हा-अन्वेषण व इतर कामांसाठी अत्याधुनिक गणकयंत्रांची सोय आहे.

महाराष्ट्रात बृहन्मुंबई, पुणे, नागपूर व ठाणे या मोठया शहरांत पोलीस प्रशासनासाठी पोलीस आयुक्तांची नेमणूक करण्यात येते.त्यांच्यावर पोलीस महासंचालक व महानिरीक्षकांचे नियंत्रण असते.शहरांची विभागणी परिमंडलात (झोन्स) करण्यात येते. पोलीस आयुक्तांच्या हाताखाली प्रत्येक परिमंडलावर पोलीस उपायुक्त व त्यांच्या खाली साहाय्यक पोलीस आयुक्त हे पोलीस प्रशासनाचे काम पाहतात. तसेच गरजेप्रमाणे पोलीस ठाणी असतात व तेथे पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक, शिपाई वगैरे कर्मचारी असतात.

पोलीस आयुक्तांना विशेष दंडाधिकार असतात. सभा, मिरवणुका, चित्रपट, हत्यारे इ. बाबतींत परवाने देणे व नियंत्रण करणे तसेच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून गुन्हेगारांना हद्दपार करणे इ. प्रकारची कार्यवाही पोलीस आयुक्त व त्यांचे सहकारी करतात.

मुंबई शहराचा प्रचंड विस्तार व पोलीस कार्याची व्याप्ती लक्षात घेऊन मुंबई पोलीस आयुक्ताला साहाय्य करण्यासाठी तीन अतिरिक्त पोलीस आयुक्त नेमले आहेत. पोलीस आयुक्तालये आणि पोलीस जिल्हे यांत पोलीस ठाणी असून त्यांवर देखरेखीकरिता पोलीस निरीक्षक व उपविभागीय अधिकारी व कर्मचारी असतात. स्थानिक गुन्हा-अन्वेषण विभाग, वाहतूक शाखा, राखीव पोलीस दल, स्त्री-पोलीस शाखा, नियंत्रण केंद्र इत्यादींच्या मदतीने मुंबई शहराचा पोलीस कारभार सांभाळला जातो. त्याशिवाय बृहन्मुंबईतील पोलीसांची संख्या ठरविणे, त्यांची भरती, प्रशिक्षण व्यवस्था, गणवेश, शस्त्रे, रजा, बदल्या, पदोन्नती इ.



munotes.in

सर्व व्यवस्था पोलीस आयुक्त हे पोलीस महासंचालक तथा महानिरीक्षक याच्या नियंत्रणाखाली पाहतात.

गुन्हा-अन्वेषणाच्या बाबतीत मुंबई पोलिसांना फार मोठी परंपरा असून मुंबईची गुन्हा शाखा (क्राइम ब्रँच) जगात विशेष प्रसिद्धी पावली आहे.ब्रिटिशांनी मुंबई शहरातील पोलीस यंत्रणेची स्थापना लंडन शहराच्या पोलीस यंत्रणेप्रमाणे म्हणजे ⟶ स्कॉटलंड यार्ड प्रमाणेच केली. मुंबई गुन्हा शाखेचे मुख्य अपर आयुक्त असून त्याला उपआयुक्त व इतर अधिकारी मदत करतात. अत्यंत गुंतागुंतीचे खून, दरोडे, अपहरण तसेच कोट्यवधी रुपयांचे आर्थिक गैरव्यवहार, आंतराष्ट्रीय पातळीवरचे गुन्हे इत्यादींचे तपास ही शाखा करते. बोटांच्या ठशांच्या साहाय्याने गुन्हेगार शोधून काढणे हा विभाग तर अत्यंत प्रसिद्ध आहे. त्याशिवाय छायाचित्रविभाग, गणकयंत्र, श्वानपथक इ. अत्याधुनिक सोयींनी युक्त असे विभाग या गुन्हा-शाखेत आहेत तसेच मुंबई पोलीस यंत्रणेत फिरती पोलीस पथके, वाहतूक विभाग, विमानतळ सुरक्षा शाखा इ. स्वतंत्र शाखाही आहेत.

महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक पोलीस अधीक्षक व त्याला मदतीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक असतात. जिल्ह्याची उपविभागांत विभागणी करण्यात येऊन त्यांवर उपविभागीय अधिकारी, त्यांचे खाली पोलीस निरीक्षक व पोलीस ठाण्यांवर निरीक्षक किंवा उपनिरीक्षक अशी खालपर्यंत क्रमशः रचना असते. जरूर तेथे दूरक्षेत्रे (आऊट पोस्ट) असून त्यांवर प्रमुख शिपायांच्या (हेड कॉन्स्टेबल) नेमणुका केल्या जातात. सर्वसाधारणपणे जिल्ह्यात २० ते ३० पोलीस ठाणी असतात. गुन्हा-अन्वेषण, गुप्तवार्ता, स्त्री-पोलीस इ. शाखा जिल्ह्याच्या ठिकाणी असतात. मुख्यालयात सु. ४०० ते १,००० हत्यारी पोलीस शिपाई असतात. कैदी नेणे-आणणे, सरकारी कोषागारांची तसेच मालमत्तेची सुरक्षितता, कारागृहांवर पहारा इ. कामे हत्यारी पोलिसांना करावी लागतात.

munotes.in

**राज्य सशस्त्र राखीव दल:**

महाराष्ट्र राज्याचे खास स्वतंत्र असे सशस्त्र राखीव पोलीस दल असून १९५१ च्या मुंबई राज्य राखीव पोलीस दल कायद्यान्वये याची निर्मिती करण्यात आलेली आहे.या दलातील पोलिसांना लष्कराप्रमाणेच शिक्षण दिले जाते. राज्यात राखीव पोलीस दलाचे १० गट असून ते महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेले आहेत. या दलाचे मुख्य पोलीस उपमहानिरीक्षक असून प्रत्येक गटावर समादेशक (कमांडन्ट) प्रमुख असतो. प्रत्येक गटाला वाहने, बिनतारी संदेश यंत्रणा, रुग्णालये इ. सुविधा आहेत. आणीबाणीच्या प्रसंगी किंवा दंगलीच्या वेळी राज्य राखीव दलाचे हे गट जिल्हे तसेच शहर पोलिसांना मदत करतात.

**गुन्हा-अन्वेषणविभाग**: महाराष्ट्रात गुन्हा-अन्वेषण विभागाचे काम पोलीस उपमहानिरीक्षकांच्या नियंत्रणाखाली चालते. प्रत्येक परिक्षेत्राचे पोटविभाग असून प्रत्येक पोटविभागावर पोलीस उपअधीक्षक प्रमुख असतो. या विभागाची प्रादेशिक कार्यालये मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद या मोठया शहरांत असून तेथे श्वानपथकेही आहेत. पुण्यात गुन्हा-

अन्वेषण विभागांतर्गत अंगुली मुद्रा (फिंगर प्रिंट ब्यूरो), हस्ताक्षर व छायाचित्र इ. केंद्रे आहेत. मुंबई येथील गुन्हा-अन्वेषण विशेष शाखाही याच प्रकारचे कार्य करते.

पोलिसांना कमीत कमी बळाचा वापर करून जास्तीत जास्त परिणामकारकता साधण्याबाबत खास प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते.त्यासाठी विविध प्रकारची शस्त्रसामग्री व तंत्रज्ञान यांचे ज्ञान त्यांना दिले जाते. समाजात सतत उद्‌भवणारे दंगेधोपे, चळवळी, मोर्चे, सभा, मिरवणुका इ. प्रसंगी ते आपल्या ज्ञानाचा, कमीत कमी बळ वापरून पण कौशल्याने उपयोग करून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत असतात. तशा प्रकारचे आदेश पोलिसांना पोलीस महासंचालकाकडून वेळोवेळी देण्यात येतात. जातिवैमनस्य व समाजकंटक यांच्यातून निर्माण झालेल्या दंगली मात्र खंबीरपणे व कठोर कारवाई करून, मुळातच निपटून काढण्याची दक्षता घेण्यात येते. अशा प्रसंगी प्रारंभी सौम्य लाठीहल्ला, अश्रुधूर इ. साधनांचा ते उपयोग करतात. परिस्थिती आटोक्याबाहेर गेली, तर त्यांना गोळीबारही करावा लागत

समाजातील गुंड, दरोडेखोर, दहशतवादी, अतिरेकी यांच्याविरुद्ध मुकाबला करण्यासाठी पोलिसांना आधुनिक शस्त्रसामग्री व तंत्रांचा फार उपयोग होतो.गुन्हा-अन्वेषणाच्या कामी पूर्वीपेक्षा आता आधुनिक शस्त्रांच्या तसेच तंत्रांच्या साहाय्याने त्यांना पुरावा गोळा करण्यात पुष्कळच मदत होते. त्या दृष्टीने महाराष्ट्रात १९५८ साली मुंबई येथे पहिल्यांदा न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली आणि तिच्या उपशाखा पुणे, नागपूर, औरंगाबादयेथे उघडण्यात आल्या. या प्रयोगशाळांत इलेक्ट्रॉनिक व इतर अद्ययावत उपकरणे असून आधुनिक तांत्रिक शिक्षण घेतलेले वैज्ञानिक त्यांत काम करतात. जीवविज्ञान, विषविभाग, रक्तरसशास्त्र, भौतिकी, क्षेपणास्त्र इ. आधुनिक तंत्रांनी युक्त असे विविध सुसज्ज विभाग त्यांत आहेत. येथे रक्त, थुंकी तसेच माती, रंग, विष इत्यादींची परीक्षा व पृथःकरण करून त्यांची गुन्ह्यांशी सांगड घातली जाते आणि या माहितीच्या आधारे गुन्हेगारांना शोधून काढण्याचे काम केले जाते. यांशिवाय या प्रयोगशाळांतून पोलीस अधिकाऱ्यांना वैज्ञानिक प्रशिक्षण देण्याचे वर्गही नेहमी चालू असतात.

**बिनतारी संदेश यंत्रणा**:

महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी व प्रमुख गावांतून बिनतारी संदेशवहनाची केंद्रे निर्माण करण्यात आली आहेत. पोलीस संचालकाच्या दर्जाचा एक अधिकारी यावर नेमलेला असतो. महाराष्ट्रात सर्व म्हणजे ७६१ पोलीस ठाण्यांमध्ये बिनतारी संदेश यंत्रणेची सोय आहे.याशिवाय राज्यात लाचलुचपत व भ्रष्टाचार विरोधी तसेच दारूबंदी, गुप्तवार्ता यांसंबधींची केंद्रेही आहेत.

**मोटार वाहन**: राज्यात पोलीस मोटार परिवहन विभाग असून ठिकठिकाणी असलेल्या यंत्रशाळांतून मोटारी व जीप वगैरे वाहनांची दुरुस्ती व देखभाल केली जाते. हा विभाग पोलीस चालकांना प्रशिक्षणही देतो.तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांनाच या विभागात घेतले जाते.

रेल्वे पोलीस व वाहतूक विभाग : राज्यात रेल्वे वाहतूक व राज्यमार्ग वाहतूक नियंत्रण असे दोन विभाग असून त्यांवर प्रत्येकी एक उपमहानिरीक्षक व मदतीसाठी पोलीस अधीक्षक आणि इतर कर्मचारी असतात. रेल्वे मार्गाची सुरक्षितता, प्रवाशांची सुरक्षितता राखण्याचे काम रेल्वे पोलिसांकडे असते. वाहतूक विभागाकडे महामार्गाची सुरक्षितता राखण्याचे तसेच अपघात टाळणे इ. कामे असतात. राज्यमार्ग वाहतूक शाखेत अभियांत्रिकी विभाग असून त्याच्यातर्फेही अपघात कमी करणे व वाहतूक सुरळीत ठेवणे इ. कामे केली जातात.

**पोलीस जनसंपर्क यंत्रणा**:

महासंचालकाच्या कार्यालयात राज्यपातळीवर पोलीस अधीक्षक दर्जाचा जनसंपर्क अधिकारी असून प्रत्येक आयुक्तालयात उपअधीक्षक दर्जाचा एक अधिकारी जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करतो. प्रत्येक दोन किंवा अधिक पोलीस स्टेशनसाठी निरीक्षक दर्जाचा अधिकारी याच कामासाठी नेमण्यात आला आहे.प्रत्येक जिल्ह्यात गृह उपअधीक्षक याच्याकडे जनसंपर्काचे काम सुपूर्द करण्यात आले आहे. जनतेची गाऱ्हाणी ऐकून खटले, गुन्ह्यांचे तपास, चौकशी व इतर कामात विलंब टाळणे आणि तक्रारींची चौकशी करून त्यांचे निवारण करणे, ही ह्या अधिकाऱ्यांची कामे असतात. महासंचालकाच्यातर्फे दक्षता नावाचे मासिक चालवण्यात येते. त्यात पोलीस तपास, त्या कामी लोकांनी दिलेले सहकार्य इ. संबंधीचे लेख, कथा व वृत्त छापले जाते.

**स्त्री-पोलीस**:

स्त्री-पोलीस ही स्वातंत्र्योत्तर काळातील एक महत्त्वाची तरतूद होय. सर्व भारतात प्रथमतः १९५५ साली मुंबई राज्यात स्त्री-पोलिसांची नेमणूक करण्यात आली. या शाखेत सतत वाढ होत असून महाराष्ट्रात विद्यमान स्त्री-पोलिसांत ३ उपअधीक्षक, १५ निरीक्षक, ११२ उपनिरीक्षक, २६९ स्त्री-प्रमुख शिपाई (हवालदार) व ९१४ स्त्री-शिपाई आहेत. मुंबई, पुणे, नागपूर या शहरांत रेल्वे पोलीस खात्यात व बहुतेक सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी स्त्री-पोलीस आहेत. स्त्रियांच्या संदर्भातील गुन्हे, समस्या व त्या संदर्भातील कायदेशीर व कल्याणकारी तरतुदी इ. बाबतींत स्त्री-पोलिसांचा फार मोठा उपयोग होतो.

जिल्ह्याच्या ठिकाणी स्त्री-पोलीस पथके असून निरीक्षक, उपनिरीक्षक व शिपाई अशी या पथकांची रचना असते. सर्वसाधारणपणे स्त्री-कैद्यांची व मुलांची ने-आण करणे, पळवून नेलेल्या स्त्रियांचा शोध घेणे, वेश्यावस्ती व कुंटणखाने यांवर लक्ष ठेवून लहान मुली व जबरदस्तीने पळवून आणलेल्या स्त्रियांची सुटका करणे, स्त्री-गुन्हेगारांना अटक करणे, त्यांची झडती घेणे, मोर्चे, सभा यांतील स्त्रियांचा बंदोबस्त करणे, रेल्वे स्थानक आणि यात्रा यांच्या ठिकाणी महिला प्रवाशांच्या गैरसोयी दूर करणे, तसेच तक्रारींची नोंद घेणे इ. कामे स्त्री-पोलिसांना पार पाडावी लागतात.

**पोलीस भरती वप्रशिक्षण**:

प्रत्येक जिल्ह्यातील हत्यारी, बिनहत्यारी हवालदार व शिपायांची भरती त्या त्या जिल्ह्यांतील पोलीस अधीक्षक व राज्य राखीव पोलीस समादेशक यांच्याकडून केली जाते. शिपायांना पुढे हवालदार, जमादार व उपनिरीक्षक म्हणून पदोन्नती मिळू शकते.महाराष्ट्र लोकसेवा आयोग उपनिरीक्षक व उपअधीक्षकांच्या जागेसाठी स्पर्धा परीक्षा घेऊन महाराष्ट्र पोलीस सेवांतील अधिकाऱ्यांची निवड करते.वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची भरती केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांमधून केली जाते.वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसाठी हैदराबाद येथे प्रशिक्षणाची सोय आहे.

महाराष्ट्रात पोलीस प्रशिक्षणाचे केंद्र नासिक येथे आहे.येथे उपअधीक्षक व उपनिरीक्षक या अधिकाऱ्यांच्या तसेच हवालदार (हेड कॉन्स्टेबल) यांच्या उजळणी अभ्यासक्रमाची प्रशिक्षण व्यवस्था आहे.प्रादेशिक प्रशिक्षण शाळा खंडाळा, जालना, अकोला, नासिक व नागपूर या ठिकाणी असून तेथे शिपाई दर्जाच्या पोलिसांना प्रशिक्षण दिले जाते.मुंबईत भरती झालेल्या पोलिसांसाठी नायगाव येथे प्रशिक्षण शाळा आहे.

केंद्र व राज्य शासन संबंधात पोलीस यंत्रणेचे महत्त्व : भारतातील सर्व राज्यांच्या कारभाराचा समन्वय साधून देशात शांतता व सुव्यवस्था राखणे, त्याबाबतचे नियोजन तसेच राज्यांना मदत करणे इ. महत्त्वाची जबाबदारी केंद्र शासनावर असते. त्यासाठी केंद्र शासनाची सुरक्षा दले, सी.बी.आय्., ⟶ सीमा सुरक्षा दल (बी.एस्.एफ्.), सी.आर्.पी.एफ्. बिनतारी संदेश यंत्रणा इ. विभाग देशात कार्य करतात आणि घटक राज्यांच्या पोलीस यंत्रणेलाही साहाय्य करतात. अखिल भारतीय कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत केंद्र सरकार राज्यांना आदेश देऊ शकते. देशातील कोणतेही राज्य किंवा काही विभाग अशांत विभाग म्हणून जाहीर करण्याचा अधिकार केंद्राला आहे. त्याचप्रमाणे राज्यातील उच्च दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांची भारतीय पोलीस सेवेतून निवड करणे तसेच त्यांचे नियंत्रण करणे हत्यारे, दारूगोळा, यंत्रसामग्री यांबाबत राज्यांना आवश्यक ते साहाय्य व मार्गदर्शन करणे इ. अनेक प्रकारे केंद्र सरकार राज्य सरकारांवर नियंत्रण ठेवून देशात शांतता व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करते.

**पोलीस समस्या व उपाययोजना**:


महाराष्ट्र पोलिसांच्या काही समस्या आहेत. उदा., वेतनश्रेणी, निवास, कामाचे तास, पदोन्नती, पूरक भत्ते इत्यादी.देशाच्या वेगवेगळ्या भागांत १९७९ साली झालेल्या पोलीस आंदोलनाचा परिणाम महाराष्ट्रातील पोलीस यंत्रणेवर विशेष जाणवला नाही.याचे कारण महाराष्ट्र शासनाने आपल्या पोलिसांच्या वेतनात त्या वेळी लगेच वाढ केली आणि त्यांच्या इतरही सुविधांसंबंधीच्या उपाययोजना आखल्या. १९७७ साली केंद्र सरकारने नेमलेल्या 'धर्मवीर आयोगा' च्या आणि पूर्वी राज्य सरकारने स्थापन केलेल्या काही पोलीस आयोग व समित्यांच्या शिफारशींनुसार महाराष्ट्र शासनाने पोलिसांच्या बाबतीत अनेक तरतुदीही केल्या आहेत. १९८२ साली सरकारने नेमलेल्या त्रि-सदस्य समितीच्या शिफारशींनुसार,

महाराष्ट्र पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तींत पुष्कळशा सुधारणा करण्यात आल्या तसेच त्यांना अनेक सवलती उपलब्ध करून देण्यात आल्या.

सेवा बजावत असताना पोलीस कर्मचाऱ्यास गंभीर दुखापत झाली किंवा मृत्यू आला, तर शासन रु.१५,००० पर्यंत आणि पोलीस महासंचालक पोलीस कल्याण निधीतून रु. ५,००० पर्यंत मदत देतात. काही प्रसंगी अशा कर्मचाऱ्यास खास अनुदानही देण्यात येते.दहा तासांपेक्षा जास्त वेळ काम केल्यास पोलीस कर्मचाऱ्यांना पाच रुपये अल्पोपहार भत्ता दिला जातो.हत्यारी पोलिसांना दरमहा २० रुपये विशेष भत्ता देण्यात येतो.पोलीस कर्मचाऱ्यांना वार्षिक ३० दिवसांच्या अर्जित रजेशिवाय १५ दिवसांची विशेष रजा मिळते.तसेच इतर सरकारी कर्मचाऱ्यांपेक्षा पाच दिवस अधिक म्हणजे वर्षाला २० दिवसांची नैमित्तिक रजा मिळते.याशिवाय पोलिसांना धान्यखरेदीसाठी शासनाकडून आर्थिक साहाय्यही केले जाते.

पोलीस प्रशासनातील अपुरा कर्मचारीवर्ग हा एक महत्त्वाचा प्रश्न असून राज्य शासनाने त्याची दखल घेतलेली आहे. शिपायांना पदोन्नती मिळण्यास लागणारा विलंब टाळण्यासाठी शासनाने पोलीस हवालदारांच्या जागाही वाढविल्या आहेत. जमादारांना पदोन्नतीने सहायक उपनिरीक्षकाचे पद देण्यात येते. पोलीस फौजदारांच्या ५०% जागा पोलीस जमादार, हवालदार आणि शिपाई यांच्यामधून पदोन्नतीने भरण्यात येतात. यांशिवाय मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर इ. मोठया शहरांमध्ये पोलिसांना बसेसमधून विनामूल्य प्रवास करण्याची व्यवस्था शासनाने केली आहे.

महाराष्ट्र शासनाने १९८३-८४ च्या अर्थसंकल्पात पोलिसांसाठी ११ कोटी रुपयांची तरतूद केली असून त्यातून त्यांचा निवासाचा प्रश्न सोडविण्यास प्राधान्य दिलेले आहे. निरीक्षक व त्यांच्याखालील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांस शासन निवासस्थाने बांधून देते.त्यासाठी शासनाने एक स्वतंत्र पोलीस गृहनिर्माण मंडळ स्थापन केले आहे.आतापर्यंत सु.३,२०० अधिकारी व ६०,००० पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. १९८३ मध्ये ३,६६९ घरांचे बांधकाम सुरू होते.१९८४ मध्ये या योजनेसाठी पोलीस गृहनिर्माण मंडळाने ६६६.१३ लक्ष रुपयांची तरतूद केली आहे. महाराष्ट्रात पोलिसांना संघटना बांधण्याची परवानगी देण्यात आली होती परंतु या सवलतीचा दुरुपयोग होऊ लागल्याने, म्हणजे कामगार चळवळीच्या धर्तीवर संघटनेचे कार्य चालविण्यात येऊ लागल्यामुळे ही संघटना रीतसरपणे बरखास्त करण्यात आली. शासनाने सदर संघटनेऐवजी ऑगस्ट १९८३ मध्ये प्रत्येक जिल्ह्यात व आयुक्तालयात पोलीस दलातील सर्व थरांना योग्य प्रतिनिधित्व देऊन 'पोलीस कर्मचारीवृंद परिषदे' ची (स्टाफ कौन्सिल) स्थापना करून तिच्याद्वारे पोलिसांच्या विविध समस्या सोडविण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.




पोलिसांसाठी वैद्यकीय साहाय्य, त्यांच्या मुलांना शैक्षणिक सवलती व खात्यात नोकरीत प्राधान्य दिले जाते. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांकडून मिळालेली वर्गणी व शासकीय अनुदान यांतून 'पोलीस कल्याण निधी' उभारला जातो आणि त्यातून पोलिसांसाठी करमणूक केंद्रे, क्रीडा नैपुण्यास उत्तेजन व इतर मदत देण्यात येते. १९८३ मध्ये या निधीतून ४,०१० विद्यार्थ्यांना सु. २ लक्ष रुपयांची शैक्षणिक मदत व ३०८ मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना १०,५१,४०० रुपयांची मदत देण्यात आली. जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या पोलीस करमणूक केंद्रातून कौटुंबिक तसेच सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यांशिवाय पोलीस खात्यातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील स्त्रियांसाठी शिवण वर्ग, कुक्कुटपालन केंद्र, वाचनालये, साक्षरता वर्ग, बालवाडया, स्वस्त धान्य दुकाने यांसारखे कल्याणकारी कार्यही केले जाते. मुंबईत पोलीस कल्याण निधीतून वरळी येथे एक प्रसूतिगृह चालविले जाते.

राज्यपाल व राष्ट्रपती यांच्यातर्फे विशेष कामगिरी बजावणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना प्रतिवर्षी पुरस्कार देण्यात येतात.

**होमगार्ड:**

महाराष्ट्र पोलीस यंत्रणेला साहाय्यभूत ठरणारी स्वयंसेवी संघटना म्हणजे नगरसेना किंवा ⟶ होमगार्ड ही होय. १९४६ साली देशामध्ये पहिल्यांदा मुंबईत होमगार्ड संघटना स्थापन करण्यात आली. पोलीसी कामात, विशेषतः कायदा व सुव्यवस्था राखण्यात, या संघटनेची मोठया प्रमाणात मदत होते. तसेच दुष्काळ, धरणीकंप, पूर इ. नैसर्गिक आपत्तींच्या वेळी आणि अंतर्गत अशांतता, जातीय दंगली, तसेच बसवाहतूक, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, अग्निशमन, विमोचन, प्रथमोपचार, रुग्णवाहन यांसारख्या अत्यावश्यक सेवेत व्यत्यय आला, तर नागरी संरक्षण दलाचा केंद्रबिंदू म्हणून काम करणे व लोकांना साहाय्य करणे, ही कामे होमगार्ड संघटनेमार्फत पार पाडली जातात. महाराष्ट्रात ही स्वतंत्र व कायम स्वरूपाची संघटना असून महासमादेशक (कमांडन्ट जनरल) हा या संघटनेचा प्रमुख असतो. महाराष्ट्र होमगार्ड संघटनेचा आलेख खालीलप्रमाणे आहे.

munotes.in

महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणी होमगार्ड संघटनेची पथके असून ग्रामीण भागांतूनसुद्धा होमगार्डांची भरती केली जाते.महाराष्ट्रात विद्यमान होमगार्ड संघटनेचे संख्याबल, ४५,७७० आहे (१९८४).त्यांची भरती तीन वर्षांच्या मुदतीसाठी निष्काम सेवा याप्रमाणे करार करून केलेली असते. कर्तव्यकालावधीत होमगार्डांना विविध प्रकारचे भत्ते दिले जातात. उदा., कर्तव्यभत्ता (४ ते ८ तासांसाठी रु. ८ इ.) धुलाईभत्ता, प्रशिक्षण कालातील खिसा भत्ता, भोजन भत्ता इत्यादी.

**कारागृहे**:

कारागृह महानिरीक्षक हा राज्यातील कारागृह प्रशासनाचा प्रमुख असून त्याच्या हाताखाली कारागृह उपमहानिरीक्षक, तुरुंग उद्योग अधीक्षक आणि इतर अधिकारीवर्ग असतो. जिल्हा कारागृहाचा प्रमुख अधीक्षक असतो.

कारागृह प्रशासनांसाठी महाराष्ट्राचे पूर्व प्रदेश व पश्चिम प्रदेश असे विभाग पाडण्यात आले असून कारागृह उपमहानिरीक्षकांच्या नियंत्रणाखाली दोन्ही विभागांतील कारागृहांचे प्रशासन चालते. महाराष्ट्रात मध्यवर्ती कारागृहे, जिल्हा कारागृहे-प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग, तृतीय वर्ग, तालुका उपकारागृहे, बोर्स्टल शाळा, खुली कारागृहे, तुरुंगाधिकारी प्रशिक्षण शाळा अशा प्रकारचे कारागृहांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. शासनातर्फे निरनिराळ्या समित्या नेमून कारागृहांची वरचेवर तपासणी केली जाते व त्यांत वेळोवेळी सुधारणाही करण्यात येतात.

महाराष्ट्रात सु. ४५ कारागृहे (मध्यवर्ती व जिल्हा कारागृहे) असून या कारागृहांतील कैद्यांना विविध प्रकारचे उद्योगधंदे पुरविले जातात. उदा., हातमागावर कापड विणणे, कारागृह रक्षक, शिपाई व इतर शासकीय विभागांच्या कर्मचाऱ्यांचे गणवेश शिवणे तसेच बटणे बसविणे, सतरंजा विणणे, खेळणी तयार करणे, सुतारकाम, बागकाम, शेती, पुस्तक-बांधणी, टॅग्ज, लेसेस तयार करणे इत्यादी. कैद्यांच्या श्रमाचा, त्यांच्यातील कलागुणांचा उपयोग करून घेऊन त्यांचे पुन्हा योग्य पुनर्वसन करण्याचा उद्देश त्यामागे आहे आणि महाराष्ट्र शासनाचा कारागृह विभाग त्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. कारागृहातील कैद्यांना सर्व प्रकारच्या शिक्षणाचीही संधी उपलब्ध करून दिली जाते.निरक्षर कैद्यांना साक्षर व साक्षरांना पुढील शिक्षण घ्यावयाचे असल्यास त्यांना ते दिले जाते.१९८३-८४ साली महाराष्ट्रातील सु.१३,००० कैद्यांनी या सवलतीचा फायदा घेतला तसेच सु, २,५०० कैद्यांनी योगासनाच्या शिक्षणाचा फायदा घेतला.कोल्हापूर येथील किशोर सुधारालयातील किशोरांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये तांत्रिक धंदेशिक्षण दिले जाते.त्याशिवाय कैद्यांना राज्यपातळीपर्यंत क्रीडा, नाट्य इ. स्पर्धांमध्ये भाग घेण्याचीही सोय केली आहे.

**खुले कारागृह**:

खुले कारागृह ही स्वातंत्र्योत्तर भारतातील अभिनव कल्पना असून महाराष्ट्रात १९५६ पासून या कारागृहांची स्थापना करण्यात येऊ लागली.या कारागृहांतील कैद्यांची निवड अत्यंत कसोशीने करण्यात येते.दीर्घ मुदतीचे कैदी, विशेषतः जन्मठेपेची शिक्षा झालेले,

तसेच चांगली प्रगती दाखविलेल्या कैद्यांनाच या कारागृहांत प्रवेश दिला जातो.कारागृहांतर्गत शेती, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन तसेच फळबागा, फुलबागा यांचे ज्ञान कैद्यांना करून दिले जाते. शासनास १९८३ मध्ये ४३,८०,००० रुपयांचे उत्पन्न निरनिराळ्या कारागृहांतील वरील उद्योगांतून मिळाले. १९६८ साली स्थापन झालेले पैठणचे मध्यवर्ती खुले कारागृह त्या दृष्टीने विशेष प्रसिद्ध आहे.गोदावरीवरील जायकवाडी प्रकल्पाच्या बांधकामावरही येथील कैद्यांना शासनाने काम दिले होते (१९६८). यांशिवाय येरवडा तुरुंगाचा शेतीमळा, सांगली जिल्ह्यातील आटपाडीजवळील स्वतंत्रपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील कनारगाव जंगल विभाग या ठिकाणी कैद्यांच्या खुल्या वसाहती असून त्यांना आधुनिक सोयींनी युक्त उद्योगधंदे पुरविले जातात.

## ५.५ स्वाध्याय:

1. जिल्ह्यातीलकायदा आणि सुव्यवस्था यंत्रणेवर सविस्तर चर्चा करा
2. जिल्ह्यातील न्यायिक यंत्रणेवर टिपण लिहा?
3. पोलिसांच्या समस्या सांगून त्यावर उपाय सुचवा
4. **टीप लिहा:**
   I. पोलीस प्रशासन व यंत्रणा
   II. राज्य सशस्त्र राखीव दल
   III. बिनतारी संदेश यंत्रणा

## ५.६ संदर्भग्रंथ


1. गाडगीळ,वि. न. भारतीय न्यायव्यवस्था, पुणे,१९६८.
2. चौधरी,दत्तात्रय हरी,मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८,मुंबई,१९६३.
3. राणे,द. म. बोरोल,य. म. मुंबई ग्रामपंचायती विधान, १९५८, पुणे, १९६०.
4. बंग के. आर., जिल्हा प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
5. जाधव तुकाराम, शिरापूरकर महेश , भारतीय संविधान व भारतीय राजकारण , Unique academy
6. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण , मुंबई


❖❖❖❖

# ६

## कायदा आणि सुव्यवस्था प्रशासन न्यायिक यंत्रणा- I

**पाठाची रूपरेषा**


६.१ पाठाचेउद्देश

६.२ प्रास्ताविक

६.३ दिवाणी आणि फौजदारी न्यायिक

६.४ लोकअदालत (लोकन्यायिक

६.५ स्वाध्याय

६.६ संदर्भग्रंथ


### ६.१ पाठाचे उद्देश

- दिवाणी आणि फौजदारी न्यायिक यंत्रणा समजून घेणे.
- लोक अदालत, लोकन्यायिक यंत्रणा समजून घेणे.

### ६.२प्रास्ताविक

दिवाणी कायदा हा शब्दप्रयोग इंग्रजीमधील 'सिव्हिललॉ' ह्या शब्दप्रयोगास समानार्थी म्हणून वापरण्यात येत असला, तरी इंग्रजी शब्दप्रयोगाचा अर्थ बराच व्यापक व थोडासा भोंगळ आहे .त्या मानाने मराठी शब्दप्रयोगाचा अर्थ बराच सासंकुचित वैशिष्ट्यपूर्ण आणि सुस्पष्ट असा आहे परंतु कायद्याच्या दिवाणी व फौजदारी अशा दोन भागांमधील भेदाच्या निदर्शक अशा व्याख्या अनेक विधिज्ञांनी दिलेल्या असल्या, तरी तर्कशास्त्राच्या कसोटीनुसार त्यांपैकी एकही व्याख्या निर्दोष वा समाधानकारक नसल्यामुळे दिवाणी कायद्याची उपयुक्त लवचिक व नकारात्मक अशी व्याख्या दिलेली आहे. ह्या व्याख्येनुसार विवाह, घटस्फोट, उत्तराधिकार, दत्तकविधी, अपकृत्य, संविदा, संपत्तीचे हस्तांतरण, करविषयक कायदे इ. विधि विषयांवरील कायद्यांचा 'दिवाणी कायदा' या संज्ञेखाली समावेश होऊ शकेल. दिवाणी व फौजदारी ह्या कायद्याच्या दोन विभागामधील भेदाची छाप जशी उपाययोजनेवर तशीच न्यायालये व प्रक्रिया विधीवर पडलेली आढळून येते. उदा. राष्ट्रकुलातील अनेक देशांमध्ये खालच्या स्तरांवरील न्यायालयांमध्ये दिवाणी न्यायालय व फौजदारी न्यायालय तसेच दंडक्रिया–विषयककायदा व दिवाणीप्रक्रिया विषयक कायदा असा भेद केलेला आढळतो.

भारतीय संविधानाच्या कलाम३९(क) नुसार समाज, न्याय आणि विधि विषयक मोफत साहाय्य व सल्लाहियोजना सुरु केली. व १९८१ पासूनहि महाराष्ट्रात सर्वच अमलात

आणली त्यासाठी राज्यस्तरावर कायदेमंत्री अध्यक्ष असलेले महाराष्ट्र राज्यकायदेवीषयक साहाय्य व सल्ला मंडळ स्थापन केलेतर जिल्हापातळीवर जिल्हा व सत्रन्यायाधिशाच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कायदेविषयक सहाय्य व सल्लासमिती आणि तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्लासमिती स्थापन केली जाते

## ६.३ दिवाणीआणिफौजदारीन्यायिक

### 1 कायदा आणि सुव्यवस्थेच्या इतर काही पध्दती :–

कायदा आणि सुव्यवस्थेच्या इतर पध्दतीचा विचार करताना गुन्हासंबंधीच्या तीन बाबी पहिल्या पाहिजेत. १) प्रतिबंध (Prevention). २) अन्वेषण (तपास) (Investigation). ३) अभियोग (खटला) (Prosecution of Trial). या त्या तीन बाबी आहेत. याशिवाय आणीबाणी (Emergencies), गोळीबार (Firing), अंतर्गत सुरक्षा; Internal security) या तीन बाबी आहेत. ज्यांचा कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात उपयोग हातो.

गुन्हे घडू नयेत आणि वाईट कृत्ये केली जाऊ नयेत म्हणून प्रतिबंध (Prevention) हा उपाय असतो. गुन्हा घडल्यानंतर त्याची चौकशी व तपास करणे यालाच अन्वेषण (Investigation)असे म्हणतात. तपासात व चौकशीत गुन्हा झाल्याचे काही पुरावे सापडले किंवा ज्या काही आधारावर तो गुन्हा आहे असे आढळून आल्यास त्याच्यावर अभियोग म्हणजेच (Prosecution) खटला दाखल करणे, या कायदा आणि सुव्यवस्थेच्या पध्दती आहेत.

कायदा आणि सुव्यवस्थेच्या काही पध्दतीचा विचार गुन्हयांच्या संदर्भात करावयाचा आहे. त्यामुळे गुन्हयांचा अर्थ व प्रकार लक्षात घेऊ.

### 2) गुन्हे (Crimes) :–

समाजात अनेक प्रवृत्तीचे लोक राहतात. काही सत्यप्रवृत्तीचे असतात. काही गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडून समाजात इतरांना अनेक प्रकारचे त्रास होतात. नागरिकांना आपले दैनंदिन जीवन जेगणेदेखील काही वेळा कठीण बनते. काही वेळा जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण होतो. खून, दरोडे असे प्रकारही घडतात. नागरिकांना त्यांच्या जीविताची व वित्ताची हमी दिलेल्या शासनावर त्यांचे त्याबाबतीत संरक्षण करणे कर्तव्यअसते. यासाठी कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करावी लागते. गुन्हांना आळा बसावा म्हणून उपाय योजणे, गुन्हा घडल्यानंतर त्यांची चौकशी वगैरे करणे, त्याचा तपास लावणे, गुन्हेगाराला शिक्षाझाली पाहिजे या दृष्टीने त्याच्यावर अभियोग दाखल करणे त्याशिवाय परिस्थिती आटोक्यात येत नेसल तर आणीबाणी जाहीर करणे, गोळीबार करणे आणि अंतर्गत सुरक्षा प्रस्थापित करण्याच्या सर्व बाबीकडे लक्ष पुरविणे या सर्व गोष्टी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने फार महत्वाच्या आहेत.
गुन्हे दोन प्रकारचे असतात.



munotes.in

### १) दखलपत्र गुन्हे (Congnisable offence)

दखलपात्र गुन्हे म्हणजे 'ज्या गुन्हयांची दखल घेणे आवश्यक असते असे गुन्हे' अशा गुन्हयात गुंतलेल्या व्यक्तींना पोलिस वॉरटशिवाय पकडू शकातात. त्याला पकडून त्याने केलेल्या गुन्हयाचा तपास करणे व चौकशी करणे इत्यादी प्राथमिक बाबी पूर्ण करून त्याने गुन्हा केल्याचे आढळून आल्यास व केलेल्या गुन्हयाच्या पुराव्यावरून खटला दाखल करणे हे कायदा आणि सुव्यवस्थेसाठी आवश्यक असते. हा खटला वा अभियोग फौजदारी खटला समजला जातो. अशा फौजदारी खटल्यातून खून करणे, दरोडे घालणे, हा चोरीचाच प्रकार असतो. जेव्हा ५ पेक्षा अधिक लोक त्यात सामील होतात त्याला दरोडा किंवा डाका टाकणे असे म्हणतात. चोरी, घरफोडी, गंभीर स्वरूपाची इजा करणे, जाळपोळ, लुटालूट, मारामारी, लाचलुचपत अफरातफर अशा प्रकारच्या अनेक गुन्हयांचा समावशे होतो

### २) अदखलपत्र गुन्हे (Non Congnisable offence)

ज्या गुन्हयांची नोंद कायदेशीररित्या करता येत नाही परंतु, अन्याय झालेली व्यक्ती पोलिस स्टेशनला जाऊन तक्रार नोंदविते. अशा व्यक्तीने आपल्यावर झालेल्या अन्यायाची कैफियत पोलिसांना सांगितलेली असते. पोलिस त्याच्या म्हणण्याचा खरेखोटेपणा तपासून पाहता. मॅजिस्ट्रटकडून आलेल्या आदेशांचे पालन करण्यासाठी ज्या बाबत चौकशी करण्यास सांगण्यात आले आहे ती चौकशी करणे व गुन्हयासंबंधीचा खटला दाखल करणे. अशा गुन्हयांमध्ये शिवीगाळ करणे, मानसिक त्रास देणे, निंदानालस्ती करणे इत्यादी बाबी ज्या फारशा गंभीर स्वरूपाच्या नसतात अशा गुन्हयांना अदखलपात्र गुन्हें म्हणतात.

कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचा दृष्टीने दोन्ही गुन्हयांचा प्रतिबंध करणे, चौकशी करणे, खटला भरणे इत्यादी पध्दतीचा अवलंब कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी करावा लागतो.

### ३) प्रतिबंध(prevention)

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यामध्ये शासनाला काही प्रतिबंधक उपाय योजावे लागतात. फौजदारी प्रक्रिया सांहताप्रमणे गुन्हे होऊ नयेत महणून काही प्रतिबंधात्मक उपाय सुचविण्यात आले आहेत. 'पोलिस नियम पुस्तिका' (Police Manual) मध्ये पोलिस अधिकाऱ्यांना मार्गदर्शनपर असे काही प्रतिबंधात्मक उपाय सांगण्यात आले आहेत. प्रतिबंधात्मक उपाय मात्र प्रचिलत कायद्यांना अनुसरूनच असले पाहिजेत. गुन्हयांचा आळा घालण्यासाठी जे प्रतिबंधात्मक नियम तयार करण्यात आलेले असतात त्या नियमांची व्यवहारात सांगड घलता आली पाहिजे आणि अशी सांगड कायद्यानुसारच घातली पाहिजे. 'फौजादारी प्रक्रिया संहिता' (Code of Criminal Procedure) हिच प्रमख 'संविधी' आहे तया संविधीच्या आधारे प्रतिबंधात्मक उपायांची योजना केली जाते.

'फौजदारी प्रक्रिया संहित' हि एक अशी परिनियम पुस्तिका आहे त्यामध्ये दंडाधिकाऱ्याने सार्वजनिक क्षेत्रात निर्माण झालेल्या गोंधळाशी असे निपटले पाहिजे, याबाबत सदर कयद्यात शांतता राखण्याचे उपाय सुचविले आहेत. काही व्यक्तीकडून

शांततेचा ससत भंग होत असेल तर त्या व्यक्तीबरोबर कसे वागावे, याचा उल्लेख सदर पुस्तिकेत आहे.

प्रतिबंधात्मक उपायांसाठी पोलिसांना काही कार्य आणि काही अधिकार देण्यात आले आहेत. तसेच दंडाधिकाऱ्याला यासंबंधीची माहिती पुरविली जाते. त्या माहितीच्या आधारे दंडाधिकारी निर्णय देतात. ते निर्णय अमान्य असल्यास संबंधित व्यक्ती अपील करू शकते. असे निर्णय अपिलात गेल्यावर बदलेही जाऊ शकतात.

फौजदारी प्रक्रिया संहितेतील एक महत्वाची तरतूद अशी आहे की, बेकायदेशीर जमावास बंदी करता येते. (Unlawful asscmblies) सदर कायद्यातील प्रकरण IX मध्ये बेकायदेशीर जमावाबरोबर कशी कारवाई करावी हे स्पष्ट केले आहे. बेकायदेशीर जमाव पांगविण्यासाठी बळाचा उपयोग केला जाऊ शकतो.

स्थावर मालमत्तेसंबधी लोकांचे तंटे होत असतील व त्यामुळे त्या भागातील परिस्थिती अंशात बनत असेल तर ती अचल संपत्ती दंडाधिकाऱ्याला त्या तंटयाचा निर्णय लागेपर्यंत, आपल्या ताब्यात घेता येते. संशयास्पद व्यक्तींना पोलिस अटक करू शकतात. तपासणी करून त्यांना सोडून दिले जाऊ शकते. सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करण्यसाठी प्रतिबंधात्मक उपय योजण्यात येऊ शकतात. दंगली, मोर्चा, रस्ता रोको अशा अनेक प्रसंगी रस्त्यावरील दिवे फोडणे, बसेस जाळणे, सार्वजनिक मालमत्तेची हानी करणे अशा घटना लोक करीत असतील तर पोलिस त्यांना असे कृत्य करण्यास प्रतिबंध करू शकतात.

नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सतत व्यत्यय आणीत असतील तर त्यांच्याविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार पोलिसांना दिलेला आहे. व्यापारीवर्गाकडून अथवा इतर कोणकडून फसवणूकीचे प्रकार घडत असतील तर त्या प्रकारांना आळा घालण्याचे कार्य पोलिसांना करावे लागते. उदा.एखादा व्यपारी वजनमापे योग्य प्रकारे ठेवत नसेल तर त्यांच्याविरुध्द कारवाई करता येते. त्यांच्यावर खटले भरले जातात व त्यांना शिक्षादेखील होऊ शकते.

**'फौजदारी प्रक्रिया संहिता'** मधील सेक्शन १३०, १३१ आणि १३२ मध्ये बेकायदेशीर जमावविरूध्द करावयाचे उपाय स्पष्ट केले आहेत. शस्त्र व बळ यांचा वापर करू बेकायदेशीर जमाव पांगविला जातो.

वरिष्ठ दंडाधिकाऱ्याने आपल्या कनिष्ठाना लेखी आदेश द्यावे लागतात. त्याप्रमाणे सभा, संमेलन, यात्रा राष्ट्रीय सण, मिरवणुका अशा प्रसंगी वरिष्ठांकडून व्यवस्थित सूचना दिल्या गेल्या पाहिजेत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या या प्रतिबंधात्मक उपायांना फार मोठे महत्व आहे.

जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३७(१) अन्वये शस्त्रबंदी व कलम ३७(३) नुसार जमावबंदीचे आदेश जिल्हाधिकारी देऊ शकतात. प्रतिबंधात्मक उपयांतील ही फार महत्वाची तरतूद आहे.कारण यामुळे एखाद्या ठिकाणी दंगल अथा दंगलीसारखा प्रकार

होणार आहे. अशी थोडी जरी चाहूल लागली तरी त्या भागासाठी ही कलमे जारी करून शांतता आणि सुव्यवस्था राखता येते.

थोडक्यात असे म्हणता येते की, गुन्हे घडू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजण्याचे अनेक प्रकार आहते. त्यापैकी काहींची चर्चा वरीलप्रमाणे केली आहे. ही सर्व उपाययोजना केल्याने कायदा आणि सुव्यवस्था राखली जाऊ शकते.

### 4) अन्वेशण **(Investigation)**

गुन्हयांचा तपास अर्थात 'अन्वेषण' हा गुन्हा घडल्यानंतरचा कायदा आणि सुव्यवस्था राखण्याती एक फार महत्वाचा घटक आहे. ज्या गुन्हयांची दखल कायदेशीररीत्या घेतली जाऊ शकते त्या सर्व गुन्हयांची चौकशी करणे व तापस लावणे हे पालिस कार्यातील एक अत्यंत महत्वाचे कार्य समजले जाते. अदखपात्र गुन्हयांची चौकशी फार गांभीर्याने केली जात नाही. अदखलपात्र गुन्हयांसबंधी दंडाधिकाऱ्याला आवश्यक वाटत असेल तर तो चौकशी करण्याचे आणि तपास लावण्याचे आदेश देऊ शकतो. दखपात्र गुन्हयांचे अन्वेषण हे पोलिसांचे कर्तव्य समजले जाते. दखलपात्र गुन्हयाची माहिती प्रथम पोलिस स्टेशनला देणे आवश्यक असते. ज्या व्यक्तीला आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटते, ती व्यक्ती स्वत: किंवा आपला मित्र अथवा नातेवाईकांतर्फे पोलिस स्टेशनला जाऊन सर्व माहिती देते. ती माहिती पोलीस स्टेशनमध्ये ठाणे अंमलदाराकडून नोंदवून घेतली आते. त्याला **'एफआयआर'** ;थ्पतेज प्दवितउंजपवद त्मचवतज द्ध प्रथम खबरी रिपोर्ट असे म्हणतात. गुन्हयासंबंधीची सत्य परिस्थिती त्यामध्ये नोंदविली गेल्यास पुढील तपास व्यवस्थित लावता येतो आणि गुन्हेगाराला ताब्यात घेऊन त्यावर खटला दाखल करता येतो; परंतु दुर्दैव असे की, एफ.आय.आर. मध्ये सत्य बार्बीचे कथन क्वचितच वेळा काही जण करतात. अनेकवेळा एकाने तक्रार दाखल केली म्हणून त्याचा विरोधक तक्रार दाखल करतो. एकमेकांवर आरोप लावण्याची जणूकाही चढाओढ लावलेली दिसते. अशावेळी सत्य माहिती आसणाऱ्या व्यक्ती पोलिस स्टेशनमध्ये जाऊन ती माहिती पोलिसांना देत नाहीत. अशी माहिती पोलिसांना कोणी देण्याचा प्रयत्न केला तर पोलिसांचा विनकारण त्यांना त्रास सुरू होतो. आपल्याकडे ही एक प्रशासकीय उदासीनता असल्याचे दिसते.

प्रथम खबरी रिपार्ट हाच खऱ्या अर्थाने गुन्हयाचा शोध घेण्याचा स्त्रोत असतो. हा रिपोर्ट जितका सविस्तर आणि लहानसहान गोष्टीची घेतलेला असेल तितका गुन्हयाचा शोध लवकर लागू शकतो. म्हणून रिपोर्ट करणारा आणि रिपोर्ट लिहून घेणारा हे दोघेही त्यामध्ये महत्वाची जबाबदारी बजावणारे असतात. गुन्हयांचा शोध लावण्यासाठी पोलिसांना हा रिपोर्ट फार मदत करतो. माहिती देणारा 'फिर्यादी' व ज्याच्या विरुध्द तक्रार दाखल केली आहे त्याला 'वादी' असते म्हणतात. गुन्हा नोंदीचे रजिस्टर ठाण्यात असते. त्याची एक कार्यपुस्तिका असते. तो रिपोर्ट न्यायालयातील निर्णय लागेपर्यंत सांभाळावा लागतो. त्या रिपोर्टची प्रत फिर्यादीला देणे आवश्यक आहे.

चौकशीचे कार्य सुरू झाल्यानंतर पोलिस गुन्हा घडलेल्या ठिकाणी कोणाची तरी साक्ष घेण्याच्या प्रयत्नात असतात. गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदाराची नितांत गरज

असते. गुन्हा केल्याचे साक्षीदाराशिवाय सिध्द होत नाही. अनेक वेळा अनेक नागरिक त्या घटनेचे साक्षीदाराशिवाय सिध्द होत नाही. अनेक वेळा अनेक नागरिक त्या घटनेचे साक्षीदार असतात; परंतु त्यापैकी क्वचितच कोण एखादाइसम साक्ष देण्यासाठी पुढे येतो. अनेक वेळा साक्षीदार पोलिसांकडून काहींवर दबाव आणून तयार केले जातात. हि बाब अयोग्य असते. साक्षीदाराच्या साक्षीने एखाद्या व्यक्तीवर असलेला गुन्हा सिध्द होईलच असे खात्रीने सांगता येत नाही. फौजदार प्रक्रिया संहितेनुसार चौकशी यशस्वीरीत्या करण्यासंबंधीचे मार्गदर्शन केले आहे. साक्ष देणाऱ्या अथवा माहिती पुरविणाऱ्याला कुठेही सही देण्याची गरज नसते. त्यामुळे ती व्यक्ती अगदी निर्भपणे सत्य कथन करतो. अशा प्रकारच्या माहितीचा उपयोग न्यायालयात फार कमी होतो. गुन्ह्यांची माहीती मिळवित असताना कोणाला काहीही आमिष दाखवता येत नाही. आमिष दाखविणे म्हणजे खोटे पुरावे जमविणे किंवा खोटया पुराव्यांना प्रोत्साहन देणेच होय.

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या सेक्शन ६४ प्रमाणे पोलिसांकडे येऊन गुन्हा कबलू करता येतो. भारतीय **'विधितत्वमीमांसा'**;श्रनतपेचतनकमदबमद्ध चे एक वेशिष्टय आहे की, पोलिसांकडे कबुली दिलेला जबाब हा न्यायालयात पुरावा म्हणून गृहीत धरला जात नाही. भारतीय न्यायशास्त्राच्या दुसऱ्या एका कायद्याने 'भारतीय पुरावा कायदा' जो दिडशे वर्षापासून अस्तित्वात आहे, त्या कायद्याच्या सेक्शन २५ अन्वये कबुली जबाब दिलेल्या गुन्हयाचा पुरावा सादर करण्याचे बंधन गुन्हेगारावर नसते. तपास कार्यत पोलिसांना संशयित ठिकाणी जाऊन त्या ठिकाणची जडती घेण्याचा अधिकार असतात.

केलेल्या तपासाच्या नोंदी दैनंदिन पुस्तिकात केल्या पाहिजेत. चौकशीच्या व तपासाच्या कामाची प्रगती वरिष्ठांना कळविली पाहिजे. प्रत्येक अधिकाऱ्याला योग्य असे रेकॉर्ड ठेवणे आवश्यक असते. काही माहिती पोलीस आपल्या डायरीत नोंद करून असतात. पोलिस तपास हा जितका चिकित्सक पध्दतीने केला जातो तिका चांगला परिणाम मिळतो. तपास कार्याची  माहिती गुप्त ठेवली जाते. फक्त तपासाच्या प्रगतीची माहिती जनतेला दिली जाते. कारण काही गुन्हयांच्या तपासाची प्रगती जाणून घेण्यासाठी जणता आतुर झालेली असते.

### 5) अभियोग**(Prosecution)**खटला **(Trial)**

पोलिसांकडून तपास कार्य पूर्ण झाले की, आरोपीविरूध्द सापडलेल्या पुराव्यावरून गुन्हा सिध्द होत असेल तर आरोप पत्र दंडाधिकाऱ्याकडे सादर केले जाते. तपास काळात आरोपीला अटक केलेले असेल तर २४ तासांच्या आत त्याला दंडाधिकाऱ्यासमोर हजर करावे लागते. तपासाचे किंवा चौकशीचे कार्य अर्धवट राहिले असल्यास पोलिस दंडाधिकाऱ्याकडून आरोपीला परत आपल्या ताब्यात घेऊ शकातात. त्याला **'रिमांड'** ;त्मउंदक परत पाठविणे) असे म्हणतात. रिमांडच्या काळात तो आरोपी त्या मॅजिस्ट्रेटच्या नियंत्रणाखाली असतो. याला न्यायालयीन कस्टडी असे म्हणतात. न्यायालयीन कस्टडीमध्ये आरोपी असेल तर त्या ठिकाणी पोलिसांना देखील मॅजिस्ट्रेटच्या परवानगीनेच जाता येते. यामुळे पालिसांच्या आत्याचारापासून त्याचे संरक्षण होते. न्यायालयीन कोठडीमध्ये विशिष्ट कामासाठी पूर्वपरवानगी घेऊन एखाद्याला सोडता येते. ज्यावेळी तपास व चौकशी करण्याचे कार्य

जास्त तर त्याला **पोलिस कस्टडी** देण्याचे पोलिसांकडन मॅजिस्ट्रेटकडे विनंती केली जाते. अशा वेळी मॅजिस्ट्रेटला आरोपी पोलिसांच्या ताब्यात देणे आवश्यक आहे असे वाटल्यास त्या आरोपीची पोलिस कोठडी मंजूर होते. तेथे पोलिस संपूर्ण तपास लावू शकतात. काही वेळा खून किंवा दरोडा अशा प्रकरणात आरोपीला त्या ठिकाणी घेऊन जाण्याची आवश्यकता वाटल्यास पोलिस बंदोबस्त त्याला तेथे नेले जाते. काही ओळख पटविण्याचे कार्य पूर्ण करणे हा त्यामागचा उद्देश असतो. वास्विक पाहता आरोपीला न्यायालयीन कोठडीतून पोलिस कोठडीत हलवले तरी त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी ही त्या दंडाधिकाऱ्याचीच असते. पोलिसांनी त्या आरोपीची चौकशी करण्यासाठी जास्तीत जास्त १४ दिवसांचा रिमांड मिळू शकतो. फौजदारी दावे पुष्कळ असातत. मॅजिस्ट्रेट रिमांडचा अर्ज पूर्णपणे व काळजीने वाचून त्याला जर आवश्यक वाटले तरच ते त्या आरोपीला पोलिसांच्या ताब्या-कोठडीत पाठविण्यास अनुमती देतात.

तपास किंवा चौकशी लवकर व्हावी असे सर्वांनाच वाटते. पोलिस मात्र तपास कार्य व्यवस्थित करू शकले आणि सबळ पुरावे सापडले तर त्या आरोपीवर आरोपपत्र दाखल करून त्याला न्यायालयात हजर करतात. ही अभियोगाची पध्दती फार काळजीपूर्वक पूर्ण करावी लागते. त्यामध्ये पोलिसांकडून तपासकार्यासंबधी व आरोपपत्र दाखल करण्यामध्ये थोडीदेखील दिरंगाई झाली किंवा काही कमी राहिले तर आरोपली त्याचा फायदा मिळू शकतो आणि गुन्हा केलेला असताना देखील केवळ आभियोगाची योग्य प्रक्रिया पूर्ण न केल्यामुळे आरोपी सुटू शकतो.

फौजदारी कायद्यानुसार कोणत्याही न्यायालयात खटले दाखल करता येतात. ज्या न्यायालयात आरोप पत्र दाखल केले आहे तेथे न्यायमूर्ती त्या संबधीचे निर्णय घेत असतात. त्यांना पोलीसांची बाजू व आरोपीची बाजू समजून घेता येते. आरोपीला आपली बाजू मांडण्यासाठी वकिलाची मदत घेता येते. पोलिसांची बाजू सरकारी वकिलांमार्फत मांडली जाते. खटल्याची सुनावणी सुरू होते. त्यावेळी दोन्ही पक्षांकडील साक्ष, पुरावे, जबान्या, उलपटतपासणी इत्यादी गोष्टी संपल्यानंतर न्यायाधीश आपला निर्णय सुनावतात. यावेळी आरोपीला शिक्षा होऊ शकतो. आरोपीची शिक्षा हि कायद्यातील तरतुदीनुसारच व्हावी लागते. शिक्षा झालेल्या आरोपीला तुरूंगात पाठविले जाते. अशाप्रकारे आभियोगाची प्रक्रिया पूर्ण होते. कायदा आणि सुव्यवस्थामध्ये अभियोगाची पध्दती फार महत्वाची असते. गुन्हेगारांवर खटला चालवून तो जर दोषी आढळला तर त्याला शिक्षा करून तुरूंगात पाठविले पाहिजे, असे जर नाही केले तर असे गुन्हेगार बाहेर राहून कायदा आणि सुव्यवस्था नष्ट करतील. म्हणून कायदा आणि सुव्यवस्थेतील हा एक महत्वाचा भाग आहे.

### 6) आणिबाणी/आपत्कालीन परिस्थीती (Emergency)

कायदा आणि सुव्यवस्था राखताना अनेक वेळा विविध प्रकारच्या संकटांनातोंड द्यावे लागते. नैसर्गिक संकटांशी सामना करणे तसे अवघडत असते; परंतु त्याहीपेक्षा लोकांनी दंगली, जाळपोळ, नासधूस करून महाभयंकर संकट उभे केल्यास त्याचा सामना करणे अत्यंत जिकिरीचे असते. अशी परिस्थीती असामान्य परिस्थिती म्हणून ओळखली जाते. अशा परिस्थिती सर्व सत्ता राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रपतीकडे व राज्य

पातळीवर राज्यपालाला स्विकारावी लागते. त्यांच्या वतीने सर्व प्रशासकीय अधिकारी कार्य करतात. आणिबाणी एखाद्या भागासाठीदेखील लागू केली जाते. काही वेळा आणीबाणी लागू करण्याची इतरही कारणे असतात. जातीय दंगली, पंचायती किंवा इतर निवडणुकांच्या काळातील तंग वातावरण, हत्या गोहत्य, जाळपोळ, संप मोर्चे इत्यादीमुळे देखील वातवारण तंग बनते. अशांतता निर्माण होते. अशावेळी समाजव्यवस्था बिघडणे. दंगलीचा परिणाम शांततेने जीवन जगणाऱ्यांवर फार होतो. ज्या भागातील परिस्थीती आटोक्यात आणण्यासाठी 'आणीबाणी' पुकारणे आवश्यक असते त्या ठिकाणची व्यवस्थित माहिती घेण्यात आली पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या संपामुळेदेखील जनजीवन विस्कळीत होते. अशावेळी पोलिसांना कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी काही उपाय योजावे लागतात. संप शांततेच्या मार्गाने होत असल्यास विशेष त्रास होत नाही. परंतु, संपकरी जनतेची अडवणूक करून त्रास देत असतील तर अशावेळी पोलिसांना आणीबाणी लागू करून परिस्थितीवर नियंत्रण करावे लागते. संपकाळ अधिक वाढत गेला तर कर्मचारी वर्गात नैराश्याची भावना निर्माण होते आणि नैराश्याच्या भावनेतून अनेक विपरीत घटना घडू लागतात. अशावेळी कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न आधिक गंभीर बनतो म्हणून तो प्रश्न सोडवून परिस्थीती पूर्वपदावर आणण्यासाठी आणीबाणी लागू करावी लागते. अशाप्रकारे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची ही एक चांगली पध्दती आहे.

### 7) गोळीबार (Firing):–

जातीय दंगली, संप मोर्चे इत्यादीमुळे काही ठिकाणी परिस्थिती फारच बिघडते. अशावेळी त्याठिकाणी शांतता प्रस्थापित करणे आवघड कार्य असते. ती परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी त्या संतप्त जमावाला पांगविण्यासाठी 'गोळीबार' ;थ्पतपदहद्ध आवश्यक बनते. संतप्त जमाव नासधूस, जाळपोळ करून सर्वांच्या वित्तची हानी करायला लागतो तेव्हा त्याला गोळीबार करूनच तेथून माघारी फिरवावे लागते. हा कायदा आणि सुव्यवस्थ राखण्यातील शेवटचा प्रयत्न असतो.

गोळीबार करणे जेव्हा पोलिसांना अपरिहार्य होते तेव्हा त्याला काही नियमांची पूर्तता करावी लागते. गोळीबार करण्याचे काही निकष लावलेले आहेत. त्या निकषावर ती परिस्थिती खरी ठरली की गोळीबार करता यतो.

गोळीबार करण्यापूर्वी पूर्ण परिस्थितीची माहिती घेणे आवश्यक असते. परिस्थिती फारच चिखळत चालली आहे अशी खात्री व्हावी लागते सार्वजनिक मालमत्तेचे फारच नुकसान झाले आहे व आणखीन फारच नुकसान होणार आहे असे वाटल्यास परिस्थिती नियंत्रित करण्यासाठी गोळीबार केला जातो. गोळीबार करण्यापूर्वी अश्रुधुरांचा प्रयोगही केला जातो. गोळीबार एकदम करता येत नाही. त्याची पूर्वसूचना लोकांना द्यावी लागते. सूचना परत परत देणे आवश्यक असते. त्यामुळे लोक गोळीबारापूर्वी आपापल्या ठिकाणी सुरक्षित पोहोचू शकतात. गोळीबाराच्या कमीत कमी फैरी झाडाव्यात. गोळीबारामुळे जो उद्देश साध्य करायचा असतो. तो साध्य झाला पाहिजे. जमावावर गोळीबार करताना करमेच्या खाली गोळी लागेल, याकडे कटाक्ष असला पहिजे. त्याच उद्देश असा की, व्यक्ती गंभीररीत्या जखमी होऊ नये. गोळीबरांचा परिणाम दूरच्या लोकांवरदेखील होऊ शकतो. म्हणून तो कमरेखालचा

भाग लक्षात घेऊनच करावयास पाहिजे. गोळीमुळे एखादी व्यक्ती गंभीर जखमी झाली अथवा दगावली तर दंगल आणखी वाढू शकते.

गोळीबार करण्यात आला तर त्यासंबंधीचा प्रश्न विचारण्यात येतो. गोळीबाराचे समर्थ खालील मुद्यांच्या अधारे केले जाते.

१. पोलिसांना स्वत:च्या संरक्षणसाठी गोळीबार केला, असे म्हणटे जाते; परंतु अशी परिस्थिती फारच कमी वेळा उद्‌भवते.

२. काही वेळा संतप्त जमाव पोलिस स्ट्रेशनलाच घेराव घालतो.पोलिस स्टेशनच्या आवारात घुसुन तेथील वाहने जाळण्यास सुरुवात करतात.

३. संतप्त जमावात समाजकंटक घुसतात. अशा व्यक्ती जाळपोळ, लूट, छळवणूक यासारख्या वाईट गोष्टी करण्यास सुरुवात करतात. सार्वजनिक ठिकाणी अनेक वाहने व इतर काही वस्तूंची होळी करतात. अशा वेळी गोळीबाराशिवाय पर्याय उरत नाही.

गोळीबाराचा निर्णय त्या ठिकाणी हजर असलेला दंडाधिकारी घेत असतो. जेव्हा दंडाधिकारी उपस्थित नसतो तेव्हा वरिष्ठ अधिकारी असा निर्णय घेऊ शकतो.तो अधिकारी कमीत कमी पोलिस उपनिरिक्षकाच्या दर्जाचा असावा लागतो. दंडाधिकारी त्या ठिकाणी नसला तरी अंतिमत: कायदा आणि सुव्यवस्थेची जबाबदारी त्याचीच असते. म्हणून आपल्या इतर सर्व पोलिस सहकाऱ्यांकडून माहिती घेऊनच अशी कारवाई करतो.

गोळीबार झाल्यानंतर विशेषत: फेरी झाडलेल्या असल्या की राजकीय नेते त्या गोळीबाराच्या चौकशीची मागणी करतात. गोळीबार करण्याइतकी गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती काय, असा सवाल करू लागतात. त्यातून पोलिसांची आरेरावी वृत्ती दिसून येते, असेही काही लोक मत व्यक्त करतात. कायदा आणि सुव्यवस्था राखताना पोलिसांच्या अशा आरेरावी वृत्तीवर अकुश असावा असाही काहींचा उद्देश असतो. पोलिसांनादेखील गोळीबार करण्यापूर्वी शांतता आणि सुव्यवस्था राखण्याचे सर्व उपाय निष्फळ झाले होते, हे सिध्द करता आले पाहिजे. गोळीबाराची चौकशी सार्वजनिकरित्या खुल्या वातावरणात झाली पाहिजे. गोळीबाराचे अहवाल जनतेसमार ठेवले गेले पाहिजेत. जनतेलाही सत्य परिस्थिती काय आहे, हे कळू शकेल, मॅजिस्ट्रेट तिथे पोलिसांबरोबर उपस्थित राहून घटनांची नोंद ठेवण्याचे कार्य करीत असतो. अशावेळी गोळीबाराच्या चौकशीच्या वेळी त्यांची बाजू आणखी भक्कम होते. सार्वजनिक हितार्थ काही अहवाल गोपनीय ठेवले जातात.

गोळीबाराच्या चौकशीसाठी शासन विलंब लावत असल्याचे चित्र नेहमीच दिसते. विशेष करून त्याबद्दल टाळाटाळ करण्याचे धोरण स्वीकारलले आढळते. याचे प्रमुख कारण असे की, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गोळीबार केलेला असतो आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य शासनाचेच असते. त्यामुळे केलेल्या गोळीबाराचे समर्थनच केले जाते; परंतु लोकशाही शासन व्यवस्थेत विरोधी पक्षाच्या लोकांनी विरोध करण्यासाठी काही गोष्टी कराव्या लागतात. त्यामध्ये अशा गंभीरकृत्याची विचारणा करणे कर्तव्य असते. गोळीबार ज्या भागात झाला तेथील दुसरा संतंप्त गट चौकशीची मागणी करतो. अनेकांकडून चौकशीची मागणी होऊ लागली की, मॅजिस्ट्रेट व पोलिस अधिकारी घाबरतात. चौकशी आयोग नेमले जाते.

अनेक वेळा पोलिस अधिकारीच दोषी असल्याचे आढळून येते. जमावातील गटांपैकी काहींचे त्यांना समर्थनही मिळते. परंतु त्याचे कारणही त्या पोलिसांची पक्षपाती वृत्ती असते. असेच दुसऱ्या गटांचे म्हणणे असते. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी गोळीबार ही महत्वाची उपाययोजना असते हे मान्य करावेच लागते.
गोळीबाराची चौकशी पूर्ण व्हायला पाहिजे. गोळीबाराची चोकशी निष्पक्षपातीने व्हायला पाहिजे. चौकशीसाठी नेमलेल्या आयोगासमोर साक्ष देणाऱ्यांनी भावनाप्रधान होऊन साक्ष देऊ नये. सत्य परिस्थितीचे जे त्यांनी अवलोकन केलेले असेल तेच त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले पाहिजे. खऱ्या परिस्थितीची जाणीव झाल्यानंतरच पोलिसांनी काय काय केले याचेही कथन केले पाहिजे. गोळीबाराशिवाय इतर उपाय लागू पडले नसते काय? असे प्रश्न विचरणारांनी त्या ठिकाणी परिस्थिती बघितलेली नसते अत्यंत जबाबदारीने सत्य परिस्थिती काय होती हे प्रत्यक्षदर्शनी सांगायला पाहिजे. गोळीबाराच्या चौकशी अहवालातून निर्णय चूक होता की बरोबर होता, सार्वजनिक हितासाठी गोळीबार आवश्यक होता की अनावश्यक होता अशा प्रकारचे अनेक प्रश्न उपस्थित करून कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणारा जो पोलिस वर्ग आहे त्यांच्याबद्दल नोहमीच किंवा कुठलातरी रोष व्यक्त करण्याची संधी समजून साक्ष देणारेही काही कमी नसतात. त्यानेही कायदा आणि सुव्यवस्था कशी बिघडलेली होती, हे नीट तपासून त्यांनी उत्तरे अथवा साक्ष द्यायला पाहिजे. ज्या गोष्टींचा ऊहापोह चौकशी अहवालात झालेला असतो आणि ज्या गोष्टीसंबधी पोलिसांचे दोष दाखवलले असतात त्याचा उपयोग पुढील प्रसंगी त्यासंबंधी दक्षता घेण्यात येऊ शकतो. काही चुका घडल्या असतील तर भविष्यात त्या चुका टाळता येतील.

गोळीबार करण्याची परिस्थितीच का निर्माण करावी या बाजूचा विचारही तितकाच महत्वाचा आहे. विरोध दर्शविण्याचे अनेक सनदशीर मार्ग असाताना हिंसक मार्ग स्वीकारणे हे कितपत माणुसकीस शोभणारे आहे. समाजाच्या हितासाठी काही करावयाचे आहे म्हणून समाजालाच जाळण्यासाठी निघालेला जमाव त्याला कोणी आवर घालावा? अलीकडे तर काही संघटना काही व्यक्तीविशेषांचा फारच आदर करतात; परंतु राष्ट्रीय महत्वाचे ठेवे ज्यांचे शासन जतन करते अशी ठिकाणेच उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न करतात. अशा जमावावर कोणत्या प्रकारची कारवाई करावी हा बिकट प्रश्न कायदा आणि सुव्यवस्थेत निर्माण झाला पाहिजे. गोळीबार नेहमीच आवश्यक असतो अशी बाब नाही; परंतु अलीकडे शासनदेखील इतके दुर्बल बनलेले आढळते की अनेक ठिकाणी कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी लष्करात पाचारण करते. लष्कराला बोलविण्याने दंगल आटोक्यात येईलच; परंतु सीमेवर कोणी अक्रमण केले तर त्यावेळी काय करावे, याची काही उपाययोजना सामान्य राजकीय व्यवस्थेत आहे काय? याचेही परीक्षण व्हायला पाहिजे. तत्वत: कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात गोळीबार ही पध्दती अथवा उपाय अत्यंत महत्वाचा आहे.

गोळीबारातील एक महत्वाचा मुद्दा असा की, सार्वजनिक सुरक्षितेच्या दृष्टिकोनातून गोळीबार करावयाचा झाल्या कोणते संकेत पाळावेत याची स्पष्ट जाणीव गोळीबार करणाऱ्या अधिकाऱ्याला असावीच लागते. दुसरी गोष्ट अशी की, गोळीबार सरळ जमावावरच करावा की हवेत गोळीबार केल्यास जमावालही लक्षात येईल की पोलिस आता बळाचा वापर करणार असून, गोळीबाराची ही पूर्वसुचना आहे. या सर्व सूचनेनंतरही जमाव पांगला नाही तर समजावे की जमावात निर्भीड व निधडया

छातीची लोक आहेत. अथवा छुपे समाजकंटक आहेत. दंगलीच्या कारणावरून हे देखील हेरता येते. जमाव जर तसूभरदेखील बाजूस जायला तयार नसेल तर गोळीबाराशिवाय दुसरा पर्यायच पोलिसांकडे नसतो. बिघडलेली परिस्थिती आटोक्यात आणयासाठी हा एक शेवटचा आणि उत्तम उपाय आहे, असे अनेकांचे मत आहे.

### ८) अंतर्गत सुरक्षितात (Internal Security):–

कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अंतर्गत सुरक्षिता आसावी लागते. सुरक्षितेमध्ये 'गुप्ताता' ही एक महत्वाची बाब आहे. अंतर्गत सुरक्षितता हे स्वातं०यपूर्व काळात ब्रिटिशांचे कार्य होते. आपण आता सार्वभौम राष्ट्रात आहोत. अंतर्गत सुरक्षितता राखणे हे आपले कर्तव्य आहे. जिल्हा प्रशासनावर याची फार मोठी जबाबदारी येते. सीमेवर युध्द असेल, नैसर्गिक आपत्ती असेल, अथवा दुष्काळाची परिस्थीती असेत अशा सर्व प्रसंगी त्या संकटांना तोंड द्यायचे झाल्यास अंतर्गत सुरक्षितता असली पाहिजे. अतंर्गत सुरक्षितात प्रस्थापित करण्यामध्ये दंडाधिकारी, पोलिस, इतर प्रशासकीय अधिकारी या सर्वाचे समन्वय व सहकार्यांचे सबंध असावे लागतात. भक्कम अशी संसूचनाची व्यवस्था उभी केली पाहिजे. अंतर्गत सुरक्षिततेसाठी कायद्याचे अधिराज्य असले पाहिजे. संसूचनाच्या व्यवस्थेबरोबर त्या व्यवस्थेमध्ये नागरिकांचा सहभाग असला पाहिजे. आपापल्या जिल्हयातील सार्वजनिक महत्वाच्या वास्तू व वस्तूंचे संरक्षण करण्याच्या विचारास प्राधान्य दिले पाहिजे. त्यांना धक्का पोहोचला की सार्वजनिक शांतता भंग पावते. अनेकांचा रोष ओढवतो. राष्ट्रीय स्मारकाचा दर्जा प्राप्त असलेल्या वास्तूला अथवा वस्तूला क्षती पोहोचता कामा नये. ही अत्यंत महत्वाची बाब अंतर्गत सुरक्षिततेसंबधी सांगितेलली आहे. आपत्कालीन परिस्थितीत ज्या लोकांना भयानक अशा संकटाने घेललेले आहे त्यातून त्यांची मुक्तता किंवा सुटका करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासनाने ताबडतोब करायला हवा. जेणेकरून अंतर्गत सुरक्षितता अबाधित राहते आणि कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित होऊ शकते.

कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये **श्री.एस.एस.खेरा**यांनी स्वतंत्रपणे जी स्वयंसेवी संघटनांचा उल्लेख केलेला नसला तरी त्यांचे महत्व त्यांनी विशद केले आहे. अलीकडे अशा संघटनांचे प्रस्थ बरेच वाढले आहे. काही संघटना समाजउपयोगी कार्य करून शांततेने जीवन जगण्याच्या मानवी व्यवहाराला हातभार लावतात. पोलीस, लष्कर आणि सामान्य नागरिक अशी तिन्ही शक्तिस्थाने आहेत, ज्यांच्या शक्तीने कायदा आणि सुव्यवस्था अभंग आणि अखंड ठेवता येते. वास्तविक पाहता श्री.खेरा हे प्रशासनाचे विचारवंतच मानावे लागतात. कारण भारतात पहिल्यांदाच जिल्हा प्रशासनाचा इतका बारकाईने अभ्यास करून जिल्हा प्रशासनाची तत्वे, पध्दती अशा बाबीसंबंधी सिध्दांत रूपाने मांडणी केली आहे. श्री.खेरा हे भारताचे कॅबिनेट सचिव राहिले. देशाच्या प्रशासनातील सर्वोच्च व सवैश्रेष्ठ पदांवर कार्य करणारे (१५-४-१९६२ ते १८-११-१९६४) ते अत्यंत कुशल व विचारवंत प्रशासक होते

**दिवाणी आणि फौजदारी न्यायिक**

**दिवाणी खटले - उच्च न्यायालयाचे दिवाणी अपीलाचे अधिकारक्षेत्र पुढीलप्रमाणे**

- करारात ठरलेली रक्कम ही अधिक असेल तर कायदा आणि तथ्य या दोन्ही प्रश्नांबाबत जिल्हा न्यायालये, अतिरिक्त जिल्हा न्यायालये आणि इतर दुय्यम न्यायालयांनी दिलेल्या आदेश आणि निकालाविरोधात थेट उच्च न्यायालयामध्ये प्रथम याचिका दाखल करता येते.
- केवळ कायद्याचा प्रश्न (तथ्याचा प्रश्न नव्हे) जिल्हा किंवा इतर दुय्यम न्यालयांच्या आदेश वा निकालामध्ये अंतभूत असेल तर उच्च न्यायालयात दुसरे अपील करता येते.

- कलकत्ता, मुंबई आणि मद्रास उच्च न्यायालयांमध्ये न्यायालयांतर्गत अपीलाची तरतुद केलेली आहे. उच्च न्यायालयाचा जेव्हा एखादा न्यायाधीश खटल्याचा (प्रारंभिक वा अपीलाच्या अधिकार क्षेत्रााखालील) निवाडा देतो तेव्हा त्या निण्रयाविरोधात त्याच न्यायालयातील विभागीय खंडपीठाकडे अपील करता येते.

- प्रशासकीय किंवा इतर न्यायाधिकरणांनी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात त्या राज्यातील उच्च न्यायालयाच्या विभागीय खंडपीठाकडे ;कपअपेपवद इमदबीद्ध अपील करता येते. १९९७ साली सर्वोच्च न्यायालयाने न्यायाधिकरणांना उच्च न्यायालयाच्या घटनात्मक आदेश देण्याच्या ;तपजद्ध अधिकार क्षेत्राखाली आणले. त्यामुळे न्यायाधिकरणाच्या निर्णयाविरोधात सुरूवातीला संबंधित उच्च न्यायालयाकडे न जाता थेटपणे सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागता येत नाही.

(अ) **फौजदारी खटले - उच्च न्यायालयाचे फौजदारी अपीलाचे अधिकारक्षेत्र पुढीलप्रमाणे -**

- सात वर्षापेक्षा अधिक काळाच्या कारावायाची शिक्षा सत्र न्यायालय किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेली असल्यास त्या विरोधात उच्च न्यायालयाकडे अपील करता येते. सत्र न्यायालयाने किंवा अतिरिक्त सत्र न्यायालयाने फाशीची शिक्षा (देहदंडाची) दिलेली असेल तर त्या दोषी व्यक्तीने अपील केले किंवा नाही केले तरी शिक्षेची अमंलबजावणी होण्यापूर्वी तिची निश्चिती उच्च न्यायालयाकडून करण्यात येते.

- फौजदारी कायदे संहितेमध्ये (१९७३) नमूद केलेल्या काही विशिष्ट खटल्यांमध्ये सहाय्यक सत्र न्यायाधीश, महानगीय दंडाधिकारी किंवा इतर दंडाधिकारी (न्यायीक) यांनी दिलेलया निवाडयाविरोधात उच्च न्यायालयाकडे अपील करता येते.

**पर्यवेक्षणाचे अधिकारक्षेत्र -** उच्च न्यायालयाच्या भौगोलिक अधिकारक्षेत्रामध्ये (अपवाद केवळ लष्करी न्यायालये किंवा न्यायाधिकरण) येणाऱ्या सर्व न्यायालयांचे आणि न्यायाधिकरणांच्या कार्यावर पर्यवेक्षण करण्याचा अधिकार संबंधित उच्च न्यायालयाला आहे. हा अधिकार पुढीलप्रमाणे

- प्रत्यागमनासाठी आवाहन करणे.
- सर्वसाधारण नियमावली तयार करणे आणि जारी करणे; त्यांचे व्यवहार आणि कार्यपध्दतीबाबत प्रकार नमूद करणे.

- पुस्तके, नोंदी आणि हिशोब कोणत्या प्रकारे ठेवले जावेत याचे प्रारूप सांगणे.
- कनिष्ठ न्यायालयाचे कायदेशीर प्रॅक्टीशनर, अधिकारी, कारकून आणि अंमलदार यांचे वेतन निश्चित करणे.

उच्च न्यायालयाचा पर्यवेक्षणाचा अधिकार हा केवळ प्रशासकीय नसून तो न्यायिक स्वरूपाचा देखील आहे.

**दुय्यम न्यायालयांवर नियंत्रण - दुय्यम न्यायालयांवरील उच्च न्यायालयाचे प्रशासकीय नियंत्रण आणि**

**इतर अधिकार पुढीलप्रमाणे -**

- राज्याच्या न्यायिक सेवेकरिता एखाद्या व्यक्तीची (जिल्हा न्यायाधीशांव्यतिरिक्त) नियुक्ती किंवा जिल्हा न्यायाधीशांची नियुक्ती, बदली आणि बढती याबाबत राज्यपाल उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करतो.

- राज्याच्या न्यायिक सेवेतील सदस्यांची बदली, बढती, रजा मंजुरी, नियुक्ती आणि शिस्त इ.बाबी हाताळणे.

- कनिष्ठ न्यायालयामध्ये अनिर्णित असणाऱ्या खटल्यामध्ये कायद्याचा समक्ष मुद्दा निहीत असेल आणि त्याबाबत घटनेचा अन्वयार्थ लावायचा असेल तर तो खटला उच्च न्यायालय काढून घेते. तो खटला उच्च न्यायालय स्वत: निकालात काढू शकते किंवा कायद्याचा प्रश्न निश्चित करून निवाडयासह तो खटला दुय्यम न्यायालयाकडे परत पाठवू शकते.

- सर्वोच्च न्यायालयाने घोषित केलेला कायदा भारतातील सर्व न्यायालयांवर बंधनकारक असतो, त्याप्रमाणेच उच्च न्यायालयाचा कायदा तिच्या भौगोलिक कार्यक्षेत्रातील दुय्यम न्यायालयांच्या कार्यावर बंधनकारक असतो.

**अभिलेखाचे न्यायालय - अभिलेखाचे न्यायालय म्हणून उच्च न्यायालयाला दोन अधिकार असतात.**

- उच्च न्यायालयाचे कायदे, कार्यपध्दतीविषयक नियम आणि न्यायनिवाडे यांची कायमस्वरूपी नोंद ठेवली जाते. या अभिलेखांना पुराव्यात्मक मूल्य असून कनिष्ठ न्यायालयांमध्ये सादर केल्यास त्याबाबत आक्षेप घेतला जात नाही. त्यांना कायदेशीर पूर्वदाखला आणि कायदेशीर संदर्भ म्हणून मान्यता मिळालेली आहे.

- न्यायालयाच्या अवमानासाठी साधा कारावास किंवा दंड किंवा दोन्ही प्रकारच्या शिक्षा देण्याचा आधिकार आहे. अभिलेखाचे न्यायालय म्हणून उच्च न्यायालय स्वत:चे निणर्य , आदेश आणि न्यायनिवाडे यांचे पुनर्विलोकन करू शकते. राज्यघटनेने उच्च न्यायालयांना पुनर्विलोकनाचा विशिष्ट अधिकार दिलेला नाही.

**न्यायालयीन पुनर्विलोकनाचा अधिकार -** उच्च न्यायालयाचा पुनर्विलोकनाचा अधिकार म्हणजे केंद्र आणि राज्य सरकार या दोहोंनी दिलेले कार्यकारी आदेश आणि कायद्यांची घटनात्मकता तपासण्याचा अधिकार होय. याबाबीची तपासणी करत

असताना, त्या बाबी जर राज्यघटनेचे उल्लंघन करणाऱ्या आढळल्या तर उच्च न्यायालय त्या अवैध, अघटनात्मक आणि बेकायदेशीर घोषित करू शकते. परिणामस्वरूप, त्यांची अंमलबजावणी सरकार करू शकत नाही. राज्यघटनेमध्ये 'न्यायालयीन पुनर्विलोकन' असा ठराविक शब्द योजलेला नसला तरी कलम १३, कलम ३२ आणि कलम २२६ नुसार उच्च न्यायालयला स्पष्टपणे पुनर्विलोकनाचा अधिकार दिलेला आहे. पिवधिमंडळीय कायदे आणि कार्यकारी आदेशांच्या घटनात्मकतेला पुढील तीन आधारांवर उच्च न्यायालयामध्ये आव्हान दिले जाऊ शकते.

- मूलभूत हक्कांची (भाग ३) पायमल्ली झाली असल्यास,
- असा कायदा किंवा आदेश देण्याची अधिसत्ता नसतानाही तो केलेला वा दिलेला असल्सास, आणि
- ते राज्यघटनेतील तरतुर्दीशी विसंगत असतील तर.

१९७६ सालच्या ४२ व्या घटनादुरूस्तीने उच्च न्यायालयांच्या पुनर्विलोकनाच्या अधिकारांचा संकोच करण्यात आला होता. कोणत्याही केंद्रीय कायद्याचे पुनर्विलोकन करण्यापासून उच्च न्यायालयांना मज्जाव करण्यात आला होता. तथापि, १९७७ सालच्या ४३ व्या घटना दुरूस्तीने मूळस्थिती कायम केली.

**पूर्वेकडील राज्यांसाठी नवीन उच्च न्यायालय**

पूर्वेकडील मणिपूर, मेघालय व त्रिपुरा या राज्यांमध्ये उच्च न्यायालयाची स्वतंत्रपणे स्थापना करण्यात आली. यासाठी आवश्यक अरणारे विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांनी १६ मे २०१२ मध्ये पारित केले. जीम छवतजी.मेंजमउ ।तमें ;त्मबवतहंदपेंजपवदद्ध ंदक वजीमत त्मसंजमक र्सेँ ; ।उमदकउमदजद्ध ठपसस – २०१२ या नावाने हे विधेयक लोकसभेमध्ये ११ मे रोजी आणि राज्यसभेमध्ये १६ मे २०१२ रोजी प्रसिध्द झाले. या विधेयकानुसार उच्च न्यायालयाची स्थापना क्रमशा इंफाळ, शिलींग आणि आगरतळा या राजधानीच्या ठिकाणी करण्यात आली. याआधी पूर्वेकडील राज्यांसाठी केवळ आसाममधील गुवाहाटी येथेच उच्च न्यायालय स्थापित होते. गुवाहाटी उच्च न्यायालयाची खंडपीठे कोहिता, ऐजॉल आणि इटानगर येथे आहेत. या विधेयकाला राष्टपर्तीनी ४ जून २०१३ रोजी संमती दिल्याने भारतातील उच्च न्यायालयांची एकूण संख्या २१ वरून २४ झाली. या व्यतिरिक्त हरयाणा आणि गोवा या दोन राज्यांनीही स्वतंत्र उच्च न्यायालयाची मागणी केलेली आहे.

## ६.४ लोकअदालत (लोकन्यायिक)

**लोक न्यायालयाची रचना- कलम १९**

या अधिनियमातील कलम १९ अन्वये राज्य अधिसत्ता आणि जिल्हा अधिसत्ता, सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती, उच्च न्यायालय विधी सेवा समिती आणि तालुका विधी सेवा समिती, त्यांना योग्य वाटेल अशा कालावधीकरीता आणि ठिकाणी लोक न्यायालय गठीत करू शकतात. प्रत्येक लोक न्यायायलामध्ये (अ) सेवारत व

munotes.in

सेवानिवृत्त न्यायालयीन अधिकारी, (ब) नमूद केले असेल त्याप्रमाणे 'तर व्यक्ती; असतात.

सर्वोच्च न्यायालय विधी समितीव्दारे आयोजित केलेल्या लोक न्यायालयामधील 'इतर व्यक्तींचा' अनुभव आणि पात्रता केंद्रशासन भारताच्य सरन्यायाधीशांशी सल्लमसलत करून नमूद करेल. सध्या राष्ट्रीय विधी सेवा अधिसत्ता नियमातील (१९९५) नियम १३ मध्ये अशी पात्रता नमूद केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे

अ) विधी व्यवसायाचा सदस्य;वा

ब) विधी सेवा योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये विशेष स्वारस्य असलेली ख्यातनाम व्यक्ती; वा

क) अनुसचित जाती, अनूसुचित जमाती, स्त्रिया, बालके, ग्रामीण आणि शहरी कामगार यांच्यासह दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी झटणारा/री ख्यातनाम सामाजिक कार्यकता/कार्यकर्ती.

या कलमातील खंड 'ब' मध्ये उल्लेख केलेल्या 'इतर व्यक्तीचा' अनुभव आणि पात्रता ही राज्यशासन उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाशी सल्ला मसलत करून नमूद करेल.

### ६.४.१ प्रलंबित प्रकरणांची दखल आणि निर्धारण-कलम २०

**अ) अर्जाव्दारे**-१) लोक न्यायालयाकडे प्रकरण सोपविण्यात यावे, याबाबत संबंधित प्रकरणातील सर्व पक्षकारांची सहमती असणे.२) एखाद्या पक्षकाराने न्यायालयाकडे अर्ज करून संबंधित प्रकरण लोक न्यायालयाकडे सुपूर्द करण्याविषयी विनंती केली आणि निराकरणाच्या शक्यतेबाबत न्यायालय सकृत दर्शनी समाधीन असेल;

**ब) Suo Moto**. लोक न्यायालयाने दखल घेण्याइतपत एखादा विषय अनुरूप असल्याबाबत न्यायालय समाधीन असेल तर, अशोवेळी न्यायालय सर्व पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी देत संबधित प्रकरण लोक न्यायालयाकडे सुपूर्द करते. लोक न्यायालय गठीत करणारी अधिसत्त या समिती विवादातील कोणत्याही पक्षकराच्या अर्जावरून संबंधित विवाद लोक न्यायालयाकडे सुपूर्द करू शकते.

- लोक न्यायालय तिच्याकडे संदर्भित केलेली प्रकरणे जलदगीतने निकालात काढण्याची कार्यवाही करेल.

- विधी, न्याय, समता आणि या तत्वांनी प्रेरित होऊन लोक न्यायालयाने काम करावे.

- पक्षकारांमये समझोता/तडजोड वा निपटारा या टप्प्यावर पोहोचण्यासाठी प्रयत्न करणे.

munotes.in

➢ कोणतीही तडजोड वा निपटारा/निराकरणझाले नाही तर प्रकरण मूळ न्यायालयाकडे परत पाठविले जाते. त्यानंतर संबंधित प्रकरणाची कार्यवाही लोक न्यायालयाकडे सुपूर्द केलेल्या टप्प्यापासून पूढे सुरु होते.

### ६.४.2 निवाडा जाहीर करणे- कलम २१

लोक न्यायालयाचा प्रत्येक निवाडा हा दिवाणी न्यायालयाचा आदेश मानला जाईल.

➢ प्रत्येक निवाडयावर विवादातील सर्व पक्षकार आणि लोक न्यायालयाच्या पॅनेल मंडळ मधील सर्वांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.
➢ प्रत्येक निवाडा हा न्यायालयीन अभिलेखाचा भाग बनतो.
➢ प्रत्येक निवाडा हा वर्गीकृत आणि सुबोध असावा
➢ प्रत्येक निवाउा हा प्रोदेशिक भाष वा इंग्रजीमध्ये असावा.
➢ निवाडयाची प्रमाणकृत प्रत सर्व पक्षकारांना मोफत देण्यात यावी.
➢ लोक न्यायालयाने दिलेला प्रत्येक निवाडा हा अंतिम आणि सर्व पक्षकारांवर बंधनकारक असावा आणि त्या निवाडयाच्या विरोधात कोणत्याही न्यायालात अपील करता येत नाही.
➢ न्यायालयापुढील प्रलंबित प्रकरणाचे लोक न्यायालयाने निराकरण केले तर 'न्यायालय शुल्क अधिनियम, १९७० अन्वये जमा करण्यात आलेले कोणत्याही न्यायालयाचे शुल्क परत करण्यात येते.

### ६.४.3लोक न्यायालयाचे अधिकार (कलम २२)

१) खटला चालविताना, पुढील विषयासंदर्भात लोक न्यायालयाला दिवाणी प्रक्रिया संहिता (१९०८) अंतर्गत दिवाणी न्यायालयाप्रमाणे अधिकार असतात-

अ) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठविणे, उपस्थित भाग पाडणे आणि शपथेवर तिची/त्याची तपासणी करणे.

ब) कोणत्याही सार्वजनिक अभिलेख वा दस्तऐवज वा कोणत्याही न्यायालयाकडून प्रत प्राप्त करणे.

क) प्रतिज्ञापत्रावर पुरावे प्राप्त करणे.

ड) कोणतेही सार्वजनिक अभिलेख वा दस्तऐवज वा कोणत्याही न्यायालयाकडून प्रत प्राप्त करणे.

इ) विहित केलेला असा इतर विषय

२) तिच्यापूढे येणाऱ्या कोणत्याही विवादाचे निराकरण होण्यासाठी प्रत्येक लोक न्यायालय तिची स्वत:ची कार्यपध्दती नमूद करू शकते.

३) भारतीय दंड संहितेतील कलम १९९३,२१९ आणि २२८ च्या अर्थातंर्गत लोक न्यायालयापूढील सर्व कार्यवाही ;च्तवबममकपदहेद्ध ही न्यायालयीन कार्यवाही मानली जाते.

४) फैजदार प्रक्रिया संहितेतील कलम १९५ आणि २६ व्या प्रकरणानुसार प्रत्येक लोक न्यायालयाला दिवाणी न्यायालय मानले जाईल.

### ६.४.4स्थायी लोक न्यायालय

२००२ सालच्या दुरुस्ती अधिनियमान्वये प्रकरण ६ 'अ' चासमावेश करून 'स्थायी लोक न्यायालयाची' संकल्पना परिचित करण्यात आली. सार्वजनिक उपयुक्त सेवांच्या ;च्नइसपब न्जपसपजल ैमतअपबमे. च्न्द्ध संबंधातील विषयाचे निर्धारण करण्यासाठी केंद्र वा राज्य अधिसत्ता अधिसूचनेव्दारा कोणत्याही ठिकाणी 'स्थायी लोक न्यायालयाची' स्थापना करू शकतात.

सार्वजनिक उपयुक्त सेवांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो -

अ) परिवहन सेवा:

ब) डाक, तार वा दूरध्वनी सेवा:

क) जनतेला वीज, प्रकाश आणि पाणी पुरवठा करणे:

ड) सर्वजनिक ब्वदेमतअंदबल किंवा आरोग्यरक्षणाची व्यवस्था

इ) विमा सेवा आणि केंद्र वा राज्य शासनाने अधिसूचित केलेलया अशा इतर सेवा.

या अधिनियामातील कलम २२ब(१) मध्ये न्यायालयाला असलेली सर्व अधिकार हे स्थायी लोक न्यायालयालादेखील असतात

स्थायी लोक न्यायालयाची संघटनात्मक संरचना

या अधिनियमातील कलम २२ ब (२) अन्वये स्थायी लोक न्यायालयाची रचना पुढीलप्रमाणे नमूद केलेली आहे.-

अध्यक्ष - एखादी व्यक्ती जिल्हा न्यायाधीश वा अप्पर जिल्हा न्यायाधीश असेल वा राहिलेली असेल वा जिल्हा न्यायाधीशापेक्षा वरिष्ठ दर्जाचे न्यायालयीन पद धारण केलेली असेल तर ती व्यक्ती स्थायी लोक न्यायालयाची अध्यक्ष असते.

सदस्य - केंद्रीय अधिसत्तेच्या शिफारशीवरून केंद्र सरकार आणि राज्य अधिसत्तेच्या शिफारशीवरून राज्य सरकार सार्वजनिक उपयुक्त सेवांमध्ये पुरेसा अनुभव असलेल्या दोन अन्य व्यक्तींना सदस्य म्हणून नामनिर्देशन करते.

स्थायी लोक न्यायालयाने प्रलंबित प्रकरणांची दखल घेणे. (कलम २२ (क))

१) कोणत्याही न्यायालयापुऐ प्रलंबित नसलेल्या परंतु सार्वजनिक उपयुक्त सेवांबाबत असलेल्या विवादाच्या निराकरणासाठी कोणताही पक्षकार स्थायी लोक न्यालयालयाकडे करू शकतो.

२) संयुक्ति नसणाऱ्या गुन्हयाबाबतचे विवाद हाताळणे स्थायी लोक न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

३) १० लाखापेक्षा अधिक मूल्य असलेल्या मालमत्तेबाबतच्या विवदाची प्रकरणे या न्यायालयाला हाताहता येत नाहीत.

munotes.in

४) विवदाचा निपटारा करण्यासाठी एकदा अर्ज स्थायी लोक न्यायालयाकडे सुपूर्द केल्यानंतर त्याच विषयाबाबत पक्षकार कोणत्याही न्यायालयाकडे अर्ज करून दाद मागू शकत नाही.

स्थायी लोक न्यायालयाी कार्यपध्दती (कलम २२ 'क' आणि 'ड')- एखाद्या विवादाचे निराकरण करण्यासाठी स्थायी लाक न्यायालय जेव्हा अर्ज स्वीकारते तव्हा-

१) प्रत्येक पक्षकारांनी लेखी स्वरूपात सर्व तथ्ये, विवादाचे स्वरूप, समर्थनार्थ व विरोधी मुद्दे स्थायी न्यायालयाला सादर करण्याचे ती निर्देश देईल. याशिवाय कोणत्याही टप्पयावर पक्षकारांना अतिरिक्त निवेदन दाखल करण्यास सांगितले जाऊ शकते.

२) तथ्यांच्या समर्थनार्थ वा विवदाला अधार म्हणून पक्षकार कोणतेही दस्तऐवज वा असा इतर पुरावा सादर करू शकतात.

३) लेखी निवेदन, दस्तऐवज वा असा इतर पुरावा दखल केल्यानंतर त्यांची एक प्रत दुसऱ्या पक्षकाराला सादर करावी लागते.

## ६.५ स्वाध्याय

1. दिवाणी आणि फौजदारी न्यायिक यंत्रणा स्पष्ट करा
2. लोकन्यालयाची रचना स्पस्ट करून लोकन्यालयाचे अधिकार सांगा?
3. टिपा लिहा :

   १ स्थायी लोक न्यायालय

   २ लोक न्यायालय

   ३ अन्वेषण

   ४ गुन्हे

## ६.६ संधर्भ सूची


1. गाडगीळ,वि. न. भारतीय न्यायव्यवस्था, पुणे,१९६८.
2. चौधरी, दत्तात्रय हरी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८,मुंबई,१९६३.
3. राणे,द. म. बोरोल,य. म. मुंबई ग्रामपंचायती विधान, १९५८, पुणे, १९६०.
4. बंगके. आर., जिल्हाप्रशासन, विद्याबुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
5. जाधवतुकाराम, शिरापूरकरमहेश , भारतीय संविधान व भारतीय राजकारण, *Unique academy*
6. महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण ,मुंबई


❖❖❖❖

munotes.in

# ७

# ग्रामीण विकासाचे नियोजन- I

**पाठाची रचना**

७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ नियोजन संकल्पना

७.३ नियोजनाची पुढील वैशिष्ट्ये

७.४ नियोजनाची महत्त्व/आवश्यकता.

७.५ भारतातील नियोजन प्रक्रियेचे बदलते स्वरूप

७.६ भारतातील नियोजन प्रकार

७.७ जिल्हा नियोजन यंत्रणा

७.८ जिल्हा नियोजन यंत्रणेची रचना व कार्ये.

७.९ सारांश

७.१० स्वाध्याय

७.११ संदर्भ सूची

## ७.० उद्दिष्टे

- नियोजनाची संकल्पना अभ्यासता येईल.
- नियोजनाची आवश्यकता लक्षात घेता येईल.
- भारतातील नियोजन प्रक्रियेचे बदलते स्वरूप अभ्यासता येईल.
- बहुस्तरीय नियोजन संकल्पना समजावून घेता येईल.
- जिल्हा नियोजन यंत्रणेची कार्यपद्धती समजावून घेता येईल.
- जिल्हा नियोजन यंत्रणेतील १९९२ नंतरचे बदल समजावून घेता येतील.

munotes.in

## ७.१ प्रस्तावना

भारत एक विकसनशील राष्ट्र आहे. भारतात नैसर्गिक व मानवीय संसाधन मोठ्या प्रमाणात आहेत. तरी आपले राष्ट्रीय उत्पादन व उपभोग कमी आहे. आजही आपल्या देशाचे दरडोई उत्पन्न विकसित देशातील सेवा सुविधांच्या तुलनेत फारच कमी आहे. त्यामुळे देशाचा संतुलित विकास होऊ शकला नाही. देशात बेकारी, अर्धबेकारीची स्थिती कायम आहे. आज जगामध्ये आपली प्रगती समाधानकारक असली तरीm आपण सर्व लोकांना गरजेनुसार पुरवठाकरू शकत नाही. दारिद्रय, अज्ञान,रूढीपरंपरा आणि संपत्तीचे असमान वितरण आजही दिसून येते. या सर्व समस्यांबघितल्यावर असे लक्षात येतेकी, विकासाकरिता एका समन्वित पद्धतीचीआवश्यकताआहे. ज्यातून राष्ट्राला जलद आणि संतुलित विकास साधता आला पाहिजे, व मुख्य समस्या कमी व्हायलाहव्यात.

**नियोजनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी** - भारतात नियोजनासंबंधी विचार १९३४ साली प्रसिद्ध भारतीय इंजिनीअर व राजनीतिज्ञ सर एम. विश्वश्वरैय्याने **भारताचा आर्थिक विकास** या आपल्या पुस्तकात (A Planned Economy for India) याचा उल्लेख केला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेकरिता नियोजनाच्या आवश्यकतेवर भर देताना, ते म्हणाले भारताचा आर्थिक विकास फक्त नियोजित पद्धतीनेच शक्य आहे. १९३४-३५ मध्ये भारतीय अधिवेशनाच्या वार्षिकबैठकीत यावर मोकळी चर्चा झाली. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या राष्ट्रीय योजना समितीच्या बैठकीत आर्थिक नियोजनाला व्यावहारिक रूप देण्याचे कार्यक्रम आखण्यात आले. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या काळात हे प्रयत्न सफल होऊ शकले नाहीत.

भारताने १९५० साली स्वीकारलेल्या नियोजनाची सुरुवात, रशियात १९२५ सालीसुरू झालेल्या धर्तीवर आधारीत होती. सोव्हिएत रशियाने केंद्रात्मक नियोजनाचा स्वीकार करून कृषीक्षेत्र, संरक्षण, उद्योग आदी क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली होती. भारतात १५ मार्च १९५० साली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. भारतात केंद्रात्मक नियोजनाच्या मर्यादा लक्षात घेता विकेंद्रित किंवा बहुस्तरीय नियोजनाचा स्वीकार करण्यात आला. १९५१ साली पहिली पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. नियोजनाचा आराखडा तयार करताना व पंचवार्षिक योजना तयार करताना देशात उपलब्ध असलेली नैसर्गिक व मानवी साधनसंपत्ती लक्षात घेतली गेली.

## ७.२ नियोजन संकल्पना

आज २१व्या शतकात नियोजन हे सार्वत्रिक झाले आहे. अर्थशास्त्रज्ञांनी त्याविषयी व्यक्त केलेले विचार पुढीलप्रमाणे -

१) राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी केवळ बाजारयंत्रणेवर विसंबून नराहता विशिष्ट उद्दिष्टे ठरवून ती गाठण्यासाठी इष्ट त्या आर्थिक धोरणांचा आराखडा तयार करावयाचा व त्या आराखड्यानुसार विकास साधण्याचा प्रयत्न करावयाचा, याला **'नियोजन'** असे म्हणतात.

२) डॉ. हॅरिस यांच्या मते, **“नियोजन** म्हणजे उत्पन्न आणि किमतीच्या संदर्भात नियोजन अधिकाऱ्यांद्वारे निश्चित केलेल्या उदिष्टांसाठी साधनांचे वितरण करणे होय."

३) प्रा. रॉबिन्स यांच्या मते, “वास्तवात संपूर्ण आर्थिक जीवनच नियोजनाने युक्त असते.नियोजन करणे म्हणजे विशिष्ट उद्देशाने, अभिवचनाने कार्य करणे आणि निवड करणे होय. निवड हे आर्थिक क्रियांचे सार आहे."

४) एच.डी. डिकीनसन यांच्या मते, "आर्थिक नियोजन म्हणजे अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचे निर्णय घेणे होय. कशाचे आणि किती प्रमाणात उत्पादन करावयाचे, कसे, कोठे आणि केव्हा उत्पादन करावयाचे, उत्पादनाचे वितरण कोणामध्ये करावयाचे याबाबतचे सर्व निर्णय एखाद्या निश्चित सभेद्वारे संपूर्ण अर्थव्यवस्थेचे विचारपूर्वक आणि व्यापक सर्वेक्षण करून त्याच्या आधारे घेतले जातात.

५) भारतीय नियोजन मंडळाच्या मते,"आर्थिक नियोजन म्हणजे निश्चित केलेल्या सामाजिक उद्देशांच्या संदर्भात महत्तम हितासाठी साधनांची जुळवाजुळवी आणि वापर करण्याचा एक मार्ग आहे. नियोजन या संकल्पनेत दोन प्रमुख घटक आहेत.

i) ज्याच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करावयाचे आहेत अशा अपेक्षित उद्दिष्टांचा एक क्रम आणि

ii) उपलब्ध साधनांचे आणि त्याच्या वितरणाचेज्ञान.

वरील नियोजनांच्या व्याख्यांवरून नियोजनाची पुढील **वैशिष्ट्ये** सांगता येतील.

## ७.३ नियोजनाची पुढील वैशिष्ट्ये

**१) आर्थिक सर्वेक्षण (Economic survey) -** ज्या अर्थव्यवस्थेसाठी नियोजन केले जाते त्या संपूर्ण अर्थव्यवस्थेची पाहणी अथवा सर्वेक्षण करणे, देशातील एकूण जमीन व अन्य नैसर्गिक साधनसंपत्ती, राष्ट्रीय उत्पन्न-वाढीचा दर, लोकसंख्या व लोकसंख्यावाढीचा दर, शेती, उद्योग आदी क्षेत्रे व त्यांची अवस्था, वित्तसंस्था, व्यापार, वाहतूक दळणवळण इत्यादी सर्वांगीण पाहणी केल्याखेरीज नियोजन अशक्य आहे.

**२) निर्धारित अधिकारी संस्था (DeterminateAuthority) -** नियोजन करणारी एक निश्चित

अधिकारी संस्था असणे आवश्यक आहे. जी मध्यवर्ती संस्था संपूर्ण देशाचे नियोजन करेल. भारतीय नियोजन मंडळ ही अशाच प्रकारची अधिकारी संस्था आहे.

**३) पूर्वनिश्चित उद्दिष्टे (Defined Social Ends) -** कोणत्याही अर्थव्यवस्थेचे किंवा देशाचे नियोजन करताना भारतीय नियोजन मंडळाने सांगितल्याप्रमाणे पूर्वनिश्चित उद्दिष्टे डोळ्यासमोर असल्याखेरीज नियोजन करता येत नाही. उद्दिष्ट स्पष्ट असली की ती गाठण्याचा सर्वात जवळचा मार्ग आखणे नियोजन मंडळाला शक्य होते. उदा. जलद आर्थिक विकास, बेकारी निर्मूलन, गरिबी हटाव ही काही उद्दिष्टे भारताबाबत सांगतायेतील.

munotes.in

**४) साधनसंपत्तीची जुळवाजुळव (OrganisingResources) -** आर्थिक सर्वेक्षणाच्या आधारे

निदर्शनास येणारी साधन-संपत्ती, दिलेल्या उद्दिष्टांसाठी जास्तीत जास्त काटकसरीने आणि कार्यक्षम पद्धतीने कशी वापरता येईल हे ठरविले जाते. वास्तव साधनसंपत्तीची जुळवाजुळव केली जाते. साधनसंपत्ती एकत्र आणण्यासाठी पैशाच्या स्वरूपातीलभांडवलाचा विचार केला जातो.

**५) अग्रक्रम ठरविणे (Concious Choice ofPriorities)** - उद्दिष्टे अथवा साध्ये अनंत असतात साधनसंपत्ती विचारात घेऊन कोणते साध्य हाती घ्यावयाचे हे जाणीवपूर्वक ठरविले जाते. उदा. भारतात एकदम सगळे आधुनिक उद्योग सुरू करणे शक्य नाही.म्हणून प्रथम मूलभूत, काही भांडवली व अन्य उद्योग, उपभोग्य वस्तूंचे उद्योग इत्यादी क्रमवारी ठरविणे हा नियोजनाचा भाग आहे.

**६) उत्पादनविषयक निर्णय घेणे (Decision ofProduction)** - अनियोजित अर्थव्यवस्थेत उत्पादन कशाचे, किती करावयाचे वगैरे निर्णय बाजारयंत्रणेच्या मदतीने वैयक्तिक उत्पादक घेतात. नियोजित अर्थव्यवस्थेत मात्र हे निर्णय मध्यवर्ती अधिकारी संस्था घेते. क्रमवारी पाहून कशाचे उत्पादन किती प्रमाणात व कोठे घ्यावयाचे हे ठरविले म्हणजे यंत्र-सामुग्री व थोडे श्रमिक वापरून तंत्राने की दोन्हीचा समन्वय साधून मधल्या तंत्राने करायचे याचा निर्णय घ्यावा लागतो.

**७) बाटणीचा विचार (Considering Distribution) -** उत्पादन कशाचे करावयाचे वत्याचप्रमाणे त्याचे वाटप कसे करावयाचे हे ठरविले जाते. अर्थात हे उत्पादन लोकांमध्ये कसे वाटावे हे योजनाकारांना ठरवावे लागते.

**८) समयबद्ध कार्यक्रम (Time-boundProgramme)** - ठरविलेल्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठीम्हणजे, त्यांची जास्तीतजास्त प्रमाणात पूर्तता होण्यासाठी साधनसंपत्तीपासून क्रमवारीने उत्पादन केले जाते. नियोजनकार प्रत्येक उद्दिष्टपूर्तीकरितानियोजनबद्ध कालखंड घेतात,

उदा. पाच वर्षे, दहा वर्षे म्हणजेच प्रत्येक कार्यक्रमाला समयबद्धता हवी. कालावधी निश्चित करणे हे नियोजनाचे शेवटचे वैशिष्ट्य आहे.

अशा त-हेने, संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करून विकासासाठी वाटचाल कशी करावयाची हे तपशीलवार आगाऊ ठरविणे हा नियोजनाचा अर्थ आहे.

**भारतातील नियोजन:**

भारतातील लोकशाही तत्त्वावर आधारित नियोजनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे -

१) भारतात लोकशाही नियोजनात खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र, सहकारी क्षेत्र अशी विविध क्षेत्र आढळतात. या सर्वांगीण क्षेत्रांचा विचार नियोजनात केला जातो.



munotes.in

२) उद्योगाची विविध क्षेत्रे असल्यामुळे उत्पादनाचे निर्णय विकेंद्रित पद्धतीने घेतले जातात.

३) बाजारातील काही वस्तू नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. बहुतांशी जीवनावश्यक वस्तूंची किंमत नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न नियोजनकार करतात.

४) जनतेचा सहभाग हा देशाच्या विकासात स्वातंत्र्यानंतर आवश्यक होता. तसेच दीर्घकाळपारतंत्र्यात राहिलेल्या लोकांच्या अपेक्षा स्वातंत्र्यानंतर वाढल्या होत्या. म्हणून लोकांचा विचार, त्यांच्या सूचना व जनतेचा सहभाग भारतीय नियोजनात लक्षात घेतला जातो.

५) भारत स्वतंत्र झाला तेव्हा भारताची आर्थिक स्थिती खूपच मागासलेली होती. वाढती लोकसंख्या, मागासलेली शेती, उत्पादनाची जुनाट तंत्रे, गरिबी, अज्ञान इत्यादी करिता नियोजनासारखा सातत्यपूर्ण इलाजच गुणकारी ठरेल, असे कोणालाही वाटेल.

## ७.४ नियोजनाची आवश्यकता / महत्त्व (Need of Planning)

जगातील सर्वच देशांना नियोजनाची आवश्यकता असते. जगातील देश गरीब असो किंवा श्रीमंत असो. भांडवलवादी असो किंवा समाजवादी किंवा मिश्र अर्थव्यवस्था असणारा किंवा अगदी खुली अर्थव्यवस्था असणारा असो. सद्यस्थितीत नियोजन ही प्रत्येक देशासाठी अत्यावश्यक गरज बनली आहे. आजचे युगच नियोजनाचे युग आहे. नियोजनाच्या आवश्यकतेचीकारणे पुढीलप्रमाणे आहेत.

**१) भांडवलवादी अर्थव्यवस्थेतील दोष दूर करणे -** आर्थिक विषमता, अमिकांचे शोषण, आर्थिक एकाधिकार, ग्राहकांचे शोषण इत्यादी भांडवलवादी अर्थव्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते. कारण नियोजनात उत्पादन व वितरण यावर सरकारचे नियंत्रण असते.

**२) संतुलित विकास** - विकसनशील अर्थव्यवस्थेत काही प्रदेश व उद्योगांचाच विकास होण्यास वाव असतो. ज्या प्रदेशात नफा मिळतो तेथेच गुंतवणूक केली जाते. इतर प्रदेशांचा त्यामुळे विकास होत नाही. त्यामुळे असंतुलित विकास होण्याची शक्यता असते.परंतु अशा प्रकारचे असंतुलन दूर करून नियोजनाद्वारे संतुलित विकास साधता येतो.

**३) साधनसंपत्तीचा योग्य वापर -** विकसनशील देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपूर व पर्याप्त वापर होत नाही. परिणामी जलद गतीने विकास (अर्थव्यवस्थेचा) होत नाही. विकसनशील अर्थव्यवस्थेच्या जलदगतीने विकास होण्याकरिता नियोजनाची आवश्यकता आहे.

**४) रोजगारात वाढ** - विकसनशील देशात बेकारीचे प्रमाण जास्त असते. नवनवीन उद्योगांची स्थापना करून रोजगारात वाढ करण्यासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

**५) आर्थिक स्थैर्य** - विकसनशील देशात रोजगार निर्मितीतून आर्थिक स्थैर्य साधण्याचा प्रयत्न केला जातो व रोजगाराची निर्मिती नियोजनाद्वारे केली जाते.

munotes.in

**६) लोकसंख्या वाढ** - विकसनशील देशात लोकसंख्या वाढीचा प्रश्न अत्यंत बिकट असतो.लोकसंख्या अतिरिक्त असल्याने वस्तू व सेवांचा सतत तुटवडा भासत असतो. मागणीआणि पुरवठ्यात सतत असंतुलन असते. तेव्हा विविध वस्तूंचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच त्यांच्या न्याय्य वितरणासाठी नियोजनाची आवश्यकता असते.

## ७.५ भारतातील नियोजन प्रक्रियेचे बदलते स्वरूप

सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्यासाठी नियोजनएकतंत्र आहे. या तंत्राचा यशस्वी वापर रशियात १९२७ पासून स्टॅलिनच्या राजवटीत केला होता. रशियात हुकूमशाही असल्याने रशियातील नियोजन पद्धत एकस्तरीय आणि केंद्रात्मक स्वरूपाची होती. रशियात केवळ केंद्रीय पातळीवर केल्या जाणाऱ्या या नियोजनास रशियात स्टॅलिनला विरोध झाला नाही. कारण रशियात साम्यवादी पक्षाची हुकूमशाही होती. अत्यंत मागास कृषीप्रधान आणि कमकुवत रशियाचे आधुनिक, उद्योगप्रधान लष्करी महासत्तेत रूपांतर करता आले. त्यामुळे नियोजनाची उपयुक्तता जगातील सर्वच देशांना समजू लागली. त्यानंतर महायुद्धामुळे मुक्तअर्थव्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला. बाजारपेठा मिळविण्यासाठी प्रत्येक देशात नियोजनाचा स्वीकारकरण्यात आला. म्हणून नियोजनाची संकल्पना २० व्या शतकात स्वीकारण्यात आली.

भारतात १९५०-६० या दशकात केंद्रात्मकस्वरूपाचे नियोजन होते. नियोजनाची यंत्रणा एकस्तरीय होती. १५ मार्च १९५० साली नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. पहिल्या दोन पंचवार्षिक योजना केवळ केंद्रीय पातळीवर तयार करण्यात आल्या होत्या. नंतर राज्यकर्त्यांच्या लक्षात आले की, नियोजन निर्णय प्रक्रियेत राज्यांचा सहभाग असावा. या उद्देशाने १२ ऑगस्ट १९५० रोजी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना करण्यात आली. देशाच्या विविध राज्यांच्या विकासविषयक गरजा वेगवेगळ्या आहेत. या जाणीवेतूनच तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतकेंद्राची योजना (Central Plan)आणि राज्यांच्या योजना (State Plans)अशी विभागणीकरण्यात आली. प्रत्येक राज्याच्या गरजा विभिन्न असल्याने राज्यांच्या गरजा राज्यांनीच तयार कराव्यात असे ठरले गेले. त्यानुसार राज्य सरकारांना नियोजनाची यंत्रणा स्थापन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार १९६४ साली राज्यस्तरीय नियोजन यंत्रणा स्थापन करण्यात आल्याआणि एकस्तरीय नियोजनाच्या जागी द्विस्तरीय नियोजनाची सुरुवात झाली. पुढे या संकल्पनेतूनच बहुस्तरीय नियोजनाची गरज भासल्याने विकेंद्रित किंवा बहुस्तरीय नियोजन प्रक्रियेची सुरुवात केली.

## ७.६ भारतातील नियोजनप्रकार

**अ) विकेंद्रित नियोजन बहुस्तरीय नियोजनब)केंद्रितखंडस्तरीय नियोजन.**

### अ) विकेंद्रित नियोजन बहुस्तरीय नियोजन

नियोजन एकस्तरीय आणि बहुस्तरीय असू शकते. त्यावेळी नियोजनविषयक निर्णय घेणाऱ्या अधिकाराचे केंद्रीकरण करण्यात आले असेल, तर त्यास एकस्तरीय किंवा एककेंद्रित नियोजन असे म्हणतात. याउलट, ज्यावेळी नियोजनविषयक निर्णय घेणाऱ्या

अधिकाराचेविकेंद्रिकरण करण्यात आले असेल आणि एकापेक्षा अधिक स्तरावर नियोजन प्रक्रियेसंबंधीचे निर्णय घेतले जात असतील त्या प्रक्रियेस बहुस्तरीय/बहुकेंद्रितनियोजन असे म्हणतात. भारतात केंद्रस्तरीय, आंतरराज्यस्तरीय, राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय नियोजन करण्यात आले आहे. म्हणजेच एकाहून अधिक स्तरावर केले जाणारे नियोजन म्हणजे बहुस्तरीय नियोजन होय.

**बहुस्तरीय नियोजनाच्या व्याख्या**

१) "जे नियोजन एकापेक्षा अधिक स्तरावर केले जाते त्यास बहुस्तरीय नियोजन असे म्हणतात."

२) "ज्या नियोजन प्रक्रियेत निर्णय आणि अंमलबजावणीविषयक अधिकार प्रत्येक स्तरातील यंत्रणेस असतात त्या नियोजन प्रक्रियेस बहुस्तरीय नियोजन असे म्हणतात."

३) बहुस्तरीय नियोजन हे संवादात्मक स्वरूपाचे असते. तर केंद्रात्मक नियोजन हे आदेशात्मक स्वरूपाचे असते.

**भारतीय बहुस्तरीय नियोजनाचे वैशिष्ट्ये :**

बहुस्तरीय नियोजन म्हणजे एकापेक्षा अधिक स्तरावर केले जाणारे नियोजन होय. भारतात नियोजनाची निर्णयविषयक प्रक्रिया राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा अशा स्तरांवर नियोजन आणि विकासविषयक कार्य केले जाते. भारतीय नियोजनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील

**१) एकापेक्षा अधिक स्तरावर केले जाणारे नियोजन -** बहुस्तरीय नियोजनातील 'बहु' हा शब्द अनेक वचनी आहे म्हणजे भारतातील नियोजन फक्त केंद्रस्तरावर केले जात नाही. तर ते राज्य, जिल्हा स्तरावरदेखील केले जाते. केंद्र, राज्य आणि जिल्हा स्तरावरनियोजनाची स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात आहे.

**२) भारतीय पद्धतीचे नियोजन -** पाश्चात्त्य लोकशाहीवादी विचारसरणीनुसार नियोजन आणि हुकूमशाही या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतामध्ये नियोजन आणि लोकशाही या दोहोंमध्ये सुवर्णमध्य काढण्यात आलेला आहे. बहुस्तरीय नियोजनाद्वारे नियोजनाच्या प्रक्रियेत लोकशाही विकेंद्रीकरण राजकीय स्वरूपाचे आणि विकेंद्रात्मककिंवा बहुस्तरीय नियोजन आर्थिक स्वरूपाचे आहे.

**३) विकेंद्रित नियोजन -** मिश्र आणि विकेंद्रित नियोजनास बहुस्तरीय नियोजन म्हणतात. कारण या प्रक्रियेत नियोजनविषयक निर्णय घेण्याच्या अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यात आलेले असते. विविध स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या नियोजन यंत्रणेस आपापल्या नियोजन व विकास संबंधीचे निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आलेलाअसतो.

**४) सहभागात्मक नियोजन -** बहुस्तरीय नियोजनात प्रत्येक स्तरावरील लोकांना नियोजनविषयक प्रक्रियेत सहभागी करून घेतले जाते. स्थानिक लोकांना

स्थानिकसमस्यांची माहिती असल्याने विकासाच्या दृष्टीनेकोणत्या विषयास प्राधान्य द्यावे याची जाणीव त्यांना असते व त्याचा वापर अधिक परिणामकारक नियोजनात केला जाऊ शकतो.

**५) क्षेत्रीय नियोजन** - क्षेत्रीय नियोजन ही बहुस्तरीय नियोजनाची एक मूलभूत संकल्पनाआहे.परिणामकारक नियोजनाकरिता हाती घेतल्या जाणाऱ्या क्षेत्रांचा भौगोलिक विस्तार मर्यादित असावा. नियोजन मंडळाने एका विकासगटाचे क्षेत्र ९००० चौ.कि.मी. पेक्षा अधिक नसावे, अशी शिफारस केली आहे. भारतात क्षेत्रीय नियोजनाची संकल्पना टप्प्याटप्प्याने विकसित होत गेली. नियोजनाचे क्षेत्र मर्यादित असेल, तर अधिकपरिणामकारक नियोजन करता येते.

**६) विचार विनिमयाद्वारे नियोजन -** बहुस्तरीय नियोजन राष्ट्रीय प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवर असलेल्या नेतृत्व व अन्य प्रभावी गटाशी विचारविनिमय करून चर्चेच्या माध्यमातून सोडविले जातात.

**बहुस्तरीय नियोजनाची गरज** :

भारतासारख्या खंडप्राय देशाकरिता बहुस्तरीय नियोजन केवळ आवश्यक आहे असे नाही तर ते इष्ट आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात निरनिराळ्या भौगोलिक प्रदेशाच्या समस्या व गरजा विविध आहेत. त्यामुळे केंद्रित किंवा एकस्तरीय नियोजन करून देशाच्या विकासाचे व प्रगतीचे प्रश्न सुटू शकत नाहीत त्यामुळे सिद्धांतिकदृष्ट्या तसेच व्यावहारिकदृष्ट्या बहुस्तरीय नियोजन आवश्यक आहे. बहुस्तरीय नियोजनासाठी आवश्यकता पुढीलप्रमाणे आहे.

**१) अधिकारांचे विकेंद्रीकरण -** भारताने लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केल्यानंतर सत्तेचे व अधिकारांचे विकेंद्रीकरण पंचायतराज संस्थांच्या मार्फत करण्यात आले असून आर्थिक व नियोजनात्मक बाबींकरिता बहुस्तरीय नियोजनाचे सूत्र स्वीकारले आहे. कारण आर्थिक लोकशाहीची संकल्पना बहुस्तरीय नियोजनाद्वारे साध्य करता येईल.

**२) माहिती गोळा करणे व तिचे विश्लेषण सुलभ –**नियोजन यशस्वीहोण्याकरिताअचूक माहिती उपलब्ध असावी लागते. त्याकरिता शासकीय यंत्रणा विविध प्रकारची माहिती वआकडेवारी गोळा करणे, त्या माहिती व आकडेवारीच्या आधारे नियोजनाची दिशा व उद्दिष्टे आणि कार्यक्रम निर्धारित केंले जातात. परंतु उपलब्ध असलेली माहिती जर चुकीची असेल, आकडेवारी फसवी असेल, तर त्यांच्या आधारे घेण्यात आलेले निर्णय देखील चुकीचे ठरतात. भारतासारख्या भौगोलिक विविधता असलेल्या देशात माहिती व आकडेवारी गोळा करणे अत्यंत कठीण व खर्चिक आहे. एवढे करूनही अचूक माहितीगोळा केली जाईल याची खात्री नसणे, दोन पंचवार्षिक योजनेत दिसून आले. १९६० नंतर विकेंद्रित नियोजनाचा स्वीकार करण्यात आला आणि स्थानिक लोकांच्या सहभागाने आवश्यक ती माहिती व आकडेवारी गोळा केली जाऊ लागली. त्यामुळे अधिक अचूक व कमी खर्चात माहिती व आकडेवारी उपलब्ध होऊ लागली.

munotes.in

**३) नियोजनाच्या प्रक्रियेत लोकांचा सहभाग** - पंचायत राज यंत्रणेस लोकशाही विकेंद्रीकरणअसे म्हटले जाते. विकास कार्यक्रमाची जबाबदारी गाव, विकासगट आणि जिल्हा पातळीवर स्थानिक नेतृत्वावर सोपविण्यात आली. तर स्थानिक नेतृत्वाला स्थानिकसमस्यांची व परिसराची अधिक अचूक माहिती असल्यामुळे त्या परिसराचा विकास कोणत्या पद्धतीने करण्यात यावा, कोणत्या कार्यक्रमांना अग्रक्रम देण्यात यावा व कोणत्या कार्यक्रमावर किती निधी खर्च करण्यात यावा ही निश्चित करण्याची क्षमतादेखीलत्यांच्याजवळ असते. यातूनच विकेंद्रित नियोजन हा विचार पुढे आला.

**४) स्थानिक साधनसामुग्रीचा पर्याप्त वापर -**

स्थानिकरीत्या उपलब्ध असलेल्या साधनसामुग्री आणि मनुष्यबळाची राष्ट्रीय पातळीवरील नियोजनकारापेक्षा स्थानिक नेतृत्वास अधिक चांगली माहिती असते. त्यांच्या ज्ञानाचा फायदा नियोजन प्रक्रियेत करून घेता येईल व साधनसंपत्तीचा अधिक कार्यक्षम उपयोग करून विकासाचा वेग वाढवता येईल.

**५) प्रादेशिक असमतोल कमी करणे** - भारतात विकासातील असमतोल ही गंभीर समस्या आहे. उदा, महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, केरळ ही विकसित राज्ये आहेत. तर बिहार, उत्तर प्रदेश, आसाम इत्यादी काही राज्ये मागासलेली आहेत. बहुस्तरीय नियोजनाच्यामाध्यमातून लोकशाही विकेंद्रीकरणाने प्रादेशिक असमतोल कमी करता येईल.

**ब)केंद्रित/खंडस्तरीय नियोजन.**

खंडस्तरीय नियोजन म्हणजे राष्ट्रीय विकासासाठी आवश्यक असलेले प्रकल्प व कार्यक्रम कोणते व ते राष्ट्राच्या कोणकोणत्या प्रदेशांत कसकसे कार्यवाहीत आणावयाचे, याचा आराखडाच होय. अशा नियोजनात विविध विकास प्रकल्पांच्या किंवा सामाजिक सुखसोयींच्या स्थाननिश्चितीस महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. ज्याचा सामाजिक व आर्थिक परिव्यय कमीत कमी असेल आणि ज्याच्या उभारणीतून त्या प्रदेशाच्या विकासास पुढे चालना मिळेल अशा तऱ्हेने कोणत्याही प्रकल्पाची स्थाननिश्चिती करावी असे मानले जाते. अशा स्थाननिश्चितीकरणासंबंधी बराच सैद्धांतिक अभ्यास होत असून '**केंद्र-स्थान सिद्धांत**' (सेंट्रल प्लेस थिअरी) आणि 'विकास-स्तभं सिद्धांत' (डेव्हलपमेंट पोल थिअरी) यांचा प्रकल्प स्थाननिश्चितीच्या संदर्भात कित्येकदा आधार घेतला जातो.

अर्थात हे करीत असताना, विविध प्रदेशांतील योजनांचा परस्परांशी समन्यय साधला पाहिजे व त्या राष्ट्रीय स्तरावरील नियोजनाशीही सुसंगत असल्या पाहिजेत. प्रादेशिक स्तरावरील योजनेच्या उद्दिष्टांचा राष्ट्रीय योजनेच्या उद्दिष्टांशी मेळ घालून हे साधता येते. तिसरा टप्पा म्हणजे या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी कार्यक्रम आखणे. सुसंगत कार्यक्रमांची सुयोग्य आखणी करून त्यांचा अग्रक्रम व स्थान निश्चित करावे लागते. तसेच ठरविलेले कार्यक्रम अंमलात आणण्यासाठी जरूर ती शासनयंत्रणा उभी करावी लागते. शासनयंत्रणेचे स्वरूप हे योजनेच्या गरजेनुसार ठरत असते. तसेच ती निर्माण करताना केंद्रीकरण वा विकेंद्रीकरण हा प्रश्न तर सोडवावा लागतोच; शिवाय योजनेच्या कार्यवाहीसाठी कराव्या लागणाऱ्या वित्तव्यस्थेविषयीही निर्णय घ्यावे लागतात.

## ७.७ जिल्हा नियोजन यंत्रणा

**जिल्हा नियोजन-** भारताच्या प्रशासकीय यंत्रणेतील पायाभूत प्रादेशिक घटक जिल्हा आहे. बहुस्तरीय नियोजन प्रक्रियेत जिल्हा या प्रादेशिक क्षेत्राच्या विकासासाठी जे नियोजन करण्यात येते त्यास जिल्हा नियोजन असे म्हणतात. जिल्हा नियोजनाची संकल्पना विशद करताना नियोजन मंडळाने असे मत व्यक्त केले होते की, **"जिल्ह्याच्या प्रादेशिक क्षेत्रात उपलब्धअसणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्ती आणि मनुष्यबळाचा पर्याप्त उपयोग करून जिल्ह्यातील लोकसमुदायाचा विकास साध्य करण्याची प्रक्रिया म्हणजे जिल्हा नियोजन होय."** राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील नियोजन प्रक्रियेप्रमाणेच जिल्हास्तरीय नियोजनात उपलब्ध असलेल्या साधनसंपत्ती आणि मनुष्यबळाचा आढावा घेतला जातो. जिल्ह्याच्या विकासविषयक गरजानिर्धारित केल्या जातात. विकासाचे अग्रक्रम निश्चित केले जातात. साधनसंपत्तीची जुळवाजुळव केली जाते आणि निर्धारित कालावधीत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्याचा प्रयत्न केला जातो. जिल्ह्याच्या नियोजन आणि विकास प्रक्रियेबाबत निर्णय लोकप्रतिनिधीमार्फत व त्याची प्रशासकीय यंत्रणा या निर्णयांची कार्यवाही करते. अशा प्रकारे जिल्हा स्तरावरील नियोजन प्रक्रियेत निर्णय घेणे आणि निर्णयांची कार्यवाही करणे या दोन्ही कृती केल्या जातात.

जिल्हा नियोजन हे वास्तव अर्थाने जिल्ह्याच्या तालुक्यांचे नियोजन असते. म्हणजेच जिल्ह्याचे उपघटक असलेल्या सर्व तालुक्यांमध्ये विकासाची योजना तयार करण्यात येते आणि सर्व तालुक्यांच्या विकासासाठीच्या समग्र नियोजनास जिल्हा नियोजन असे म्हणतात.

समग्र जिल्ह्याच्या विकासविषयक गरजांचा विचार करण्यात येतो, आणि त्यानुसार तालुक्यांच्या विकास आराखड्यात समन्वय प्रस्थापित करण्यात येतो. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन विभाग (District Planning Cell) स्थापनकरण्यात आला आहे. हा विभाग जिल्हा नियोजन अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणारा विशेषज्ञांचा गट आहे. त्यात अर्थतज्ञ, सांख्यिकी विशारद आणि भौगोलिक विशारदांचा समावेश

असतो. हा विभाग पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांच्या सहकार्याने तालुक्याची विकास

योजना तयार करतो. सर्व तालुक्यांच्या विकास योजनांवर आधारित जिल्ह्याच्या विकास योजना

आराखडा तयार करण्यात येतो आणि जिल्हा नियोजन समिती समोर सादर करण्यात येतो.

**जिल्हा नियोजन यंत्रणेची कार्यपद्धती:**

नियोजन मंडळाने जिल्हा नियोजनाची कार्यपद्धती तयार केली आहे. त्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा जिल्हा नियोजन यंत्रणेद्वारे तयार करण्यात येतो.

**१) प्राथमिक आराखडा (Preliminary Framework) -** प्राथमिक आराखडा तयार करणेम्हणजे भविष्याबद्दल अंदाज, उद्दिष्टे, अपेक्षा आणि अग्रक्रम यांच्यासंबंधी एक स्थूल मसुदा तयार करणे हे काम पार पाडण्यासाठी पुढील बाबी कराव्या लागतात.

(अ) संख्याशास्त्रीय माहितीची कोष्टके भरणे.

(ब) जिल्हा विकासाच्या विविध बाजूसंबंधी टिपणे तयार करणे तसेच जिल्ह्याच्या विविध उपविभागातील परिस्थिती आणि समस्या, जिल्ह्यात चालू असलेल्या योजनांचे यश, उणिवा, पुढील पाच वर्षांतील कृती किंवा कार्यक्रमांबद्दल सूचना इत्यादी विषय समाविष्ट केलेले असतात

**२) सुधारितआराखडा (Revised Framework) -** सुधारित आराखड्यामध्ये सुद्धा भविष्यकाळासंबंधी उद्दिष्टे, अपेक्षा अग्रक्रम ठरवून दिले जातात. हे काम तीन पायऱ्यांनी केले जाते.

(अ) विकासगट अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाते.

(ब) प्रत्यक्ष काम करणाऱ्या किंवा कृतिशील सक्रिय लोकांच्या गटांशी चर्चा केली जाते. उदा. शेतकरी, उद्योजकांचा समूह, निरनिराळ्या संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली जाते. उदा. सहकारीसंस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, बँका आणि पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली जाते.

**३) दीर्घकालीन आणि अल्पकालीन व्यूहरचना -** जिल्हा नियोजन यंत्रणेत जिल्ह्यातील उपलब्ध साधनसंपत्ती व मनुष्यबळाचा विचार करून दीर्घकालीन तसेच काही अल्पकालीन व्यूहरचना तयार केल्या जातात. त्याकरिता जिल्ह्यातील विविध विभागांतील अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाते. तसेच जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त सभा घेऊनत्यांच्याशी एकत्रितपणे चर्चा केली जाते.

**४) योजना किंवा योजनेची रूपरेषा तयार करणे -** हे काम चार टप्प्यातून पार पाडले जाते.

(अ) जिल्ह्याची विविध उपप्रदेशात किंवा उपविभागात विभागणी केली जाते. हे उपप्रदेश किंवा प्रादेशिक उपविभाग एकजिनसी किंवा एकसंध असतील. कृषी हवामान व आर्थिकदृष्टीने असे उपविभाग पाडले जातात.

(ब) नकाशा विश्लेषणाच्या साहाय्याने सध्या अस्तित्वात असलेल्या विकासाच्या पातळीचा अंदाज घेतला जातो. त्या भागात असलेल्या सामाजिक व आर्थिकपरिस्थितीचे मूल्यमापन केले जाते. चालू असलेल्या विकास-कार्यक्रमांच्या यशापयशाचा आढावा घेतला जातो.

(क) विकासासाठी योजना किंवा प्रकल्प तयार करण्याचे काम केले जाते. यामध्ये विविध प्रादेशिक उपविभागासाठी विकासाची व्यूहरचना ठरविली जाते. याकरिता मुख्य व्यवसाय व जोडव्यवसायांचा शोध घेतला जातो आणि त्यांच्या विकासासाठी संरचनात्मक आधार आणि सेवांचा पुरवठा केला जातो.

munotes.in

(ड) सर्व योजना एकत्र जमा करून योजनेचा आराखडा तयार केला जातो. योजनेत सुसंगती आणली जाते. विविध क्षेत्रांत एकात्मीकरण करून योजना सुसंवादी केली जाते.

**५) योजनेला अंतिम स्वरूप देणे -** यात दोन टप्पे असतात (अ) जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, अधिकारी संस्थांचे प्रतिनिधी यांची सभा घेऊन अंतिम योजना सादर केली जाते. (ब) त्यानंतर वरिष्ठ राज्य पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करूनयोजनेत आवश्यक असल्यास बदल केले जातात.

## ७.८ जिल्हा नियोजन यंत्रणेची रचना व कार्ये

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार जिल्हा नियोजन आणि विकासाची जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे सोपविण्यात आली. त्यानुसार २००० साली जिल्हा नियोजन विकास समित्या बरखास्त करण्यात आल्या. त्यांच्या जागी लोकप्रतिनिधी बहुसंख्य असलेली जिल्हानियोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयारकरण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बार्बीसाठी तरतूद करण्यासाठीमहाराष्ट्र शासनाने ९ ऑक्टोबर १९९८ रोजी महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम १९९८ मंजूर केला. यामध्ये सुधारणा करण्यासाठी "महाराष्ट्र जिल्हा समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम २०००" दिनांक ४ मे २००० रोजी प्रसिद्ध करण्यात आला,

जिल्हा नियोजन समितीची रचना: जिल्हा नियोजन समितीमध्ये कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ५० सदस्य असतील.

१. २० लाखांपर्यंत लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ३० सदस्य

२. २० ते ३० लाख लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ४० सदस्य

३. ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ५० सदस्य असतील.

**पदसिद्ध सदस्य** - जिल्ह्याचा पालकमंत्री या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष व जिल्हाधिकारी पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषदेचा मुख्याधिकारी, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष,तीन विषय समित्यांचे सभापती व तीन पंचायत समितीचे सभापती त्यांचे सदस्य असतात. या व्यतिरिक्त जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांचे प्रतिनिधी सदस्य असतात. जिल्हा स्तरावरील विकासाशी संबंधित खात्यांचे अधिकारी आणि शेती, सहकार, समाजसेवा, उद्योग इत्यादी क्षेत्रांतील काही नामवंत व्यक्तींची बिगर-शासकीय सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येते.

जिल्हा नियोजन समितीच्या कोणत्याही बैठकीस अध्यक्ष गैरहजर असल्यास, समितीचे सदस्य आपल्यामधील एकाची सभेचा अध्यक्ष म्हणून निवड करू शकतील.

munotes.in

जिल्हा नियोजन समितीमध्ये निवडणुकीने भरावयाच्या जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचितजमाती, मागासवर्ग व स्त्रियांसाठी त्या त्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**सदस्यांना काढून टाकणे** - राज्यशासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जिल्हा नियोजन समितीच्या सदस्याला पुढील बाबतीत पदावरून काढू शकेल.

१) संबंधित सदस्यांच्या महानगरपालिका, नगरपालिका अथवा जिल्हा परिषदांमधील योजना अथवा कार्यक्रमात परियोजना अथवा कामामध्ये आर्थिक हितसंबंध असल्यास.

२) अस्तित्वात असलेल्या कायद्यामधील तरतुदीत अन्वय शिक्षापात्र, नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबदल दोषी असल्यास.

३). निवडणूक विनंती अर्जाच्या न्याय चौकशीत भ्रष्टाचाराबल दोषी असल्यास. जिल्हा नियोजन समितीची कामे। राज्यशासन अधिसूचनाद्वारे खाली नमूद केलेली सर्व अथवा काही कामे जिल्हा नियोजन समितीकडे सोपवील.

१) जिल्हयातील पंचायती आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेणे आणि एकत्रित करणे व संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार

२) पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना विचारात घेणे आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी पंचवार्षिक योजना आणि सम्यकदी मसुधाचे समन्वय करणे व ती तयार करणे,

३) जिल्हा वार्षिक योजनेचा प्रगतीचा आढावा घेणे आणि सनियंत्रण करणे,

४) राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्यानुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदींचे पुनर्विनियोजन करण्याची सूचना करणे,

५) विकास योजनेच्या मंजूर मसुद्याची अध्यक्षांमार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे

## ७.९ सारांश

स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून भारतात १५ मार्च १९५० रोजी नियोजन मंडळाची स्थापना केली गेली. लोकशाही विकेंद्रीकरणाला महत्त्व देऊन राष्ट्रीय, आंतरराज्य, राज्य, जिल्हा स्तरावर नियोजनाची प्रक्रिया राबविली गेली. बहुस्तरीय नियोजन प्रक्रियेचा स्वीकार करून जिल्हा नियोजन यंत्रणा राष्ट्रीय नियोजन व राज्य नियोजन यंत्रणेप्रमाणेच निर्माण केली गेली.

munotes.in

प्रत्येक स्तरावरील यंत्रणेला स्वायत्त अधिकार, निर्णय स्वातंत्र्य व पुरेसे आर्थिक पाठबळ दिले गेले. भारतातील प्रशासकीय यंत्रणेतील पायाभूत प्रादेशिक घटक जिल्हा आहे. त्याचप्रमाणे जिल्हा नियोजन यंत्रणेस विकासाच्या प्रक्रियेत समाविष्ट करण्यात आले आहे.

## ७.१० स्वाध्याय

१) भारतीय नियोजनाची संकल्पना स्पष्ट करा,

२) बहुस्तरीय नियोजनाची वैशिष्ट्ये विशद करा,

३)बहुस्तरीय नियोजनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४) जिल्हा नियोजन यंत्रणेची कार्य पद्धती लिहा.

**५) टिपा लिहा**

१) जिल्हा नियोजन समितीची रचना.

२) ग्रामीण विकासासाठी नियोजन,

## ७.११ संदर्भ सूची


१) बंग के. आर. - भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, श्री. मंगेश प्रकाशन – नागपूर - २००५

२) पाटील बी.बी. - भारतीय शासन आणि राजकारण - फडके प्रकाशन, कोल्हापूर - २००६

३) पाटील व्ही. बी. - महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज संस्था - के.सागर पब्लिकेशन, पुणे - २००५

४) पवार जे.ई.. व्ही. ए., यादव चंद्रशेखर - पंचायत राज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ०७. २००४

५) वाउबुद्धे बी.एसी., भरतकर एस.आर. - विकेंद्रित नियोजन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ७ - २००४

६) कुलकर्णी अ.ना, - भारतातील स्थानिक स्वशासन विद्या प्रकाशन, नागपूर - २०००

७) कानेटकर मेधा - भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर - २००७


❖❖❖❖

# ८

# ग्रामीण विकासाचे नियोजन- II

**पाठाची रचना**


८.१ उद्दिष्टे

८.२ प्रस्तावना

८.३ जिल्हा नियोजनातील १९९२ नंतरचे बदल

८.४ ग्रामीण नियोजनात लोक-सहभागाची गरज.

८.५ लोकसहभागाचे महत्त्व -

८.६ लोकसहभागाच्या उदासीनतेची कारणे

८.७ लोकसहभाग वाढविण्याचे उपाय

८.८ लोकसहभाग आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका

८.९ स्वयंसेवी संस्थांच्या कार्याच्या मर्यादा

८.१० सारांश

८.११ स्वाध्याय

८.१२ संदर्भ सूची


## ८.१ उद्दिष्टे

- ग्रामीण विकासातील नियोजनात लोकसहभागाचे महत्त्व समजावून घेता येईल.
- लोकसहभागातील अडथळे न वाढविण्याचे उपाय अभ्यासता येतील
- ग्रामीण विकासातील स्वयंसेवी संस्थांची भूमिका अभ्यासता येईल.
- स्वयंसेवी संस्थांच्या कार्याच्या मर्यादा अभ्यासता येतील.
- स्वयंसेवी संस्था करीत असलेली कामे अभ्यासता येतील.

## ८.२ प्रस्तावना

लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग अतिशय महत्त्वाचा असतो हे आता सर्वमान्य झाले आहे. आमंडसारख्या राज्यशास्त्रज्ञाला सहभाग संस्कृती (Participatary Culture) असा शब्दप्रयोग करावा लागला. याचा अर्थ राजकीय प्रक्रियेत जनतेचा अर्थपूर्ण सहभाग (Meaningful participation of the people in the political process) अशा प्रकारचा अर्थपूर्ण सहभाग पाश्चात्त्य देशात आपणास दिसून येतो. तेथे शासक व जनता



munotes.in

यांच्यामध्ये संसूचनाची (Political Communication) साधने मोठ्या प्रमाणात विकसित झालेली असतात.

विकसनशील देशात मात्र अशी परिस्थिती नसते. आमंड या बाबतीत आज्ञांकित संस्कृती (subject culture) असा शब्दप्रयोग करतो. अशा देशात राजकीय संसूचनाची अनेक साधने विकसित झालेली असतात. परंतु बहुसंख्य लोकांना त्याची जाणीव नसते. तेथील लोकरूढी, परंपराप्रिय असतात. त्या देशातील लोक स्वतः पुढाकार घेऊन एखादे कृत्य करण्यापेक्षाकोणत्या तरी नेत्यामागे जाणे पसंत करतात. साहजिकच त्यामुळे जनतेचा सहभाग खऱ्या अर्थानेनसतो. साक्षरतेचे प्रमाण अल्प असते. जनता व शासन यांच्यामध्ये खूपच अंतर असते. आमंडच्या मते राज्यकर्त्यांची एक निराळीच संस्कृती असते.विकसनशील देशातील जनतेने जास्तीत जास्त प्रमाणावर राजकीय प्रक्रियेत सहभागी व्हावे यासाठी शासन व प्रशासन यांनी प्रयत्न करणे आवश्यक असते. असा सहभाग वाढला की विकासाच्या प्रक्रियेला ही गती येईल. अन्यथा केवळ शासकीय किंवा प्रशासकीय कार्यक्रम म्हणजे एकमार्गी प्रक्रिया होईल.

## ८.३ जिल्हा नियोजनातील १९९२ नंतरचे बदल

जिल्हा नियोजन यंत्रणेत १९९२ नंतरचे जे मूलभूत बदल झाले आहेत. ते ग्रामीणविकासासाठीच्या नियोजनात महत्वाचे परिवर्तन निर्माण करणारे म्हणून ओळखले जातात जिल्हा नियोजन यंत्रणेत पंचायत राज व्यवस्थेची महत्त्वाची भूमिका सुरुवातीपासूनच राहिली आहे. ७३व्या घटनादुरुस्ती नंतर पंचायत राज व्यवस्थेतील नियोजनाला अधिकच बळकटी प्राप्त करून दिली आहे.

पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांच्या कारकीर्दीत सप्टेंबर १९९१ मध्ये लोकसभेत पंचायत राज्यासंबंधीचे घटनादुरुस्ती विधेयक मांडले. त्या विधेयकारा लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ रोजी, तर राज्यसभेने त्यास २२ डिसेंबर १९९२ रोजी मान्यता दिली. २४ एप्रिल १९९३ पासून कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानाच्या २४३ व्या कलमात पंचायत राज व्यवस्थेची तरतूद २४३ ते अनुच्छेद २४३ (ओ) करण्यात आली आहे. या कायद्यानुसार भारतीयसंसदेत ११वे परिशिष्ट जोडण्यात आले आहे. त्यानुसार ग्राम, तालुका जिल्हा पातळीवर नियोजन केलेले आहे.

७३ व्या घटनादुरुस्तीनुसार जिल्हा नियोजन आणि विकासाची जबाबदारी पंचायत राज संस्थांकडे सोपविण्यात आली. त्यानुसार २००० साली जिल्हा नियोजन विकास समित्या बरखास्त करण्यात आल्या. त्यांच्या जागी लोकप्रतिनिधी बहुसंख्य असलेली जिल्हानियोजन समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्ह्यातील पंचायती व नगरपालिका यांनी तयार केलेल्या योजना एकत्रित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयारकरण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बार्बीसाठी तरतूद करण्यासाठीमहाराष्ट्र शासनाने ९ ऑक्टोबर १९९८ रोजी महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिती (रचना व कामे) अधिनियम १९९८ मंजूर केला. यामध्ये सुधारणा

munotes.in

करण्यासाठी "महाराष्ट्र जिल्हा समिती (रचना व कामे) (सुधारणा) अधिनियम २०००" दिनांक ४ मे २००० रोजी प्रसिद्ध करण्यात आला,

जिल्हा नियोजन समितीची रचना: जिल्हा नियोजन समितीमध्ये कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ५० सदस्य असतील.

१. २० लाखांपर्यंत लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ३० सदस्य

२. २० ते ३० लाख लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ४० सदस्य

३. ३० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या जिल्ह्यासाठी ५० सदस्य असतील.

**पदसिद्ध सदस्य** - जिल्ह्याचा पालकमंत्री या समितीचा पदसिद्ध अध्यक्ष व जिल्हाधिकारी पदसिद्ध सचिव असतो. जिल्हा परिषदेचा मुख्याधिकारी, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, उपाध्यक्ष,तीन विषय समित्यांचे सभापती व तीन पंचायत समितीचे सभापती त्यांचे सदस्य असतात. या व्यतिरिक्त जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिकांचे प्रतिनिधी सदस्य असतात. जिल्हा स्तरावरील विकासाशी संबंधित खात्यांचे अधिकारी आणि शेती, सहकार, समाजसेवा, उद्योग इत्यादी क्षेत्रांतील काही नामवंत व्यक्तींची बिगर-शासकीय सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येते.

जिल्हा नियोजन समितीच्या कोणत्याही बैठकीस अध्यक्ष गैरहजर असल्यास, समितीचे सदस्य आपल्यामधील एकाची सभेचा अध्यक्ष म्हणून निवड करू शकतील.

जिल्हा नियोजन समितीमध्ये निवडणुकीने भरावयाच्या जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचितजमाती, मागासवर्ग व स्त्रियांसाठी त्या त्या प्रमाणात जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

**सदस्यांना काढून टाकणे** - राज्यशासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जिल्हा नियोजन समितीच्या सदस्याला पुढील बाबतीत पदावरून काढू शकेल.

१) संबंधित सदस्यांच्या महानगरपालिका, नगरपालिका अथवा जिल्हा परिषदांमधील योजना अथवा कार्यक्रमात परियोजना अथवा कामामध्ये आर्थिक हितसंबंध असल्यास.

२) अस्तित्वात असलेल्या कायद्यामधील तरतुदीत अन्वय शिक्षापात्र, नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबदल दोषी असल्यास.

३). निवडणूक विनंती अर्जाच्या न्याय चौकशीत भ्रष्टाचाराबल दोषी असल्यास. जिल्हा नियोजन समितीची कामे। राज्यशासन अधिसूचनाद्वारे खाली नमूद केलेली सर्व अथवा काही कामे जिल्हा नियोजन समितीकडे सोपवील.

१) जिल्हयातील पंचायती आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या जिल्हा वार्षिक योजना विचारात घेणे आणि एकत्रित करणे व संपूर्ण जिल्ह्यासाठी विकास योजनेचा मसुदा तयार

munotes.in

२) पंचायतींनी आणि नगरपालिकांनी तयार केलेल्या पंचवार्षिक योजना आणि सम्यकदर्शी योजना विचारात घेणे आणि संपूर्ण जिल्ह्यासाठी पंचवार्षिक योजना आणि सम्यकदी मसुधाचे समन्वय करणे व ती तयार करणे,

३) जिल्हा वार्षिक योजनेचा प्रगतीचा आढावा घेणे आणि सनियंत्रण करणे,

४) राज्य शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्यानुसार जिल्हा वार्षिक योजनेच्या मंजूर तरतुदींचे पुनर्विनियोजन करण्याची सूचना करणे,

५) विकास योजनेच्या मंजूर गसुद्याची अध्यक्षांमार्फत राज्य शासनाकडे शिफारस करणे. नियोजन मंडळाने जिल्हा नियोजनाची कार्यपद्धती तयार केली आहे. त्यातील मार्गदर्शक तत्त्वानुसार जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा जिल्हा नियोजन यंत्रणेद्वारे तयार करण्यात येतो.

**नियोजन मंडळाने जिल्हा नियोजनाची तयार केलेलीकार्यपद्धती**

**१) प्राथमिक आराखडा (Preliminary Framework) -** प्राथमिक आराखडा तयार करणेम्हणजे भविष्याबद्दल अंदाज, उद्दिष्टे, अपेक्षा आणि अग्रक्रम यांच्यासंबंधी एक स्थूल मसुदा तयार करणे हे काम पार पाडण्यासाठी पुढील बाबी कराव्या लागतात.

(अ) संख्याशास्त्रीय माहितीची कोष्टके भरणे.

(ब) जिल्हा विकासाच्या विविध बाजूसंबंधी टिपणे तयार करणे तसेच जिल्ह्याच्या विविध उपविभागातील परिस्थिती आणि समस्या, जिल्ह्यात चालू असलेल्या योजनांचे यश, उणिवा, पुढील पाच वर्षांतील कृती किंवा कार्यक्रमांबद्दल सूचना इत्यादी विषय समाविष्ट केलेले असतात

**२) सुधारित आराखडा (Revised Framework) -** सुधारित आराखड्यामध्ये सुद्धा भविष्यकाळासंबंधी उद्दिष्टे, अपेक्षा अग्रक्रम ठरवून दिले जातात. हे काम तीन पायऱ्यांनी केले जाते.

(अ) विकासगट अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाते.

(ब) प्रत्यक्ष काम करणाऱ्या किंवा कृतिशील सक्रिय लोकांच्या गटांशी चर्चा केली जाते. उदा. प्रगत शेतकरी, उद्योजकांचा समूह, निरनिराळ्या संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली जाते. उदा. सहकारी

संस्थांचे प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, बँका आणि पंचायत राज संस्थांचे प्रतिनिधी यांच्याशी चर्चा केली जाते.

**३) दीर्घकालीन आणि अल्पकालीन व्यूहरचना -** जिल्हा नियोजन यंत्रणेत जिल्ह्यातील उपलब्ध साधनसंपत्ती व मनुष्यबळाचा विचार करून दीर्घकालीन तसेच काही अल्पकालीन व्यूहरचना तयार केल्या जातात. त्याकरिता जिल्ह्यातील विविध विभागांतील अधिकाऱ्यांशी चर्चा केली जाते. तसेच जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त सभा घेऊनत्यांच्याशी एकत्रितपणे चर्चा केली जाते.

**४) योजना किंवा योजनेची रूपरेषा तयार करणे -** हे काम चार टप्यातून पार पाडले जाते.

(अ) जिल्ह्याची विविध उपप्रदेशात किंवा उपविभागात विभागणी केली जाते. हे उपप्रदेश किंवा प्रादेशिक उपविभाग एकजिनसी किंवा एकसंध असतील. कृषी हवामान व आर्थिकदृष्टीने असे उपविभाग पाडले जातात.

(ब) नकाशा विश्लेषणाच्या साहाय्याने सध्या अस्तित्वात असलेल्या विकासाच्या पातळीचा अंदाज घेतला जातो. त्या भागात असलेल्या सामाजिक व आर्थिकपरिस्थितीचे मूल्यमापन केले जाते. चालू असलेल्या विकास-कार्यक्रमांच्या यशापयशाचा आढावा घेतला जातो.

(क) विकासासाठी योजना किंवा प्रकल्प तयार करण्याचे काम केले जाते. यामध्ये विविध प्रादेशिक उपविभागासाठी विकासाची व्यूहरचना ठरविली जाते. याकरिता मुख्य व्यवसाय व जोडव्यवसायांचा शोध घेतला जातो आणि त्यांच्या विकासासाठी संरचनात्मक आधार आणि सेवांचा पुरवठा केला जातो.

(ड) सर्व योजना एकत्र जमा करून योजनेचा आराखडा तयार केला जातो. योजनेत सुसंगती आणली जाते. विविध क्षेत्रांत एकात्मीकरण करून योजना सुसंवादी केली जाते.

**५) योजनेला अंतिम स्वरूप देणे -** यात दोन टप्पे असतात (अ) जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, अधिकारी संस्थांचे प्रतिनिधी यांची सभा घेऊन अंतिम योजना सादर केली जाते. (ब) त्यानंतर वरिष्ठ राज्य पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करूनयोजनेत आवश्यक असल्यास बदल केले जातात.

**ग्रामीणविकासासाठीच नियोजनचे**

**१) त्रिस्तरीय पंचायत राज** - ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार प्रत्येक घटक राज्यात गाव,तालुका व जिल्हापातळीवर ग्रामीण विकासासाठी नियोजन करण्यात आले आहे. पंचायत राज संस्थांची निर्मिती केली गेली आहे.

**२) ग्रामसभा** - ग्रामपातळीवर ग्रामसभेची १९९२ नतर निर्मिती करून गावातील योजना व कार्यक्रमासंदर्मात (गावाच्या) नियोजन केलेले आहे. कलम २४३ (अ) नुसार ग्रामसभेच्या निर्मितीची व अधिकाराची तरतूद केलेली आहे.

**३) पंचायतीची रचना** - ग्रामीण विकासाचे नियोजनात सुसूत्रता व सुलगीकरण याये याकरता कलम २४३ (क) मध्ये पंचायतीची स्थापना केलेली आहे.ग्रामपातळीवरील सर्वात कनिष्ठ स्तर म्हणून ग्रामपंचायती ओळखल्या जातात. संपूर्ण गावाचे व परिसराचे नियोजन हेग्रामपंचायतीकडून होत असते.

**४) आरक्षणाची व्यवस्था** - भारतीय राज्यघटनेच्या २४३ (ड) नुसार पंचायत राज्यातील संस्थांमध्ये ग्रामीण समाजाच्या सर्वांगीण विकासाकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गांना लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची तरतूद केलेलीआहे.



munotes.in

**५) पंचायत राज संस्थांचा कार्यकाल** - कलम २४३ (इ) नुसार ७३ व्या घटनादुरुस्तीनुसार ग्रामीण विकासाच्या नियोजनाकरिता पंचायत राज संस्थांचा कार्यक्रम हा पाच वर्षांकरिता निश्चित करण्यात आला आहे.

**६) पंचायत राज संस्थांचे अधिकार व कार्ये** - जिल्हा नियोजन यंत्रणेतील नियोजन प्रक्रियेत पंचायतराज संस्थांचे अधिकार व कार्ये निश्चित केलेले आहेत. आर्थिक विकास, सामाजिक न्याय, यासाठी योजना तयार करणे आणि अशा योजनांची अंमलबजावणीकरणे. या संबंधी २९ विषयांची यादी संविधानाच्या ११ व्या अनुसूचीत दिलेली आहे.

**७) आर्थिक अधिकार -** ग्रामीण आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक सर्वागिण विकासाकरिता जिल्हा नियोजनात पंचायत राज संस्थांना आपापल्या कार्यक्षेत्रात कर स्वरूपात आर्थिक अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.अशा रीतीने पंचायत राज संस्थेचे नियोजनव्यवस्थापन हे जिल्हा नियोजनात १९९२ नंतर ७३व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आलेले आहे.

## ८.४ ग्रामीणनियोजनात लोक-सहभागाची गरज:

नियोजन करत असताना काही मूठभर त्रयस्थ लोकांनी लोकांसाठी नियोजन न करता लोकसहभागातून लोकांच्या गरजा समजावून घेणे, त्या गरजांनुसार नियोजन करणे व त्या सेवांवर लोकसहभागामधून देखरेख ठेवणे या प्रक्रियेला विकेंद्रीत-लोकसहभागी नियोजन प्रक्रिया असे म्हणतात.

अर्थकारणाचे उदारीकरण व मुक्त व्यापाराचे धोरण यामुळे अधिकारांचे विकेंद्रीकरण मोठ्या प्रमाणात चालू झाले. सध्याच्या घडामोडींकडे पाहता विकेंद्रीकरण फक्त राजकारणापुरते मर्यादित न राहता ते व्यवस्थापन, अर्थकारण व प्रशासन या घटकांमध्ये देखील आहे. अधिक ठोस बोलायचे झाल्यास विकेंद्रीकरण म्हणजे नियोजनाचे हक्क स्वामित्त्व, निर्णय घेण्याचा अथवा नियोजन व व्यवस्थापन करण्याचा अधिकार केंद्रशासन व त्यांच्या विभागाकडून स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायतराज संस्था, शासनाच्या खालच्या दर्जाचे विभाग, निमशासकीय मंडळ, विभागीय मंडळ किंवा स्वयंसेवी संस्था यांना दिले जाणे.

## ८.५ लोक-सहभागाचे महत्त्व

लोकसहभागाचे विकासप्रक्रियेतील स्थान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील अहमदनगर हा तसा दुष्काळी जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारेंनी राळेगणसिद्धीचा विकास हा लोकसहभागातून घडवून आणला व ग्रामीण विकासाचे आदर्श मॉडेल म्हणून आज राळेगणसिद्धी जगप्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील हिवरेबाजारचे सरपंच श्री. पोपटराव पवारांनीसुद्धा लोकसहभागातून गावाचा सर्वांगीण विकास साधलाआहे. यावरून जर विकास प्रक्रियेत लोकसहभागाचे महत्त्व खालीलप्रमाणे विशद करता येईल.

munotes.in

**१) योजनेमध्ये एकी व चैतन्य निर्माण करण्यासाठी -** राजकीय व विकास प्रक्रियेत जर लोकांचा सहभाग व सहकार्य नसेल तर ती प्रक्रिया निर्जीव वाटते. लोकांच्या सहभागामुळे या प्रक्रियांना जिवंतपणा येतो. चैतन्य प्राप्त होते. तसेच जनतेला त्यामुळे अशा कार्यक्रमात, घोरणात आपुलकी आहे असे दिसून येते. राष्ट्राकडून जनतेच्या काही अपेक्षा असतात. त्या फलद्रूप व्हायच्या असतील, तर लोकसहभाग आवश्यक आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमांना जनतेचा पाठिंबा व मान्यता आहे असे दिसून येते. त्यामुळे शासनाकडून काहीतरी लादले जावे यावर भर देण्यापेक्षा जनतेकडून उत्स्फूर्तपणे सहभाग यावा याची काळजी घेतली पाहिजे.

**२) सामाजिक बदलासाठी आवश्यक -** विकसनशील देशात समाजाचे आधुनिकीकरण करण्याचे महत्त्वाचे काम असते. परंतु ते काम तितकेच अवघड असते. त्यामुळे राजकीय प्रयत्न केवळ अपुरे पडतात.देशाच्या पुनर्रचनेमध्ये जनतेचा सहभाग असणे आवश्यक असते. तसे केल्यामुळे जनता स्वतःच,स्वतःची शिल्पकार होते. हवा तसा विकास तिला घडवून आणता येतो. त्यामुळे विकासाच्या निरनिराळ्या टप्प्यावर जनतेचा सहभाग असलेला चांगले असते. विकासाचे निरनिराळे कार्यक्रम व योजना तयार करताना व त्याची कार्यवाही करताना जनतेचा सहभाग त्यास दिसला पाहिजे. त्यामुळे विकास कार्यक्रम हा दुसऱ्याचा आहे. आपला त्याच्याशी संबंध नाही. अशी भावना लोकांमध्ये ज्येष्ठ विधायक बळवंतराय मेहता समितीनेसुद्धा समाजविकास व राष्ट्रीय विस्तार योजना अपयशी ठरण्यामागचे प्रमुख कारण जनतेचा असहभाग व कार्यक्रमाबद्दल असलेली उदासीनता असे म्हटलेहोते. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एकदा म्हणाले होते, "शासनाला स्वतःच्या जबाबदारीवर काही गोष्टी करता येतील. परंतु विकासाची दीर्घकालीन व टिकाऊ स्वरूपाची फळे चाखायची असतील, तर शासनाचे प्रयत्न व जनतेचा सहभाग यामध्ये समतोल साधला पाहिजे." विशेषतः सामाजिक बदलासारख्या गोष्टी जनतेवर लादून होत नाहीत. बदलत्या परिस्थितीची दखल घेऊन जनतेनेआधुनिक मूल्यांचा स्वतःहून स्वीकार केला तर समाज खऱ्या अर्थाने विकसित होतो व प्रगती करतो.

**३) जनतेचे कल्याण व भरभराटीसाठी** - विकसनशील देशात विकासाची कल्पना व्यापकअर्थाने घेतली जाते तिच्यामध्ये जीवनाच्या सर्वांगीण विकासाचा विचार केला जातो.त्यामुळे राष्ट्र उभारणीच्या कार्यात नागरिकांना सहभागी होण्याची पूर्ण संधी मिळते.जनतेत उत्साह निर्माण होतो. त्याचा उपयोग विकासकार्यासाठी चांगल्या प्रकारे करून घेता येतो. जनतेचे सहकार्य प्रामुख्याने स्थानिक पातळीवरील कार्यक्रमापासून चांगल्या प्रकारे मिळवता येते. अशा वेळी शासनाने आर्थिक मदत द्यावी व जनतेच्या उत्स्फूर्तसहकार्याचा उपयोग करून घ्यावा. त्यामुळे जनतेलाही असे वाटते की ती स्वतःच्या विकासात सहभागी होत आहे. ग्रामीण विकासाच्या नव्या संकल्पनेतलोकसहभागाला अतिशय महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात प्रशासनाने जलस्वराज्य, हगणदारीमुक्त गाव, संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान इत्यादी ग्रामीण विकासाचे कार्यक्रम लोकसहभागातून पूर्णत्वास नेले आहेत.

**४) लोकांच्या जीवनमानात वाढ होते -** विकसनशील देशाच्या सर्वागिण विकासाकरिता लोकांच्या जीवनमानात वाढ होणे अपेक्षित असते. स्वर्गीय राजीव गांधी यांनी पंतप्रधान

असताना आपल्या भाषणात म्हटले होते की, देशात केंद्र पातळीवर जेव्हा ग्रामीणगरिबाकरिता एक रुपया खर्च केला जातो त्यापैकी फक्त पंधरा पैसेच ग्रामीण भागात जाऊन पोहोचतात. ग्रामीण विकासात जर लोकसहभाग वाढला, तर राबविलेल्या योजना व कार्यक्रमांना जिवंतपणा येणार आहे. अशा योजना व कार्यक्रम यशस्वी झाले तर लोकांच्या जीवनमानात वाढ होईल.

## ८.६ लोकसहभागाच्या उदासीनतेची कारणे

लोकांचा विकास प्रक्रियेतील सहभागाच्या अभावाला उदासीनता असे म्हणतात. भारताला स्वातंत्र्यप्राप्ती होऊन ६४ वर्षे झाली तरी हव्या त्या प्रमाणात विविध सरकारी योजना व कार्यक्रमांमध्ये जनतेचा सहभाग पुरेशा प्रमाणात दिसून येत नाही. गाव, खेड्यात राबविल्या जाणाऱ्या विविध योजना गावकऱ्यांना सरकारी मालकीच्या वाटतात. भारतीय जनतेचे असलेलेअज्ञान हे त्याकरिता प्रमुख कारण, तर सरकारी कामांबद्दल लोकांच्या मनात असलेली अनास्थाहोय, ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी संदर्भात असाच अनुभव येतो.

**१) कमी राजकीय जागृती** - भारतात ग्रामीण लोकांमध्ये निरक्षरता जास्त आहे. आता कुठेभारतात शिक्षणाचा प्रसार होतो आहे. अज्ञानामुळे लोकांना कमी राजकीय जाणीव,जागृती आहेत. त्यामुळे लोकसहभागाचा अभाव आहे.

**२) पारतंत्र्याचा परिणाम** - भारतात १५० वर्षे कालावधीपर्यंत परकीयांचे राज्य होते. त्याचादूरगामी परिणाम भारतीय समाजव्यवस्थेवर झालेला आहे. सरकारबद्दलचा हा विश्वास कालांतराने दृढ होत गेला त्यामुळे शासनाबद्दल आपुलकी न वाटता नाराजी व नंतरच्या काळात संताप वाटू लागला. दिवसेंदिवस शासन व जनता यांतील अंतर वाढत गेले.

**३) परावलंबनाची सवय** - सर्व विकास, सर्व काही गोष्टी शासनाने किंवा आणखी कोणीतरी कराव्यात असे तिला वाटते व त्यातूनच असहाय्यता, परावलंबित्व, उदासीनता, निष्काळजीपणा असे दुर्गुण वाढत गेले याचा परिणाम म्हणजे विकासकार्यात सातत्यता वस्थायी विकास प्रक्रियेला अडथळे येत आहेत.

## ८.७ लोकसहभाग वाढविण्याचे उपाय

विकास कार्यक्रमांना यश यावयाचे असेल, तर जनता उदासीन राहून चालणार नाही. विशेषत- आधुनिक काळात अनेक ठिकाणी कल्याणकारी राज्याची कल्पना स्वीकारलेली आहे. भारतात लोकशाहीची कल्पना जनतेपर्यंत पोहोचवून राबवायची असेल, तर लोकसहभाग अतिशय आवश्यक आहे. त्याकरिता पुढील उपायांचा विचार करावा लागेल.

**१) संघटनात्मक पातळीवर बदल** - लोकांच्या उदासीनतेचे महत्त्वाचे कारण म्हणजे आर्थिकतरतुदींची कमतरता, पुरेसे अधिकारी नसणे, अपुरी नागरी सेवा केंद्रे, याकरिता संघटनात्मक पातळीवर बदल करणे गरजेचे आहे.

munotes.in

**२) सेवाभावी संस्था -** पाश्चात्त्य देशात सेवाभावी संस्था जनतेच्या सहकार्यासाठी व सहभागासाठी प्रयत्न करताना दिसतात. या सेवाभावी संस्था लोकशाही शासनसंस्थेची पाळेमुळे दृढ करतात. अमेरिकेसारख्या देशात कायदेपंडित, इंजिनीयअर्स, शिक्षक, डॉक्टर्स यांच्या व्यावसायिक संस्था या कार्यासाठी वाहून घेताना दिसतात. सेवाभावी संस्था आपल्या व्यवसायाशी एकनिष्ठ असतानाच शिवाय महिला मंडळ, युवक मंडळे, विविध क्लब इत्यादींच्या माध्यमातून समाजपरिवर्तनासाठी मदत होईल व त्याचबरोबरविकासकार्यात नागरिकांना सहभाग वाढविण्यात त्यांची मदत होईल.

**३) नागरिकांना प्रशिक्षण देणे** -लोकसहभाग वाढवायचा असेल व विकास प्रक्रियेचा वेगवाढविण्याकरिता लोकांना विकासकार्यात सहभागी होण्याबाबत विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. प्रदर्शने, वस्तुसंग्रहालये, ग्रामीण नृत्य गीते, पुस्तिका,नकाशे यांचा वापर करून घेता येईल.

## ८.८ लोकसहभाग आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका

प्रस्तावना स्वातंत्र्योत्तर कालखंडापासून ग्रामीण भागात विकासाची कार्ये करणाऱ्या (NonGovernment Organization) (NGOs) ज्यांना मराठीमध्ये स्वयंसेवी संस्था/संघटना म्हणतात.ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत त्यांच्या सहभागाला अधिकृत मान्यता शासनाने दिली आहे. विविध शासकीय योजना व कार्यक्रमांची कार्यवाही करण्याची जबाबदारी स्वयंसेवी संस्थांकडेसोपविण्यात आली आहे. स्वयंसेवी संस्था याचा अर्थ सेवाभावी वृत्तीने कोणत्याही नफ्याची अपेक्षा न करता काम करणाऱ्या खाजगी संस्था, त्यांच्यावर बाह्य नियंत्रण नसते, आयकरात त्यांना सूट दिली जाते. अशा संस्था जनतेकडून वर्गणी, देणगी, मदत गोळा करतात अनुदाने मिळवतात व आपला कारभार करत असतात. स्वयंसंस्थांमधील सभासद हे स्वेच्छेने सहभागी झालेलेअसतात. समाजकार्यात रस असलेले कार्यकर्ते स्वयंसेवी संस्थांचे सदस्य असतात. त्यामुळे विकासकार्यात शासनास या संस्थांचा फार चांगला उपयोग होतो. त्यामुळे अनेक ठिकाणी अशा संस्था आणि शासन परस्पर सहकार्याने काम करताना दिसतात. अशा स्वरूपाच्या स्वयंसेवी संस्था विकसित राष्ट्रात अधिक कार्यरत आहेत व त्या विकसनशील देशांना सहकार्य करताना दिसून येतात.

स्वयंसेवी संस्थांची विकास प्रक्रियेतील भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) जनतेचा सहभाग मिळवणे -** विकसनशील देशात समाज परिवर्तनाचे मोठे काम असते. परंतु अशा कामात सर्व कारभार राज्यावर टाकून चालणार नाही. त्यात जनतेचाच सहभाग कसा आवश्यक असतो याचे विवेचन आपण केलेले आहे. विकास कार्याचा पायामजबूत करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचे जाळे विणले पाहिजे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जनता अशा कार्यक्रमात सहभागी होईल.

**२) ग्रामीण विकासासाठी आवश्यक -** भारताच्या विकासकार्यात ग्रामीण विकासाला अनन्य महत्त्व आहे याचा विचार अनेक वेळा झाला आहे.स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी ग्रामीण जनतेला जागृत करण्याचे काम करतात. बदलत्या परिस्थितीची त्यांना जाणीव करून देतात व जनतेचा जास्तीत जास्त सहभाग कसा वाढेल याकडे लक्ष देतात.

सोप्याशब्दांत सांगावयाचे झाले तर ग्रामीण विकासाचे कार्यक्रम लोकप्रिय करावयाचे काम स्वयंसेवी संस्थांना करावे लागते.

**३) लोकशाही रक्षणासाठी आवश्यक** - लोकशाहीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यकअसते. शासनाचे अधिकार मात्र दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. वाढते कार्यक्षेत्र व वाढते अधिकार यामुळे शासनाच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष दबावापुढे व्यक्तिस्वातंत्र्याची जपणूक कशी करावी हा प्रश्न सर्वच देशांत पडलेला आहे. अशा वेळी स्वयंसेवी संस्थालोकशाहीच्या नागरी स्वातंत्र्याच्या रक्षणाचे काम फार परिणामकारकरीत्या करू शकतात.

**४) पूरक भूमिका** - कल्याणकारी राज्य या कल्पनेत राज्याचे कार्यक्षेत्र वाढत असले तरी राज्यदेखील कमी पडते. त्यामुळे राज्याच्या कार्यक्षेत्राबरोबर काही कामे असतात की जी स्वयंसेवी संस्थांना करता येतात. अशी कामे राज्याच्या कार्याला उपयुक्त पूरक ठरू शकतात. उदा. कुटुंब नियोजनाचे काम शासन घेऊ शकते. त्यातही स्वयंसेवी संस्था अशी कामे करू शकतात की जे राज्याला करता येणार नाही. खऱ्या अर्थानेकुटुंबनियोजनाचे महत्त्व लोकांमध्ये लोकप्रिय करण्याचे काम स्वयंसेवी संस्था करू शकतात

**५) सत्तेच्या केंद्रीकरणावर नियंत्रण** - शासनाच्या वाढत्या अधिकारांवर नियंत्रण राहण्यासाठी स्वयंसेवी संस्थांचा उपयोग होऊ शकतो. अशा संस्था जनतेला जास्तीत जास्त सहभाग करण्यासाठी प्रवृत्त करतात व त्यामुळे जनतेला पदोपदी राजकीय शिक्षण मिळते. त्यामुळे केंद्रीय पातळीवरील व प्रांतीय पातळीवरील सत्तेचे विकेंद्रीकरण झाले पाहिजे. परंतु त्याचबरोबर ही सत्ता स्वयंसेवी संस्थांनाही मिळाली पाहिजे. अशा प्रकारे स्वयंसेवी संस्थांचा दुहेरी उपयोग होतो. एका बाजूने सत्तेचे विकेंद्रीकरण होते, तर दुसऱ्या बाजूला त्या जनतेचा सहभाग वाढवितात.

**६) नवनवीन कार्याची क्षितिजे** - स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचा व्याप जसजसा वाढत जातो तसतसा जनतेच्या दैनंदिन स्वरूपाच्या अनेक तक्रारी कमी होत जातात. कारण या संस्थांच्या कामामुळे शासनावरील कामाचा ताण कमी होत जातो. त्याचबरोबर स्वयंसेवी संस्थांचे कार्य ऐच्छिक स्वरूपाचे असल्याने जर ते चांगले चालत असेल तर त्याकडे बुद्धिमान लोक आकृष्ट होतात. या सर्व प्रक्रियेमुळे या संस्था जनतेचा वाढत्या प्रमाणातविश्वास संपादन करतात. त्याचा उपयोग या संस्थांना वाढत्या कार्यासाठी होऊ शकतो. त्याप्रसंगी संशोधन करून कार्याची नवनवीन क्षितिजे धुंडाळू लागतात. सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक परिवर्तनाचे कार्य याबाबत स्वयंसेवी संस्था कामेकरताना दिसतात.

**७) आधुनिकीकरण व सामाजिक परिवर्तनाचे साधन** - भारतासारख्या विकसनशील देशातसामाजिक परिवर्तन, आधुनिकीकरण यांची फार आवश्यकता असते. यासाठी स्वयंसेवी संस्था हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. भारतात भारतसेवक समाज, राष्ट्रसेवा दल, युवक क्रांतीदल, भूदान संघ यासारख्या संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यात त्याचे दृष्टिकोन निरनिराळे असले तरी त्या आपआपल्या परीने सामाजिक परिवर्तनाचे काम करत असतात.

शासन या संस्थांच्या मदतीने व सहकार्याने विकास कार्यक्रम पार पाडू शकते. उदा. साक्षरता प्रसार, रोग निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन, रोटरी क्लब, लायन्स क्लब, जायन्टस् क्लब, महिला मंडळे, भजनी मंडळे, व्यायामशाळा इ. या सारख्या काही संस्था विकासकार्यात हातभार लावताना दिसतात. विद्यापीठे, महाविद्यालये व इतर शिक्षणसंस्था याही आपापल्या परीने विकास कार्यक्रम हाती घेऊ शकतात. उदा. प्रौढ शिक्षण, ग्रामीण पुनर्रचना, वृक्षारोपण, कुटुंबनियोजन, रक्तदान यासारखे राष्ट्रीयदृष्ट्या महत्वाचे कार्यक्रमहाती घेतले जातात. शिक्षण, बालकल्याण, आदिवासींसाठी सुधारणा कार्यक्रम, आरोग्य सुधारणा यासाठी चर्च, खालसा यासारख्या धार्मिक संस्था कार्य करताना दिसून येतात.

## ८.९ स्वयंसेवी संस्थांच्या कार्याच्या मर्यादा

भारतातील स्वयंसेवी संस्था व संघटनांच्या कार्याच्या काही मर्यादादेखील आहेत त्यापुढीलप्रमाणे

**१) नेतृत्व** : लोकशाहीच्या यशस्वितेसाठी सर्व स्तरावर ते नेतृत्व असावे लागते. भारतात याबाबत सर्वत्र बरीच मोठी उणीव भासते. स्वातंत्र्यपूर्व व काही काळ स्वातंत्र्योत्तर कालखंडात स्वयंसेवी संस्थांनी विविध स्वरूपाची कामे अंगीकारली होती. परंतु अलीकडच्या कालखंडात स्वयंसेवी संस्थांची सेवाभावी वृत्ती लोप पावत चालली आहे. सर्वजण स्वार्थी व सत्तेच्या मागे लागले आहेत असे वाटते. अशाप्रवृत्तीने विकासकार्याचीफारच मोठी हानी होत आहे.

**२) साधनांची कमतरता -** स्वयंसेवी संघटनांना करता येण्यासारखी कामे खूप आहेत. विशेषतः स्वातंत्र्योत्तर काळात तर या कामांचा व्याप खूप वाढला आहे. परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला अशी अडचण येते की वाढत्या कामाला लागणारा पैसा पुरेसा पडत नाही. त्यामुळे चांगली गुणवत्ता, प्रशासकीय कौशल्य व व्यावसायिक पदे यांची निष्पत्ती होऊ शकत नाही.

**३) जनतेचा पुरेसा सहभाग निर्माण करण्यात अपयश -** स्वयंसेवी संस्थांचा जसा व्हावा तसा

उपयोग होताना आढळून येत नाही. वास्तविक या संघटनांचा दबाव राजकीय सत्तास्पर्धेवर पडावा अशी अपेक्षा होती. त्याचप्रमाणे जनतेच्या तक्रारी या संघटनांच्या माध्यमाद्वारे कमी व्हाव्यात अशीही अपेक्षा होती. परंतु असे होताना दिसत नाही. स्वयंसेवीसंघटना जनतेचा पुरेसा सहभाग निर्माण करण्यात अपयशी ठरल्या आहेत.

**४) समन्वयाचा अभाव** - विविध स्वयंसेवी संघटनांमध्ये व स्वयंसेवी संघटनेच्या सभासदांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. अनेक संघटना एकाकीपणे काम करताना दिसतात. त्याचा शासनाच्या धोरणावर काहीही परिणाम होत नाही. अशा एकाकीपणे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेमध्ये समन्वयाचा अभाव असतो व अशा संघटनांचा राष्ट्रीय विकासावर फारसा परिणाम होत नाही.

**५) कामाची दिखाऊ वृत्ती -** अनेक वेळा केवळ प्रचारासाठी अगर प्रसिद्धीसाठी स्वयंसेवी संघटना वाढल्या जातात त्यांचे खरेखुरे व अपेक्षित असलेले उद्दिष्ट या संघटना चालकांना ठाऊकही नसते. केवळ दिखाऊपणा व काही लोकांनी समाजात मिरविण्यासाठी अशा संघटना चालविल्या जातात.

**स्वयंसेवी संस्था करीत असलेली कामे**

विकसनशील देशात स्वयंसेवी संस्था विविध प्रकारची कामे करताना दिसतात. यामध्ये आपद्ग्रस्तांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, विकास कार्यक्रम करणाऱ्या, आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्या, शेतीक्षेत्रात काम करणाऱ्या, समाजपरिवर्तनासाठी काम करणाऱ्या, महापूर, दुष्काळ, भूकंप, त्सुनामी इत्यादी नैसर्गिक आपत्तीवर काम करणाऱ्या अशा अनेक प्रकारचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आपल्याला दिसून येतात. स्वयंसेवी संस्थांच्या कार्याचे विभाजन पुढीलप्रमाणे करता येईल

**१) भौतिक स्वरूपाची कामे -** या कामामध्ये राष्ट्र उभारणीसाठी व विकासासाठी लागणाऱ्या भौतिक स्वरूपाच्या कामांचा समावेश होतो.उदा. रस्ते-बांधणी, पाटबंधारे, औद्योगिक उभारणी, बी-बियाणे, खते, पंप इत्यादी सारखी उत्पादने तयार करावयाची कामे. याकामांचा जनतेशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध येत असतो. रस्तेबांधणी, पूल, हॉस्पिटले बांधणे यांसारखी कामे करणाऱ्या स्वयंसेवी संस्था भारतात फारशा नाहीत. मात्र शेतीविषयक कामे करणाऱ्या संस्था त्यामानाने बऱ्याच आहेत. भारतातील हरितक्रांती घडून येण्यामध्ये

स्वयंसेवी संस्थांची भूमिका मोठी आहे. कृषीक्षेत्रात त्यांचे संशोधन ही महत्त्वाचे आहे.शेतीविषयक कामे करणाऱ्या स्वयंसेवी संस्था कॅनडा, युरोप, जर्मनी देशात बऱ्याच आहेत.त्यामुळे तेथे शेतीत भरभराट झालेली आहे.

**२) संस्थांचा विकास व सांस्कृतिक कामे -** स्वयंसेवी संस्थांचा सांस्कृतिक कार्यावर भर असतो. त्यामुळे निधी गोळा करणे, कार्यक्रम आयोजित करणे, अभ्यासगट स्थापन करणे, नाटक, संगीत इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होतो. समाजातील डॉक्टर्स, इंजिनीअर्स,वकील, व्यापारी इत्यादी लोक एकत्र येऊन सांस्कृतिक स्वरूपाची कामे हाती घेतात.

**३) शैक्षणिक संस्था -** पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालय स्तरावर स्वयंसेवी

संस्थांनी केलेले कार्य वाखाणण्यासारखे आहे. अनेक ठिकाणी या संस्था विविध त-हेच्या शैक्षणिक संस्था चालवितात. शासनाने त्यांचे महत्त्व ओळखून या संस्थांना पुरेशी आर्थिक मदत दिली पाहिजे. विविध राज्यांतील स्वयंसेवी संस्थांचे कामकाज वेगवेगळ्या स्वरूपाचे आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात जवळजवळ ८०पेक्षा जास्त महाविद्यालये खाजगी संस्थांनीचालविली आहेत. यामध्ये गोखले एज्युकेशन सोसायटी, रयत शिक्षण संस्था, डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांचे कार्य उल्लेखनीय आहे. १९६६च्या शिक्षाण समितीने खाजगी संस्थांच्या शैक्षणिक कार्याची प्रशंसा केली आहे. एकट्या शासन व्यवस्थेला

शिक्षणाची एवढी मोठी जबाबदारी पेलता आली नसती. ती जबाबदारी स्वयंसेवी संस्थांनी पार पाडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**४) ग्रामीण विकास -** ग्रामीण विकासासाठी पंचायत राज ही अधिकृत शासकीय संस्था आहे. परंतु त्याचबरोबर अनेक स्वयंसेवी संस्था या कामात शासनाला मदत करीत असतात याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अन्यथा एकट्या शासनावर ग्रामीण विकासाची व पंचायत राजची पूर्ण जबाबदारी पडली असती. ग्रामीण भागात दिवसेंदिवस सेवाभावीसंस्थांचे जाळे विणले जाऊ लागले आहे. त्या आपापल्या पद्धतीने विविध कामे करतातचशिवाय इतर कामे करतात. उदा. ग्रामीण लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी प्रयत्न करतात. शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे व वैयक्तिक आरोग्याकडे लक्ष पुरविणे. कुटुंबनियोजनाच्या कामाचा प्रसार करणे व त्याचे महत्त्व जनतेला पटवून देणे. ही सर्व कामे पंचायत राज संस्था अनेक कारणांमुळे करू शकत नाही. त्यातील एक म्हणजे शासनाकडे यासाठी लागणारा पुरेसा पैसा नसतो. दुसरी गोष्ट या कामासाठी लागणारे तळमळीचे कार्यकर्ते शासनाकडे नसतात.

## ८.१० सारांश

विकसनशील देशात नियोजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नियोजन व विकास प्रक्रियेत भारतासारख्या लोकशाही व्यवस्था असलेल्या देशात लोकसहभागाची गरज आहे. विकासाची कार्ये ही लोकांसाठी असतात याची जाणीव लोकांना होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर चिरस्थायी विकासाची संकल्पना साध्य करावयाची असेल, तर विकास व नियोजन प्रक्रियेत त्याचप्रमाणे स्वयंसेवी संघटनांमध्ये लोकसहभागाची गरज आहे. ग्रामीण विकासाच्या कार्यात स्वातंत्र्यपूर्व व उत्तर कालखंडात स्वयंसेवी संघटनांनी नेहमी महत्त्वाची भूमिका पार पाडलीआहे. ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेत लोकसहभाग व स्वयंसेवी संस्थांचा कार्यभाग महत्त्वपूर्ण असणार आहे यात शंका नाही.

## ८.११ स्वाध्याय

१) लोकसहभागाचे ग्रामीण विकासातील महत्त्व स्पष्ट करा.

२) लोकसहभागाच्या उदासीनतेची कारणे लिहा.

३) ग्रामीण विकासाच्या नियोजनातील स्वयंसेवी संस्थांची भूमिका स्पष्ट करा.

४) स्वयंसेवी संस्थांच्या मर्यादा लिहा.

**टिपा लिहा**

१) लोकसहभाग

२) स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व

३) स्वयंसेवी संस्थांच्या मर्यादा,

munotes.in

## ८.१२ संदर्भ सूची.


१) बंग के. आर. - भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य, श्री. मंगेश प्रकाशन - नागपूर - २००५

२) पाटील बी.बी. - भारतीय शासन आणि राजकारण - फडके प्रकाशन, कोल्हापूर - २००६

३) पाटील व्ही. बी. - महाराष्ट्रातील पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज संस्था - के.सागर पब्लिकेशन, पुणे - २००५

४) पवार जे.ई.. व्ही. ए., यादव चंद्रशेखर - पंचायत राज संस्थांचे प्रशासकीय व आर्थिक व्यवस्थापन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ०७. २००४

५) वाउबुद्धे बी.एसी., भरतकर एस.आर. - विकेंद्रित नियोजन, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे - ७ - २००४

६) कुलकर्णी अ.ना, - भारतातील स्थानिक स्वशासन विद्या प्रकाशन, नागपूर - २०००

७) कानेटकर मेधा - भारतीय नियोजनाची पन्नास वर्षे - श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर - २००७


❖❖❖❖

munotes.in